२०।१९८१९.

म. ग्रं. सं. ठाणें

विषय

सं. क्र. ९१०

REFBK-0001671

म. ग्रं. सं. ठाणें
इतिहास

गजानन प्रसन्न ॥



# संस्थानिक
# पटवर्धन घराण्याचा
# इतिहास.

## भाग पहिला.

REFBK-0001671

लेखक व प्रकाशक,
गोविंद विनायक आपटे.

मिती चैत्र शु॥ प्रतिपदा शके १८४१

किंमत २ रुपये.

# अनुक्रमणिका

पृष्ठ.


प्रस्तावना ....................

प्रकरण १ लें:— पूर्ववृत्तांत .................... १।२६

,, २ रें:— मूळवंशवृक्ष, मर्दुमकी व स्वामिसेवा .... २७।८८

,, ३ रें:— मंगळवेढें व आंबेकर .................... ८८।१०७
मिरज किल्ल्यांतील पटवर्धन. ........ १०७।११९
कुरुंदवाडकर, वाडीकर व कागवाडकर ११९।१४६

,, ४ थें:— सांगलीकर, मिरजकर व बुदगांवकर ... १४६।१७२

,, ५ वें:— जमखंडीकर, चिंचणीकर व तासगांवकर १७३।२४०
शेडसाळकर व लढाईचे सन ........ २४१।२४२
जंत्रीसंबंधी माहिती व जंत्री ........ २४२।२६४

# प्रस्तावना.

दक्षिणमहाराष्ट्रांत अदमासें दोनशें वर्षांपूर्वी कोंकणप्रांतांतून कोकणस्थ ब्राह्मणांचीं थोडीबहुत जीं घराणीं आलीं; त्या घराण्यांत ऐतिहासिकदृष्ट्या कोतवडेकर पटवर्धन घराणें विशेष प्रसिद्धीस आलें. याचें कारण या घराण्यांतील जितके पुरुष लढाईचे कामास आले, तितके दुसऱ्या कोणत्याच घराण्यांतील पुरुष लढाईचे कामास आले नाहींत. या शूर घराण्याचा इतिहास लिहून प्रसिद्ध करण्याचें काम हातीं घेऊन दोन वर्षें झालीं. यापूर्वी प्रथम 'आपटे घराण्याचा इतिहास' शके १८३६ त व 'बरवे घराण्याचा इतिहास' शके १८३८ त लिहून प्रसिद्ध केले. मीं ज्या पद्धतीनें सदरहु दोन घराण्याचे इतिहास लिहून प्रसिद्ध केले अशाच पद्धतीनें हा 'पटवर्धन घराण्याचा इतिहास' लिहून प्रसिद्ध केला आहे. इकडील प्रांतीं अशा पद्धतीचे घराण्याचे इतिहास आजपर्यंत दुसरे कोणीं प्रसिद्ध केल्याचें आढळत नाहीं. हा माझा तिसरा प्रयत्न असल्यामुळें वरील दोन्ही घराण्यांच्या इतिहासापेक्षां हा पटवर्धन घराण्याचा इतिहास मीं आपल्यापरी शक्य तितक्या व्यवस्थितपणें लिहिला आहे. तत्रापि ज्या उत्सुकतेनें हें काम मीं हातीं घेतलें ती उत्सुकता निष्फळ झाल्यामुळें हजार बाराशें पृष्ठांचा ग्रंथ, ज्यांत पटवर्धन वीरांच्या साद्यंत सर्व हकीकतींचा समावेश होऊन प्रसिद्ध व्हावयाचा तो फक्त द्रव्यबलाच्या अभावामुळें झाला नाहीं.

हरिभटबावांचें चरित्र, हरिवंशाची बखर, व श्रीमंत कै० आपासाहेब जमखंडीकर यांचें चरित्र इत्यादि पुस्तकांतील मी थोडथोडे उतारे घेतले आहेत. बावांचें चरित्र, हरिवंशाची बखर, ऐतिहासिक लेखसंग्रह व श्रीमंत कै० आपासाहेब जमखंडीकर यांचें चरित्र हीं पुस्तकें अत्यंत वाचनीय आहेत. ऐतिहासिक लेखसंग्रहाचे

भाग ह्मणजे केवळ ऐतिहासिक विषयांचें भांडार होय. या पटवर्धन घराण्याचा इतिहास साद्यंत परिपूर्ण माहितीसह पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याचें काम जरी विशेष खर्चाचें आहे; तरी पटवर्धन संस्थानिकांकडून तें सहज होण्यासारखें आहे. मला जर पटवर्धन संस्थानिकांकडून द्रव्याचें योग्य सहाय्य झालें असतें तर हें काम मी कोणातरी इतिहासज्ञाच्या सहाय्यानें पूर्ण केलें असतें. ज्यांनीं पटवर्धन संस्थानिकांचे कागदपत्रं आज दोन तपें अवलोकन केले व अद्यापि करीत आहेत; असे कट्टे इतिहासभक्त रा. वासुदेवराव वामनशास्त्री खरे यांच्याचकडून, पटवर्धन योध्यांच्या सर्व युद्धकला, पराक्रम वगैरे इतर पूर्ण माहितीसह मोठा ग्रंथ पटवर्धन संस्थानिकांनीं लिहवावा अशी माझी पटवर्धन संस्थानिकांस आग्रहाची सविनय विनंती आहे.

इतिहास विषयाचा मी भोक्ता असल्यामुळें, ऐतिहासिक विषयाची सेवा घडावी ह्मणून मीं ऐतिहासिक विषय लेखनद्वारा अभ्यास करण्याचा हा प्रयत्न चालविला आहे. या प्रयत्नांत दोषही असणारच ! ते दोष दिवसानुदिवसांनीं नाहींसे होण्याकरितां, इतिहासज्ञ वाचकांनीं सौम्य शब्दानें या अज्ञ लेखकास सुशिक्षित करावें अशी विनंती आहे. या पुस्तकांत मीं जें कांहीं लिहिलें आहे, तें कोणास दुखविण्याचे हेतूनें कांहींच लिहिलें नाहीं. योग्य तेंच लिहिलें आहे. तत्रापि लिहिण्यांत कांहीं चुकभूल झाली असल्यास, हरिभटबावांचे वंशज लेखकावर रोष करणार नाहींत अशी आशा आहे.

आपटे व बरवे या घराण्यांचे इतिहासासंबंधीं आतां कोणी माहिती विचारल्यास मिळणें शक्य नाहीं. मी प्रसिद्ध केलेल्या " संस्थानिक पटवर्धन घराण्याच्या " इतिहासासंबंधीं कोणी कांहीं माहिती विचारल्यास शके १८४१ अखेरपर्यंत शक्य ती माहिती दिली जाईल.

मिती चैत्र शु॥ प्रतिपदा शके १८४१<br>मु॥ श्रीक्षेत्र वांई ता. १।४।१९१९

लेखक,<br>गोविंद विनायक आपटे.



रणपटु परशुरामराव भाऊसाहेब यांनीं स्थापन केलेला
श्रीगणपति मु० तासगांव.



ब्रह्मीभूत हरिभटबाबा यांची समाधि, मु० पुणें.



श्री० कॅप्टन सर परशुरामराव भाऊसाहेब पटवर्धन
जमखंडीकर, के. सी. आय. ई.

# अर्पण पत्रिका.

श्रीमंत सरदार कॅप्टन सर **परशुरामराव भाऊसाहेब पटवर्धन जमखंडीकर** के. सी. आय. ई. यांना हा पटवर्धन घराण्याचा इतिहास अर्पण करण्याची मी विनंती केली असतां, श्रीमंतांनीं आज्ञा केली कीं. "आमचे मूळपुरुष ब्रह्मीभूत श्रीगजानन-भक्त हरिभटबाबा यांना अर्पण केल्यास आम्हांस विशेष आनंदकारक व भूषणा-वह होईल." श्रीमंतांची आज्ञा अत्यंत वंदनीय जाणून, श्रीमंतांच्याच कृपा-छत्राखालीं हा इतिहास ब्रह्मीभूत हरिभटबाबा यांच्या आत्म्यास अर्पण केला आहे.

लेखकः—**गोविंद विनायक आपटे.**

॥ श्री गजानन प्रसन्न. ॥

# पटवर्धन घराण्याचा इतिहास.

## प्रकरण १ लें.

### पूर्ववृत्तांत.

कोंकणप्रांतांत रत्नांगिरी शहरापासून ३।४ मैलांवर कासारवेल हा गांव आहे. ह्या गांवास लागून खाडी आहे. कासारवेलहून कोतवड्यास गाडीरस्ता आहे. रत्नांगिरीपासून कोतवडें अदमासें ११ मैल आहे. कसबे कोतवडें हा गांव साधारण खोऱ्यांत आहे ह्मटलें तरी चालेल ! ह्या गांवास लागून डोंगर आहे. अगदीं गांवास लागून असलेला उत्तरेकडील डोंगर वृक्ष व झाडीहीन आहे. हा डोंगर चढून खालीं उत्तरेकडे उतरल्याबरोबर नेवरें हा गांव आहे. हा कोतवड्याहुन साधारण एक कोस आहे. ह्या नेवरें गांवाहून अदमासें श्री पुळे हा गांव तीन कोस आहे. देशावर पेशवाईचे अमदानींत, गोविंद हरी, रामचंद्र हरी, गोपाळराव गोविंद, पुरुषोत्तमदाजी, परशरामभाऊ, निळकंठराव त्रिंबक, कोन्हेरराव त्रिंबक व रघुनाथराव निळकंठ वगैरे पटवर्धन वीरांनीं आपल्या बाहुबलांवर अतुल युद्धसंग्राम व एकनिष्ट स्वामिसेवा करून, दिगंत कीर्ती केली; त्यांचे पूर्वज कोतवडें येथील राहणार होत. ह्या पटवर्धन घराण्यांतील पहिले हरिभट पटवर्धन यांनीं कोतवडें येथील खोत सहस्त्रबुद्धे यांची उपाध्येपणाची वृत्ती संपादून हे कोतवडें गांवींच रहात असत. हरिभटास पुत्र तीन. बाळंभट, कृष्णंभट व रघुनाथभट; पहिले पुत्र बाळंभट यांस

पुत्र तीन; पहिले हरिभटबावा, दुसरे केशवभट व तिसरे विठ्ठलभट; हरिभटबावांचे चुलते रघुनाथभट; रघुनाथभटास पुत्र पांच; रघुनाथभटाचे वंशज शीळ येथें असतात ह्मणून यांस शिळकर पटवर्धन ह्मणतात. या घराण्यांतील पुरुष कोतवडेकर पटवर्धन यांच्या घराण्यांत बरेच दत्तक आले आहेत.

हरिभट यांची घरची स्थिति अत्यंत गरिबीची होती. तिघा बंधूंत हे वडील असल्यामुळें प्रपंचाची जबाबदारी यांचेच शिरावर होती. हरिभट हे मंदबुद्धीचे असल्यामुळें, यांचे हातून भिक्षुकीहि विशेष होत नसे. धाकट्या बंधूच्या व वडिलांच्या भिक्षुकीवरच प्रपंच चालला होता. प्रपंच्याच्या दगदगीस त्रासून एके वेळीं, बाळंभट एकाएकीं सहज बोलून गेले कीं, हरी! तूं जर वेद पूर्ण करून याज्ञिक ह्मटलें असतेंस तर अशी प्रपंचाची ओढाताण झाली नसती; यापेक्षां एरंडाचे जन्मास जातास तरी बरें झालें असतें!! हे वडिलांचे शब्द कानीं पडतांच हरिभटास अत्यंत वाईट वाटलें. हरिभट जरी मंद बुद्धीचे होते तरी मोठे निग्रही होते. त्याच दिवशीं हरिभटांनीं कायमचा निश्चय केला कीं, "कीर्तिदाता, विद्यादाता, धनदाता व सर्व विघ्नांचा हर्ता जो श्रीगजानन त्याची कृपा संपादण्याकरितां श्रीक्षेत्र गणपतीपुळे येथें जाऊन श्रीची सेवा करावयाची." ठरल्याप्रमाणें दुसरे दिवशीं कुलदेवी श्रीकरंजेश्वरी ईस व मातापित्यास वंदन करून श्रीगणेशसेवनार्थ मोठ्या भक्तीनें ते घरांतून निघाले. श्री पुळें येथें पोंचल्यावर श्रीगजाननाचें अत्यंत प्रेमयुक्त अंतःकरणानें दर्शन घेत जे समोर उभे राहिले ते तसेच अहोरात्र उभे होते. प्रातःकाळ होतांच प्रातर्विधी उरकून स्नान करून नंतर संध्यावंदनादि झाल्यावर, श्रीपुढें माध्यान्ह पावेतों उभे राहून ध्यान करीत. नंतर मधुकरी मागून आणून श्रीस नैवेद्य समर्पण करून भोजन करावें. आणि पुन्हां रात्रौं आहार न करितां पूर्व दिवसाप्रमाणें अनुष्ठान करावें. याप्रमाणें एकभुक्त राहून चार वर्षें सेवा केल्यावर, पुढें भोजन सोडून

फळाचे आहारावर राहून सेवा चालविली. अशी दोन वर्षे गेलीं. तरी प्रभूची कृपादृष्टी नसल्यामुळें बहुत श्रमी होऊन मनांत विचार करितात कीं, मी ईश्वराचा बहुत अपराधी असेन ह्मणूनच अद्यापी कृपेस पात्र झालों नाहीं. आतां हे अपराधी शरीर श्रीचे चरणसेवेनें नाहींसें करावें. असा निश्चय करून फक्त दूर्वारस प्राशन करून, दोन दोन प्रहर एक पायावर उभे राहून श्रीस विनवावें. अशा प्रकारें उग्र तपश्चर्या पाहून गांवांतील सर्व लोक ह्मणूं लागलें कीं, " हा खरा तपस्वी ब्राह्मण आहे. हा ब्राह्मण सिद्धी मिळविल्याशिवाय येथून हलणार नाहीं. "

श्रीगजाननाची सेवा देहास अत्यंत यातना देऊन पुढें पुढें दूर्वारस एकवेळ प्राशन करून दुसरे वेळीं श्रीचें तीर्थ सेवन करावें. याप्रमाणें हरिभट यांची सेवा घेतल्यावर श्रीगजानन प्रसन्न झाले. आणि स्वप्नांत प्रकट होऊन आज्ञा केली कीं, " येथील देवळांतील पुराणिक उपनाम शेंडे यांच्या मुलीशीं तूं लग्न करून घ्यावें. त्यासही मीं आज्ञा केली आहे. " ही आज्ञा श्रवण करून हरिभटबावा जागे झाले आणि विचार करूं लागले कीं, हल्लीं मी ज्या आनंदांत निमग्न आहें अशा सुखांतून काढून, देवा ! मला क्षणिक अशा प्रापंचिक सुखाच्या मोहांत ढकलतां काय ? छे ! मला तें प्रापंचिक सुख बिलकुल नको. अखंड तुझे चरणीं सेवा घडावी हेंच मी मागतों. असें ह्मणून पुन्हां नित्याप्रमाणें श्रीची सेवा चालविली. तों इकडे देवळांतील पुराणिक शेंडे यांसही श्रीनीं स्वप्नांत दृष्टांत दिला कीं, " तूं आपल्या कन्येचा, माझी सेवा करीत असलेल्या हरिभटबावाशीं विवाह करून द्यावा. " हरिभटबावांची सेवा नित्यनेमानें चाललीच होती. तों पुन्हा एके दिवशीं श्रीनीं प्रत्यक्ष दर्शन देऊन आज्ञा केली कीं, " स्त्रीपुत्रादि लाभार्थ जें कर्म केलेंस त्या कर्माच्या लाभाचा प्रथम उपयोग करून घे. नंतर अनुभवांतीं वैराग्य उत्पन्न होऊन, आश्रमांतर होशील आणि मग परमानंदाप्रत पावशील. "

असा वर देऊन श्री गुप्त झाले. श्रींच्या आज्ञेप्रमाणें वागण्याचा हरिभटबावांचा निश्चय झाला. पुन्हां त्याच दिवशीं श्रीगणेशांनीं पुराणिकाचे स्वप्नांत येऊन सांगितलें कीं, " हा नारळ आणि तुझी कन्या हरिभटबावा पटवर्धन यांस दे." पुराणिक जागा होऊन पहातो तों हातांत नारळ ! तो अत्यादरें घेऊन प्रभूची आज्ञा मोडल्याचे भयानें लागलेंच आपले इष्टमित्रांस त्यानें सर्व मजकूर कळविला. आणि मित्रमंडळीसह श्रींचे देवालयांत येऊन, हरिभटबावापुढें तो नारळ ठेऊन, श्रींनीं दिलेला दृष्टांत सांगून शेंडे पुराणिक ह्मणाले, महाराज, श्रींच्या आज्ञेप्रमाणें, हा नारळ व माझी कन्या मी आपणांस अर्पण करणार, तें आपण मान्य केलें पाहिजे. बावांनीं ठीक आहे ह्मणून सांगितलें. नंतर बावांची मातापिता बंधुवर्ग वगैरे मंडळी आल्यावर पुळें येथेंच सुमुहूर्तावर शेंडे यांनीं कन्यादान केलें. बावांची तपोबलाची ख्याती कर्णोपकर्णी सर्व मुलखांत पसरली. हरिभटबावा आपल्या वयाचे अदमासें पंचविसावे वर्षी पुळ्यांत आले असावेत. कारण, पुळ्यास त्यांनीं श्रींची सेवा आरंभ केल्या-नंतर दहावे वर्षी त्यांना दृष्टांत झाला. नंतर लग्न झालें. आणि मग कांहीं महिन्यांनीं ते घरीं गेले. यावरून बारा वर्षे अनुष्टान केल्याची ख्याती आहे. बावांचें लग्न छत्तिसावे वर्षी झालें असावें.

हरिभटबावा पटवर्धन हे श्रीगजाननप्रसाद संपादन करून कोत-वडें येथें आपले घरीं आले. गांवांतील पुष्कळ लोकांनीं येऊन दर्शन घेतलें, आणि ह्मणाले कीं, आपली इच्छा प्रभूनें पूर्ण केली. नंतर कांहीं दिवसांनीं केशवभट व विठ्ठलभट यांचीं लग्नें झालीं. पुढें हरि-भटबावा सहकुटुंब श्रीकुलदेवता करंजेश्वरीचे दर्शनास निघाले. चिपळूणनजीक श्रीपरशुरामाचें दर्शन घेऊन, चिपळुणास लागून असलेल्या गोवळकोटनजीक असलेल्या श्रीकुलदेवी करंजेश्वरीची सेवा करीत राहिले. कांहीं दिवसानंतर श्रीगणेशांनीं व श्रीदेवीनें स्थिरकाल—स्वरूपदर्शन दिलें. आणि देवीनें आशिर्वाद दिला कीं, "तुला

प्रवालक्षेत्रांत जो दृष्टांत झाला तोच खरा मान. आतां माझी सेवा करून तूं पुत्रप्राप्तीची इच्छा दर्शविलीस, तरी तुला पराक्रमी पुत्र होतील." असा वर देऊन देवी गुप्त झाली. प्रभूची कृपा मनांत आणून अति नम्र होत्साते हरिभटबावा स्तवन करूं लागले कीं, " हे सकलव्यापका, हे भेदबुद्धिविनाशका, हे दयाघना, हे आशापूरका, हे गजवदना, हे भक्तानुकंपिन्, हे पतितपावना " इत्यादि देवतागुणानुरूप स्तवन करितांना बावांची वृत्ती तदाकार होऊन चलनवलनादि रहित स्तब्धावस्थेंत बराच काळ गेल्यामुळें, माता, पिता, बंधुवर्ग आपले मनांत विचार करूं लागले कीं, हरिभटजी शयनस्थान सोडून स्नानादि नित्य कर्मास लागण्याचा वेळ झाला असून भूमीशयन काय ह्मणोन केलें ? ह्या संशयानें जवळ जाऊन स्पर्श करितात तों ते जागृत असून अत्यंत आनंदांत मग्न असल्याची मुद्रा पाहून, सर्वांस परमानंद झाला. नंतर अनुष्ठानसांगता ब्राह्मणसुवासिनी भोजन वगैरे करून श्रीदेवीचा निरोप घेऊन मातापित्यासह बावा घरीं पोंचले. नंतर वडिलांची सेवा करीत वर्णाश्रमधर्माप्रमाणें वागत असतां कांहीं दिवसांनीं एक पुत्र झाला. त्याचें नांव कृष्ण असें ठेविलें. हरिभटबावांची कीर्ति ऐकून लोकांनीं दर्शनास येऊन त्यांचें सदाचरण, विद्वत्ता श्रीगणेशकथाश्रवण, पठण आणि भजनाचा परमानंद पाहून फार संतुष्ट होऊन त्यांच्या प्रपंचाच्या उपयोगीं पडावें ह्मणून धनधान्यादि आणून देत. त्याचा उपयोग हरिभटबावा प्रायः गणेशआराधनेकडे करून आपला प्रपंच भिक्षेनेंच चालवीत. अशा वागणुकीनें इतर विद्वानांस पूर्व युगांतील ऋषींच्या आश्रमाप्रमाणें हरिभटबावांचें रहाण्याचें ठिकाण वाटूं लागलें. त्यांतून त्यांचे मातापिता बंधुवर्ग यांचीहि सुशीलता पाहून सर्वांस त्याविषयीं पूज्यबुद्धि उत्पन्न होई. त्या योगें त्या कुटुंबाचा योगक्षेम होत असल्यानें व बहुत काल देवता, अतिथी, पूजन भोजनादि सत्कारपूर्वक श्रीगजाननमहामंत्रानुष्ठान सदा चालू असल्यानें हरिभटबावांची सत्कीर्ति उत्तरोत्तर दिगंत पसरूं लागली. या-

मुळें त्यांच्याजवळ पुष्कळ शिष्यसमुदायहि जमला. मग त्यांसह ते तीर्थयात्रा निमित्यें कोंकणांतच फिरावयास निघाले व फिरत फिरत रत्नांगिरीस आले. तेथील अधिकारी यांनीं हरिभटबावांस शिष्यांसह अत्यादरें आपल्या घरीं कांहीं दिवस ठेवून घेऊन दक्षिणेदाखल कोतवडें पैकीं पांच बिघे जमीन दिली. ती अति आग्रहामुळें स्वीकारून हरिभटबावांनीं ती जमीन कोतवडें येथील श्रीमहालक्ष्मीस दिली. पुढें रत्नांगिरी सोडून राजापुरास गेले. तेथें दर्शनास आलेल्या ब्राह्मणादि जनांची मनकामना पूर्ण करीत असतां, कोणी व्यापारी गलबतावरून मालाची ने आण करणारा बावांचे दर्शनास येऊन अति नम्रतेनें विनंति करून ह्मणाला कीं, माझे मालाचें गलबत येण्याची मुदत संपून बरेंच दिवस झाले तरी माझें गलबत मालासुद्धां मला कधीं मिळेल व कोणत्या कारणामुळें तें इतकें दिवस आलें नाहीं हें कृपाकरून मला सांगावें. अशी प्रार्थना करीत तो बराच वेळ उभा राहिलेला पाहून बावांस दया आली. त्या सावकारास पुढें बोलावून सांगितलें कीं, तुह्मीं केलेल्या प्रश्नाचें उत्तर खरें दिल्यास तुह्मांस बहुत दुःख होईल; ह्याकरितां तुह्मीं श्रीविघ्नहर्ता गणपतीची प्रार्थना करावी. ते तुमच्या भक्तीप्रमाणें तुह्मांस सुख देतील. तो सावकार पुन्हां साष्टांग नमस्कार करून ह्मणाला; महाराज, श्रीगजानन प्रत्यक्ष आपणच आहांत. आपल्या प्रसादानें बहुतांचें कल्याण झालें आहे. ह्मणून मी आपणांस शरण आलों आहें. तरी मज गरिबावर कृपा करावीत. बावांनीं कृपादृष्टीनें त्याकडे पाहून सांगितलें कीं, तुमचें गलबत उदईक सूर्योदयाबरोबर समुद्रतीरास येईल आणि त्यांतून आलेला माल आणण्यास तुह्मी याच वेळीं जावें. बावांच्या आज्ञेप्रमाणें तो सावकार समुद्रावर जों जातो तों गलबत सुरक्षित पाहून सर्व मालाची व्यवस्था करून, तो सावकार बावांच्या दर्शनास आला. बावांचें दर्शन घेऊन प्रार्थना केली कीं, गलबतावरील सर्व माल मीं संतोषानें प्रभुचरणीं अर्पण केला आहे. हा त्याचा उदारपणा पाहून

बावांनीं सांगितलें कीं, " हा हजारों रुपयांचा माल, आह्मांसारख्या स्वल्प भिक्षेवर निर्वाह करणाऱ्यास घेणें उचित नाहीं. त्या तुमच्या मालाचा उपयोग तुह्मीं करावा. " हें बावांचें औदार्य पाहून सर्वत्र लोक चाकित झाले.

मातापित्यांचे सेवेविषयीं अत्यासक्त, अतिथिपूजनीं बहुप्रेमळ, श्रीगणेशपूजनीं अत्युत्सुक अशा रीतीनें वागत असतां कांहीं दिवसांनीं वृद्धत्वामुळें मातापिता मरण पावल्यावर त्यांचें उत्तरकार्य सांग करून बंधुवर्गासह गृहस्थाश्रमसुख अनुभवीत असतां दुसरा पुत्र झाला. त्याचें नांव आपल्या पित्याचें नांव बाळंभट हेंच ठेविलें. पुढें अनुक्रमें पांच पुत्र झाले. पहिले कृष्णंभट; दुसरे बाळंभट; तिसरे त्रिंबकभट; चवथे गोविंदभट; पांचवे महादेवभट; सहावे रामचंद्रभट, सातवे भास्करभट. सर्व मुलें बरींच प्रौढ झाल्यावर बावांनीं आतां यांसह कांहीं दूर प्रदेशीं गमन करावें असें मनांत आणून तें उभयतां बंधूस कळविलें.

स्त्री-पुत्र वगैरे मंडळीसह कोंकणांतील तीर्थयात्रेस निघाले तों जागजागीं शिष्यमंडळीहि पुष्कळ मिळाली. त्यांसह ते हिंडत असतां सावंतवाडीस जाऊन पोंचले. त्यांचा लौकिक ऐकून तेथील लोकांच्या झुंडींच्या झुंडी बावांच्या दर्शनास जाऊं लागल्या. येथील राजास शत्रूनें पराजित करून लहानशा अधिकारावर ठेविलें होतें. त्या राजानें बावांची अनन्यभावानें प्रार्थना केली. तेव्हां त्या संकटापासून मुक्त होण्यास, त्या राजास श्रीगजानन विघ्नहर्ता याची सेवा करावयास सांगितली. पुढें जातां जातां आपण या गांवाजवळ गेले, तों तेथील गांवकरीलोकांस बावांची कीर्ति ऐकून माहित असल्यामुळें शेंकडों लोक सामोरे गेले. तेथें कांहीं दिवस मुक्काम केला होता. राजे व शेंकडों लोक दर्शनास येत होते. त्यांतच एक विधवा बाई जोशी उपनांवाची आपल्या पुत्रास घेऊन दर्शनास आली; आणि पुत्रास बावांचे पायांवर घालून विनंति करूं लागली कीं, महाराज,

हा माझा पुत्र मुंजीस आला आहे. त्याचा जन्मदाता गेल्यामुळें, ह्या गरिब जन्मदातीवर संकट आलें आहे. कुलोपाध्यायास अनेक प्रकारें विनवून मुलाचा व्रतबंध करावा अशी मागणी केली. परंतु ते ह्मणतात, तुह्मां दारिद्र्यांचा पुरोहितपणा आह्मांस नको. तो कोणा दुसऱ्यास देऊन व्रतबंध करून घ्यावा. पुष्कळांस विनंति केली; परंतु कोणासच माझी दया येईना; तथापि आपण साक्षात् ईश्वर, सर्वज्ञ आहांत; तरी माझ्या मुलाचा व्रतबंध करून, त्यास आपले शिष्यवर्गांत घ्यावा. हें ऐकून बावा ह्मणाले, तुझ्या पुत्राचा व्रतबंध लौकरच होईल, आतां तूं सुखी असावें.

रामभट दांडेकर हे बहुत सुशील व विद्वान् असून बावांशीं सत्यत्वेंकरून वागणारे होते. बावांस भिक्षेवर जें द्रव्य मिळे तें बावांनीं रामभट दांडेकर यांजजवळ देऊन,त्यांजकडून ते आपला प्रपंचखर्च चालवीत. रामभटांनीं तें द्रव्य ठेवण्यास एक पिशवी तयार केली. सदरहु पिशवीस कोणी बटवा ह्मणत व कोणी वाटवा ह्मणत. बावास पैशाची गरज लागल्यास, रामभट, तो वाटवा आणा असें ते ह्मणत. त्या वाटव्याचे संरक्षक रामभट ! ह्मणून बहुतेक बावा ह्मणत तसेंच ह्मणूं लागले. बावांनीं रामभटास ह्मणावें कीं, रामभट, वाटवा आणा. असें ह्मणतां ह्मणतां एके दिवशीं बावांनीं रामभट वाटवे ह्मणून हाक मारिली. मोठ्याच्या तोंडचें वाक्य ! तें सर्वांमुखीं झालें. तेव्हां रामभटास सर्वच वाटवे ह्मणून हांक मारूं लागले. हल्लीं संस्थानिक पटवर्धनांचे जे वाटवे उपनांवाचें पुरोहित आहेत, ते सर्व रामभट वाटवे यांचेच वंशज होत. असो; बावांनीं रामभट यांस हांक मारून सांगितलें कीं, या मुलाच्या मुंजीची सर्व तयारी करावी. आज्ञेप्रमाणें सर्व तयारी झाल्यावर त्या बाईच्या आग्रहावरून बावांनींच पुरोहितपणा स्वीकारून कार्य केलें. मग एके दिवशीं बावा त्या बाईस ह्मणाले, हा तुझा पुत्र मोठा भाग्यवान् होईल. तूं ह्या पुत्रास घेऊन घांटावर जा. घांटावर कापशी गांवाचे अधिपतीस जाऊन भेट ह्मणजे तो तुझ्या पुत्राचे

पुत्रवत् पालन करील. हा बावांचा आशिरवाद ऐकून बाई ह्मणाली, महाराजांनीं आह्मांस पुन्हां दर्शन द्यावें. असें ह्मणून मुलास पुन्हां बावांचे पायावर घातलें. आणि बावांच्या आज्ञेप्रमाणें घांटावर जाण्यास निघाली. तेव्हां कांहीं वर्षांनीं आह्मी घांटावर येणार आहों त्यावेळीं भेट होईल असें बावा म्हणाले. नंतर ती मुलासह हळूं हळूं मार्ग क्रमितां कांहीं दिवसांनीं घांटावर येऊन पोहोंचली. कापशीनजीक एक कोसावर आली तों भर दोन प्रहर उन्हाचे तापानें श्रमित होऊन एका झाडाखालीं विश्रांतीकरितां बसली. तों त्याच झाडाखालीं कापशीचे अधिपति सेनापती संताजीराव घोरपडे शिकार करीत असतां श्रमित होत्साते विश्रांतीकरितां आले. तेथें बसलेल्या बाईस घोरपडे यांनीं विचारलें, बाई, हा मूल कोणाचा व तुह्मी कोठून आलांत. बाई म्हणाली, महाराज, मला एका सत्पुरुषानें सांगितलें कीं, " तूं आपले पुत्रास घेऊन कापशीचे राजे संताजीराव घोरपडे यांचेकडे जा ह्मणजे तुझ्या मुलाचें तो पुत्रवत् पालन करील. " त्यांच्या आज्ञेप्रमाणें येथपर्यंत आलें आहे. आतां गांवांत गेल्यावर आह्मांसारख्या दरिद्र्यांस त्या राजाची भेट कोण करून देईल ! या विचारांत आहे. तेव्हां आपण कोण हें न सांगतां, त्या बाईस राजे ह्मणाले, बाई, गांवांत जाऊन कोणासही विचारल्यास कापशीकरांचा वाडा कोणीहि तुह्माला दाखवतील. दरवाजावरील पहारेकऱ्यांस मी राजाचे भेटीस जाणार आहे; असें सांगितलें असतां तो पहारेकरी तुह्मांस सोडील. असें सांगून थोडी विश्रांति घेऊन राजे निघाले. त्यांनीं वाड्यांत जातेवेळीं पहारेकऱ्यांस सांगितलें कीं, कोणी एक बाई एका मुलासह येईल तिला आंत सोडावें. थोड्या वेळानें ती बाई वाड्याजवळ आली तों पहारेकरी यांनीं त्या बाईस वाड्यांत जाण्याची परवानगी दिली. वाड्यांत गेल्यावर त्यांची अन्नवस्त्राची व्यवस्था लागली. संताजीरावास यावेळीं अपत्य नसल्यामुळें ते नारायणावर पुत्रवत् प्रेम करूं लागले. त्यांनी शिक्षणाची उत्तम

व्यवस्था केली. तो मुलगा उत्तरोत्तर शरीरानें, बुद्धीनें व स्वरूपानें आणि लहान वय असून बोलण्याचे चातुर्यानें संताजीरावास फारच प्रिय झाला. त्याचें विद्यार्जन उत्तम करवून लग्नही केलें. याप्रमाणें अत्यंत कृपा. पुढें संताजीरावास औरस पुत्र झाला. परंतु नारायणावरील पुत्रवत् प्रेम विशेषच दृढ झालें. प्रसंगवशात् आपले सेनापतीचे दरबारीं कामही नारायणाकडून करवीत. घरांतील बायका व इतर संबंधीं लोक हे नारायणाचा द्वेष करीत; व त्याच्यावरची मर्जी कमी होण्याकरितां, त्याच्याविरुद्ध खोटच्यानाटच्या गोष्टी संताजीरावास सांगीत. त्यांनीं ह्मणावें तें आमचें पोर! पोरबुद्धीनें एखादेवेळीं तसें वागत असेल, असें ह्मणून ते सर्व सांगणें व्यर्थ मानीत. एके दिवशीं ते शिकारीस गेले असतां परत येण्यास फार उशीर लागला ह्मणून तहान व भूक विशेष लागली होती. घरीं येतांच बाईसाहेब यांनीं यजमानास उपहाराकरितां आंत बोलावून, आपलेबरोबर नारायणही होता तरी त्यासही आपण बोलवावें. असें बाई ह्मणाल्या. हें ऐकतांच नारायणासही यजमानांनीं हांक मारिली. तो आला असें पाहून संताजीराव म्हणाले, तुला फार श्रम झाले आहेत तरी माझ्याजवळच खाण्यास बैस. नारायण आज्ञेप्रमाणें त्यांचेजवळ बसला. तों ताटांत खिचडी, रोटी व मांस बाईनीं स्वतः वाढिलें. नारायणास खाण्यास सांगतांच तोही अस्तन्या वर करून खिचडींत हात घालून ग्रास घेणार तों संताजीरावानें अकस्मात् भयाभित होऊन नारायणाचा हात ताटांतील पदार्थांस लागण्यापूर्वींच धरला. आणि सद्गदित अंतःकरणानें देवास शरण जाऊन म्हणाले, परमेश्वरा! आज माझ्या हातून केवढें भयंकर पातक होणार होतें कीं, मी ज्यास ब्राह्मण केला त्यास मी शूद्रान्न भक्षण करवीत होतों. माझें पूर्व सुकृत चांगलें म्हणुन आज मी या घोर पातकापासून बचावलों. तरी हे देवाधिदेवा, पुन्हां अशी दुर्बुद्धी मला केव्हांही देऊं नको. अशी विनंति करून त्यांनीं नेत्रांतून अश्रु गाळिले. नारायणाचें आपल्यावरील हें

निःसीम प्रेम पाहून त्याबद्दल त्यांना अत्यंत संतोष झाला. तसाच बाई व इतर सर्वांनाही झाला. या त्याच्या निष्कपट प्रेमामुळें तो वैभवास चढला. त्याच दिवशीं संताजीरावांनीं नारायणास सांगितलें कीं, तूं आमचा वडील पुत्र होय. संताजीराव व त्याची बायकोहि नारायणावर अती प्रेम करूं लागल्यामुळें सरकारदरबारांत नारायणरावास बहुत मान्यता प्राप्त झाली.

हरिभटबावा सर्व शिष्यमंडळीसह कोंकणप्रांतीं फिरत असतां, गांवोगांवीं योग्य पूजन सत्कार करून पाठवणी करीत. त्यांच्याबरोबर असलेल्या शिष्यांपैकीं मुख्य शिष्य ८।१० होते. त्यांचीं नांवें— रामभट दांडेकर, सखंभट जोशी त्यांचे वंशजास पुढें सखदेव ह्मणवूं लागले व यास पटवर्धन यांनीं आपले दौलतींत सरदार व पोतनीस केले. कृष्णंभट जोशी यांचे वंशजास पुढें उत्तूरकर हें उपनांव प्राप्त झालें. लिमये यांचे वंशजास पुढें पेशवे यांनीं आपल्या पदरीं खासगी कामावर ठेविलें, त्यामुळें खासगीवाले हें उपनांव त्यास मिळालें. काळे यांचे वंशजास पुढें रामचंद्र हरी यांनीं आपले संस्थानचे फडणीस केलें. गोखले यांचे वंशजास पुढें भास्कर हरी यांनीं आपले स्वारांवरील मुख्य सरदार केलें. शिवाय खाडिलकर, फडके वगैरे मंडळी बावांचेबरोबर घांटावर आली होती.

कृष्णंभट बापाजी बावांचे प्रथम पुत्र. यांचा विवाह झाला त्यावेळीं कोंकणांतील यांचे मूळ उपाध्ये वझे यास बावांनीं बोलाविलें असतां ते आले नाहींत म्हणून रामभटजी दांडेकर ( ज्यास पुढें वाटवे हें उपनांव चालूं झालें ते ) बरोबर असून पुरोहित शब्दार्थप्रमाणें वागत असल्यामुळें त्यांसच आपले पुरोहित असें हरिभटबावांनीं मानून कार्य केलें. आणि पुढें बंधूस व पुत्रांसही त्याप्रमाणें वागण्यास आज्ञा केली. ती त्यांनीं मान्य करून कोतवडें मुक्कामाखेरीजचे स्थळीं रामभटजीस उपाध्येपणाची वृत्ती देऊं लागले. हीच वहिवाट हल्लीं चालूं आहे. बावांनीं अनुक्रमें सर्व पुत्रांचे विवाह फिरतीवर असतां-

नाच केले. अक्कलकोटकर महाराजांच्या लोकांनीं बावांना तिकडे येणेविषयीं पुष्कळ आग्रह केला. परंतु बावांचा मनोदय दिसेना तेव्हां आपल्या पुत्रांपैकीं कोणी आल्यासही आमचे महाराजांस फार आनंद होईल. असें ऐकतांच त्या मंडळीबरोबर बावांनीं त्रिंबकयास जाण्यास सांगितलें. आणि बावांनीं त्रिंबकास बोलावून सांगितलें कीं, मी फिरत फिरत थोड्याच दिवसांत कापशी येथें जाणार आहे, तेथें तूं मला भेट. असें सांगून त्याला जाण्यास आज्ञा दिली.

नंतर हरिभटबावांचे शिष्यवर्गांत गोखले ह्मणून जे मागें सांगितले तेच महादेव कृष्ण गोखले होत. यांनीं विशेष आग्रह धरिल्यामुळें, त्यांच्या कन्येशीं भास्कर हरीचें लग्न लावून देशावर येण्यास निघाले. नंतर अजरेनजीक उत्तूर येथें आले. उत्तूर येथें शिष्यांपैकीं कृष्णंभट जोशी बरवडेकर रहात असत, त्यांचे आग्रहास्तव त्यांच्या घरीं बावा उतरले. उत्तूरास बावा आल्याची वर्दी आसमंतांतील सर्व भागांत समजली. तेव्हां कापशीकर सेनापती यांनीं बावास कापशीस येण्याबद्दल फार आग्रह केला. नारायण जोशी याचे आईस देशांवर पुन्हां भेट देण्याबद्दल बावांनीं कबूल केलेंच होतें; करितां बावांनीं कापशीस प्रयाण केलें. कापशीस बावा पोंचल्याबरोबर नारायणराव जोशी यानीं बायको व मातोश्रीसह बावांचे घट्ट पाय धरून ह्मटले; महाराज, आपले प्रसादें आह्मीं या वैभवास पोंचलों. आपण कृपा करून आमचे घरीं चलावें. पूर्व उपकार स्मरून त्यांनीं बहुत आग्रह केल्यामुळें बावा त्यांचे घरीं उतरले. संताजीराव घोरपडे कुटुंबासह येऊन बावांचें दर्शन घेतांच, अशा सत्पुरुषाचें दर्शन नित्य घडावें या हेतूनें त्यांनीं बावांस कापशीस राहण्याची विनंती केली. आणि बावांची सर्व व्यवस्था उत्तम ठेवण्याबद्दल सांगुन संताजीराव वाड्यांत गेले. कापशीस बावांचें बरेच दिवस वास्तव्य झालें. या दिवसांत बावांस कोणीं कांहीं मागतात, कोणीं कांहीं बावांस समर्पण करितात तर कोणीं नित्य नेमानें सेवा

चाकरीही करितात. नारायणरावांच्या मातोश्रींनीं व त्यांच्या कुटुंबांनीं बावांची सेवा एकनिष्ठपणें चालविली होती. त्यांच्या सेवेचा हेतू बावांचे लक्षांत तेव्हांच आला. नारायणराव यांस पुत्रप्राप्ती व्हावी ह्मणून त्यांच्या मातोश्रींनें बावांस विनंति केली. तेव्हां बावांनीं आज्ञा केली कीं, गिरीवर जाऊन गणेशरूपीं श्रीव्यंकटेशाची सेवा करावी. नारायणराव ह्मणाले, मी सेनापती यांचा सेवक, त्यांतून सुटका होऊन श्रीव्यंकटेशसेवा कशी होईल, या चिंतेंत मग्न होऊन ते म्लान-वदन होत्साते विचार करीत राहिले. ही नारायणरावांची स्थिति पाहून बावा ह्मणाले, नारायणा ! तुझें भाग्य मोठें, तूं चिंता करण्याचें कारण नाहीं. तुझ्या कुटुंबास घेऊन मीच गिरीवर सेवा करण्यास जातो. असें ह्मणून, नारायणाच्या कुटुंबास घेऊन बावा गिरीस गेले. तेथें पोंचल्यावर सुमुहूर्तावर त्या बाईस श्रीव्यंकटेशसेवापद्धती सांगून सेवेस बसविली. आणि आपणही नित्यकर्म करून स्थिरचित्तानें श्रीची सेवा चालविली. बरेच दिवस झाले तरी कांहीं साक्षात्कार होईना. तेव्हां बावांनीं श्रीची करुणा भाकिली, आणि सारखें प्रभूचें मुख निरीक्षण करीत नामस्मरण चालविलें. तों तन्मयवृत्ती होऊन आनं-दांत डुलत असतां, एकाएकीं चित्तव्यग्र होऊन हातांत पहातात तों फळ ! बावा तदाकारस्वरूपीं निमग्न असतां, श्रीनीं सांगितलें कीं, " तुझ्या भक्तीस मी संतुष्ट होऊन पूर्वी तुला दोन वेळ दृष्टांत दिल्या-प्रमाणें आजही साक्षात्कार देत आहे. तूं ऐहिक सुख उपभोगून शेवटीं ईशचरणीं वास करशील. आतां पुत्रलाभार्थ हें फळ घे व तें त्या बाईस भक्षणास दे ह्मणजे पुत्र प्राप्त होईल. " त्या बाईची व बावांची मनकामना पूर्ण झाल्यावर ते परत घरीं आले. नंतर प्रसादसेवन केला. पुढें नारायणरावास त्या प्रसादाच्या योगें पुत्र प्राप्त झाला. त्याचें व्यंकटेशाच नांव ठेविलें. त्या व्यंकटरावांचें लग्न बावांच्या खटपटीनें श्रीमंत बाळाजी विश्वनाथ पेशवे यांची कन्या अनुबाई इच्याबरोबर झालें. नारायणराव इचलकरंजीस राहूं लागल्यामुळें त्यांस इचल-

करंजीकर ह्मणूं लागले. त्यांच्या मातोश्रींच्या आग्रहावरून बावांनीं, नारायणाचे मुंजींत जो पुरोहितपणा स्वीकारला तो पुरोहितपणा हरि-भटबावांचे वंशजांनीं हल्लींहि चालविला आहे.

बावांचा मुक्काम कापशी येथें असल्यामुळें त्रिंबक हरी अक्कल-कोटहून वारंवार कापशीस येत असत. त्रिंबक हरी हे अक्कलकोट-करांचे पदरीं असल्यामुळें, त्यांचा व कापशीकरांचा बराच परिचय झाला. त्रिंबक हरी यांनीं नोकरी करून द्रव्यसंचय चांगला केला. कापशीकर राणोजी घोरपडे यांनीं त्रिंबक हरी पटवर्धन यांचेकडून कर्ज घेतलें. त्या कर्जाचे फेडीस कुरुंदवाड गांव लावून दिला तो येणेप्रमाणेः—

श्री.

फे. नं. ४ कुरुं० द०

राजश्री त्रिंबक हरी गोसावी यांसी—

अखंडीत लक्ष्मीआलंकृत राजमान्य राजेश्री राणोजी घोरपडे सेनापती मंडित सु॥ सबा सलासीन मया व आलफ तुमचे गुजा-रतीनें मनसबी यास कर्ज घेतलें होतें. त्यास कर्जाच्या ऐवजास मौजे कुरुंदवाड दिल्हें आहे. कर्ज फडी तों ऐवज तुह्मी घेणें. साल गुदस्ता राजेश्री स्वामीचा व आमचा कजिया पडला. त्यास हिशोबीं जें निघालें त्याचे दरमाहे दरसदे केले तर रुपये ३ तिहोत्राप्रमाणें अस्सल व कलदार जो हिशोब होईल त्यास मौजे मजकूरचे ऐवजीं वरचेवरी भागवून घेत जाणें जाणिजे ता. छ. १५ सफर बहुत काय लिहिणें ( शिक्का ) मोर्तब.

सदरहु कर्जरोखा सन १७३६ त झाल्यावर, कुरुंदवाड येथील दोन चावर जमीन त्रिंबक हरी यांना मिळाली.

श्री.

फे० नं० १० कुरुं० द० (शिक्का)

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ६४ कालयुक्तनाम संवत्सरे माघ बहुल पंचमी मंदवासरें क्षत्रीय-कुलावतंस श्री राजा शंभू छत्रपती स्वामी यांणीं राजश्री

(शि.) (शि.) त्रिंबक हरी उपनांम पटवर्धन गोत्र कौंडिण्य सूत्र आश्वलायन यास दिल्हें इनामपत्र ऐसेजें. तुह्मी करवीरिचे मुक्कामीं स्वामीसंन्निध विनंति केली कीं, आपण महाराजांची सेवा करीत आहों. महाराजांनीं आपणांस कांहीं इनाम करून देविला पाहिजे ह्मणून त्यावरून मनास आणितां तुह्मी सेवक एकनिष्ठ स्वामीची सेवा मनोभावें करीत आहां. यास्तव तुमचें चालवणें आवश्यक जाणून स्वामी कृपाळु होऊन तुह्मास नूतन इनाम, कुलबाब कुलकानु खेरीज हक्कदार करून मौजे कुरुंदवाड तालुके अळतें या गांवीं जमीन कांटीं जुने बिघे काळी जमीन चावर दोन मळी जमीन चावर आर्धा एकूण चावर आडीच इनाम दिल्ही असे. तरी तुह्मी सदरहु जमीन चतुःसिमा करून आपले स्वाधीन करून घेणें आणि इनाम तुह्मी व तुमचे पुत्र-पौत्रादी वंशपरंपरेनें अनुभवून सुखरूप राहणें जाणिजे. निदेष समक्ष (शिक्का)

कुरुंदवाड हा गांव त्रिंबक हरी यांनीं गहाण घेतल्यावर दोन वर्षांनीं ह्मणजे सन १७३८ त सदरहु जमीन इनाम मिळाली. श्री-नरसिंहवाडीजवळ श्रीकृष्णा व पंचगंगा संगमास लागून असलेल्या कुरुंदवाडीं रहावयाचें बावांचे मनांत आलें आणि त्यांनीं कापशीचा मुक्काम सोडून कुरुंदवाड येथें आले. हरिभटबावा कुरुंदवाडास गेल्यावर नारायणराव जोशी ऊर्फ घोरपडे हे सहकुटुंब आपल्या इचलकरंजी गांवांत येऊन राहिले. नारायणरावांचे आज्ञेवरून त्रिंबक हरी यांनीं इचलकरंजीस चारी बाजूनें खंदक व चौबुरुजी मजबूत तटाचे आंत वाडा बांधविला. " विद्यमान आंतील

वाड्याशिवाय चारी बाजूचे तट, बुरुज व सभोंवारचा खंदक मात्र कायम आहे. हल्लींचे श्रीमंत बाबासाहेब इचलकरंजीकर यांनीं अदमासें एक लाख रुपये अधीक खर्चून किल्ल्यांतच सुंदर मनोऱ्याचा वाडा बांधविला आहे. "

त्रिंबक हरी यांनीं प्रथम गरिबींत दिवस काढून स्वतःच्या कर्तबगारीवर उत्तम प्रपंच थाटला. कुरुंदवाड मुक्कामीं बावांनीं भजन, पूजन व षटकर्मै करून बरेच दिवस काढिले. एके दिवशीं बावांचे मनांत सहकुटुंब त्रिस्थळीं यात्रा करावी असें आलेवरून त्यांनीं आपले बंधूस व पुत्रांस कळविलें. तेव्हां सर्वत्र मंडळींत गडबड सुरू जाहली कीं, बहुत आयास, श्रम, वाटेंत भिक्षाही मिळणें कठीण म हा हिंसक व्याघ्रादि पशु व चोर इत्यादिकांचें भय विशेष, जाऊन येणें ह्मणजे पुनर्जन्मच, अशीं परस्परांचीं भाषणें चाललीं. हें ऐकून बावा ह्मणाले, यात्रेस जाण्याचें तुह्मांस संकट कां वाटतें ? ज्यानें यात्रेस जाण्याची आह्मांला स्फूर्ती दिली तो विघ्नहर्ता श्रीगजानन सर्व संकटें निवारण्यास समर्थ आहे. हें बावांचें बोलणें ऐकतांच कुटुंबांतील व गांवांतील बरीच मंडळी यात्रेस निघाली. हरिभटबावा समारंभानें यात्रेस निघाल्यावर जातां जातां मार्गांतून देवदर्शन व तीर्थस्नान करीत करीत गोदाकांठीं असलेल्या गंगाखेड या गांवीं गेल्यावर तीर्थश्राद्धादि करून तीर्थोपाध्यायास आमचे कोणी वंशज येतील ते तुमची पूजा करितील, या अभिप्रायाचें पत्र आपले नांवचें हरिभटबावांनीं दिलें आहे. त्या पत्राचें अक्षर व वरील गजानन हें अक्षर भास्कर हरीच्या हातचें आहे. हरिभटबावा यांचें चरित्रलेखक, " विष्णु गणेश पटवर्धन " मिरज येथील नामांकित वैद्य यांनीं वरील पत्राचें अक्षर भास्कर हरी यांचेच असल्याबद्दल खात्री दिली आहे. यावरून भास्कर हरी हे बावांच्याबरोबर होते हे सिद्ध होत आहे. पुढें आंवढ्या नागनाथाचें दर्शन पुजन करीत कांहीं दिवस तेथें राहून नंतर नागपुरावरून रामटेकास गेले. तेथील श्रीरामचंद्राचें दर्शन घेऊन

मार्ग क्रमीत विंध्याद्री ह्मणजे सातपुड्याच्या डोंगरांतून चालले असतां, अनेक भिल्लांसह त्यांच्या नायकानें त्यांना गांठिलें आणि सर्व यात्रेकरी लोकांस ह्मगाला, तुमचेजवळील चीजवस्त व वस्त्रप्रावरण येथें ठेवा. तेव्हां सर्व यात्रेकरी भयाभीत होऊन बावांजवळ आले. बावांनीं त्या भिल्लनायकाकडे पाहून ह्मटलें ! अरे, तुह्मी सर्वच अंध कसे ! हें कानीं पडतांच सर्व भिल्ल अंध झाले. एकदम अंधत्व आल्यामुळें सर्व भिल्ल भयाभीत होत्साते बावांची प्रार्थना करूं लागले कीं, आपणांस आह्मीं कांहीं त्रास देत नाहीं व लुटतही नाहीं; कृपा करून आमचें अंधत्व दूर करा, आम्हांस दिसूं लागल्यावर, आम्हीं आपणां सर्वांस सुरक्षित पोंचवूं. तेव्हां बावा म्हणाले, अरे, तुम्हांस नेत्र आहेतच, तर मजकडे पहा म्हणजे झालें. असें म्हणतांच त्या सर्वांस दिसूं लागलें. हा चमत्कार पाहून सर्व यात्रेकरूंस आनंद झाला. नंतर बरोबरच्या यात्रेकऱ्यांसह बावांनीं सर्व यात्रा करून ते परत येण्यास निघाले. तों पुन्हां सातपुड्यांत पोंचतांच मार्गावर एक मोठा वाघ बसलेला दिसला. तो वाघ रस्त्यावरून दूर होईना; तेव्हां बावा पुढें जाऊन त्या व्याघ्रास म्हणाले, अरे, तूं रस्ता सोडून दूर बैस ! याप्रमाणें त्या व्याघ्रास बावांनीं आज्ञा करितांच, तो वाघ दूर गेला. असें बावांनीं पुष्कळ चमत्कार केले आहेत. " हरिभट-बावांचें साद्यंत चरित्र वाचनीय आहे. बावांचें चरित्र जे वाचतील त्यांची खात्री होईल कीं, पटवर्धनकुळांत प्रत्यक्ष हरिभटबावांच्या रूपानें श्रीगजाननच अवतरला असें वाटल्यावांचून रहावणार नाहीं. " नंतर नाशिक व त्रिंबकेश्वर करून ते पुण्यास आले. पुण्यास श्रीमंतांनीं बावांस ठेवून घेतल्यामुळें बाकीचे यात्रेकरू बावांचा आशिरवाद घेऊन आपापले गांवीं गेले. बावांही कांहीं दिवसांनीं गोविंद हरी व रामचंद्र हरी यांसह कुरुंदवाड मुक्कामीं आले. कुरुंदवाड येथेंच बावांनीं बंधु व पुत्र यांसह मोठ्या उत्साहानें यात्रासांगता केली.

गोविंद हरी व रामचंद्र हरी आपल्या परमपूज्य भगवद्भक्त

पित्याच्या चरणीं लीन होऊन विनंति करितात कीं, आम्ही जरी श्रीमंतांचे सन्निध आहों तरी आमची इच्छा अद्यापि पूर्ण होत नाहीं. बावांनीं शांत मनानें त्या उभयतांचें पूर्वकर्मफल ध्यानांत आणून ते आज्ञा करितात कीं, अरे, गोविंदा, " तूं जन्मांतरीं श्रीविठ्ठलास नवस केला होतास, तो फेडला नाहींस यास्तव तो देव कार्यविघातक झाला आहे. तर तें ऋण फेड. आतां तूं पंढरीस जाऊन श्रीविठ्ठलाचें दर्शन घे व पुन्हां महाद्वारांत ये. म्हणजे तेथें कोणी अत्यंत वृद्ध असून महारोगी मनुष्य तुझें नांव घेऊन तुला हाक मारील. तूं त्याच्यापुढें जातांच, माझी इच्छा पूर्ण करशील काय ? असें म्हणतांच तो तुला जें सांगेल ती इच्छा त्याची पूर्ण कर म्हणजे तुझा भाग्योदय होईल." नंतर रामचंद्रास म्हणाले, " अरे, तुझा ऋणी चिमाजीपंतअप्पा पेशवे आहे. त्याची सेवा तूं एकनिष्ठपणें कर, म्हणजे तो तुझी इच्छा पूर्ण करील." पित्याची आज्ञा श्रवण करून, गोविंद हरी पंढरपुरास व रामचंद्र हरी पुण्यास जावयास निघाले. गोविंद हरी पंढरीस जाऊन श्रीविठ्ठलाचें दर्शन घेऊन परत जों महाद्वारांत येतात तों, एका वृद्ध रोग्यानें गोविंदपंत म्हणून हाक मारिली. गोविंदपंत त्याचेसमोर जों जातात तों वृद्ध म्हणाला, " मला कोंकणचें पक्वान्न घारगे म्हणून करतात ते दहा घारगे खाऊन वर तांब्याभर थंड पाणी प्यावें असें बहुत दिवस वाटतें, तर ती माझी इच्छा तूं पूर्ण करशील काय ?" तें ऐकतांच गोविंदपंतांनीं तें मान्य करून त्वरेनें गांवांत फिरून उत्तम प्रतीचे दहा घारगे व तांब्याभर पाणी घेऊन ते त्या रोग्याजवळ आले, तों वृद्धरोगी म्लान होऊन नेत्र झांकून पडला आहे. त्यास हाक मारून त्यांनीं ते त्याचेपुढें ठेविले. तें पाहून तो परम संतोषानें ते घारगे स्वस्थपणें खाऊन वर तांब्याभर पाणी प्याला आणि ढेकर देऊन गोविंदपंतास म्हणतो, " अरे गोविंदपंत, माझी बहुत वर्षांची इच्छा तूं पूर्ण केलीस. आतां तूं [illegible]

तुझी इच्छा पूर्ण करील. ह्या माझ्या बोलण्याचा तूं संशय मानूं नको. "
इतकें बोलून तो रोगी अकस्मात् तेथें नाहींसा झाला. हें आश्चर्य पाहून गोविंदपंतांचे नेत्रावाटें प्रेमाश्रु चालले! त्या प्रेमानंदांत निमग्न असतां ते म्हणाले, हे प्रभो, तात! काय आपलें अंतरज्ञान व केवढी योग्यता; पूर्वपुण्याई मोठी म्हणूनच परमेश्वरानें आपल्या पोटीं मला जन्म दिला.

भास्कर हरी हा हरिभटबावांचा सर्वांत लहान पुत्र होय. हा बावांचा विशेष लाडका होता. याचें कारण विशेष सान्निध्य होय. पुढें वडिलांचे आज्ञेवरून ते श्रीमंतांची चाकरी करूं लागले. भास्कर हरी यांनीं कागवाड हा गांव विश्रांतीचें ठिकाण करून, त्या गांवास पाण्याच्या सोईकरितां मोठी विहीर खणून फुलझाडें लाविलीं. कागवाडपासून आदमासें मैल दीडमैल असलेल्या श्रीकृष्णाकाठीं घांट बांधून घांटावर एक दगडी देवालय बांधून त्यांत आपले पितामह बाळंभट यांचे नांवें, बाळेश्वर या नांवाची लिंगस्थापना केली. त्या लिंगाची पूजा वगैरे करण्यास एकास सांगून, त्यास निरंतर चालेल अशी जमीन देऊन स्थाइक केलें. पुढें कांहीं दिवसांनीं तासगांवकर परशरामभाऊ यांचेकडून त्या देवास अभिषेक, पूजन व ब्राम्हणभोजनादि क्रम चालू झाला. तो अद्यापि जमखंडी संस्थानाकडूनच प्रतिवर्षास होत असतो.

हरिभटबावा कांहीं दिवस सिद्धटेकास राहून प्रभूची पूजनादिप्रकारें सेवा करीत असतां, उत्तरोत्तर सर्व ऐहिकसुखाविषयीं विरक्त होऊन, तेथें कोणा एका महासिद्ध संन्याशाकडून त्यांनीं चतुर्थाश्रम घेतला. बावांनीं आपली कामधेनु ऊर्फ पडशी, पुस्तक आणि यज्ञोपवीतादि वस्तु पुत्रास देण्याकरितां शिष्याचे स्वाधीन करून मग आश्रम स्वीकारला. इकडे वडिलांनीं चतुर्थाश्रम घेतल्याचें वर्तमान गोविंदपंतास समजतांच ते मोठ्या त्वरेनें त्या क्षेत्रांत पित्याचे दर्शनार्थ आले. त्यावेळीं त्या शिष्यमंडळींनीं ती पडशी

पित्याच्या चरणीं लीन होऊन विनंति करितात कीं, आम्ही जरी श्रीमंतांचे सन्निध आहों तरी आमची इच्छा अद्यापि पूर्ण होत नाहीं. बावांनीं शांत मनानें त्या उभयतांचें पूर्वकर्मफल ध्यानांत आणून ते आज्ञा करितात कीं, अरे, गोविंदा, " तूं जन्मांतरीं श्रीविठ्ठलास नवस केला होतास, तो फेडला नाहींस यास्तव तो देव कार्यविघातक झाला आहे. तर तें ऋण फेड. आतां तूं पंढरीस जाऊन श्रीविठ्ठलाचें दर्शन घे व पुन्हां महाद्वारांत ये. म्हणजे तेथें कोणी अत्यंत वृद्ध असून महारोगी मनुष्य तुझें नांव घेऊन तुला हाक मारील. तूं त्याच्यापुढें जातांच, माझी इच्छा पूर्ण करशील काय ? असें म्हणतांच तो तुला जें सांगेल ती इच्छा त्याची पूर्ण कर म्हणजे तुझा भाग्योदय होईल." नंतर रामचंद्रास म्हणाले, " अरे, तुझा ऋणी चिमाजीपंतअप्पा पेशवे आहे. त्याची सेवा तूं एकनिष्ठपणें कर, म्हणजे तो तुझी इच्छा पूर्ण करील." पित्याची आज्ञा श्रवण करून, गोविंद हरी पंढरपुरास व रामचंद्र हरी पुण्यास जावयास निघाले. गोविंद हरी पंढरीस जाऊन श्रीविठ्ठलाचें दर्शन घेऊन परत जों महाद्वारांत येतात तों, एका वृद्ध रोग्यानें गोविंदपंत म्हणून हाक मारिली. गोविंदपंत त्याचेसमोर जों जातात तों वृद्ध म्हणाला, " मला कोंकणचें पक्वान्न घारगे म्हणून करतात ते दहा घारगे खाऊन वर तांब्याभर थंड पाणी प्यावें असें बहुत दिवस वाटतें, तर ती माझी इच्छा तूं पूर्ण करशील काय ?" तें ऐकतांच गोविंदपंतांनीं तें मान्य करून त्वरेनें गांवांत फिरून उत्तम प्रतीचे दहा घारगे व तांब्याभर पाणी घेऊन ते त्या रोग्याजवळ आले, तों वृद्धरोगी म्लान होऊन नेत्र झांकून पडला आहे. त्यास हाक मारून त्यांनीं ते त्याचेपुढें ठेविले. तें पाहून तो परम संतोषानें ते घारगे स्वस्थपणें खाऊन वर तांब्याभर पाणी प्याला आणि ढेकर देऊन गोविंदपंतास म्हणतो, " अरे गोविंदपंत, माझी बहुत वर्षांची इच्छा तूं पूर्ण केलीस. आतां तूं पुण्यास जाऊन श्रीमंतांजवळ रहा, म्हणजे तो

तुझी इच्छा पूर्ण करील. ह्या माझ्या बोलण्याचा तूं संशय मानूं नको. " इतकें बोलून तो रोगी अकस्मात् तेथें नाहींसा झाला. हें आश्चर्य पाहून गोविंदपंतांचे नेत्रावाटें प्रेमाश्रू चालले ! त्या प्रेमानंदांत निमग्न असतां ते म्हणाले, हे प्रभो, तात ! काय आपलें अंतरज्ञान व केवढी योग्यता; पूर्वपुण्याई मोठी म्हणूनच परमेश्वरानें आपल्या पोटीं मला जन्म दिला.

भास्कर हरी हा हरिभटबावांचा सर्वांत लहान पुत्र होय. हा बावांचा विशेष लाडका होता. याचें कारण विशेष सान्निध्य होय. पुढें वडिलांचे आज्ञेवरून ते श्रीमंतांची चाकरी करूं लागले. भास्कर हरी यांनीं कागवाड हा गांव विश्रांतीचें ठिकाण करून, त्या गांवास पाण्याच्या सोईकरितां मोठी विहीर खणून फुलझाडें लाविलीं. कागवाडपासून आदमासें मैल दीडमैल असलेल्या श्रीकृष्णाकांठीं घांट बांधून घांटावर एक दगडी देवालय बांधून त्यांत आपले पितामह बाळंभट यांचे नांवें, बाळेश्वर या नांवाची लिंगस्थापना केली. त्या लिंगाची पूजा वगैरे करण्यास एकास सांगून, त्यास निरंतर चालेल अशी जमीन देऊन स्थाइक केलें. पुढें कांहीं दिवसांनीं तासगांवकर परशरामभाऊ यांचेकडून त्या देवास अभिषेक, पूजन व ब्राम्हणभोजनादि क्रम चालू झाला. तो अद्यापि जमखंडी संस्थानाकडूनच प्रतिवर्षास होत असतो.

हरिभटबावा कांहीं दिवस सिद्धटेकास राहून प्रभूची पूजनादिप्रकारें सेवा करीत असतां, उत्तरोत्तर सर्व ऐहिकसुखाविषयीं विरक्त होऊन, तेथें कोणा एका महासिद्ध संन्याशाकडून त्यांनीं चतुर्थाश्रम घेतला. बावांनीं आपली कामधेनु ऊर्फ पडशी, पुस्तक आणि यज्ञोपवीतादि वस्तु पुत्रास देण्याकरितां शिष्याचे स्वाधीन करून मग आश्रम स्वीकारला. इकडे वडिलांनीं चतुर्थाश्रम घेतल्याचें वर्तमान गोविंदपंतास समजतांच ते मोठ्या त्वरेनें त्या क्षेत्रांत पित्याचे दर्शनार्थ आले. त्यावेळीं त्या शिष्यमंडळींनीं ती पडशी

आंतील वस्तूंसह पंतांचे स्वाधीन केली. ती पडशी अत्यंत पूज्य-बुद्धानें वडिलांचा प्रसाद मिळाला असें पूर्ण मानून त्यांनीं ती पडशी आपल्या जामदारखान्यांत आणून ठेविली. ती पडशी गोविंदपंतास मिळाल्यावर उत्तरोत्तर संपत्तीचा उत्कर्ष होऊन त्यांच्या पुत्रांचीही शौर्याबद्दल दिगंत कीर्ती झाली. त्या पडशींतील श्रीगणेश महामंत्र-प्रयोगाची पोथी वगैरे कांहीं महत्वाच्या वस्तु नाहींशा झाल्याचें समजतें.

हरिभटबावांनीं आश्रम धारण केल्यावर ते पूर्वीपेक्षांही ब्रह्मानंदांत विशेष मग्न असल्याचें सर्वत्रांस दिसूं लागलें. पुढें ते इच्छा विहारी हरिभटबावा हळूं हळूं संचार करीत तीर्थं व क्षेत्रें पहात पहात पुणें येथें श्री ॐकारेश्वराचे देवळांत शिष्यांसह येऊन राहिले. तेव्हां बावांस वृद्धावस्थेमुळें जरी अशक्तता आली होती तथापि ते आपले नित्यकर्मांचा त्याग कधींही करीत नसत. उदरनिर्वाहही प्रतिदिवशीं अनुष्ठान आटोपल्यावर दहापांच घरें भिक्षेस जाऊन मिळेल तें अन्न आणून आपले ठिकाणीं भोजन करीत. याप्रमाणें नित्यक्रम चालत असे. गांवांतील लोक स्वामींच्या दर्शनास सारखे येत असत. श्रीमंतही केव्हां केव्हां दर्शन घेऊन, स्वामींनीं कांहीं मागावें अशी विनंति करीत; पण स्वामींनीं ती श्रवणांत न घेतां श्रीगणेशनामस्मरण करीत. असे बरेच दिवस गेल्यावर शके १६७२ मार्गशीर्ष वद्य प्रतिपदा रोजीं ब्राह्ममुहूर्तकाळीं स्वामी जागृत होऊन जवळील शिष्यांशीं, आज प्रभुदर्शनार्थ स्वानंदपुरीस जाण्याचें आहे, असें भाषण करून स्नानादि नित्यकर्मैं केलीं. आणि आसनावर बसून श्रीगजाननपाद चिंतन करीत असतां त्यांचे मुखांतून सशब्द प्राणवायु निघून गेला. हें जवळील शिष्यांच्या लक्षांत येऊन ते पुढें जाऊन पाहतात तों स्वामी स्वानंदपुरीस गेले, असें पूर्ण समजल्यावर गुरुवियोग झाल्याबद्दल ते कष्टी होऊन, त्यांनीं ताबडतोब गोविंद हरी व भास्कर हरी या उभयतांसही कळविलें. तेव्हां ते व स्वामींच्या दर्शनास

नित्य येणारे थोर थोर गृहस्थ हे सर्व स्वामीजवळ येऊन विचार करितात कीं, स्वामींनीं आज स्वानंदपुरीस जावयाचें असें शिष्यांजवळ सांगितलें हें श्रवण करून सर्व लोक बहुतच विस्मय करूं लागले. नंतर त्या सत्पुरुषाचा वियोग सहन न झाल्यामुळें कांहींवेळ स्तब्ध राहून, नंतर उत्तरकर्म करण्याची सर्व तयारी करून श्रीॐकारेश्वराचे पूर्वबाजूस नदीतीरावर चांगले स्थळीं मोठा गर्त करून तेथें त्यांच्या पुत्रांनीं यथाविधी स्वामींची स्थापना केली. पुढें त्यावर पार बांधून अश्वत्थारोपण केलें. तो वृक्ष हल्लीं कायम आहे. हरिभटबावांचे चरित्रकार कै. विष्णु गणेश पटवर्धन चरित्रांत लिहितात कीं, " समाधिपूजन गोविंद हरी यांचे वंशिकांकडून होत असून,त्यांचे सर्व वंशिक आपापले शक्तितारतम्यानें पुण्यतिथीदिवशीं स्वामींची आराधनाहि करीत असतात. " चरित्रकारांचे ह्मणण्याप्रमाणें फक्त समाधीची पूजा मात्र गोविंद हरी यांचे वंशजकांडून चालूं आहे. मात्र पुण्यतिथी आपापले शक्तितारतम्यानें करीत असतात; असें जें चरित्रकारानें लिहिलें तें मात्र आत्मवंशियांची फाजिल स्तुती केली असें ह्मणणें भाग पडतें. समाधीसंबंधीं हल्लीं काय व्यवस्था आहे ती माहिती मी पुढें देत आहे. यावरून वाचकांस मीं वर लिहिलेलें वाक्य योग्य आहे असें सहज वाटेल अशी माझी समजूत आहे.

श्रीमंत पेशवे सरकारांस साधूचा वियोग झाल्याबद्दल कांहीं खेद वाटून ते सर्वांस ह्मणत कीं, अशा सत्पुरुषाचें सदा स्मरण रहावें ह्मणजे त्या पुण्यानें तरी तशी स्थिती मिळेल. श्रीमंत वारंवार बावांचें स्मरण करून ह्मणत कीं, हरिभटबावा पटवर्धनांसारखे ईश्वरसाक्षात्कार असलेले महाविरक्त साधू हल्लीं कोणीं दिसत नाहींत. पूर्वी समर्थ रामदास व ज्ञानेश्वर झाले त्याप्रमाणें बावांनींहि अनेकांचे कष्ट दूर केले व त्यांस चांगले मार्ग दाखविले व त्याचा प्रत्ययही दिला. आणि तसा प्रत्यय सरकारासही बहुतवार आला. बावांचें स्मरण सर्वतो-

मुखीं रहावें ह्मणून श्रीकृष्णा व वार्णा संगमस्थानाजवळील जमीनि ब्राम्हणांस स्नानसंध्यादि षट्कर्में करून राहण्यास वंशपरंपरा इनाम देऊन गांव वसवावा व त्या गांवास हरिपूर हें नांव द्यावें; ह्मणजे हरिभटबावांचें स्मरण चिरकाल राहील. ही विनंति ऐकून वरील-प्रमाणें करण्याकरितां गोविंद हरी यांचें नांवें जमीन देऊन, गांवास हरिपूर हें नांव ठेवण्याचा हुकूम केला. त्याप्रमाणें गोविंद हरी यांनीं गांवाची वसाहत केली. नंतर गोविंद हरी यांचे पश्चात् त्यांचे चिरंजीव गंगाधरराव गोविंद ऊर्फ बाळासाहेब यांनीं बावांचे चरित्रकार यांचे मातामह विष्णुपंत उत्तुरकर ( हे हरिभटबावांचे शिष्य-वर्गांतील कृष्णंभट जोशी वरवडेकर यांचे पुत्र )यांजकडून गांव-वसाहत चांगली होईल हें समजून त्यांसच तें काम सांगून तो गांव पूर्णतेस आणिला. हल्लीं तो गांव हरिपूर या नांवें सांगलीजवळ प्रसिद्ध आहे.

हरिभटबावा मयुरेश्वराचे दर्शनास जाते वेळीं त्यांचा सातारा येथें मुक्काम झाला होता. त्यावेळीं सातारकर महाराज यांनीं बावांस दर्शविलें कीं, आपल्यासारख्यांचा योगक्षेम चालविला पाहिजे. तरी आपण पुन्हां एकवार दर्शन द्यावें ह्मणजे ठीक होईल. बावांचे मनांतून दान घेणेचें नसल्यामुळें ते तावडतोब दुसऱ्या मुक्कामावर गेले. ही हकीकत त्रिंबक हरी यांना समजली. त्रिंबक हरी अक्कलकोटकरांचे पदरीं असल्या-मुळें सातारादरबारीं त्यांचीं विशेष वळणें होतीं. त्यामुळें महाराज सरकारास भेटून त्यांच्या इच्छेप्रमाणें श्री कृष्णाकाठीं त्यांनीं इनाम मिळविलें. तें बावांचे नांवें करून घेतलें.

श्री.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शक ७२ क्षयनाम संवत्सरे चैत्र बहुल १३ क्षत्रीय कुलावंत श्री राजा शिवछत्रपती स्वामी यांनीं मौजे कागवाड कसबे सैसाळ प्रांत मिरज यांस आज्ञा केली ऐसाजे, वे॥ मूर्ती हर-भट बि॥ बाळंभट उपनांव पटवर्धन गोत्र कौंडिण्य सूत्र आश्वलायन

यांनीं शाहूनगरनजीक किल्ले सातारा येथील मुकामीं स्वामीसंनिध येऊन विनंती केली कीं, आपण कुटुंबवत्सल स्नानसंध्या षट्कर्मे आचरण करून स्वामीस व स्वामींच्या राज्यास कल्याण चिंतून आहों. आपल्यास कुटुंबासह वास्तव्यास श्रीकृष्णातीरीं स्थळ व योगक्षेमास कांहीं इनाम जमीन देऊन वंशपरंपरेनें चालविलें पाहिजे ह्मणोन विनंती केली. त्याजवरोन मनास आणून भले सत्पात्र यांच्या कुटुंबाचा योगक्षेम चालविला पाहिजे हें श्रेयस्कर असें समजून स्वामी यांजवर कृपाळु होऊन मौजे कागवाड येथील वाडी देवन-हाळपैकीं नूतन इनाम जमीन अव्वल दुमशिम तीन वावतीच्या काठीचे मोजणीनें चाहूर दोन स्वराज्य व मोगलाई एकूण दुतर्फें येथील जमीन तिजाई कुलबाब कुलकानू हल्लीं पट्टी व पेस्तर पट्टी हकदार खेरीज करून पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम देऊन वाडी मजकूर ओत नदी × × × ×* श्री बाळेश्वरसान्निध वास्तव्य करा-वयाची आज्ञा केली असे. ब्राह्मणसमुदायासह तेथें घरें बांधून राहतील. त्यास वाडी मजकूर सन्निध कृष्णातीरीं सदरहु पैकीं दोन चाहूर जमीन काठीचे मोजणीनें चतुःसिमापूर्वक याचे दुमाला करून त्याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें सदर दोन चाहूर जमीन चालविणें. प्रतिवर्षी नवीन पत्राचा आक्षेप न करणें. या पत्राची नक्कल लिहून घेऊन हें पत्र भोगवट्यास त्यांजपाशीं परतोन देणें. जाणिजे. लेखन सिमा रुजु सुरु सुद ता. छ. २६ माहे रबिलावल सु॥ सीत आर्बैन मया व अल्लफ.

सदरहु इनामपत्र त्रिंबक हरी यांनीं सन १७४६ त मिळविलें. नंतर इनाम जमीन दोन चाहूर भाऊबंदास वाटून देऊन, दुसऱ्या दोन चाहूर जमीनीवर वसाहत करून श्रीगणेशमंदिर बांधलें. ह्मणून गणे-शपूर हे नांव प्राप्त झालें. परंतु हल्लीं गणेशपूर न ह्मणतां गणेशवाडी हेंच नांव प्रसिद्धीस आलें आहे. हरिभटबावा समाधिस्त होण्यापूर्वी

* अक्षरें लागत नाहींत ह्मणून फुल्या टाकिल्या आहेत.

चारच वर्षें हें इनाम मिळविलें व त्यानंतर गांव वसविला. या गणे-शपूर ऊर्फ गणेशवाडी येथें बावांनीं कांहीं दिवस वास्तव्य केल्याचें आढळून येत नाहीं.

पुणें येथील ॐकारेश्वराचे देवालय हल्लीं पुण्याची वस्ती वाढल्या-मुळें अगदीं वस्तीस लागून आहे. शंभर वर्षांपूर्वी वरील देवालयाचे आसपास स्मशान होतें. आतां त्याठिकाणीं घरें झालीं आहेत. आतां पावसाळीं स्मशान मात्र देवालयासमोर बावांचे समाधीस लागून चालू आहे. प्रेतदहन होत असतां होणारे आवाज व सुटणारी घाण, समाधीचे एकेबाजूस असलेल्या घरांतील लोकांस व समाधीचे पुजाऱ्यांस नकोनको करून सोडत असेल. अशा या सुधारणावादि शहरांत ही केवढी गैरव्यवस्था ! ! असो.

श्रीब्रम्हीभूत हरिभटबावा यांचे समाधीसंबंधीं माहिती अशी कीं, समाधीचें पूजन व नैवेद्य सरदार सांगलीकर यांचेकडून हल्लीं चालूं आहे. नैवेद्याकरितां ६० रु. व पुजाऱ्यास सालीना वेतन २४ रु. मिळून समाधीकडे ८४ रु. आणि सांगलीकरांच्या वाड्यांत देव आहेत, त्यांच्या पूजेबद्दल पुजाऱ्यास सालिना वेतन ३६ रु. व भोजन. शहरांतील रहाणीच्या खर्चाच्या मानानें पहातां वेतन कमी आहे. आतां ह्या दोन्ही पूजा एकाचकडे आहेत म्हणून साधारण चालतें. वाड्यांत जे देव आहेत त्यांत हरिभटबावांचेही देव आहेत असें समजतें. सदरहु दोन्ही पूजा वे० रा. गणेशभट बिन विनायकभट मराठे करीत आहेत. गणेशभट यांचे आजे रामचंद्रभट यांनीं ह्या पूजा संपादिल्या. या समाधीप्रीत्यर्थ बावांचे पुण्यतिथीचे दिवशीं वार्षिक ब्राम्हणभोजन, अभिषेक, वेदघोष व भजन-पूजन इत्यादि प्रकारें पुण्यदायक कर्मै येथें होणें अत्यंत अवश्यक होय. परंतु, यापैकीं कांहींच होत नाहीं. ज्यांचे घराण्यांत बावांसारखे भगवद्भक्त झाले त्यांचे वंशज अशा पुरुषांचे नांवें मोठें देवालय बांधून नंदादीप व नित्य त्रिकाल चौघडा ठेविनात. आणि वार्षिक ब्राम्हणभोजन,

अभिषेक, वेदघोष व कीर्तन याप्रकारें उत्साव करितात. हरिभटबावांचे वंशज हल्लीं जे हयात आहेत ते अत्यंत कंगाल स्थितींत आहेत काय? कंगाल स्थितींत असणाऱ्यांस जितका आपल्या वाडवडिलांचा स्वाभिमान असतो, तितकाही बावांचे वंशजास वाडवडिलांचा अभिमान नसावा काय? अत्यंत लाजिरवाणी व दुःखाची गोष्ट ही कीं, बावांचे वंशजांपैकीं हल्लीं जे वंशज हयात आहेत त्यांत मध्यम व उच्च दर्जाचे वर्गांतील वंशज बरेच आहेत, परंतु कांहीं लक्षाधीशही असून शिवाय संस्थानिक आहेत. अगदीं कंगाल स्थितींत कोणीच नाहीं. असें असतां ज्यांच्या पुण्यप्रतापें आपणांस अशी सुस्थिति व राजऐश्वर्य प्राप्त झालें आहे, त्याची जागरूकता जर या संस्थानिकांस असती तर पुणें मुक्कामीं प्रतिवर्षीं मोठा उत्सव होऊन, नित्य चौघडा व नंदादीप चालू राहिले असते ! ! आणि बावांचे समाधिस्थानावर आज विस्तीर्ण दिव्य मंदिर पुणेंकरांसच काय पण इतरांसही दृष्टिगोचर झालें असतें !!!

हरिभटबावांचे वंशांतील देशाभिमानी व वंशाभिमानी अशा शूर-वीर पुरुषांचा सन १८१८ पर्यंतचा सर्व काल लढाईच्या धामधुमींत व स्वतःस राहण्यास बंदोबस्ताच्या जागा करण्यांतच गेला. त्यानंतर ह्मणजे आज एक शतकपर्यंतचे कालांत लढाया वगैरे कांहीं नसल्यामुळें शांततेचा काल गेला. येवढ्या शांततेच्या कालांतील पटवर्धन संस्थानिकांपैकीं, हल्लीं हयात असलेल्या संस्थानिकांपर्यंत जे पुरुष झाले त्यांत कमी जास्ती प्रमाणानें देशाभिमानी, कुलपरंपराभिमानी वर्णाश्रमधर्माभिमानी व ज्ञानसंव्येशील असे होऊन गेले. श्रीमंत कै० अपासाहेब जमखिंडीकर, कै० तात्यासाहेब सांगलीकर, कै० तात्यासाहेब मिरजकर, कै० दादासाहेब मळेकर, कै० बापूसाहेब कुरुंदवाडकर, कै० बाळासाहेब कुरुंदवाडकर व कै० दाजीसाहेब कुरुंदवाडकर इतक्या सरदारमंडळींपैकीं, कोणीही अधर्मानें वागले नाहींत. इतकेंच नव्हे तर केव्हांही स्नानसंध्यादि नित्य कर्मांस ते अंतरले नाहींत.

या पिढीपर्यंत हरिभटबाबांचे वंशजांनीं बावांचा उपदेश ध्यानीं वाग-विला, असें ह्मणण्यास कांहींच हरकत दिसत नाहीं. या संस्थानिकां-पैकीं कै० आपासाहेब जमखिंडीकर व कै० तात्यासाहेब सांगलीकर यांच्याकडे कांहीं कामानिमित्त्य हा ग्रंथकर्ता दोन तीन वेळां गेला होता.श्री. कै० बाळासाहेब कुरुंदवाडकर व दाजीसाहेब कुरुंदवाडकर यांची मात्र या ग्रंथकर्त्यावर अत्यंत कृपा होती.

श्रीगजाननभक्त हरिभटबावा यांनीं जी पडशी गोविंद हरी यांच्या स्वाधीन केली त्या पडशींतील सामान खालीलप्रमाणें—

शके १७२८ त ह्मणजे सन १८०६ त नोंदलेली एक यादी सर-दार सांगलीकर यांच्याजवळ हल्लीं आहे. ती येणेप्रमाणेंः—

१ तिवट, २ पायजमा ( गजनीचा ), ३ पटका ( जरीच्या बुंदाचा ), ४ झगा ( आंगरखा ), ५ पेटी ( गजनीची ), ६ बासन.

हरिभटबावांच्या नित्य पूजन करण्याच्या मूर्ती दोन; श्रीगजानन व श्रीकरंजेश्वरी होत. त्या मूर्ती हल्लीं सरदार आण्णासाहेब पटवर्धन कुरुंदवाडकर सीनीयर यांच्याकडे असून, त्या मूर्तींची ते नित्य आरा-धना करीत असतात.

सरदार बाबासाहेब पटवर्धन मिरज—मळा यांच्याजवळ रुद्राक्षांची माळ, वाटवा ( पेशाचा ), पिशव्या दोन ( एक लहान व एक मोठी ), आणि श्रीशिवछत्रपती शिक्याचे तांब्याचे पैसे वगैरे बावांच्या वस्तू आहेत.

## प्रांत रत्नांगिरी कसबें कोतवडें येथील पटवर्धनांचा वंशवृक्ष.

हरिभट

बाळंभट | कृष्णंभट | रघुनाथभट (शीळकर घराणें)

(बाळंभट यांचे पुत्र:) **हरिभटबावा** पु० ७ | केशवभट (भिलवडीकर) | विठ्ठलभट (यादवाडकर)

(हरिभटबावा यांचे पुत्र:)
१ कृष्णंभटबापा
२ बाळंभटआण्णा
३ लिंबकपंत
४ गोविंदपंत
६ रामचंद्रआपा
७ भास्करपंत.

## सरदार पटवर्धन यांचें कर्तृत्व, मर्दुमकी व स्वामिसेवा.

### प्रकरण २ रें.

हरिभटबावा वरघाटीं येण्यापूर्वीची सर्व माहिती मागें दिलीच आहे. बावा सर्व कुटुंबासह कुरुंदवाड येथें राहिल्यावर, पुढें कांहीं मंडळीसह यात्रेस गेले. यात्रेहून परत येतांना पुणें येथें मुक्काम झाला असतां, श्रीमंत वरचेवर दर्शनास येऊन भोजनसामग्री पुढें ठेवून, ते वारंवार आपल्यासारख्या पुण्य पुरुषाची सदा संगती असावी अशी प्रार्थना करीत. असे कांहीं दिवस गेल्यावर पुढें कुरुंदवाडास जाण्याकरितां बावा निघाले. तें पाहून श्रीमंतांनीं आपल्याजवळ रहाण्याचा आग्रह केला. परंतु, बावांची उत्तरोत्तर वैराग्यवृत्ती वाढत असल्या-

मुळें तेथें राहणें त्यांनीं मान्य केलें नाहीं; हें पाहून श्रीमंतांनीं मनांत आणिलें कीं, हरिभटबावांचे चिरंजीव जरी आमचे संग्रहास राहतील तरी आम्हांस निर्विघ्नपणें शत्रूपासून जय मिळणारा आहे. असें मनांत आल्यावरून, श्रीमंतांनीं बावांस आग्रहाची विनंति करून, चिरंजीवांस तरी आमचेजवळ अवश्य ठेवावें, अशी प्रार्थना केली. बावांनीं चिरंजीव गोविंद हरि व रामचंद्र हरि अशा दोघांस श्रीमंतांजवळ ठेवून दिलें. पुढें श्रीमंतांनीं बावांचे दर्शनास कन्यापुत्रादि आणून, बावांस कन्येकडून नमस्कार करवून, हिला चांगला वर मिळावा ह्मणून शोध करीत आहोंत; परंतु अद्याप वर मिळत नाहीं; हिचा वर कोठें आहे हें कळावें ह्मणून प्रार्थना करितां, स्वल्पकाळ हरिभटबावा स्वस्थचित्त होऊन सांगतात कीं, हिचा नवरा कापशीकर सेनापतींनीं पुत्रवत् पालन केलेला नारायणराव जोशी यांस श्रीव्यंकटेश प्रसादानें प्राप्त झालेला पुत्र तो हिचा वर आहे. हें श्रवण करितांच सर्वांस संतोष जाहला. परंतु हा योग कसा येईल, हा विचार करून हरिभटबावांस विनंति करितात कीं, महाराज, आपण सांगितलेला वर मिळण्यास बहुतच प्रयास; कारण आम्ही ही पृथ्वी सातारा छत्रपतींचे सत्तेंत आणणारे; आणि कापशीकर तर करवीरपक्षाचे ! तेव्हां हा वरलाभ आपल्या प्रसादेंकरून व्हावयाचा; तरी या कन्येवर आपली कृपादृष्टी पाहिजे. तेव्हां बावा ह्मणाले, मी तिकडे जात आहे. आपला मनुष्य पाठवावा ह्मणजे काम होईल. त्याप्रमाणें बावांच्याच कृपेनें सदरहू लग्न सन १७१७ त झालें.

गोविंद हरि व रामचंद्र हरि हे श्रीमंतांजवळ राहिले. श्रीमंतांनीं हे हरिभटबावांचे पुत्र या पूज्य भावनेनें त्यांची अन्नवस्त्रांची वगैरे सर्व व्यवस्था उत्तम केली. " भाग्योदयाची वेळ आली म्हणजे सर्व गोष्टी जमून येतात. " श्रीमंतांच्या पदरीं राहून या बंधुद्वयांनीं घोड्यावर बसणें, तिरंदाजी करणें, निशाण मारणें, तलवार, भाला व बोथाटी वगैरे कामांत प्राविण्य संपादिलें. श्रीमंत बाजीराव बल्लाळ

यांनीं गोविंदपंतांची हुषारी पाहून, इंद्रोजी कदम यांच्या पागेची फड-णविशी सन १७३० त सांगितली. कदम यांनीं गोविंदपंतांची शिफारस श्रीमंतांजवळ केली. सन १७३६ यावर्षी कदम मृत्यू पावल्यामुळें यांचें कामही गोविंदपंतच पाहूं लागले. सन १७४१ त कदम यांच्या पागेची सरदारी गोविंदपंतास मिळाली. पुढें १७६२ त श्री. राघोबादादांनीं मिरजेवर स्वारी केली त्यावेळीं गोविंदपंतनानानीं मिरजेचा किल्ला विशेष करामतीनें झुंजविला.

" बापसे बेटा सवाई; " या ह्मणीप्रमाणें, गोपाळराव गोविंद फारच शूर निपजले. दमाजी गायकवाड याचे लढाईत गोपाळराव होते. सावनूरचे नबाबावर पेशव्यांची फौज सन १७५५।५६ त गेली त्यावेळीं गोविंद हरि व गोपाळरावहि होते. यांनीं आपली तलवार गाजवून नबाबाचा मोड केला व आपल्या मध्यस्थीनें पेशवे-सरकारांशीं त्याचा तह करविला. या उपकाराबद्दल नबाब यांनीं आपल्या जहागिरीपैकीं दोदवाड हा ठाण्याचा गांव गोपाळराव यांस सन १७६९ त इनाम करून दिला. तो गांव हल्लीं सांगलीकरांकडे चालत आहे.

आतां रामचंद्र हरिसंबंधीं थोडी माहिती देतों:— रामचंद्र हरि एका घोड्यानिशीं श्रीमंत चिमाजी आपा यांचेजवळ चाकरीस राहिले. यांनीं स्वाऱ्या शिकाऱ्या बहुत केल्या. यांस श्रीमंत चिमाजीआपा खडी ताजीम देत असत. श्रीमंत बाजीरावसाहेब यांणीं कोणे एके समयीं रामचंद्रपंत आपास ताजीम दिली नाहीं ह्मणून हे कचेरींतून उठून गेले. श्रीमंतांनीं चिमाजीआपास विचारिलें, रामचंद्र हरि मोठा रागीट आहे. कचेरींतून उठून गेला. असें ह्मणतांच श्रीमंत चिमाजीआपा बोलले, ' तो शिपाई आहे, आपण ताजीम दिली नाहीं ह्मणून उठून गेला. ' तें मनांत धरून पुढें हिंदु-स्थानचे स्वारीस सवाई जयसिंग यांचे लढाईत त्यांणीं सांगितलें कीं, ' आम्हांकडील एक भालेकरी व तुम्हांकडील एक भालेकरी अशी

लढाई व्हावी. तुम्हांकडील भालेकरी यानें आमचे भालेकरी यास मारल्यास आम्ही चवथाई राज्य तुम्हांस देतों." असें ठरून त्यांनीं एक रजपूत भालेकरी तिकडून पाठवून दिला. नंतर श्रीमंत अंबारींत होते तेथून रामचंद्र हरि यांस बोलावून सांगितलें कीं, 'तुम्ही पुढें व्हावें.' नंतर श्रीगजाननाचें व हरिभटजीबावांचें स्मरण करून आपांनीं घोडा पुढें ढकलला. नंतर तिकडून भालेकरी आला. त्यानें विचारिलें, तुम्ही कोण आहां? आपांनीं उत्तर केलें आम्ही शिपाई आहोंत. याप्रमाणें ते बोलले. तों श्रीमंत चिमाजीआपा श्रीमंत बाजीराव यांस बोलले, 'आपण ही गोष्ट नीट केली नाहीं. आमची ब्राह्मणांची शिपाईगिरी मुसलमान-रजपूत यांजपुढें नाहीं! आतां तो अब्रूचा ब्राह्मण फुकट मरून जाईल!' याप्रमाणें बोलले. नंतर उभयतांची लढाई लागली. दैवयोग व श्रीगजाननाची कृपा व श्रीमंतांचा होता काळ, त्यामुळें अकस्मात् भाला रजपूत याचे भ्रूमध्यभागीं लागून ठार ⁂ जाहला. तो श्रीमंतांकडील शहाजानें नौबती वाजवून श्रीमंतांनीं आपले लष्करांत रामचंद्र हरि यांस बहुत

⁂ हरिवंशाचे बखरींत वरीलप्रमाणें माहिती आहे परंतु, याच स्वारींतील रामचंद्र हरीची हकिकत निराळी आहे. ती अशीः—" जयसिंगाची व पेशव्यांची लढाई झाली. त्यांत रामचंद्र हरि यांनीं फारच पराक्रम केल्यावरून श्रीमंत पेशवेबंधू संतुष्ट झाले. जयसिंगाबरोबर तह जाहल्यामुळें, जयसिंगानें श्रीमंतांस खूष करण्याकरितां आपल्या तंबूपुढें दोन मदोन्मत्त हत्तींची झुंज लाविली होती. पैकीं एक हत्ती एकदम मंडळींचे अंगावर आला. त्यावेळीं त्या हत्तीस धरून त्याच्या जागेवर बांधण्याची एकाचीहि छाती होईना. तेव्हां खरा शूर असेल तोच या हत्तीस बांधील असें सर्व ह्मणाले. तों रामचंद्रराव यांनीं बरची भाल्यासह घोड्यावर स्वार होऊन, सदरहु हत्तीस जेरीस आणून, त्यास त्याच्या जागेवर बांधिलें. यामुळें रामचंद्र हरि यांची फारच वाहवा झाली."

सरंजामानें आणिलें आणि अडीच हजार रावतांचा सरंजाम देऊन वस्त्रें दिलीं. सन १७३९ त श्रीमंत चिमाजीआपानीं वसईवर स्वारी केली. या स्वारींत रामचंद्र हरि यांनीं मोठ्या शूरत्वानें शत्रूचा मार सोसीत प्रथम किल्ल्यांत शिरून, किल्ल्यावर पेशव्यांचें निशाण लाविलें. असें यांचें धैर्य पाहून, सरदारी, पोषाख व चोविसशें स्वारांच्या पथकावर यांची नेमणूक केली.

सन १७५० पर्यंत कृष्णंभट बापाजी आपल्या पुत्रांसह कुरुंदवाड येथेंच होते. मंगळवेढें, करकंब, पंढरपूर व विजापूर हा सर्व मुलुख शाहू महाराजांनीं प्रतिनिधीस जहागीर दिला होता; तो पेशव्यांनीं घेऊन मंगळवेढची मामलत श्रीमंतांनीं मेघःशामबापूस दिली. सन १७५०।५१ त मंगळवेढ्याची मामलत मेघःशामबापूकडे आली. तेव्हां कृष्णंभट बापाजी सर्व कुटुंबांसह मंगळवेढ्यास येऊन राहिले. बापाजींचे पुत्र नारायणराव हे गोपाळरावदादा यांजवळ जाऊन राहिले. त्या उभयतांचा बहुत लोभ. मिरजदौलतीचा सर्व कारभार नारायणरावनाना करीत. गोपाळराव सरदार व त्यांचे कारभारी नारायणराव याप्रमाणें चालले.

नारायणरावांनीं आपल्या प्रपंचाचाही बंदोबस्त उत्तम केला. कुरुंदवाडहून मंगळवेढ्यास जाते वेळीं, त्रिंबकपंत आपानीं नऊ घोडीं मात्र दिलीं होतीं. वाटखर्चास तांदूळ देखील दिले नाहींत. हरिभटबावांचा कोणी शूद्र स्नेही होता. त्यानें मंगळवेढेपर्यंत लागणारा खर्च दिला. असें असतां नाना यांणीं प्रपंच बहुत थाटला. श्रीमंतांकडून तैनात चार हजार व पालखी मिळविली. मंगळवेढेस सन १७५६।५७ सालीं दीडशें रुपयेची जमीन इनाम झाली. नाना यांणीं सरकारांत कामकाज बहुत केलें. घोडनदीचे लढाईंत नारायणरावांच्या मानेवर तलवारीची जखम झाल्यामुळें त्यांचा अंत झाला.

पुरुषोत्तमरावदाजी हे शूर व मोठे मुत्सद्दी होते. हे वयाचे सहावे वर्षीं शिऊबाआपाबरोबर सातार्‍यास जात असतां, वाटेंत

माहुली येथें कृष्णास्नानास उतरले. तेथें वाळवंटींत दाजी खेळत होते. तेथेंच शिऊबा यांचीं धोतरें वाळत घातलीं होतीं. तो अकस्मात् त्या मार्गानें शाहूमहाराज यांची स्वारी आली. ते एकटे असून पायांत विजार, हातांत छडी व त्यांच्या मस्तकांसही कांहीं नाहीं अशा वेषानें आले. तों दाजी बोलला, अरे गोसाव्या, आमच्या धोतरांस शिवशील. महाराज ह्मणाले; अरे मुला, तुझ्या धोतरांस आह्मी कांहीं शिवतें नाहीं ! असें ह्मणून ते तेथून जाऊन आंब्याच्या वृक्षाखालीं बसले. तों मागाहून हत्ती, घोडे, पालखी, चोपदार व भालदार वगैरे सरंजाम आला. हें पहातांच दाजीनें शिवबास झालेली हकिकत सांगितली. इतक्यांत महाराजांनीं चौकशी करून शिऊबा पटवर्धनास बोलाविलें. दाजीस बरोबर न घेतां शिऊबा महाराजांकडे गेले. तों महाराजांनीं तुमचा मुलगा कोठें आहे ह्मणून विचारलें. शिऊबा ह्मगतात, महाराज, मूल लहान आहे. कांहीं हरकत नाहीं, त्यास जरूर आणावें. मुलास आणून महाराजांचे पायांवर घातलें. तों महाराज ह्मणाले, शिऊबा हा मुलगा मोठा धीट आहे ! आह्मांस " गोसाव्या, धोतरास शिवशील " असें बोलला. हा मोठा पराक्रमी होईल असें बोलून महाराजांनीं शेलापागोटें आणोन वस्त्रें दिलीं. मुलानें चरण धरिले. महाराजांनीं मस्तकीं हात ठेविला.

रामचंद्र हरि यांनीं दाजीस आपल्याजवळ बाळगिलें. पुढें मुंज व लग्न हीं रामचंद्रपंतअप्पांनींच केलीं. ज्या वेळीं शिवराजपूर येथें आपांचे प्राण घोटाळूं लागले, त्या वेळीं दाजी जवळ होते. दाजींनीं विचारले, आपा ! आपलें मनांत काय आहे ? तेव्हां आपा बोलले, भाऊस मीं शल्य करून ठेविलें ! तूं भाऊबरोबर भांडून वाटणी घेशील. नंतर दाजीनें उत्तर केलें कीं, माझ्या तळहातास केंस कांहीं आले नाहींत ! वाटणी मागणें हें काम निर्बळाचें ! मी कांहीं वाटणी मागणार नाहीं असें बोलले. नंतर आपांनीं आज्ञा केली कीं, भाऊ लहान आहे तोंपर्यंत ही पागा सांभाळून लौकिक रक्षण करून

माझें नांव रक्षण करावें, याप्रमाणें मला वचन देणें. दाजींनीं गळ्यावर हात ठेवून शपथ घेतली व वचनही दिलें. पुढें आपांचा काळ झाला, शेवटील कार्य सर्व दाजींनींच केलें. त्यासमयीं अंताजीपंततात्या यादवाडकर आपांचे चुलत बंधू तेथेंच होते. सन १७४९ त आपांचा अंत झाला. या वेळीं भाऊंचें वय आठ संपून नवव्यावर्षास आरंभ झाला असावा. या वेळीं भाऊंची मुंज झाली नव्हती असें पुढील पत्रावरून ठरतेः—

श्री.

रा. पुरुषोत्तमराव गोसावी यासीः—

सु॥ सलास खमसेन मया व अल्लफ तुह्मीं चिठ्ठी पाठविली ती पावली, मजकूर कळला. त्यास कोणा एकास बहुमान झाला ह्मणजे सर्वांसच दिला असें जाणावें. एकघरची गोष्ट याजप्रकारची असते. जेथें सर्व एकजागा आहेत तेथें हा संशयभेद खावंदांनीं न मागावा वर तुह्मीही न मागावा. गोपाळरावाचा जो बहुमान जाहल्यास गोविंदपंताचा झालाच. तुमचा झाल्यास रामचंद्रपंताचे लेकाचा झालाच. विस्तारें काय लिहिणें. "श्रीमंत रावसाहेब यांचें पत्र सन १७६३"

दमाजी गायकवाड याचें खूळ उभें राहिलें तेव्हां त्याच्या बंदोबस्ताकरितां बरोबर पटवर्धन यांसही रवाना केलें. ते समयीं पुण्यांत कोणी सरदारमंडळापैकीं बोलिला, रामचंद्र हरि यांचें पथक बाळपरवेशी. रांडरोटी चालवावयाची; गोपाळरावामुळें चालवावें असें कोणी बोलला. ते समयीं पुण्यांत परशरामभाऊंची मातोश्री होती. त्यांणीं ऐकलेंवरून पुरुषोत्तमदाजीस बोलावून, मातुश्री फार श्रमी झाली, आणि बोलली, वडील गेले, मूल लहान, आपलें कोणी कर्तें नाहीं. याजमुळें अशीं उणीं उत्तरें ऐकणें प्राप्त झालीं ! तुझेंहि वय लहान. तुला वडिलांनीं सांगितलें तो कांहीं अभिमान धरून कामकाज करून दाखीव ! असें ह्मणून फार श्रमी जाहली. नंतर दाजी बोलले, बाई, तुला एक ठाऊक असोंदे. या स्वारींत निराळी चाकरी

करून दाखवीन तरच तुला तोंड दाखवीन; नाहीं पेक्षां पांढरे कावळे असतील तिकडे जाईन ! असें ह्मणून आपले पागेंतील मानकरी व शिपाई या सर्वांस बोलले कीं, निराळी चाकरी करून दाखवितां, किंवा रांडरोटी खातां ? तेव्हां सर्व ह्मणाले, आह्मांस कांहीं अभिमान नाहीं काय, बाईचे पायांवर हात ठेवून, प्रसंगास आह्मी मागें सरणार नाहीं; असेंही बोलले. नंतर दाजी आपली सर्व पागा घेऊन साताऱ्यास लढाईवर गेले. लढाई सुरू झाली. गोपाळरावदादा निराळे उभे होते. दाजीही आपलें पथक घेऊन निराळेच उभे राहिले. रास्ते व गायकवाड यांसीच तोंड लागलें. तों रास्ते यांच्या फौजेचा मोड जाहला. गायकवाडाची फौज पाठीस लागली. ते माहुलीपर्यंत मारीत गेले. तों मध्येंच रामचंद्र हरीचें पथक घेऊन पुरुषोत्तमदाजी उठले. तों खासा दमाजी गायकवाड याचीच गांठ पडून लढाई मानवर झाली. दमाजी गायकवाड याची फौज मोडून किल्ल्याचें माचीपर्यंत मारीत गेले. याप्रमाणें बिघडलेली लढाई सुधरली. ते समर्थी पुण्यास अकबार गेली. आज रामचंद्र हरि याचे पथकांत दाजी यांणीं कामकाज चांगलें केलें. त्यावेळेपासून श्रीमंत नानासाहेबांची पूर्ण कृपा झाली.

श्रीमंतांनीं साताऱ्यास बंदोबस्त करून दमाजी गायकवाड यांसी तह केला. त्यास वस्त्रें देऊन परत जाण्यास सांगितलें. दमाजीनें श्रीमंतांस आपल्या डेऱ्यावर पानसुपारीस बोलाविलें. श्रीमंत दाजीस बरोबर घेऊन गेले. पानसुपारी होऊन दमाजीनें श्रीमंतांस बहुमोलाचीं वस्त्रें देण्यास पुढें केलीं तों दमाजीकडून तींच वस्त्रें दाजीस देवविलीं. अशा रीतीनें श्रीमंतांनीं दाजींचा बहुमान केला. त्यांनीं हात जोडून विनंती केली कीं, सर्व अभिमान स्वामींस, आह्मांस वाढवावें असें स्वामींच्या मनांत आहे त्यापेक्षां आह्मांस काय कमी ! याप्रमाणें श्रीमंतांचा पूर्ण लोभ संपादन केला.

पुरुषोत्तमदाजी यांचा जन्म सन १७२९ मध्यें. रामचंद्र हरि

यांचे अंतकाळीं दाजींचें वय १४ वर्षांचें होतें. सन १७५५।५६ सालीं सावनूरवर स्वारी झाली. श्रीमंत नानासाहेब पेशवे, श्रीमंत भाऊसाहेब आणि गोपाळराव हे स्वारीवर असतां, श्रीमंतांनीं दाजींची आठवण पांचसात वेळ करून गोपाळरावदादास विचारिलें. तेव्हां दाजी मंगळवेढ्यास घरीं आजारी असल्यामुळें राहिले आहेत. पुन्हां श्रीमंतांनीं गोपाळरावदादास आज्ञा केली कीं, त्यांचेकडे स्वार पाठवा आणि प्रकृती बरी असल्यास ताबडतोब बोलवा. आज्ञेप्रमाणें स्वार रवाना झाले. दाजींची प्रकृती नुकतीच बरी झाली होती. ते श्रीमंतांचे आज्ञेप्रमाणें स्वारींत दाखल झाले. श्रीमंत व गोपाळराव वगैरे कचेरींत बसले असतां दाजी तेथेंच गेले व श्रीमंतांस नमस्कार केला. श्रीमंतांनीं बसावयास सांगून कुशल विचारलें. नंतर पंधरा दिवस झाले, किल्ल्यास मोर्चे दिले असून अद्याप आंतील बातमी कांहींच समजत नाहीं वगैरे बोलणें चाललें. काय करावें असें श्रीमंतांनीं भाऊसाहेबास विचारिलें. तों दाजी बोलले कीं, मला आज्ञा झालियास मी बातमी आणीन. श्रीमंतांनीं आज्ञा केली कीं, बातमी आणावी. दाजी दोनशें स्वारानिशीं किल्ल्याचे भोंवते *तलाव्यास गेले. तों आंतील ×कहीस तट्टें पांच पन्नास किल्ल्याचे लगत कुरण होतें त्यांत गवत कापावयास आलीं होतीं. त्यांत कांहीं स्वारही होते. त्यांची यांची थोडीशी लढाई जाहली. ती सारीं तट्टें व माणसें धरून दरोबस्त एका चार घटकेंत घेऊन आले. तों श्रीमंत कचेरीस बसले होते. श्रीमंतांस नमस्कार करून, तट्टें व माणसें धरून आणिलीं, तीं +पागेस लावावयाची आज्ञा व्हावी. व माणसें आणिलीं आहेत त्यांस बातमी विचारावी. असें ह्मणतांच श्रीमंतांस बहुत संतोष होऊन, श्रीमंत भाऊसाहेब यांस बोलले कीं, अरे भाऊ, पुरुषोत्तमराव

---

* टेहाळणीस. × दाणावैरण आणावयास. + सरकारी पागेस जमा करावयाची.

नुकते आले, अद्यापी कंबर देखील सोडिली नाहीं, तों आह्मांस आठ पंधरा दिवस झाले किल्ल्यांतील बातमी अगदीं नव्हती, ती बातमीही आह्मांस लागली व घोडींही पागेस लागलीं! गोपाळराव यांनीं असलें मनुष्य घरीं ठेविलें होतें! असें किंचित् रागानें बोलले.

" हरिवंशाची बखर पान ८ मध्यें ' श्रीमंतांनीं चिरंजीव भाऊ-जवळ तुमचें स्मरण पांचसात वेळ केलें ' असें गोपाळराव यांनीं पत्र दाजीस लिहिलें. " सदरहु भाऊ, हे परशरामभाऊ असें टिपेंत खालीं स्पष्टीकरण केलें आहे. परंतु परशरामभाऊ या स्वारींत नसून श्रीमंत भाऊसाहेबच फक्त होते. "

पुढें दुसरें दिवशीं श्रीमंतांनीं स्नानसंध्या आटपून ते लढाईस सिद्ध झाले. स्वारींत १ उभयतां बंधू अंबारींत बसले. सर्व फौज तयार होऊन आपलाले विल्हेवार उभी राहिली. तोफेची वगैरे मारगिरी आंतून बाहेरून चालली. सावनूरकर नबाब यांजकडील पठाण किल्ल्याचे २ रेवणीवर सतरंज्या हांतरून वर बसून तिरंदाजी करीत. याप्रमाणें तिराचा मार व बंदूकीचा मार चालला. तों श्रीमंतांनीं गोपाळरावदादांस हांक मारिली. तों भालदार बोलवावयास आले. तों गोपाळराव खांद्यावर ३ भाला घेऊन तसाच घोडा पुढें ढकलला आणि अंबारीच्या हत्तीजवळ आले. श्रीमंतांनीं आज्ञा केली कीं, पुढें जावें. असें ह्मणतांच तसेंच पुढें जाहले. तों जेथें तिरांचा व गोळ्यांचा पाऊस पडत होता, त्या जाग्यावर जाऊन उभे राहिले. आणि आपले जागीं ह्मणाले; आज माझे पंगतीस भाऊबंद मंडळींचीं ताटें पंचवीस जेवितात; परंतु आज मरावयास मी मात्र एकटा! याप्रमाणें बोलले. तो शब्द दाजी यांनीं ऐकिला. ते लगतच पाठीमागें होते. त्यांनीं आपला घोडा पुढें ढकलला आणि बोलले कीं, अरे दादा,

१ नानासाहेब व भाऊसाहेब. २ तटाखालीं खंदकाचे पुढें मोकळी जागा असते ती. ३ गोपाळरावांचा भाला अद्यापी मिरजेच्या किल्ल्यांत आहे.

तुला कळलें कां ? जे तुझ्या पंगतीस जेवतील ते मरतील, मार्गे सरणार नाहींत. असें ह्मणून खंदकाचे रेवणीपर्यंत जाऊन एक पठाण ठार मारिला. नारायणरावनाना हेही पुढें जाहले, तों दाजीस तिराची जखम लागतांच जिनावर डोकें ठेविलें; तों श्रीमंतांनीं अंबारींतून पाहिलें आणि बोलले कीं, अरे भाऊ, पुरुषोत्तमराव यांस जखम लागली, त्यास पालखी पाठवावी. नंतर श्रीमंतांनीं पालखी पाठविली. तों इकडे नारायणरावनाना यांचे खासगीचे स्वार होते त्यांनीं भाल्याची झोळी करून झोळींत त्यास घातलें, तों सरकारची पालखी आली. नंतर दाजी बोलले कीं, आह्मी असल्या पालखींत बसत नाहीं ! आमची शिलेदारांची झोळी हीच पालखी ! असें ह्मणतांच ती बातमी श्रीमंतांस समजली. श्रीमंतांनीं आज्ञा केली कीं, पुरुषोत्तमराव यास सांगावें कीं, आजपासून तुह्मांस १पालखी दिली. तुह्मी पालखींत बसावें. नंतर पालखींत बसून गोटांत आले. मग सरकारचे कमानदार वगैरे जखमा शिवणारे श्रीमंतांनीं पाठवून दिले. तों त्यांनीं येऊन पाहिलें आणि ह्मणाले, यांचा तीर काढतांच तिराबरोबर प्राण जाईल ! ते लोडास टेंकून बसले होते. त्यांनीं हें ऐकिलें, आणि आपले हातांनीं तीर उपसून टाकिला ! याप्रमाणें धैर्य ! असें पाहून सर्वांस आश्चर्य जाहलें. पुढें कांहीं दिवसांनीं जखमही बरी झाली. नंतर श्रीमंतांनीं सावनूरचा बंदोबस्त करून स्वारी पुन्हा पुण्यास आली. आलेवर तैनात पालखीसुद्धां पसतीसशें रुपये तैनातजाबल्यास करून दिली. याप्रमाणें श्रीमंतांची कृपा व सेवाही याप्रमाणें केली.

बखरींतील पान १० मधील टीपेंत रा. खरे यांनीं ठरविलेल्या सनांत ह्मणजे सन १७५५ च्या अखेरीस सावनूरचे स्वारीस जातांना श्रीमंत नानासाहेब, भाऊसाहेब व दादासाहेब पेशवे, हे त्रिवर्ग बंधू दाजींच्या सक्त रदबदलीवरून परगणें मंगळवेढें येथें किल्ल्यांत येऊन

१ तिच्या खर्चास दरसाल बाराशें रुपयांची तैनात दिली.

उतरले. श्रीमंत भाऊसाहेब मात्र लष्करांत उतरले. कृष्णंभटबापाजी यांनीं चौकांत सामोरे जाऊन श्रीमंतांस नारळ देऊन आशिरवाद दिला. भोजनसमारंभ झाल्यावर श्रीमंत नानासाहेब बोलले कीं, अरे भाऊ, कृष्णंभटजीनीं आह्मांस आशिरवाद केला, त्यांस काय द्यावें ? त्यांचें कुटुंब मोठें, पांच पुत्र, स्नुना, नातु. याप्रमाणें बोलले-वर, नारायणरावनाना बोलले कीं, स्वामीनीं आह्मांस कमी काय केलें आहे ! मग श्रीमंत बोलले कीं, तुह्मी चाकऱ्या करून तैनाता खातां; परंतु कृष्णंभटजीनीं आशिरवाद केला त्यांस काय द्यावें ? असें ह्मणून कलमदान आणविलें आणि स्वदस्तूरची भोजनखर्चा-बद्दल दरमाहा दीडशें रुपयेप्रमाणें अठराशें अकोटी रुपयांची यादी करून, कृष्णंभटजी यांचे हवालीं करून, नमस्कार करून, स्वारी चालती झाली.

कोणे एके दिवशीं श्रीमंतांनीं विचारलें. अरे पुरुषोत्तमराव, नारा-यणराव, तुह्मांला कांहीं द्यावेंसें वाटतें. त्यांनीं विनंति केली कीं, महा-राज, आह्मांस काय कमी आहे ? पालखी तैनाता सर्व बंदोबस्त स्वामीनीं करून दिला आहे. असें बोलतांच श्रीमंत बोलले कीं, तुह्मांस मंगळवेढेनजीक एक स्थळ तुमचीं मुलें माणसें रहाण्यास द्यावें असें मनांत आहे. नंतर त्यांनीं विनंती केली कीं, आम्ही आपले सोईचे जाग्याची योजना करून स्वामीस विदित करूं, असें ह्मणाले, आणि मौजे आंबें हा गांव पंढरपूरनजीक, भीमातीर मंगळवेढेही सन्निध, असा पाहून जाऊन विनंति केली, त्याजवरून त्यावेळेसच चिठ्ठी स्वदस्तूरची गोविंद हरि यांचे नांवची दिली; " मौजे आंबें परगणे मंगळवेढें हा गांव दरोबस्त नारायणराव कृष्ण व पुरुषोत्तम-राव कृष्ण या उभयतांस इनाम दिला असे. तरी सालदरसाल उभयतांचे नांवें पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनामखर्च लिहीत जाणें. " याप्रमाणें श्रीमंतांची चिठ्ठी होऊन त्यावेळेपासून हल्लींही गांव चालत आहे.

कोणे एके दिवशीं दाजीस दहाबारा घटका रात्रीं श्रीमंतांचें बोलावणें आलें. तों गोविंदपंतनाना ह्मणाले कीं, लवकर जाऊन ये. मग नानांची आज्ञा घेऊन दाजी श्रीमंतांकडेस गेले. श्रीमंत दिवाणखान्यांत होते. श्री० बाईसाहेबही तेथें होत्या. तों हे गेले आणि हुजऱ्यास विचारलें कीं, श्रीमंत कोठें आहेत ! तों यांचा शब्द ऐकून श्रीमंतांनीं विचारलें कीं, पुरुषोत्तमराव कीं काय ? हे बोलले कीं मी आहें. श्रीमंतांनीं आज्ञा केली कीं, आंत येणें. तों हे पडदे उघडून आंत जातात तों उभयतां पलंगावर बसलीं होतीं तें पाहिलें. मग विनंती केली कीं, महाराज, आतां रात्र फार जाहली. मी उदईक येईन. श्रीमंत, ह्मणाले आंत ये. असें ह्मणतांच आंत गेले. हे आंत जातांच श्रीमंत बाईसाहेब पलंगावरून उठून एकीकडे उभ्या राहिल्या. श्रीमंतांनीं यांस जवळ बोलाविलें, हे जवळ जातांच हात धरला. हे मनांत म्हणाले कीं, आतां तोंडांत मारितात! असें मनांत आणिलें तों श्रीमंतांनीं ओढून आपले पलंगावर बसविलें. हे बोलले कीं, महाराज, बाईसाहेब उभ्या आहेत. मी खालीं उभा राहतों. असें म्हणतांच श्रीमंत म्हणाले, तिला बसावयास सांगावें. नंतर बाईसाहेब खालीं बसल्या. मग पूर्वीच्या गोष्टी काढिल्या. तों मध्यान्हरात्र जाहली. वरचेवर दाजी म्हणत, आतां रात्र झाली उदईक उजाडावयाचें नाहीं कीं काय ? श्रीमंत म्हणत, तुझ्या गोष्टी ऐकिल्या म्हणजे मला किंचित् स्वस्थ वाटतें. याप्रमाणें बोलत असतां रात्र दोनप्रहर अखेर झाली. मग श्रीमंत म्हणाले, तुला कांहीं द्यावेंसें वाटतें; परंतु आतां १जामदार, २पोतनीस सारे घरास गेले असतील. मग दाजी म्हणाले कीं, महाराज, आपले कृपेकरून कांहीं कमी नाहीं. तों श्रीमंतांनीं आपल्या अंगाकडे अवलोकन करून पांढरी शालजोडी काढून, पुरुषोत्तमराव यांचे अंगावर घातली. त्यांणीं पायावर डोई ठेऊन निघाले तों श्रीमंतांनीं बाईसाहेब यांस

१ जवाहीर संभाळणारा. २ रोकड संभाळणारा.

सांगितलें, पुरुषोत्तमराव यास विडे द्यावे. तेव्हां त्यांनीं आपले हातांनींच विडे घेऊन बाईसाहेब यांचे पायावर मस्तक ठेवून निघाले व ते आपले वाडयांत आले. तों गोविंदपंतनाना हे सदरेवर वाट पहातच बसले होते. तों यांची मशाल दृष्टीस पडली. तों यांणीं येऊन नानांचे पायांवर मस्तक ठेवून शालजोडी पुढें ठेविली. मग नानांस संतोष जाहला. आणि बोलले कीं, तुझें दैव चांगलें ! याप्रमाणें श्रीमंतांची पूर्ण कृपा संपादिली. पुढें श्रीमंत दादासाहेब यांचीही मर्जी त्यांजवर होतीच.

सन १७६१ अखेर सर्व दौलतीचा कारभार श्रीमंत दादासाहेब पाहूं लागले. राज्याधिकारी श्रीमंत माधवरावसाहेब, सबब पटवर्धन सरदार त्यांचे अनुसंधानें चालत. यामुळें श्रीमंत दादासाहेब यांचा राग जाहला, आणि पटवर्धन सरदारास पुण्यांत राहूं नये असें सांगितलें. नंतर एकांतीं, गोपाळराव, नारायणराव व पुरुषोत्तमराव यांणीं श्रीमंत रावसाहेब यांची गांठ घेतली आणि विचारिलें कीं, पुढें आमची वाट काय ? ते समयीं श्रीमंतांनीं आज्ञा केली, तूर्त तुम्हांस जिकडे वाट फुटेल तिकडे जाऊन जीव रक्षण करणें. जे वेळीं माझा हात चालेल ते दिवशीं तुम्ही जेथें असाल तेथून आणवून तुमचे चालवीन. त्यांनीं विनंती केली कीं, याप्रमाणें वचन द्यावें. नंतर श्रीमंतांनीं वचन दिलें. मग पुण्याहून निघाले ते टाकोटाक मिरजेस आले.

सन १७६२ अखेर श्रीमंत दादासाहेब फौजेनिशीं निघोन पटवर्धनांचें पारिपत्य करून, मिरज किल्ला ताब्यांत घेण्याकरितां निघाले. गोपाळराव मोंगलाईंत गेल्याचे ऐकून अत्यंत रागानें, गोपाळराव मोगलाईंत पोंचण्यापूर्वींच आबा पुरंदरे यांस त्यांवर पाठविलें. आबा पुरंदरे यांच्या फौजेची व गोपाळरावांची गांठ जमाखिंडीस पडली व लढाई मानबर झाली. दैवयोगें गोपाळरावाचा मोड झाल्यामुळें, गोपाळराव पळत सुटले ते तीन चार दिवसांनीं नंगळवेढें

परगण्यांतील नंदेश्वरगांवीं आले. गांवकऱ्यांनीं गोळ्या मारल्या ह्मणून मंगळवेढ्यास आले. पांच दिवस घोड्यावरून उतरले नाहींत. त्यामुळें रिकिब्यांतून पाय निघेनात. पाय सुजल्यामुळें रिकिब्या तोडून पाय मोकळे केले. येथें चार दिवस गुप्तपणें राहून, तेथून निघाले ते मोगलाईंत नबाब निजामअल्लीची भेट घेतली आणि तेथेंच राहिले. इकडे गोविंदपंतनाना, पुरुषोत्तमराव, भास्करपंतआपा यांनीं किल्ला लढविल्याखेरीज देऊं नये अशी व्यवस्था करून नारायणरावनानास बरोबर घेऊन गोपाळराव गेल्यावर, पटवर्धन मंडळींनीं बायका व मुलें कोंकणांत वगैरे गुप्त ठिकाणीं ठेवून, किल्ल्यांत तयारीनें राहिले. तों श्रीमंत दादासाहेबांनीं पटवर्धनांचे पाय भुईस न लागाणेविषयीं कारभाऱ्यांच्या चिथावणीवरून, एकदम हुकूम केला कीं, पटवर्धनांचें कुत्रें देखील सांपडल्यास मारावें ! असें ह्मणून मिरजेवर स्वारी केली.

इकडे दारूगोळ्यांची तयारी झाली. दाजींनीं बायकांसुद्धां गोळ्या घडावयास लाविलें. श्रीमंतांची स्वारी येतांच किल्ल्यांतून तोफखाना सुरू झाला. श्रीमंतांनीं मोर्चे बसविले. तीन हल्ले मातबर झाले. दारूचे बुदले पुरून बुरूज उडविला तो पुन्हां तसाच त्या ठिकाणीं बसला. त्यांतील ढेंकूळ देखील निघालें नाहीं. श्रीमंतांचे मोर्चे खंदकास येऊन लागले. याप्रमाणें एक महिना किल्ला लढविला. दाजी व भास्करपंतआपास आहोरात्र निद्रा नाहीं. ढाल तलवार बांधून महिनाभर फिरत होते. दुसरा हल्ला पुन्हा करून लोक दरवाजास येऊन लागले. लांकडें लावून दरवाजा जाळितात असें पाहून दाजींनीं किल्ल्याचे पानावर पडून शंख केला. अरे किल्ला गेला! किल्ला गेला ! असें ह्मणाले. तों किल्ल्यांतील जमातदार व त्याचे पांचशें लोक; त्या जमातदारानें दाजींचे कमरेस धरून एक शिवी देऊन माघारे ओढिले आणि बोलला, ' अरे बामणा, आरडतोस कां? आह्मी इतके मरूं तेव्हां किल्ला जाईल. आतां आमचा तमाशा

पहा ! ' असें ह्मणून पांचशें असामी यांनीं कंबरा बांधून ढाल तलवारी घेऊन, हल्लयाचे लोकांच्या डोकीवर किल्लयांतून उड्या टाकिल्या; आणि पांच हजार गाडदी चालून आले, त्यांत शिरून मारामारी करून हल्ला माघारी फिरविला. ही लढाई श्रीमंतांनीं दृष्टीनें पाहून म्हणाले, वाहवा गोपाळराव, काय माणूस पदरीं बाळगिले आहेत ! किल्लयावरून उड्या टाकून हल्ला माघारी फिरविला ही गोष्ट परम कठीण. तेव्हां श्रीमंतांस समजलें कीं, किल्ला लढोन येत नाहीं, श्रीमंत माधवरावसाहेब यांचें सूत्र आंतून होतेंच, श्रीमंत रावसाहेब पेठेंत येऊन बसत, हे किल्लयांत समजलें, त्यांनीं सांगून पाठविलें कीं, आपण येता, वरून तोफा सुटतात, एखादा घात होईल, श्रीमंतांनीं सांगितलें, मी जेथें बसेन तेथें वर अबदागिरी धरवीत जाईन त्या सुमारास गोळे मारूं नयेत.

पुढें आंत फितूर होऊं लागला. नंतर सल्लयाचें बोलणें लागलें, तेव्हां बोलण्यास कोणी पाठवून द्यावें म्हणून गोविंदपंतनानास श्रीमंत दादासाहेबांनीं सांगून पाठविलें. नानांच्या आज्ञेवरून दाजी ढाल तलवार घेऊन बाहेर पडले तों श्रीमंतांच्या लष्करांत आले. तों लष्करचे लोक मुसलमान म्हणाले कीं, ' लढणेवाला जो बामण तो हा, ' असें म्हणो लागले. हे श्रीमंतांच्या डेऱ्यासन्निध गेले तों श्रीमंत दादासाहेब स्नान करून पूजा करीत बसले होते. तों नीट श्रीमंतांजवळ गेले. जाऊन श्रीमंतांस नमस्कार केला. श्रीमंतांनीं ' या, पुरुषोत्तमराव, ' म्हणून बोलले. त्यांनीं तलवार श्रीमंतांपुढें ठेविली. तों श्रीमंतांनीं दाजीच्या शालजोडीच्या पदरास धरून बोलले, पुरुषोत्तमराव, मी येथें आलों. मला यश द्यावें. असें ह्मणतांच, आह्मीं स्वामींचे चाकर, किल्ला स्वामींचा. लोक म्हणते, ब्राह्मणांकडे किल्ला, आणि श्रीमंतांची स्वारी येतांच लढविल्याखेरीज दिला ! याजमुळें स्वामींची चाकरी केली. आतां स्वामींच्या पायाशीं ढालतलवार ठेविलीच आहे, आह्मांस निरोप द्यावा. तुह्मी ढाल-

तलवार घेणें, अशी आज्ञा जाहली. तों इतक्यांत सखारामबापू यांनीं शागिर्दांकडून ढाल तलवार उचलविली. श्रीमंत रागे भरले व ढालतलवार आणून देण्यास सांगितलें. तों ढालतलवार दुसरीच आणून ठेविली. ती माझी नव्हे, माझी मलाच मिळाली पाहिजे. तेव्हां श्रीमंत फार रागावले. तेव्हां ढालतलवार त्यांचीच त्यांस देवविली. मग तीन दिवसांच्या मुदतीनें किल्ला खालीं करण्याचें ठरलें. धायगुडे यास जामीनकीस देऊन, श्रीकृष्णापार कुरुंदवाडास जावें असें ठरविलें. नंतर मुलें माणसें, चीजवस्त सर्व घेऊन कुरुंदवाडीं गेले व किल्ला स्वाधीन केला.

श्रीमंत रावसाहेब पेशवे यांच्या कारकीर्दींत पटवर्धनांचा विशेष उत्कर्ष झाला. सन १७६१ त फौजेच्या खर्चाकरितां मिरजेचा ×किल्ला व दुसरी कांहीं ठाणीं व जकात वगैरे कांहीं उत्पन्न गोविंद हरि यांस दिलें. सन १७६४ त प्रथम बेहडा गोविंद हरि, परशरामभाऊ व निळकंठ त्रिंबक या त्रिवर्गांच्या नांवें जाहला. आठ हजार स्वार ठेवण्याकरितां सुमारें पंचवीस लक्ष रुपये उत्पन्नाचा मुलूख दिला. या आठ हजारांपैकीं ४६०० स्वार गोविंद हरि यांनीं ठेवाव असा ठराव जाहला. हा मुलूख एकठिकाणीं नसून कांहीं पंढरपुरच्या उत्तरेस, कांहीं तुंगभद्रेच्या समीप व कांहीं मिरजेच्या सभोंवार आहे.

श्रीमंत रावसाहेब पट्टणच्या स्वारीस निघाले ते धारवाडास सन १७६४ त मोर्चे बसविले. तों पट्टणाहून हैदरखान धारवाडच्या कुमकेस निघाला. तेव्हां त्याच्या तोंडावर कोणी पाठवावा लागेल, त्यास कोण पाठवावा ? असें श्रीमंत बोलले. गोविंदराव बोलले, त्याचे

---

× श्रीमंत दादासाहेब यांनीं सन १७६२ त मिरजकिल्ला जो घेतला तो गोविंदपंतांनीं किल्ला लढवून, फौजेच्या स्वारीच्या खर्चाचें कर्ज भागविण्याच्या अटीवर दिला असेंही समजतें.

तोंडावर गोपाळराव यांस पाठवावा. त्यांवाचून दुसरा कोणीच योग्य नाहीं. तेव्हां श्रीमंतांनीं दहा हजार फौज व दहा हजार गाडदी याप्रमाणें जाजती फौज देऊन गोपाळरावास रवाना केलें. हैदरखानास गोपाळराव फौज घेऊन आल्याची बातमी लागतांच तो परत गेला. याप्रमाणें रायाची दहशत होती.

भवानराव प्रतिनिधी यांनीं सांगितलें कीं, या पृथ्वींत साडेतीन राव ते कोणते ? एक मुरारराव घोरपडे, एक भवानराव प्रतिनिधी, एक गोपाळराव पटवर्धन व अर्धा श्रीमंत माधवरावसाहेब ! यांविषयीं एक गोष्ट अशीः— एके दिवशीं प्रतिनिधी पुण्यांत आपले वाड्यांत बसले होते. तों गोपाळनाईक तांबवेकर सावकार पालखींत बसून जात होते. बरोबर कांहीं स्वार, पायदळ व पट्टेकरी होते. ते यांचें माडीखालून गेले. तों यांनीं शोधास पाठविलें कीं, स्वारी कोणाची ? त्यांच्या माणसांनीं सांगितलें कीं, स्वारी गोपाळरावाची. पंत यांनीं पुन्हां शोधास पाठविलें कीं, गोपाळराव पटवर्धन कीं काय ? त्यांच्या माणसांनीं सांगितलें कीं, तांबवेकर आहेत; पटवर्धन नव्हेत. असें ऐकतांच पंतांनीं आज्ञा केली कीं, पहातां काय धरून ठोका ! हा राव कोठून झाला ? अशी आज्ञा होतांच पंतांच्या शेंपन्नास शिपायांनीं तांबवेकर याची पालखी मोडून त्यासही मार दिला. नंतर श्रीमंतांकडे तांबवेकर यांनीं वरील मजकूर सांगितला. तेव्हां श्रीमंत ह्मणाले, तुह्मी आपणांस राव कां ह्मणत होता ? भवानराव यांनीं केलें तें बरोबर केलें. याप्रमाणें गोपाळराव पटवर्धन यांची योग्यता. तो केवळ प्रति अर्जुन. याप्रमाणें तो गोपाळराव हैदरखानाचे तोंडावर जातांच, हैदरखान माघारा गेला. नंतर श्रीमंतांनीं धारवाड घेऊन स्वारी पुढें चालती जाहली.

गोपाळराव हे मोठे पराक्रमी व धाडसी होते. त्यांनीं आपल्या पराक्रमाची कीर्ति दिगंत केली. हे हैदराच्या स्वारीवर असतां प्रकृती उदराच्या विकारानें बिघडल्यामुळें

येथें आले. स्वारींत असतां प्रकृतीच्या अस्वस्थतेमुळें घरीं वडिलास भेटणें जरूर असल्यामुळें, लष्करांत सर्वत्रांस सांगून, परशरामभाऊस सांगितलें कीं, माझे पाठीमागें माझें नांव तूं रक्षण करशील. असें सांगून त्रिंबकरावमामास सांगून पाठविलें कीं, माझी प्रकृति बिघडली; शरीराचा भरंवसा नाहीं, यास्तव मी वडिलांस भेटावयास जातों. असें ह्मणतांच त्रिंबकरावमामा बोलले कीं, श्रीमंतांनीं जरीपटका आपले भरंवशावर येथें ठेऊन प्रकृती बिघडली सबब श्रीमंत पुण्यास गेले. आपणही प्रकृती बिघडली ह्मणून जातां. साऱ्यांनींच असा वहाणा केल्यावर पुढें वाट काय ? शत्रु-सान्निध्य आणि आपण फौजेंतून गेला ही गोष्ट शत्रूस समजल्यावर पुढें कसें होईल ? श्रीमंतांचा राग कोणे प्रकारचा हें आपणांस माहित आहे; मीं सांगावें असें नाहीं. तें कांहीं असो, मी वडिलांचे पाय पहावयास जाणार. मी वांचल्यावर पुढें श्रीमंत चाकरीविशीं रागें भरतील ! असें ह्मणून डोलींत बसून डांकेवरून मिरजेस आले. त्रिंबकरावमामा यांनीं श्रीमंतांस पत्र लिहिलें कीं, गोपाळरावास मी जाऊं नका, असें ह्मणत असतां घरास निघोन गेले. प्रकृती अत्यवस्थ हें कांहींच न लिहितां जितका गिल्ला तितका लिहून पाठविला ! श्रीमंतांनीं तें पत्र पाहतांच एकदम दोनशें स्वार, पांचशें पायदळ व एक कारकून याप्रमाणें सरंजाम जप्त करण्याकारितां रवाना केले. इकडे राव घरीं पोंचल्यावर उदराचें मान जास्त होऊन वारले. नंतर गोविंदपंतनानांनीं श्रीमंतांस पत्र लिहिलें कीं, प्रकृति बिघडल्यामुळें राव लष्करांतून घरास आले. एक रात्र होते. प्रातःकाळीं वारले. आतां आह्मांस वृद्धपणीं ही गोष्ट प्राप्त झाली ! वगैरे लिहून पत्र रवाना केलें. तों श्रीमंतांनीं लखोटा फोडून वाचतांच अंमळ पाव घटका अस्वस्थ झाले. आणि बोलले कीं, माझा एक हात गेला ! असें ह्मणून त्यावेळीं चौघडा जो वाजत होता तो बंद करविला. तो दुसरा लखोटा आला. पहातात तों जप्तीच्या कारकुनानें लिहिलें कीं, राव वारल्याचें समजतें ह्मणून

पुढें चाल न करितां श्रीमंतांच्या हुकुमाची वाट पहात आहे. श्रीमंतांनीं प्रथम गोविंदपंतांना पत्र लिहिलें. त्यांतील मुख्य मजकूर "-माधवराव गेले आणि गोपाळराव आहेत असें मनांत आणावें." नंतर जप्तीच्या कारकुनास लिहिलें कीं, गांवांत एकदम न येतां निरनिराळ्या रस्त्यानें परत यावें.

गोपाळरावदादा यांनीं सरकारचाकरी करून वैकुंठवासीं झाले. गोपाळराव यांचे वेळेस पंचभाई, पांचजण भाऊ म्हणजे भारतीवीर; याप्रमाणें यांचा लौकिक. वडील गोपाळराव, दुसरे निळकंठराव, तिसरे कोन्हेरराव, चौथे नारायणराव व पांचवे पुरुषोत्तमराव. गोपाळरावांच्या मृत्यूसंबंधीं माहितीचे ऐतिहासिक लेखसंग्रहांतील भाग चौथा पान १७६१ मधील १०८९ नंबरचे पत्राचा उतारा पुढीलप्रमाणेंः—

### गोपाळरावाचा मृत्यू.

नं. १०८९ श्री. ( स. १७७९।१० फेब्रुवारी )

*अपत्यें अनंतानें दोन्हीकर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल वर्तमान तागायत माघवद्य एकादशी रविवारपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडिली वरचेवर पत्रें पाठविलीं तीं पावलीं. लिहिलें वर्तमान सविस्तर कळलें. असेंच निरंतर आसिरबाद पत्र पाठवून सांभाळ करावा. इकडील वर्तमान लिहिणें तरी आज एक महिना तीर्थस्वरूप कैलासवासी कनकगिरीस आले. तेथील पत्रें आलियापासून घरांत कोणी अन्न सुरक्षितपणें खाल्लें नाहीं. पौषवद्य चतुर्दशीस कनकगिरीच्या मुक्कामापासून पत्रें दोनप्रहरा आलीं. दुसरीं पत्रें गजेंद्रगडच्या मुक्कामचीं तिसरे प्रहरीं आलीं. तिसरीं पत्रें यादवाडच्या मुक्कामचीं संध्याकाळच्या चार घटका दिवसास आलीं. चौथीं पत्रें कुडचीच्या मुक्कामचीं संध्याकाळीं आलीं. ऐशीं चार पत्रें दोन प्रहरांत आलीं. तोंपर्यंत इतकी

*पत्र वामनरावास लिहिलेलें आहे, लिहिणारा आप्त असून कारकून.

अवस्था भारी असें कोणास कळलें नाहीं. दुसरें दिवशीं घरास यावें तरी अमावास्या, मंगळवार, मासांत, याकरितां कसबे झैसाळावरी मुक्काम केला. आणि सांगोन पाठविलें कीं, तुळेचें साहित्य श्रीसंगमास करावें. त्यावरून संगमीं तुळेचें साहित्य केलें. आणि प्रतिपदेस मिरजेस यावयाचा मुहूर्त दहा घटका दिवसास पाहून ठेविला. त्यानंतर दोन घटका रात्र राहिली तेव्हां तात्या सामोरें जावयासी निघोन गेले. वड्डीच्या वोढ्यावरी गेले तों सूर्योदयापूर्वी वड्डीवर आले त्यांस आपला मृत्यू समीप आलासा मनांत समजून निकड करून आले. दहा घटकांचा मुहूर्त टाकून चार घटकांत मिरजेस आले. उभयतां वडिलांची भेट घेतली, तेव्हां दुखणें भारीसें कळलें. इतकें दुखणें भारी, परंतु ( त्यांनीं आपण होऊन ) कोणास दर्शविलें नाहीं. आपला मृत्यू समीप आला, परंतु हिम्मतीच्या गोष्टी सांगाव्या. कोणी भेटावयासी आले तितक्यांशीं ओळखून भेटी घेतल्या. तदोत्तर संगमासी तुळा करावयासी जात नाहीं म्हणून सांगितलें. येथेंच साहित्य करावें म्हणून सांगितलें. त्यावरी येथेंच सर्व साहित्य करून तृतीया भृगुवारीं तुळा करावीसा करार झाला. वरकड दैवी, औषधी उपाय करावयास लागलों तों संध्याकाळ झाला. तेव्हां सर्वप्रायःश्चित्त द्यावयाचा आग्रह करूं लागले. कोणी नाहीं म्हणत होते परंतु फारच आग्रह पाहून द्वितीयेस करावेंसें करून साहित्य केलें. सारी रात्र चांगले होते. दोन तास रात्र राहिली तेव्हां पथ्याचें घालून सूर्योदयास प्रायश्चित्तास प्रारंभ केला. ' लौकर करणें ' म्हणून आपणच फार निकड करून आपल्या मुखें मंत्र म्हणून ब्राह्मणांस दक्षिणा आपल्या हातें दिली. गोदानें देऊन तीर्थ व गंगोदक पोटांत घेतांच प्राण व्याकूळ झाला. इतकें सारें आपल्या धीरें केलें. परंतु आपला अंतकाळ समीप आला असें कोणाजवळ बोलले नाहींत. वरकडही कोणती गोष्ट बोलले नाहींत. सहा घटका दिवस आला तों काल झाला. त्या समयीं त्याप्रमाणें

धरणीकंप होतो तो न्याय झाला ! तें दुःख कोठवरी लिहावें ! याप्रमाणें मरणाची अवस्था झाली. ते ज्ञानी पुरुष ! आपण घाबरेपणीं सांगितलें तरी उभयतां वडिलांस श्रम होतील याकरितां कांहीं बोलले नाहींत. मरण त्यांस कळोन आपणांस बोलावूं निकडीनें पाठविलें. आपणही गेलां येणें करून उत्तम गोष्ट झाली. न जातां तरी ते कांहीं लष्कर टाकून येत नव्हते. आणि तेथें मृत्यू पावते ! लोकांत जघन्य होतें कीं, त्यांचे इतके ( आप्त ) असोन कोणी आले नाहींत असें होतें. परंतु कांहीं वाईटांत बरें होतें, त्या निमित्य चुकलें ! येथें आपल्या घरीं आले त्यामुळें त्यांचें उत्तरकार्य दानें वगैरे सांग झालें. दहा दिवसपर्यंत भास्करपंत आपांनीं केलें. सपिंडी आपानीं केली. आबा कोंकणांत गेले होते ते नववे दिवशीं आले. कैलासवासी यांनीं तों आपलें चांगलें करून गेले. कोणाचें वाईट म्हणून घेतलें नाहीं. लोकांत असा दम ठेऊन गेले कीं, ' गोपाळराव आणखी वांचते तरी काय करिते ! ' अशी इभ्रत ठेवून गेले. परंतु जें मागें राहिले त्यांच्या दुःखास पारावार नाहीं. इतकें दुःख असून वडिलीं जो विवेक केला आहे तो ब्रह्मादिकीं होणार नाहीं. ज्याप्रमाणें वडिलीं विवेक केला त्याप्रमाणें आपण करावा. आपण जितका दम धरून उमेदीनें कैलासवासी राव यांचें नांव लौकिक झालें आहे, तसेंच राखून सर्वांनीं असावें. येणें करून वडिलांचें दुःख परिहार होईल. जितके क्लेश आपण मनांत आणितील तितकें दुःख वडिलांस अधिक होईल. दुःख तो परिहार होणें ऐसे पुरुष नव्हते ! परंतु मृत्युलोक आहे, यास कोणाचा उपाय नाहीं ! आपलें शरीर अशक्त, जितका खेद मनांत येईल तितकी शक्ती हीन होईल. आपण तो क्षत्रिय धर्म आचरीत आहांत. वारंवार दुःख मनांत आणिलें तरी आपले पदरीं लक्षावधी जीव आहे, इतक्यांचा सांभाळ करावा लागतो. अशाकरितां सर्व दुःखांचा त्याग करून वडिलांस धैर्याचीं पत्रें लिहावीं. वरकड राव कैलासवासी ज्या ज्याप्रमाणें संस्थानिक वगैरे भले लोक यांजवरी

ज्या ज्याप्रमाणें कृपा करीत होते त्या त्याप्रमाणें करावी. तेणेंकरून आपल्या तेजाचा प्रादुर्भाव विशेष होईल. वडिल कैलासवासी याणीं तो आपलें तेज आपलेपाशीं ठेवून सर्व निरवानिरव करून कैलासवासी झाले. श्रीमंतांसही दुःख बहुत झालें. वर्तमान कळतांच चार दिवस दरबार व चौघडे बंद केले होते. याप्रमाणें थोरथोरांस या प्राण्याचीं दुःखें झालीं ते आह्मीं घरच्यांनीं कशीं विसरावीं ! परंतु विवेक करावा. राजश्री नारो आपाजी (तुळशीबागवाले) यांस श्रीमंतांनीं समाधानार्थ पाठविलें होतें. येथें येऊन माघारे गेले. यानंतर वडिली पत्रीं आज्ञा केली होती कीं, विहीर वगैरे व चौकीदाराबरोबर रुपये व कित्येक मजकूर लिहिले होते, त्यास या घोटाळ्यामुळें सर्व राहिलें. आमची खोली बाहेरील मात्र मोडली. परंतु आतां सर्व राहिलें. याप्रमाणें वर्तमान आहे. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विज्ञापना.

आतां निळकंठराव यांचे पराक्रमाविषयीं लिहितों. गोपाळराव-दादा वारल्यावर कर्नाटकचे स्वारीस त्रिंबकरावमामा होते. सारे पटवर्धन सरदारही होते. एके दिवशीं त्रिंबकरावमामा यांनीं भालदाराचे हातीं पटवर्धन यांजकडे सांगून पाठविलें कीं, तुमचें पथक उदईक कहीसमागमें नेमिलें आहे. तर तयार होऊन कही-बरोबर जावें. भालदाराचा निरोप ऐकून, पुरुषोत्तमदाजी बोलले. आमचें पथक कहीबरोबर जावयाचें नाहीं. हें ऐकून भालदार ह्मणाला, मामासाहेब बोलले कीं, हे मानपान गोपाळरावदादा यांज-बरोबर गेले. आतां जी चाकरी सांगूं ती केली पाहिजे असा हुकूम आहे. हे शब्द ऐकतांच एक शिवी देऊन दाजी बोलले कीं, अरे, गोपाळराव मात्र गेले, परंतु ज्यांनीं गोपाळराव केले ते जिवंत आहेत ! हें ऐकून भालदार निघोन गेला. नंतर पुरुषोत्तमरावदाजी पालखींत बसून त्रिंबकरावमामाकडे गेले. 'या पुरुषोत्तमराव' ह्मणोन मामानीं ताजीम दिली आणि बसले. तों घटका रात्र जाली. तेही

बोलेनात व हेही बोलेनात. तेव्हां पुरुषोत्तमराव काय करावें, याउपर घोड्यास दाणावैरण मिळून घोडीं कांहीं जगावयाचा सुमार दिसत नाहीं. हैदरखान याचे बेदडे ( जसे पेंढारी तसे ) चोहोंकडे फिरतात. कही निभावून येईनाशी जाहली. त्यास आपल्यासारखें मातबरे यांचें पथक समागमें देऊन कही निभावून आली तर आली. नाहीं-पेक्षां सारीं पथकें देऊन पाहिलीं. कही निभावून येत नाहीं, यास कसें करावें ? असें त्रिंबकरावमामा बोलले. नंतर दाजी बोलले, हें वर्तमान सारें खरेंच परंतु तुह्मीं शेवटील निरोप काय सांगून पाठविला. मानपान गोपाळराव यांजसमागमें गेले, आतां जी चाकरी सांगू ती करावी; त्यास आपण कांहीं नवे आला नाहींत. श्रीमंत भाऊसाहेब यांचे मामा ते सारे राज्याचे मामा. कांकीं, शिपाई मर्द माणूस, ह्मणून श्रीमंतांनीं जरीपटक्यासमागमें आपणांस नेमिलें. नाहींपेक्षां श्रीमंतांचे घरीं मामा पुष्कळ आहेत ! गोपाळराव मात्र गेले, परंतु ज्यांनीं गोपाळराव केले ते मात्र जिवंत आहेत ! आगखी आपण सारे हैदरखानाच्या माणिकचौकांत आहोंत. हरवक्त काम पडतें, कोण मनुष्यें कशीं हें तुह्मीं नजरेनें पहातां, असें असोन भलतेंच बोलला ! तुम्ही जुने माहितगार आहां ह्मणोन उगेच राहिलों. नाहींपेक्षां नवा कोणी जर असता त × × × × × ला पायपोसानें मारिलें असतें ! याप्रमाणें तोंडावर बोलून निघोन आपल्या लष्करांत आले. आणि सर्व लहानथोर जमा करून त्यांस सांगितलें कीं, जाऊन जें पाहिजे तें बोलून आलों. उद्यां प्रसंगास जर नांव रक्षिलें तर बरें. नाहींपेक्षां पडलें काम करावें लागेल ! त्यास तुमचे सर्वांचे मनांत काय आहे तें सांगावें. याप्रमाणें बोलतांच सर्वांनीं उत्तर केलें कीं, हा अभिमान सर्वांसच आहे. असें बोलून सर्वांपासून बेलभंडारा घेतला कीं, प्रसं-गास आम्ही मागें सरणार नाहीं.

हैदरखान याची छाप्याची बातमी आली ती त्रिंबकरावमामा यांनीं पटवर्धन यांस सांगितली नाहीं. आपलें बुणगें वगैरे लावून

देऊन तयारी करून आयते वेळेस यांस सांगून पाठविलें. आणि अव-घड तोंड होतें तिकडील चाकरी सांगितली. पटवर्धन यांनींही परभारें बातमी आणिलीच होती. पटवर्धन यांनीं त्रिंबकरावमामा यांस सांगून पाठविलें कीं, तुह्मी आपलें बुणगें सारें रवाना करून आयते वेळेस आह्मांस सांगितलें, त्यास आमचें बुणगें अद्यापी गोटांतच आहेत. त्यापेक्षां आतां कसें होईल तसें होऊं ! आम्ही तयार आहोंत. असें सांगून पाठवून ही सारी मंडळी तयार जाहली. आणि क्रोधही सर्वांस फार, यांजमुळें सर्व लढाईस उदितच होते. तों पहांटेचे प्रहर रात्रीचे सुमारास खासा हैदरखान चालोन आला. तेव्हां पटवर्धन यांची गांठ पडोन लढाई मातबर झाली. त्यांत हैदरखान मात्र यांनीं जिवानिशी सोडिला; सबब तो मांघारा गेला. बाकी तोफा सुमार पांच व हत्ती निशाणें सारें पाडाव आले. तों इतक्यांत सूर्योदय जाला. लढाई शिकस्त करून सारे माघारे फिरले. हैदरखान याचीं एक तोफ व शंभर पायदळ तोफ रक्षण करून घेऊन जात होते तें निळकंठराव यांनीं पाहिलें, आणि बोलले कीं, अरे, तुमचे उरावरून तोफ घेऊन जातात ! पहातां काय ! घोडीं यांजवर घालावीं ! असें ह्मणून नीट तोफेवर चालून गेले. त्या लोकांनीं फैर झाडली तों गोळ्या अकस्मात् निळकंठराव यांस लागल्या व ते ठार झाले. तों फौज सारी तेथेंच थिजली. सारे भाई मंडळी घोड्यावरून उतरून जमा जाहले. तों इतक्यांत त्रिंबकमामा तिकडून आले आणि बोलले कीं, माझा हैदरखान कोठें आहे ? तेव्हां पुरुषोत्तमराव बोलले कीं, हैदरास काय करि-तोस ? हा तुझा × × पडला पहा ! असें ह्मणतांच त्रिंबकराव-मामाही घोड्यावरून उतरले आणि तेथें आले. नंतर दहन केलें. दहावे दिवशीं पिंडास कावळा शिवेना. तेव्हां नानाप्रकारचीं उदकें सोडिलीं. तिसरा प्रहर झाला, परंतु कावळा शिवेना. तेव्हां त्यांचे बंधू कोन्हेरराव बोलले कीं, मला एक सुचलें आहे तें मी बोलतों. असें ह्मणतांच पुरुषोत्तमराव बोलले, काय सुचलें असेल तें बोलावें.

तेव्हां कोन्हेरराव बोलले, अहो निळकंठराव, आपले मनांत असेल कीं, माझा भाऊ एक आहे हा घरांत पडला खोकल्यानें बिछान्यावर मरेल, अशी काळजी आपणांस लागली असेल. परंतु आपणांस ठाऊक असो द्यावें कीं, जसे आपण हैदरखानाच्या निशाणावर चालून जाऊन रणाचे ठायीं ठार जाहलांत त्याप्रमाणेंच मी कोन्हेरराव या हैदरखानाचे निशाणावर चालून जाऊन रणाचे ठायीं देह अर्पण करीन! याप्रमाणें बोलून उदक सोडतांच तत्काळ कावळा शिवला! हें सारें फौजेनें व मानकरी वगैरे सर्व मंडळींनीं पाहून सर्वांना आश्चर्य वाटलें!

पुढें तेरावे दिवशीं त्रिंबकरावमामा समाचारास आले आणि बोलले कीं, निळकंठराव आह्मांस टाकून वैकुंठास गेले! असें ह्मणतांच पुरुषोत्तमराव बोलले कीं, अहो त्रिंबकराव, कोणते लढाईंत आमचा पुरुष पडला नाहीं, अशी लढाईच नाहीं. दर लढाईस आमचा एक पुरुष खर्च होतो तेव्हां श्रीमंत सरंजाम चालवितात! आह्मीं शिरें हातांत घेतलीं आहेत. आम्ही कांहीं लेकी अथवा बहिणी देऊन रोजगार मिळवून श्रीमंतांची कृपा संपादिली असा अर्थ नाहीं. असें ह्मणतांच त्रिंबकरावमामा यांनीं पदर पसरून बोलले कीं, पुरुषोत्तमराव, मी चुकलों. आतां सर्वांनीं मजवर कृपा करावी. वारंवार आपण असें बोलूं नये. असें ह्मणून राग शांत केला.

याप्रमाणें पटवर्धन यांचे पुरुष कीर्तीमान झाले. त्या कीर्ती साऱ्याच वर्णन करीन ह्मटलें तर आयुष्यदेखील पुरावयाचें नाहीं. हें जाहलें वर्तमान श्रीमंतास कळोन त्यांनीं इनाम गांव रघुनाथराव निळकंठ यांस देऊन वस्त्रें दिलीं. जशी कृपा निळकंठराव यांजवर त्याप्रमाणें रघुनाथराव यांजवर जाहली.

हैदरखानाचे लढाईंत मेघश्यामरावबापू सांपडले ती कथा लिहितों. लढाईच्या प्रसंगानंतर मेघश्यामरावबापू कांहीं जरूरीसाठीं घोड्यावरून उतरले यामुळें फुरसद मिळून शत्रूनें गांठिलें. तों इतक्यांत जलदी करून घोड्यावर बसले, परंतु घोडी कांहीं केल्यानें जागा

सोडीना ! नानाप्रकार केले, सोटे मारिले, परंतु जागा सोडीना ! शेवटीं पागेकडील बारगीर यांनीं पुठ्ठ्यावर तलवारीचे वार केले तरी थोडी जागा सोडीना ! नाहींपेक्षां मेघश्यामरावबापू यांच्याप्रमाणें घोड्यावर बसणार पटवर्धनमंडळींत नाहीं ! परंतु होणार बलवत्तर ! धरले गेले ! नंतर हैदरखान यानें पिंजऱ्यांत ठेविलें. पुढें श्रीमंत माधवरावसाहेब यांची स्वारी जातीनिशी आली त्यासमयीं लढाई होऊन शत्रूस जिंकिलें. नंतर तहाचें बोलणें आलें. तेव्हां खंडणी ठरून बंदींत नरगुंदकर होते त्यांस सोडावयाचें. ठरलें त्यांत मेघश्यामराव यांस सोडावयाचें कलम लिहिलें नाहीं हें वर्तमान दाजीस समजलें. त्या वेळेस गोपाळरावदादा होते. दादांच्या कानांवर मजकूर घालतांच त्यांनीं श्रीमंतांकडे सांगून पाठविलें कीं, सरकारचा तह होऊन खंडणी ठरविली व नरगुंदकर यांस सोडावें असेंही ठरलें; आणि मेघश्यामराव यांचें कांहींच बोलणें नाहीं ! त्यास आमचे भावाचे पायांत बेड्या असोन आपणांजवळ चाकरी करण्याची आमची प्रतिष्ठा काय ? त्यास आज्ञा दिल्यास हैदरखान याजकडे जाऊन मी त्याच्या कैदेंत राहतों आणि मेघश्यामराव यास घरास पाठवून देतों. वडिलांनीं ध्यास फार घेतला आहे. असें सांगतांच श्रीमंतांनीं हैदरखान याजकडील वकिलास बोलावून आणून सांगितलें कीं, मेघश्यामराव यांस सोडल्यास तुमचा आमचा तह. नाहींपेक्षां बिघाड. तेव्हां वकील यांनीं विनंती केली कीं, यादी वगैरे ठरल्या. तेव्हां श्रीमंतांनीं आज्ञा केली कीं, ते कांहीं असो. मेघश्यामराव यांस सोडल्याखेरीज तह नाहीं. नाहींपेक्षां आजच लढाई ! असें ह्मणतांच मेघश्यामराव यांस हैदरखानानें बहुमान करून श्रीमंतांकडे पोंचतें करविलें. ही हकिकत सन १७६४-६५ त झाली. ही हैदरावरील पहिली स्वारी होय.

## ऐ. ले. संग्रह पान १७७७ पत्र नं. ११०१

श्री.

चिरंजीव राजेश्री तात्या यांसी (पांडुरंगराव) प्रती वासुदेव धोंडदेव. विनंती उपरी. येथील कुशल तागायत छ२२जिल्काद पावेतों यथास्थित असे विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. पत्रीं कितीएक मजकूर दौलतीविशीं वगैरे लिहिला त्यास आपण असतां चिंता काय आहे ? रावसाहेबांचें पुण्य व वडिलांचा अशिर्वाद विचित्र आहे. छ १९ जिल्कादीं मौजे मेलकोटेचे मुक्कामीं हैदरखानाची लढाई प्रातःकाळ चार घटका रात्रौपासून होऊं लागली ते तिसराप्रहर दिवस पावेतों होत होती. पांच सहा कोस लढाई होत आली. निदान हैदरखान पट्टणांत जातो, दीडकोस पट्टण राहिलें, असें जाणून फौजाची निकड झाली. त्याजमध्यें आपलीं तीन पथकें अघाडीस निशाणाजवळ उठलीं. तोफखान्याचा आरावा खाऊन आंत गेले आणि गाड्यांच्या बुरजांशीं हत्यार लागलें; असें सारे फौजांनीं पाहून हुजुरातची निकड झाली. पिछाडीस हुजरात, अघाडीस आपली फौज, इतर पथकें बाजूंनीं याप्रमाणें जागांजागां हल्ला झाली. तेचक्षणीं हैदरखानाचा मोड झाला. सडा पळून पट्टणांत गेला. कांहीं निदानचें माणूस होतें तें डोंगराचे आसऱ्यास जाऊन मारामार करूं लागलें. ते समयीं निकड झाली तेव्हां निळकंठरावदादा गोळी लागून ठार पडले. मानसिंगनाईक निंबाळकर व शिवाजी सेकले व सखो चवडो, रायापा साबळे, ( असे ) निळकंठरायाकडील आठ नऊ आसामी ठार झाले. येणेप्रमाणें त्या जाग्यास झुंज झालें. भाऊ व वामनरावबाबा जवळच होते. शिपाईगिरीची शर्तच केली. हरबाआण्णानें चांगली कराचली मारली. फौजेंतील मराठी माणूस त्यांतून कोणी कराचली करणेविशीं चुकला नाहीं. पंचवीस हजार माणूस गाडदी व बारा हजार फौज, पन्नास तोफा येणेंप्रमाणें एक घटकेंत सत्यानाश त्याचा झाला. श्रीमंतांचें पुण्य विचित्र याजमुळें

सारे फौजेंत आपले फौजेचा लौकिक विचित्र जाला. मामासही फार संतोष जाला. परंतु एक निळकंठरावानें घर बुडविलें ! रावसाहेबामागें निळकंठरावानें लौकिक जास्ती केला. परंतु सर्वांस सोडून गेला ! वृद्धापकाळीं आपास ( त्रिंबक हरीस ) परम दुःख झालें, तें कोठवर लिहावें ! बावांचें अवसान चांगलें आहे. सर्वांनीं मिळोन रावसाहेबामागें नांवलौकिक चांगला केला. कळावें म्हणून लिहिलें आहे. सविस्तरवृत्त बावांनीं लिहिलें आहे त्याजवरून कळेल. आह्मीं ( त्यांचे ) मर्जीशिवाय चालत नाहीं. कोंकणचें वर्तमान फार दिवस कळत नाहीं. मर्जीस आलिया समाचार घेऊन वर्तमान लिहावें. भेटीअंतीं सविस्तर कळेल. बहुत काय लिहिणें हे आशिरवाद.

मेघश्यामरावबापू यांणीं मंगळवेढ्याची मामलत पन्नास साठ वर्षें केली. त्यांनीं प्रजापालन केलें असें राज्यांत देखील कोणीं केलें नाहीं. नांगर धरणारे यांजवर अबदागिऱ्या धरिल्या ! प्रजा रानांतच राहून झाडांस पाळणे बांधिले. याप्रमाणें निर्भय अम्मल केला. अद्यापी मंगळवेढ्यांत त्यांच्या ओव्या गातात. असे पुण्यवान् ! प्रजापालनाविशीं अत्यंत तत्पर अशीं माणसें क्वचितच निपजतात.

आतां बाप्पाजींचे चतुर्थ पुत्र महादेवरावअण्णा तेही महापराक्रमी. ते हैदरखान याचे छाप्यांत सरकारकामास आले. तेथें तोफेचा गोळा लागून ठार झाले. त्या वेळेस परशरामभाऊ जवळ होते. भाऊ यांचीं तीन घोडीं पडलीं, परंतु त्यांनीं जागा सोडिली नाहीं ! त्यावेळेस भाऊस सालिना वीस हजार तैनात करून दिली. पुढें महादेवराव अण्णा यांचे पुत्र दामोदर महादेव यांस श्रीमंतांनीं कृपा करून नांदोरें गांव इनाम दिला व तैनात दीड हजार रुपये करून दिली. याप्रमाणें ते कीर्तिवान झाले. धाकटे बळवंतरावदादा पांचवे पुत्र. हेही पराक्रमी, घोड्यावर बसणार उत्कृष्ट. यांनींही श्रीमंतांचे घरीं चाकरी करून नैनाता वगैरे मिळविल्या. याप्रमाणें पंचपुत्र बाप्पा-

जींचे महापराक्रमी. कृष्णंभटबाप्पाजी पुत्रशोकानें वारले. ते त्रिवर्ग बंधु पुत्रशोकानेंच वारले. कृष्णंभटबाप्पाजी, गोविंदपंतनाना व त्रिंबकपंतअप्पा या त्रिवर्गास पुत्रशोक जाहला. राजयक्ष्मा रोग होऊन श्रीमंत शके १६९४ कार्तिकवद्य ८ रोज बुधवारीं वारले. श्रीमंत रमाबाईसाहेब सहगमनें गेली. त्यावेळेस त्यांनीं प्रसाद सर्वांस दिला. पांच मोहरा प्रसाद पुरुषोत्तमरावदाजी यांस श्रीमंत बाईसाहेब यांनीं दिल्या. ते दाजींनीं स्वदस्तूरचें लिहून ठेविलें आहे.

पुणें मुक्कामीं श्रीमंत नारायणराव यांचा खून झाल्यानंतर, श्रीमंत गंगाबाईसाहेब यांना पुरंदर किल्ल्यावर ठेवण्यांत आल्यावर, तमाम सरदारांस पत्रें पाठवून आणवावें अशी मसलत बळावून, तमाम सरदारांस पत्रें गेलीं. वामनरावबाबा, परशरामभाऊ, रघुनाथरावदादा या त्रिवर्ग पटवर्धन सरदारांसही पत्रें आलीं. सारे सरदार तासगांवाजवळ रामापूर-कमळापूर ह्मणोन गावें आहेत, तेथें जमा जाहले. त्या वेळेस पुरुषोत्तमरावदाजी मंगळवेढ्यास घरीं होते. पटवर्धन यांस काळजी लागली कीं, श्रीमंत रघुनाथरावदादा यांचा आह्मांवर अत्यंत राग. त्यांनीं प्रत्यक्ष पुतण्यास गाड्यांकडून मारविलें तेथें आमची कथा काय? पुढें विचार ठीक दिसत नाहीं! सर्वांनीं ठरविलें कीं, दाजीस आणविल्याखेरीज परिणाम नाहीं! याप्रमाणें ठरविलें. नंतर परशरामभाऊ यांची मातोश्री जानकीबाई यांच्या नांवें पत्र पाठवून जासूद रवाना केले. जासूद मंगळवेढ्यास आले व पत्रें येतांच भुजंगभट जोशी मंगळवेढकर यांजकडून मुहूर्त काढून दाजी रातोरात निघाले ते तासगांवास आले. तेथें बाईची भेट घेतली. तों बाई बोलली कीं, अरे दाजी, भाऊ रामापूर-कमळापुरावर उतरून आठ रोज झाले. तूं कोठें होतास? तुला समजलें कीं नाहीं? तेव्हां, प्रसंग पाहून दाजींनीं उत्तर केलें कीं, बाई, दूधभात खाण्यास भाऊ आणि मरायच्या वेळेस मात्र दाजींची आठवण तुला झाली! असें ह्मणतांच बाईनीं पदर पसरला आणि बोलली कीं, या वेळेस तूं

भलतेंच बोलूं नको ! " असें ह्मणण्याचें कारण, एकदां तासगांवास असतांना भोजनास सारी मंडळी बसली. त्यांत बाईनीं दुध आणोन भाऊस मात्र वाढिलें, दाजीस कांहीं वाढिलें नाहीं. " बाई ह्मणाली, तूं लष्करांत जा. तेव्हां दाजी बोलले, मी जात नाहीं. भाऊ जोंपर्यंत लहान होता तोंपर्यंत तूं जें सांगितलेंस तें मीं केलें. आतां त्याचें त्यांस कळों लागलें. असें ह्मणतांच बाईनीं वडिलांची शपथ घातली कीं, तूं अक्षर देखील बोलूं नको. मी सांगतें त्याप्रमाणें ऐक. तेव्हां यांनीं उत्तर केलें कीं, बाई, तुझी आज्ञा प्रमाण परंतु मला समागमें न्यावयाचें असल्यास मी जें करीन तें त्रिवर्गांनीं मान्य केल्यास बरें. नाहीं पेक्षां पाणी प्यावयासही रहाणार नाहीं ! याप्रमाणें बोलतांच, बाईनीं सांगितलें कीं, मी येऊन त्रिवर्गासही ताकीद करितें. असें ह्मणोन बाई पालखींत बसून दाजीस घेऊन लष्करांत आली. आणि त्रिवर्गास बोलावून सांगितलें कीं, मीं दाजीस आणिलें आहे. तुह्मांस वांचण्याचें असल्यास जें दाजी सांगेल त्याप्रमाणें ऐकावें. न ऐकल्यास तो घरास निघून जाईल. याप्रमाणें सांगतांच त्रिवर्गांनीं सांगितलें कीं, जें दाजी करितील तें आह्मांस प्रमाण. ते जितकें पाणी प्यावयास सांगतील तितकेंच पाणी पिऊं ! याप्रमाणें त्रिवर्गांनीं बाईचे पायांवर हात ठेविले. नंतर त्या स्वारीस दाजी यांनीं जी मेहनत केली ते उपकार परशरामभाऊ स्मरत कीं, आम्ही आमचे अंगाचें कातडें काढून जोडे करून दाजीचे मुलाचे पायांत घातले तरी दाजींचे उपकार फिटावयाचे नाहींत ! याप्रमाणें बोलत, हें सर्वांस माहीत आहे.

एके दिवशीं आनंदीबाईजवळ चार दुष्ट मिळोन मसलत दिली कीं, पटवर्धन यांचा विश्वास धरितां नये. त्यांस हरतऱ्हा करून दगा करावा. प्रथम पुरुषोत्तमराव यांस मारावें. नंतर मग साऱ्यांचें कांहीं कठीण नाहीं. पुरुषोत्तमराव हे फार सावध, यांस दगा करावा. असें सांगून दादासाहेब यांसही मजकूर सांगून मसलत सिद्ध करविली. भोजनास बोलावून विषप्रयोग करावा. तों पटवर्धन यांणीं त्याचा

बंदोबस्त पूर्वीच केला होता कीं, " आम्हीं कोंकणांत कुलदेवतेस जाण्याचा नवस केला होता तों सरकारचें पत्र आल्यावरून आलों. त्यास एक अडत केली आहे कीं, दर्शन घेतल्याखेरीज कोठें भोजनास जावयाचें नाहीं, याप्रमाणें बोललों आहों. " असें म्हणून भोजनास कोठें न जाण्याचा बंदोबस्त पूर्वीच केला होता. दाजी यांचा नियम सरकारचे विडे जरी आले तरी ते आपले गोटास आणोन पुरून टाकावे, याप्रमाणें प्रत्यही नेम. एखादे वेळेस विडा खावा अशी त्यांणीं आज्ञा केली तरी दाजींनीं विनंति करावयाची कीं, महाराज, आमचा सांप्रदाय सरकारचें काय जें येईल तें सर्वांस दिल्याखेरीज आह्मांस खातां नये. याप्रमाणें रामचंद्रपंतआप्पा यांजपासून चाल आहे. आमचे मानकरी आहेत त्यांस दिल्याखेरीज आह्मांस खातां नये. खाल्लें असें त्यांस समजल्यास ते प्रसंगास दगा करितील, यामुळें त्यांची मर्जी रक्षण करणें प्राप्त ! असें सांगून तेथें विडे खाण्याचा बंदोबस्त केला. एके दिवशीं मकरसंक्रमण आलें. ते दिवशीं तिळगुळाचा समारंभ जाहला. सर्वांनीं सरकारांस तिळशर्करा दिली. दाजी आनंदीबाईकडे तिळशर्करा द्यावयास गेले होते. तों आनंदीबाई बोलल्या; या पुरुषोत्तमराव, असें ह्मणून बसावयास पाट दिला. याणीं नमस्कार करून तिळशर्करा दिली. नंतर त्यांणीं रुप्याचे तबकांत तिळशर्करा-सोनेरी वर्ख लावलेला व केशरी असा नाना प्रकारचा हलवा भरून आपले हातानें तबक उचललें तों दाजींनीं शेला पुढें पसरला. तों तबक शेल्यांत सारें ओतिलें. आणि बोलल्या कीं, तिळशर्करा घेणें. ते घेऊन लष्करांत आले. आणि सर्वांस सांगितलें कीं, सरकारची तिळशर्करा आली ही भक्षण करितां कीं काय ? चांगली आहे, सोनेरी वर्ख लाविले आहे, ज्यास मरावयाचें असेल त्यानें खावी ! असें ह्मणून लष्करांत कुत्रीं होतीं त्यांस आणून त्यांजपुढें टाकिली. त्यांनीं खातांच लागलींच मेलीं; हें सर्वांनीं पाहिलें. नंतर सर्वांची खातरजमा जाहली कीं, दाजी सांगतात तें खरें !

एके दिवशीं पटवर्धन यांस लुटावें ह्मणून सरकारच्या पागेंत हुजुरातींत वगैरे तयारी जाहली. ही बातमी पटवर्धन यांस समजोन हे सारे तयार होऊन सरकारच्या डेऱ्यानजीक नगारा वाजवीत आले ! तों कोण आले ह्मणून शोध घेतला तों पटवर्धनांची फौज. तेव्हां सांगून पाठविलें कीं, रात्रींच तयार होऊन येण्याचें कारण कोणतें ? यांनीं उत्तर केलें कीं, सरकारच्या पागेंत तयारी जाहली ह्मणोन बातमी आली, तेव्हां कोणी गनीम आला किंवा गनिमावर दग्यानें जावयाचें असेल. असें समजून आह्मी तयार होऊन आलों. आमचें आणखी दुसरें काम कोणतें ? वडिलांनीं हेंच केलें. आह्मीही हेंच करणार. सरकारांतून आज्ञा जाहली कीं, आतां तुम्हीं आपलें गोटास जावें. त्यांनीं उत्तर केलें कीं, आह्मीं राहुट्या वगैरे पाडून बुनगें लादलें, आतां कोणीकडे जावें ? आतां उजाडेपर्यंत असाच छबिना ( रात्रभर पहारा करणें. ) करूं. असें ह्मणत रात्रीं तसेच छबिन्यास उभे राहिले. प्रातःकाळ होतांच सरकारचें कूच जाहलें. त्यांजसमागमें तसेच चालते जाहले.

एके दिवशीं दाजी श्रीमंतांच्या कचेरीस गेले. तों तेथें मानकरी सारे मांडीस मांडी लावून बसले व सुमेरसिंग वगैरे गाडदी बसले. त्यांचा मरातब दादासाहेबांनीं मोठा वाढविला व त्यांस पालख्या, अबदागिऱ्या वगैरे दिल्या. तेही कचेरीसच बसले होते. तेथें पुरुषोत्तमराव बसले. तों फुलांच्या हारतुऱ्याच्या पाट्या भरून आणून श्रीमंतांपुढें ठेविल्या. तों दादासाहेब यांनीं हारतुरे अगोदर गाडदी समोर बसले त्यांच्या अंगावर टाकिले. नंतर मालोजीराजे घोरपडे व अप्पाजीराव पाटणकर वगैरे मानकरी यांस देऊन दाजींच्या अंगावर तुरा टाकिला. तों दाजी यांनीं तसाच तुरा माघारा टाकून बोलले कीं, राजे, राजे, हारतुरा माघारा टाका ! असें ह्मणतांच दरोबस्त मानकरी यांनीं हारतुरे माघारे टाकिले. नंतर दाजी बोलले, दादासाहेब ! हे गाडदी पायचीं माणसें, आणि हे मानकरी तुमच्या

मांडीस मांडी लाऊन बसले, असें असतां गाडद्यांस हारतुरे अगोदर देऊन नंतर मानकरी यांस देणें ही चाल श्रीमंत नानासाहेबापासून नव्हती! दादासाहेब, श्रीमंत नारायणरावसाहेब यांस गाडद्यांनीं मारिलें, त्यावेळेस हे मानकरी जर वाड्यांत असते तर पांच हजार गाडदी कापून काढिले असते!!! असें बोलतांच दादासाहेब यांस वाटलें कीं, हें मानकरी आतां दंगा करतील कीं काय? दाजीनीं तलवार म्यानाबाहेर केली आणि ह्मणाले, आपणांस चमत्कार पहावयाचा असल्यास अद्यापि कां होईना! असें ह्मणतांच दादासाहेब कचेरींतून उठून आंत डेऱ्यांत बिचोऱ्यांत गेले! दाजी मानकरीसुद्धां गटाचा गट तसेच कचेरीच्या बाहेर आले. तों गाडदीही बाहेर आले. गाडदी दाजीस मुजरा करून बोलले, महाराज, आपली बरोबरी आह्मांस यावयाची नाहीं. असें ऐकतांच गाडद्यांस बोलले, अहो जमातदार, तुह्मांकडे काय आहे! हे श्रीमंतांनीं पहावें. तुह्मी किती थोर जाहला तरी श्रीमंतांच्या मांडीस मांडी लाऊन बसाल कीं काय! मानकरी यांचा दर्जा निराळा व तुह्मीं किती जाहला तरी सरकारचे चाकर. असें म्हणून गाडद्यांच्याही तोंडावरून हात फिरविला! तों मालोजीराजे दाजी यांची पाठ थोपटून बोलले कीं, दाजी, तुला काय सांगूं! माझे अंगावर साडेतीनशें जखम आहे. आणि प्रसंग पडल्यास आणखी मरून जाऊं. परंतु हें बोलणें आमच्यानें व्हावयाचें नाहीं! आम्ही हारतुरे घेऊन उगेच बसलों होतों! आज आमची अब्रू तूं राखलीस. असें ह्मणतांच, दाजी ह्मणाले, राजे, आम्ही काय, ब्राह्मण! राजे ह्मणाले, तूं वरकड बामणावाणी बामण नव्हेस. तूं बोलशील आणि प्रसंग पडल्यास मरूनही जाशील. माझी खातरजमा आहे. याप्रमाणें दाजींचें वक्तृत्व व शूरत्वाची खातरजमा मोठे मोठे मानकरी यांस होती.

बारभाईचें सर्व कारस्थान श्रीमंत दादासाहेबांस समजल्यावरून, बारभाईचा फोड करण्याकरितां परतले. इकडे नबाब निजामअल्ली

कारस्थानी लोकांच्या मदतीस आला होता. त्यास फितूर करण्याचा प्रयत्न दादासाहेबांनीं केला. परंतु हरिपंततात्या फडके यांनीं हरयुक्तीनें नवाबास आपलासा करून घेतला. नवाबाचे फौजेचा तळ हाललला. हें वर्तमान दादासाहेबांस समजतांच यांनीं पळ काढिला. नंतर नवाबास मेजवानी करायची त्यावेळीं नाना व बापू यांस तुह्मी यावयास पाहिजे ह्मणून, लष्करांतून हरिपंत फडके यांनीं लिहून पाठविलें. हरिपंत फडके यांचे ह्मणण्याप्रमाणें तर मेजवानीस गेलें पाहिजे. परंतु, पुरंदरीं श्रीमंतांजवळ कोणास ठेवावें ? ही योजना पडली. झाडून मंडळींची नांवनिशी लिहिली. तेव्हां सखारामबापू ह्मणाले कीं, श्रीमंतांजवळ ज्यास ठेवावयाचें त्यास चार गुण चांगले पाहिजेत. एकतर मातबर नामांकित मनुष्य पाहिजे. दुसरा गुण विश्वासूक पाहिजे. तिसरा गुण निस्पृह पाहिजे. कोट रुपये मृत्तिकेसमान असें पाहिजे. चौथा गुण शिपाई मर्द माणूस पाहिजे; कीं, जो प्रसंग पडला असतां प्राण-समर्पण करणार. हे चार गुण ज्यामध्यें आहेत त्यानेंच श्रीमंतांजवळ रहावें. तेव्हां विचारांतीं, चारी गुण संपूर्ण असें पुरुषोत्तमरावदाजीशिवाय कोणीच नाहीं असें ठरून; दाजींना आणवावें असें ठरून, लष्करांतून पत्र पाठवून दाजी यांस आणविलें; आणि सांगितलें कीं, लष्करांत नवाबास मेजवानी करावयाची यास्तव आह्मांस गेलें पाहिजे. करितां आपणांस श्रीमंतांजवळ ठेवावयाचें यास्तव आणविलें; त्यांस आपण येथें रहावें; असें उभयतां कारभारी यांणीं सांगितलें.

तेव्हां दाजी म्हणाले, " हें सरदाराचें काम ! मी सरकारचा एकांडचा शिपाई, लष्करांत फिरणारा; मला हें मोठें काम कशाला पाहिजे ? सरकारचे पदरीं माझेसारखे लक्षावधि आहेत. हें काम कोणा सरदारांस सांगावें. पटवर्धन सरदार तिघे आहेत त्यांतून कोणासही सांगावें. " तव्हां बापू ह्मणाले, आम्हीं सर्वांची चौकशी करून ठेविली. कोणी शिपाई आहेत तेथें मसलत नाहीं. मसलत व शिपाईगिरी आहे तेथें विश्वास नाहीं. असें कोणांत कांहीं गुण; परंतु जे

सर्व गुण आह्मांस पाहिजेत ते आपणापाशीं आहेत. करितां आपणांसच ठेवावयाचें. तेव्हां दाजी बोलले; मी चाकर खरा, परंतु मला दुसऱ्याचे ताबेदारीस आपण लावून दिलें त्यापेक्षां मला भाऊची परवानगी पाहिजे असें ह्मणतांच, कारभारी यांणीं डांकेवरून भाऊंचें पत्र आणविलें. भाऊंनीं लिहिलें कीं, दाजी वडील आहेत. ते आम्हांस आज्ञा करणार, आणखी सरकार त्यांस तेथें ठेवणार, त्यापेक्षां आम्ही नाहीं ह्मणतों कीं काय ? कोठेंही सरकारची चाकरी करावयाची. कोठें सवड नाहींसी जाहली. तेव्हां दाजी बोलले कीं, आपण मला येथें ठेवितां; परंतु सारी मुखत्यारी मला सांगितली तर राहीन. तेव्हां कारभारी बोलले, जसे आम्ही उभयतां, त्याप्रमाणें आपण.

उभयतां कारभारी लष्करास जावयाकरितां निघाले ते वेळेस सखारामबापू यांनीं दाजीस एकांतीं बोलावून सांगितलें कीं, अहो दाजी, दादासाहेब पन्नास हजार फौज घेऊन बाहेर फिरतात. आह्मीं आपणांस श्रीमंतांजवळ ठेविलें. तरी बहुतसावधगिरीनें रहावें. तेव्हां दाजी बोलले, हें सारें माझे पोटांत गडबडत आहे ! मी श्रीमंतांचे घरीं दहा वर्षांपासोन पंचेचाळीस वर्षें माझ्या वयास जाहलीं आजपर्यंत वागलों. परंतु कोणाचे पाचोळ्यावर देखील पाय दिला नाहीं. तें माझी अब्रू घ्यावयासाटीं मला हें काम आपण सांगितलें ! परंतु बापू, आपणांस एक ठाऊक असो द्या कीं, हे चारशें प्यादें आपण करून दिले हे मारवीन, नंतर आभाळ जरी कडकडून पडलें तरी या मुलांवर पालथा पडोन राहीन. परंतु, दाजी जिवंत असून भलती गोष्ट आपण ऐकणार नाहीं ! याप्रमाणें बोलले. तेव्हां बापू ह्मणाले, दाजी, तुह्माविषयीं माझी खातरजमा आहे. असो; नंतर कारभारी लष्करास गेले. दाजी श्रीमंतांजवळ राहिले. श्रीमंत गंगाबाईसाहेब यांनीं दाजीस आपले बंधू म्हणविलें होतें. दाजी यांनीं ढाल तलवार घेऊन खोलीचे दारांत निजावें. चौकी पहारा पहात सारी रात्र फिरत असावें. तों कारभारी इकडे लष्करांत गेले. नबाबास भेजवानी

जाहली. तेव्हां नबाब यांनीं कारभारी यांस विचारिलें कीं, तुह्मी उभयतां आलां आणि राव पंडनके पास कोण आहे ? तेव्हां कारभारी यांनीं सांगितलें कीं, पुरुषोत्तमराव पटर्धन यांस ठेविलें आहे. तेव्हां नबाब बोलले कीं, " गोपाळराव यांचे बंधु नारायणराव व पुरुषोत्तमराव आह्मास माहीत आहेत. चांगले योग्य मनुष्य आहेत. " पटवर्धनांची चौकी विश्वासाची ही नबाबापावेतों कीर्ति. याप्रमाणें दाजींची विश्वासाची चौकी. एके दिवशीं दोन प्रहरीं दाजी खोलीचे दारांत निजले होते. तों कुणबीण नित्य आंत जाणार तीच जात होती. तों यांची चाल कीं, नित्य माणसें आंत जाणार त्यांचा झाडा घेऊन नंतर आंत जाऊं द्यावीं. याप्रमाणें नित्यकृत्याची शिस्त होती. तों कुणबीण आंत चालली ती दाजीनीं पाहिली आणि बोलले कीं, रांड फितुरी आहे, धरा ! असें ह्मणतांच धरून झाडा घेतला, तों कांहीं निघालें नाहीं. दुसऱ्या कुणबिणी आणवून अगदीं लुगड्यासुद्धां झाडा घेतला, नंतर बुचडा सोडविला तों सुरी निघाली ! आणि चौकशी केली तों फितुरी असें खास जाहलें. नंतर तिला भोतांत घालून कडेलोट करून दिला. याप्रमाणें दाजींची धूर्तता बहुत होती.

दाजी एके दिवशीं आपले इनामगांवीं मौजे आंबें परगणे मंगळवेढें येथें ठाण्याचें ( आपल्या वाड्याचें ) काम चालत होतें तें पहावयास आले. चार दिवस होते. मौजे चळें परगणे मजकूर येथें निरंजनअय्या ह्मणून जंगम होता तो आंब्यास आला होता. तो दाजीजवळ येऊन फारच आर्जवानें बोलूं लागला. दाजी गंगेस स्नानास गेले तेथें जाऊन आपल्याजवळील रुद्राक्षांची माळ सोन्यांत गांठविलेली होती ती पाण्यांत भिजवून दाजीजवळ ठेविली आणि ह्मणाला, ही माळ आपण घ्यावी. तेव्हां दाजी जप करीत होते. कांहीं बोलले नाहींत. माघारे येते वेळीं सांगितलें, आह्मांस कांहीं ही माळ नको. असें ह्मणून ठाण्यांत आले. भोजनानंतर मंगळवेढ्यास जातेसमयीं गांवांतून जयराम पाटील यास बोलावून आणून ताकीद केली कीं, हा

जंगम जर पुन्हा गांवांत आला तर तुझें डोचकें फोडीन ! हा चोर आहे. असें सांगून मंगळवेढ्यास गेले. पुढें आठ पंधरा दिवसांत पंढरपुरीं दरवडा पडला. त्या दरवड्यांत हा जंगम सांपडला. त्यास बेडी घालून मिरजेस बंदींत पाडिला. याप्रमाणें दाजी यांची मनुष्य-परिक्षा होती. कोण मनुष्यें कशीं हें त्यांचे तोंडावरून ओळखीत होते. ही हकिकत पुरंदरास रहाण्याचे पूर्वीची होय. दाजी यांनीं पंढरीस मंगळमूर्तिबावा महान साधु होते त्यांस पालखींत बसवून आंब्यास आणिलें. त्यांना आंब्यास ( किल्ल्यांत ) श्रीउत्तरेश्वर शिवालय आहे तेथें ठेविलें. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं उठून दाजीस बोलले कीं, अरे पुरुषोत्तम, तुला नाना पेशवे यांनीं हें स्थळ दिलें आहे हें तुझें वंशपरंपरेनें चालेल. कांहीं चिंता नाहीं. असें ह्मणतांच दाजीनीं पायांवर डोई ठेविली. बाबांनीं मस्तकीं हात ठेविला. याप्रमाणें दाजीवर भगवद्भक्तही कृपा करीत.

दाजींचे दुसरें कुटुंब कृष्णाबाई यांनीं, आपले पती दाजी यांचे पश्चात् मंगळवेढ्याहून निघोन इनामगांव आंबें येथें येऊन राहिल्या. निरंतर पुराणश्रवण—स्नानदानादि कृत्यें करून सत्काळ घालविला. मुलें लहान, सर्वांच्या मुंजी व लग्नें करून पुत्रांचे पुत्र, कन्या, त्यांचीं लग्नें मुंजी वगैरे कामीं लक्ष रुपये खर्च केले. धर्मकृत्य व सहकुटुंब महायात्रा केली. पंचवीस हजार रुपये खर्चून वाडा पूर्ण केला. गांवांत पेठ वसविली. मळे, तळें, झाडझूड केलें. विहिरी व तळीं बांधिलीं व ओढे फिरविले.

हरिहरराव पुरुषोत्तम हे परम मातृभक्त, आमरणांत मातुश्रीची आज्ञा उल्लंघन केलीच नाहीं. पंचावन वर्षांचें वय होत तों पावेतों मातुश्रीचे आज्ञेंत वागून सार्थक केलें. हरिहरराव यांनींहि दाजींचे पाठीमागें मौजे ओझेवाडी परगणे ब्रम्हपुरी हा गांव सरकारांतून इनाम करून घेतला. हे दाजींचे पाठीमागें पुण्यांत श्रीमंत सवाई रावसाहेब यांजपाशीं होते. श्रीमंतांची कृपा पूर्ण होती. नानाफडणवीसही कृपा करीत.

बळवंतरावकाका यांनीं फितूर प्रकरण केलें तेव्हां त्यांस सरकारांनीं कैद केलें. त्यासमयीं परशरामभाऊ यांनीं सोडविलें. तळेगांवचे स्वारीस सरकारचें बोलावणें भाऊस आलें तेव्हां भाऊंनीं सांगितलें कीं, आमचे पायांत बेडी आहे. तेव्हां बेडी असोन घोड्यावर बसावयास कसें येईल ? बेडी तोडल्यावर येऊं ! तेव्हां बळवंतरावकाका यांची बेडी तोडून मिरजेस पाठविलें. नंतर तळेगांवची स्वारी जाहली. तेथें इंग्रजांशीं मातबर लढाई होऊन इंग्रजांचा पराभव झाला. श्रीमंतांस यश आलें.

भाऊसाहेबाप्रमाणें भाऊबंदांचा अभिमानी, पूर्वस्मरणाविशीं दक्ष व उपकार जाणणारा असा दुसरा या पटवर्धनकुटुंबांत कोणीच जाहला नाहीं. हें पुढील गोष्टीवरून सहज लक्षांत येईल. पंढरपूरकर बडवे यांची मुलगी पंढरपूरच्या गवंड्यानें ठार मारिली. तेव्हां १चिंतोपंत लिमये कमाविसदार यांचा तेथें अंमल होता. त्यांनीं तो मजकूर मनास आणिला आणि मध्येंच दाबून टाकिला ! नंतर बडवे यांनीं आंब्यास येऊन मातुश्री कृष्णाबाईजवळ ( दाजींच्या कुटुंबाजवळ ) फिर्याद केली. तेव्हां बाईनीं शिबंदी कारकून व स्वार पाठवून गवंडी यांस चीजवस्तसुद्धां कैद करून आंब्यास आणिलें. तेव्हां मुलीचे दागिने त्याच्या घरीं निघाले. नंतर जबान्या वगैरे घेऊन तो खून केलेला मजकूर लागूं जाहला. नंतर कृष्णाजी महादेव यांजसमागमें गवंडी यांस देऊन तासगांवीं पाठविलें. वाड्यांत येतात तों भाऊसाहेब आडवे झालेले जागेच होते. भोंवतालीं सारी मंडळी बसली होती चिंतोपंत लिमयेही बसले होते. तों लिमये यांनीं गोष्ट काढली कीं, तुह्मी स्वारी करून गवंडी धरून आणण्याचें प्रयोजन काय ? चोरून येऊन तुह्मी गवंडी धरून नेला, असें चोरीचें कसब करणें चांगलें कीं काय ? असें म्हणतांच हरिहररावतात्या बोलले कीं, चोरीचें कसब आमच्या

१ लिमये यांस पंढरपूर येथें परशरामभाऊंनीं कमाविसदार नेमिलें होतें.

वडिलांनीं केलें नाहीं व आह्मांसही ठाऊक नाहीं. आतां करावयाचें जाहल्यास तुह्मांजवळ शिकावें लागेल ! असें ह्मणतांच भाऊसाहेबांनीं तोंडावरील पांघरूण काढून चिंतोपंत यांजकडे पाहून बोलले कीं, अहो चिंतोपंत, कृष्णाबाई वहिनी कोण समजतां हो ? ती प्रत्यक्ष धनी. तासगांवास जर कोणीं अन्याय केला आणि त्यांस समजलें तर येथून मुसक्या बांधून नेतील. तेथें तुमची कथा काय ? त्या धनी आहेत. आम्ही गैर गोष्ट केली तर त्यांस चौकशी करून योग्य न्याय करण्याचा त्यांचा अधिकार आहे. असें बोलतात तों कृष्णाजी महादेव यांणीं विनंती केली कीं, महाराज, मामलेदार यांचे स्वाधीन चीजवस्त करून पावती घेणें ह्मणून आज्ञा जाहली. परंतु आठ दिवस यांच्या पाठीस लागलों तरी स्वाधीन करून घेत नाहींत. नानाप्रकारचें बोलतात. असें सांगतांच भाऊसाहेब यांनीं आज्ञा केली कीं, गोपाळपंत सोनी यांजकडे चीजवस्त देऊन पावती घ्यावी आणि तुह्मी जाणें. कृष्णाबाई वहिनीस सांगावें कीं, तुह्मी केलें तें ठीक केलें याप्रमाणें सांगावें. असें सांगतांच लिमये मुकाट्यानीं उठून गेले. या प्रकारें भाऊसाहेब कृष्णाबाई यांस मानीत. कां कीं, दाजी यांनीं आम्हांवर जे उपकार केले ते आम्हीं आपले अंगाचें कातडें काढून जोडे करून दाजींच्या मुलाचे पायांत घातले तरी दाजींचे उपकार फिटावयाचे नाहींत. याप्रमाणेंच बाळासाहेबही नारायणराव व पुरुषोत्तमराव यांचे वंशास अधिक मानीत. त्यांनीं तशींच महत्वाचीं कार्यें केलीं सबब मानीत.

मेघश्यामरावबापू यांस पहिल्या कुटुंबास पुत्र सहा; दुसऱ्या कुटुंबास चार पुत्र; व तिसऱ्या कुटुंबास पांच पुत्र; एकूण पुत्र पंधरा झाले. पैकीं अल्पवयांत तीन वारले. मेघश्यामराव यांची व हैदरअलीचा सरदार मीर फैजुल्ला याची सन १७६३ त लढाई होऊन हे शत्रूकडे पाडाव सांपडले ते दोन वर्षांनीं तिकडून सुटून आले. सन १७८० त जनरल गाडर्ड यांच्या फौजेशीं बोरघाटाखालीं परशुराम·

भाऊंनीं निकराच्या लढाया केल्या. त्यांत एका टोळीवर हे मुख्य सरदार होते. गोपाळरावांचे प्रथम कारभारी नारायणराव कृष्ण होते. नारायणराव सन १७६९ त वारल्यावर हरिभटबावांचे द्वितीय पुत्राचे चिरंजीव मोरोबाआबा हे कारभारी झाले. यांच्या चातुर्याबद्दल ऐ. ले. संग्रहांतील शेंकडों पत्रें साक्ष देत आहेत. रघुनाथराव कुरुंदवाडकर हे परशुरामभाऊबरोबर प्रत्येक स्वारींत होते. यांस अनेक वेळां जखमाही लागल्या होत्या. रघुनाथरावांस पुत्र त्रिंबकराव. त्रिंबकरावांस पुत्र केशवराव. केशवरावांस पुत्र रघुनाथराव, हरिहरराव, विनायकराव; व त्रिंबकराव असे चार पुत्र. पैकीं रघुनाथरावांच्या वांटणीस संस्थान कुरुंदवाड थोरलें घराणें व बाकी तिघांच्या वाटणीस संस्थान कुरुंदवाड धाकटें घराणें. शिवराव निळकंठ यांस कुरुंदवाड सरंजामाची वाटणी मिळाली नाहीं. पण सन १७९१ त जुन्या सरंजामापैकीं निर्वाहापुरतीं खेडीं मिळालीं. हे कुरुंडवाड सोडून जवळच्या वाडींत राहूं लागले, सबब यांच्या घराण्यास " वाडीकर पटवर्धन " ह्मणतात. गणपतराव कोन्हेरराव यांस बाजीरावसाहेबांनीं कुरुंदवाड सरंजामापैकीं वाटणी देवविली ती घेऊन ते शेडबाळ येथें राहूं लागले. त्यांच्या संस्थानास संस्थान शेडबाळ अथवा संस्थान कागवाड ह्मणतात. हे संस्थान हल्लीं खालसा आहे. हरिहरराव पांडुरंग यांस सरदारीचीं वस्त्रें मिळालीं होतीं. ते वीस बावीस वर्षांचे होऊन वारले. त्यांस संतती नाहीं. त्यांचे धाकटे बंधू विठ्ठलराव हे अल्पवयांतच वारले. नंतर चिंतामणराव पांडुरंग यांस बाजीरावसाहेबांनीं सन १८०८ त मिरज सरंजामाची वांटणी दिली. ती घेऊन ते सांगली येथें राहूं लागले. हे शूर शिपाई होते. धोंडजी वाघाशीं यांची लढाई झाली तींत त्यांस नाकांवर जखम लागली होती. त्या काळच्या इतर बहुतेक धामधुमींत हे प्रमुख होते. सन १८२२ त ब्रिटिश सरकारानें पुन्हा मिरजसरंजामाच्या चार वाटण्या करून त्या गणपतराव नारायण, माधवराव गंगाधर, कृष्णराव गोविंद व गोपाळराव

गंगाधर यांस दिल्या. त्यापैकीं गणपतरावांच्या वाटणीस संस्थान मिरज व माधवरावांच्या वाटणीस संस्थान मिरज-मळा असें ह्मणतात. कृष्णरावांची वांटणी संस्थान सोनी व गोपाळरावांची वांटणी संस्थान सुपारीबाग. संस्थान सोनी व सुपारीबाग खालसा झालीं. परशराम-भाऊंच्या पुत्रांपैकीं रामचंद्रपंत आपा व हरिपंतबावा हे त्या काळचे नांवाजलेले मर्द शिपाई होते. खडर्याच्या लढाईंत लालखानास हरि-पंतबाबांनीं मारिलें तो पराक्रम प्रसिद्धच आहे. हरिपंतांनीं सरंजा-माची वांटणी घेतली नाहीं. त्यांनीं पुष्कळ दान-धर्म केला. त्यांनीं काशीयात्रा केली तेव्हां त्यांबरोबर लक्षावधि माणूस गेलें होतें असें सांगतात. ते निपुत्रिक वारले. त्यांच्या बंधूपैकीं विनायकराव हे अल्पवयांत वारले. बाकीचे तिघे बंधू रामचंद्रपंत, गणपतराव व माध-वराव यांच्या वाटणीस अनुक्रमें संस्थान जमखंडी, तासगांव व चिंचणी असें ह्मणतात. त्यांपैकीं तासगांव व चिंचणी हीं संस्थानें आतां खालसा झालीं आहेत.

भास्कर हरीच्या पुत्रांत धोंडोबादादा, विनोबाआबा, हरबाआण्णा व रामचंद्रपंत हे शौर्याविषयीं फार प्रसिद्ध आहेत. त्यांत विनोबा-आबा व धोंडोबादादा हे माधवराव पेशव्यांनीं केलेल्या सर्व मोहि-मेंत हजर होते. व सवाई माधवराव जन्मास आले तेव्हां तेथील बंदोबस्ताकरितां कांहीं महिने त्यांची नेमणूक झाली होती. हरबा-आण्णांनीं मोतीतलावाच्या लढाईंत मोठा पराक्रम केला. हे तोतया-कडे गेल्यामुळें कांहीं दिवस पुणें दरबारची यांजवर अवकृपा होती. विनोबाआबा व हरबाआण्णा उभयतांही पट्टणकुडीच्या लढाईंत जखमी झाले होते. रामचंद्र भास्कर हे सन १७९१ त परशराम-भाऊंनीं धारवाड काबीज करून श्रीरंगपट्टणावर चाल केली तेव्हां आघाडीच्या फौजेंत एका टोळीवर मुख्य सरदार होते. विठ्ठलराव धोंडदेव हे खडर्याच्या लढाईंत गोळी लागून ठार झाले. तेव्हां त्यांची स्त्री रखमाबाई सती गेली. या सतीच्या सहगमनाची हकिकत फार

चमत्कारिक आहे. ती आतांच्या काळांत कोणास खरी वाटणार नाहीं ! तथापि पूर्वीचीं माणसें जशी सांगत आलीं तशीच ती येथें देतों. खडर्य्राच्या लढाईंत विठ्ठलराव पडले तेव्हां ही बाई मिरजेस वाड्यांत घरीं तुळशीला पाणी घालीत होती. पूजा करितां करितां ती अकस्मात् आक्रोश करूं लागली व घरांतील माणसांस सांगूं लागली कीं, याक्षणीं माझा भ्रतार लढाईंत पडला. त्याचें पागोटें घरांत आहे त्याबरोबर मी सती जाणार. मला परवानगी द्या व माझी तयारी करून द्या. असें ह्मणून तिनें त्यावेळेपासून अन्नपाणी वर्ज केलें. त्यावेळीं तिला कोण सती जाऊं देणार ! तिला वेड लागलें असेंच लोक समजले. खर्ड्याहून पांचवे दिवशीं मिरजेस वातमी आली तेव्हां रखमाबाईच्या अंतर्ज्ञानाविषयीं सर्वांस विस्मय वाटला ! नंतर ती मोठ्या समारंभानें सती गेली.

पट्टणकुडीच्या लढाईंत जखमांनीं घायाळ झालेले गणपतराव विनोबा समरभूमीपासून कांहीं अंतरावर येऊन मूर्छित होत्साते घोड्यावरून पडले ते तसेच कांहींवेळ पडले होते. मागून त्या काळचे प्रसिद्ध शिलेदार शितोळे लढाईंतून परत येत होते त्यांनीं काळोखांत त्यास पाहिलें व घोड्यावरून उतरून त्यांचें अंग चांचपून पाहिलें, तों त्यांच्या कमरेस देवांचें संपुट होतें तें खडबड वाजलें. त्यावरून हा ब्राह्मण आहे व यांस येथेंच टाकून गेलों तर फुकट मरून जाईल, असें जाणुन त्यांस त्यांनीं भाल्याचे झोळींत घालून मिरजेस पोंचवून दिलें.

भाऊंचे पुत्र रामचंद्रआपा यांच्या पराक्रमाचें वर्णन हरिवंशाच्या बखरींत नसल्यामुळें, हरिभटबावा यांच्या चरित्रकारांनीं दिलेली माहिती पुढें देत आहे.

कर्नाटक देशांत हैदरखानाचा उपद्रव होऊन तुंगभद्रातीरावर त्याचा अंमल पूर्ण बसल्याचें पुण्यास श्रीमंतांस कळून, त्यांनीं तो अंमल दूर करण्यास परशरामभाऊस आज्ञा केली. तेव्हां भाऊ-

साहेबांनीं आपले धाकटे ( चुलत ) बंधु विनोबाआबा व हरबाआण्णा व विठ्ठलरावबाबा यादवाडकर व मेघश्यामरावबापू मंगळवेढेकर वगैरे मंडळी व हुजूरची फौज घेऊन ते तुंगभद्रातीरावर आले. तों शत्रूंचा जमाव विशेष असल्याचें समजतांच त्यांनीं आपल्या सैन्याच्या चार टोळ्या करून शत्रूवर एकदम चाल केली. हें हैदरअल्लीकडील सरदारांनीं पाहून त्यांनींही त्याचप्रमाणें सैन्याचे चार विभाग करून ते टोळी टोळीवर चाल करून आले. ज्या टोळींत हैदर वगैरे मुख्य सरदार होते तीच टोळी परशरामभाऊ बंधूंसहित ज्या टोळींत होते त्यावर चालून आली व परस्पर सरदार आपापले युद्धचातुर्य दाखवूं लागले. त्यांत परशरामभाऊंचे पदरीं रामजी या नांवें कोणी बारगिरावरील अधिकारी होता तो हैदराकडून जो जो सरदार गोळीचे पल्लयांत येईल त्याला यमलोकास पाठवूं लागला. हें त्याचें गोळीचें काम चालू असलेलें इतर शूर लोकांनीं पाहून त्याला त्यापैकीं कितीएक शूर भले शिपाई शाबास असा शब्द करीत व कितीएक असें ह्मणत कीं, हें काम पट्टा किंवा तरवारीनें केलें असतें ह्मणजे शत्रूंचे फारच लोक कामास आले असते. त्या शूरांस विनोबाआबा ह्मणतात, पहा मी त्या हत्तीवरील बंदुकबारदारास मारितों. असें बोलून त्यांनीं आपला घोडा जों उडविला तों घोड्याचें पाय हत्तीचे दांतांवर ठेवून गंडस्थळावरील बंदुकदारास पट्यानें मारून ते पुन्हा आपले सैन्यांत आले. याप्रमाणें वारंवार क्रम सुरू असलेला पाहून परशरामभाऊंनीं विनोबाआबास शाबासकी दिली. थोड्याच वेळांत हैदरानें पळ काढून तो तुंगभद्रा पैलतीरावर गेला हें परशरामभाऊंचे सैन्यानें पाहून सर्वांनीं जयशब्द केला. पुढें रामजी व विनोबाआबा या उभय शूरांवर लोकप्रसिद्ध अशा ह्मणी उत्पन्न झाल्या कीं, " आली रामजीची गोळी तर शत्रूनें बांधावी झोळी. " " आला विनोबाचा मारा त्याला कोठें नाहीं थारा " ह्या ह्मणी बहुत वर्षें शूरमुखांतून निघत असत. इकडे भाऊसाहेब शत्रूचा पाठलाग करून

त्यांस बहुत दूर घालविल्यावर परतून आपल्या पूर्वस्थळीं आले. तों पूर्वी चार टोळ्या करून हैदरावर गेल्याचें लिहिलें आहे; त्यापैकीं एका टोळींत सरकारी नगारा, निशाण वगैरे राजचिन्हें होतीं. त्यावरच हैदराकडील पेंढारी वगैरेंनीं गर्दी करून निशाणें वगैरे आपल्या हातीं घेऊन गेल्याचें वर्तमान आलें, तें भाऊंनीं श्रवण करितांच राजचिन्हें परत आणण्याकरितां त्यांनीं हरबाआण्णा पटवर्धन यांस बरोबर फौज देऊन रवाना केलें. ते शरीरबलानें व बुद्धीनें सर्वांत मान्य होते. त्यांनीं युक्ति केली ती अशी, मोठ्या वेगानें घोडेस्वार निराळे काढून त्यांस असा हुकूम केला कीं, तुह्मीं त्वरेनें त्या चोरट्या पेंढाऱ्यांच्या बाजूनें पुढें जाऊन पुन्हा त्यांच्या मुखावर येऊन त्यांचा पुढें जाण्याचा मार्ग बंद करावा. असें सांगून त्यांस रवाना केलें. त्याप्रमाणें स्वारांनीं त्यांचा पुढें जाण्याचा मार्ग बंद केला. तों मागाहून हरबाआण्णांनीं आपल्या सैन्याच्या तीन टोळ्या करून त्यांच्या दोन बाजूंनीं दोन व एक पाठीमागून अशा युक्तीनें धांवत धांवत चोरटे दृष्टीस पडतांच त्यांस चोहोंकडून हत्यारांचा व गोळ्यांचा मारा केला. तेव्हां त्यांतील बहुतेक लोक ठार झाले व कांहीं मूर्च्छित पडले, असें पाहून त्यांनीं लूट केली. त्या लुटींत सरकारी सर्व सामान व इतर लूट घेऊन ते परत भाऊसाहेबांजवळ आले. तेव्हां हरबाआण्णा यश घेऊन परत आले हें वर्तमान ऐकून सर्वांना आनंद झाला व लष्करांत जयवाद्यें वाजूं लागलीं. पुढें भाऊसाहेब हैदरानें पीडा दिलेल्या प्रजेस आश्वासन देऊन त्या देशावर आपले अंमलदार ठेऊन आपण सैन्यासह पुण्यास परत आले. तेथें श्रीमंतांनीं दरबार भरवून हैदरावरच्या स्वारींत ज्या ज्या शूरांनीं सहाय्य करून पराक्रमानें शत्रूंचें पारिपत्य केलें, त्यांच्या त्यांच्या योग्यतेनुरूप कोणास पोषाख, कोणास अलंकार, कोणास रोख रुपये असें देऊन संतुष्ट केलें. त्यांत विनोबाआबास बहुमोलाचे पोषाख व अलंकार मिळाले. तसेंच हरबाआण्णांसही

बहुमोलाचा पोषाख व चाळीस हजार रुपये रोख बक्षीस देऊन त्याच सभेंत असा उल्लेख केला कीं, हरबाआण्णांनीं आपल्या शौर्यानें गेलेलें यश पुन्हा संपादन केलें.

टिपूसुलतान यानें धारवाडचा किल्ला घेऊन, त्या समीपचे गांवांवर आपली सत्ता बसविली. हें वर्तमान श्रीमंत पेशवे यांस कळतांच, त्यांनीं परशरामभाऊस हुजूरपथकासह किल्ला परत घेण्याकरितां रवाना केलें. किल्ल्यावरून तोफेचा गोळा न लागे इतक्या अंतरावर भाऊंनीं आपल्या लष्कराचा तळ देऊन किल्ल्याचे सभोंवार स्वारांचा बंदोबस्त केला. आणि लढाईशिवाय शत्रूस किल्ला स्वाधीन करणें भाग पाडावें असा घाट घातला. शत्रू बहुत बंदोबस्तानें असल्यामुळें, भाऊसाहेबांस तेथें बरेच दिवस रहाणें भाग पडलें. यामुळें इकडे पुणें दरबारांत भाऊसाहेबासंबंधीं बरीच कुजबुज सुरूं झाली. आणि ह्मणूं लागले कीं, आपल्या अल्पवयाच्या बंधुवर्गासह भाऊसाहेबांनीं सरकारांतून मोठमोठ्या तैनाती घेऊन, त्यासह धारवाडवर दिवाळीसण करीत राहिले आहेत. हे शब्द नाना फडनविसांचे कानीं येतांच त्यांनीं खरी वातमी घेण्याकरितां, रामचंद्रबाबा व मामा या उभयतांस धारवाडास पाठविलें. थोड्याच दिवसांत उभयतां लष्करांत दाखल झाले. भाऊंचे डेऱ्यांत जों जातात तों भाऊसाहेब आपल्या सर्व बंधूसह भोजनास बसलेले पाहून विनोदानें हास्य करून ह्मणाले, अहो भाऊसाहेब, तुह्मावर श्रीगणपतीची कृपा पूर्ण आहे. मिश्रूही दृग्गोचर होत नाहीं अशा अल्पवयी बंधुवीरांसह मोठमोठ्या तैनाती संपादून शिपाईगिरी गाजवीत आहां ! परंतु हल्लीं चाललेल्या प्रयत्नानें किल्ला हस्तगत होण्यास निदान बारा वर्षें तरी लागतील. हे त्या उभयतांचे शब्द ऐकून सर्व पटवर्धन बंधूंस क्रोध आला आणि ह्मणाले, उद्यांक अस्तमान होण्याच्या पूर्वीं किल्ला घेऊं; न घेऊं तर तुमच्यासमक्ष सरकार फर्मावतील ती शिक्षा भोगूं. दुसरें दिवशीं भाऊसाहेबांनीं एकदम जय्यत तयारी करून सूर्योदय होण्याबरोबर हरिभटबाबांचें

व श्रीगजाननाचें स्मरण करून किल्ल्यावर चाल केली. तोफांचा भडि-मार सुरू केला. किल्ल्याशीं लगट करून शिड्या लावून भाऊसाहेब आपल्या बंधूंसह किल्ल्यावर चढले. त्यावेळीं रामचंद्र भास्कर ऊर्फ बळवंतराव पटवर्धन हा सर्वांत वयानें लहान असून शौर्यानें विशेष ! यानें सरकारी निशाण हातीं घेऊन पट्टा फिरवीत सर्वांच्या पुढें चाल केली. तो क्रोधानें संतप्त झालेला पाहून भाऊसाहेबांनीं त्याच्या मद-तीस निशाणाखालचे कांहीं शिपाई व यादवाडकर बंधूंस पाठविले. रामचंद्र भास्कर यानें शत्रूचा मार सहन करीत, आपल्या पट्ट्याचे मारानें शत्रूचे शेंकडों लोक घायाळ केले. शत्रूंनींही बळवंतरावाचे हातावर व पाठीवर वार केले. तथापि ते न जुमानतां तो वाघाप्रमाणें चवताळून शत्रूंवर तुटून पडला. बळवंतरावास देहभान राहिलें नाहीं. जो पुढें येईल त्यावर ते वार करूं लागले. प्रत्यक्ष भाऊसाहेबांवरही ते चालून गेले. तेव्हां बहुत प्रयासानें त्यांच्या हातांतील पट्टा काढून घेतला. किल्ल्यांतील शत्रू पळून गेले. किल्ला सर झाला. हें पाहून ते उभयतां भाऊसाहेबांस म्हणाले कीं, तुमचे बंधू रामचंद्र भास्कर अशा परा-क्रमाचा असून त्यास तुम्ही सालीना दोन हजारांवरच ठेविलेत ? अहो, हा सरदार आहे. याला दोन चार लक्षांची जरी जहागीर श्रीमंतांनीं दिली तरी ती थोडीच ! ! इकडे रामचंद्र भास्कर यांस क्रोधावेशानें पित्तवायूचा कोप होऊन धरा मारा असे शब्द करीत ते परलोकास गेले. किल्ल्याचा बंदोबस्त करून भाऊसाहेब लष्करासह पुण्यास गेले. पुढें कांहीं वर्षांनीं निजमाशीं युद्ध झालें. त्याचें कारण सव्वादोनकोटी रुपये निजामाकडे येणें आहेत ते मागितले असतां, देणें नाकारिलें वरून युद्धास कारण झालें. तेव्हां उभयपक्षीं जारीनें युद्धाची तयारी चालू झाली. नानाफडणविसांनीं आपल्या फौजेवर परशरामभाऊ पटवर्धन यांस सेनापति नेमिलें. सन १७९५ त निजाम व पेशवे यांचें युद्ध खर्डा या गांवीं झालें. कोणकोणत्या ठिकाणीं कोणीं असावें वगैरे व्यवस्था करण्याकरितां सद्या पालखीनिशीं

भाऊसाहेब फिरत असतां एका पठाणाच्या टोळीनें भाऊंस गांठलें. मों विठ्ठलराव धोंडदेव पटवर्धन यांनीं जवळ शस्त्र नसल्यामुळें तोब-ऱ्यांतील एक मेख घेऊन ते त्या टोळीवर धांवले. आणि त्या मेखीनें सर्वांच्या तरवारी मोडून टाकिल्या. मेखीनेंच शत्रुपक्षास अगदीं हतवीर्य करून टाकिलें. त्या टोळीवरील मुख्य पठाणानें याला जिवंत धरून निजामाकडे न्यावें ह्मणून पकडण्याची पुष्कळ खटपट केली. परंतु त्यानें आपले लोक मारिले. हा कांहीं आटपत नाहीं असें पाहून, त्या पठाणानें विठ्ठलरावाचे छातीवर जोडगोळी मारली. विठ्ठलराव-बाबा हा जसा शक्तिमान होता तसाच शरीरानेंही धिप्पाड होता. विठ्ठलरावबाबा यांनीं लहानपणीं ज्याप्रमाणें शेळीचे कोंकरास उचल-तात तसें लहानशा घोड्यास ( तट्टास ) सहज उचलावें. बैल किंवा रेडा सपाट्यानें पळत असतां एकदम त्याचें शेंपूट धरून त्यास दहा वीस हात मागें ओढावें. अशा प्रकारचें सामर्थ्य दाखवून तो वारं-वार लोकांचे मनांस संतुष्ट करीत असे. खर्ड्याच्या लढाईवरून पर-शरामभाऊंनीं बाळासाहेब मिरजकर यांस पाठविलेलें पत्रः—

ऐ. ले. संग्रह पत्र नं. ३६०८ ( फाल्गुन व० ६—१२ मार्च ) "काल छ० १९ साबानी बुधवारीं प्रातःकाळीं नबाबाच्या कुचाची बातमी आली. त्याजवरून आम्ही आपली फौजसुद्धां तयार होऊन गेलों. रा. बाबा फडके व शिंदे, होळकर व भोसले यांच्याही फौजा तयार होऊन गेल्या. तों त्यांची गांठ पडली. त्यांचें बाहेर बुनगें चाललें होतें तों आम्हीं जाऊन पुढें उभे राहिलों. शिंदे आमच्या डाव्या बाजूस होते. इतक्यांत दोन प्रहराच्या सुमारास नबाबाकडील भारामल व असदअलीखान वगैरे सरदार आघाडीचे चालणार आह्मा-वरी चालून आले. त्यांची व आमची झटापट जाली. मला उजव्रे बाहुट्यावर व कपाळास तरवारीची जखम लागली. अगोदर दोन वार पट्ट्यावरील तटले. खोवळा पट्ट्याचा तुटला आहे. चिरंजीव राजश्री जनोबा सुभेदार यांस डाव्या हातावर, जखम आहे. चिरंजीव विठ्ठल-

राव घोंडदेव गोळी लागून ठार जाहले. ईश्वरी-इच्छेस इलाज काय ? चिरंजीव सरकारकामास आला. वृद्धापकाळीं ती. रा. आपा यांस दुःख झालें. होणारास उपाय नाहीं. माझी जखम हलकी आहे. काल रात्रीस बुनग्यांत येऊन जखम टांक्यानें शिवून शेकविली. आज प्रातःकाळीं सडे स्वारींत आलों. इतक्यांत बातमी आली जे, खासा नवाब मोहरीचा घांट चढून मध्यरात्रीस गेला. त्याजवरोन फिरोन सरकारच्या फौजा पाठीमागें गेल्या आहेत. बुनगें लुटलें. कालच्या लढाईची शर्थ जाली. प्रहर दिवसापासून हिरिंग्या तिकडील व इकडील होत होत्या. त्याचा विस्तार मागाहून लिहून पाठवूं. वरकड सारी मंडळी खैर आहे. चिरंजीव आपा, बाबा सारी मंडळी फौजा घेऊन गेले आहेत. चिरंजीव रा. सदाशिवभाऊ याचीहीं भाल्याची जखम आहे. चिरंजीव रा. सदोबा जोशी यासही जखम लागली आहे. आणि बहुत जखमी जाहले. नबाबाकडील फौजेचा मोड जाहला. रात्रीसच खासा नवाब मोहरीचा घांट चढले म्हणोन बातमी आहे. फौजा आज पाठीस लागल्या आहेत. बुनग्यास मोड ( ? ) लागले. लूट येत आहे. चिंतामणभट खाडिलकर ठार जाहला. अस्थि मागाहून लावून देतों.

अस्थि लावून दिल्या. लढाई मोठी शर्तेची जाहली. श्रीमंतांचें पुण्य विचित्र. मोठें यश आलें. नबाबाची दौलत गारद व्हावयाचा रंग आहे. श्री इच्छेरूप घडेल तें खरें ! नबाबाकडील भारामल व रादानखान व वजीरखान वगैरे पांच सात सरदार ठार पडले व हजार पावेतों माणूस कामास आलें. याउपर कांहीं बाकी नाहीं. रवाना २० साबान खमस तिसैन. ”

हरिभटबावांच्या पुण्यप्रभावानें त्यांच्या कुळांत महा शौर्यवान व धैर्यवान असे प्रख्यात वीर पुरुष उत्पन्न झाले होते. अशा पराक्रमाचा विठ्ठलराव ठार झाल्यावर तो पठाणी सरदार भाऊसाहेबावर चालून गेला. तो पठाण वेगानें घोडा उडवीत पालखीजवळ येऊन त्यानें

भाऊंच्या कपाळावर निसटता वार करून जो दुसरा वार करण्यास हात उचलिला तों विनोबाआबांनीं आपल्या पट्टयानें त्याचा तो हात तरवारीसह तोडून खालीं पाडिला. नंतर भाऊसाहेबांचे द्वितीय पुत्र हरिपंतबाबा वगैरेंनीं त्यावर हल्ला करून त्या पठाणी सरदारास ठार केलें. हें त्या पठाणी स्वारांनीं पाहून भयानें पळ काढिला. मग विनोबाआबांनीं भाऊसाहेबांस आपल्या लष्करांत पाठवून देऊन आपण विठ्ठलराव रणांत जेथें पडला होता तेथें जाऊन त्यास पाहिलें, तों पूर्वी ज्या हातांत सुवर्णाचें कडें होतें, त्या डाव्या हाताचा पंजा गंठेचोरानें तोडून कडें नेलें होतें. पुढें त्याच्या कमरेस घोड्यावरील काढणीचा फास घालून त्याला आपल्या घोड्यावर घेऊन आपल्या लष्कराजवळ येऊन त्याचें दहन केलें, आणि त्याच्या अस्थि ब्राह्मणाबरोबर मिरजेस पाठवून दिल्या. त्या विठ्ठलरावाच्या पत्नीनें पाहतांच आपले पती रणांत पडून स्वर्गास गेले तर त्याबरोबर आपणही तेथें जाऊन स्वर्गसुख भोगावें या इच्छेनें त्या अस्थींशीं सहगमन केलें. त्या वीर पत्नीचा संतोष व धैर्य पाहून सर्व लोक त्या माउलीचे गुणानुवाद गाऊं लागले.

खड्र्याचे लढाईंत निजामाचा पूर्ण पराभव झाल्यामुळें निजामानें पूर्वी देणें असलेला व फौजेस झालेला खर्च चुकता करण्याकरितां आपला मुलुख लावून दिला. आणि खटला उपस्थित करणारा मश्रुउलमुल्क यांस पेशव्यांचे ताब्यांत दिलें. या लढाईंत ज्यांनीं ज्यांनीं पराक्रम केला त्यांना त्यांना कोणांस वस्त्रें, कोणांस गांवें, कोणांस देणग्या वगैरे देऊन संतुष्ट केलें. परंतु विनोबाआबांनीं वस्त्रें न घेतां मी मागेन ती वस्तू अल्पमोलाची श्रीमंतांनीं आपल्या हातून मला द्यावी, असें म्हणतांच काय पाहिजे तें सांगावें असें नानांनीं म्हटल्यावरून विनोबाआबा म्हणाले, श्रीमंतांचे हातांतील शेला त्यांनीं उठून माझ्या अंगावर घालावा. असें म्हणतांच फडणविसांनीं तें अमान्य करून कळविलें कीं, अशा सभेंत खुद्द श्रीमंतांनीं उठून आपलें वस्त्र

आपल्या हातून कोणासही दिलें नाहीं. सबब दुसरें कांहीं हत्ती, घोडे अगर गांवही मागावें. हें भाऊसाहेबांनीं श्रवण करून नानांस ह्मणाले, हत्ती, घोडे व गांव बहुत आहेत; परंतु शूर पुरुषाचे इच्छे-प्रमाणें देणें हाच मान. भाऊसाहेबांची मर्जी जात चालली, असें समजून नानांनीं श्रीमंतांच्या हातांत शेला दिला. तों श्रीमंतांनीं उठून तो शेला विनोबाआबाचे अंगावर घातला. नंतर विठ्ठलरावबाबा पट-वर्धन यांनीं या लढाईंत शौर्याचीं कामें बहुत करून शेवटीं आपणही ठार जाले, यामुळें नानांनीं श्रीमंतांकडून, त्यांचे वडील धोंडो भास्कर पटवर्धन यांस दरसाल दोन हजार रुपये बक्षीस देण्याचा ठराव केला. तो पुढें बहुत वर्षें चालत होता व विनोबाआबांस मिळालेला शेला अद्यापि त्यांच्या वंशजांकडे ( श्रीमंतांचा शेला ) अशा पूज्य-बुद्धीनें ठेविलेला आहे.

श्रीमंत सवाई माधवराव यांच्या कारकीर्दीनंतर पेशवेपदाचा औरसपणानें हक्कदार बाजीराव रघुनाथ होता हें जरी खरें तरी रघुनाथरावांनीं प्रत्यक्ष पुतण्याचा " नारायणराव पेशवे यांचा " खून करविल्यामुळें, रघुनाथरावाच्या वंशजास पेशवेपदाचीं वस्त्रें न देतां, नमस्कारही कोणी करूं नये असें ज्या मुत्सद्यांचें ठरलेलें होतें; त्यांत नाना फडणवीस व परशरामभाऊ हेही होते. सवाई माधव-राव यांच्या मागून पेशवेपदावर चिमाजीआपास योग्य ठरवून त्यांस शिंदे, होळकर वगैरे सर्वांच्या विचारें परशरामभाऊंनीं जिवापाड परिश्रम घेऊन साताराच्या महाराजांकडून पेशवाईचीं वस्त्रें देवविलीं. परशरामभाऊसारखा अद्वितीय पराक्रमी योद्धा समशेरीच्या जोरा-वर श्रीमंत चिमाजीआपा पेशवे यांचें रक्षण करण्यास समर्थ असतां राजकारणांत मोठे कुशल ह्मणून नांवाजलेल्या नाना फडणविसांची बुद्धी भ्रष्ट झाल्यामुळें ह्मणा ! अगर पुढें होणारे भवितव्यतेमुळें ह्मणा ! ! बुद्धिभ्रष्ट नानाफडणविसानें बाजीराव रघुनाथ याचा पक्ष स्वीकारून परशरामभाऊस कैद करविलें. आणि बाजीराव रघुनाथ

यांस पेशवेपदाचीं वस्त्रें देवविलीं. परंतु लेखणीबहादूर नाना फडणवीस व श्रीमंत बाजीराव यांच्या हातून राज्याचा बंदोबस्त होण्याऐवजीं अत्यंत बेबनशाही मात्र सुरू झाली. हें सर्व श्रीमंतांच्या लक्षांत आलें; आणि श्रीमंतांनीं परशरामभाऊस मांडवगणच्या प्रतिबंधांतून मुक्त करून त्यांस, सातारकर महाराजांच्या आश्रयानें चतुरसिंगानें बंड केलें, तें बंड मोडण्याविषयीं आज्ञा केली. नंतर भाऊसाहेबांनीं आपल्याबरोबर प्रतिबंधांत असलेले विनोबाआबांच्या विचारें फौज जमा करून ते साताऱ्च्या मार्गावर चालू झाले. त्यावेळीं एक मुक्कामावर जाऊन स्वस्थपणें आपली पुन्हा हजारों फौज जमलेली पाहून विस्मयानें विनोबाआबा ह्मणतात, अहो भाऊसाहेब, काय कालमहिमा पहा, तुह्मीं प्रतिबंधांत असतां आपला प्राणत्याग करावा ह्मणून वारंवार वेगानें उटत होता. परंतु त्यावेळीं मी तुह्मांस असें करूं नका, आमच्या हरिभटबावांच्या पुण्यानें हा प्रतिबंध स्वल्प काळांत जाऊन पुन्हा आपल्या इच्छेप्रमाणें सर्व होणार, असें ह्मणत होतों; तो दिवस आज आला पहा. असें सर्व मंडळींत प्रसिद्धपणें विनोबाआबा बोलतांच भाऊसाहेबांना सर्व पूर्वस्मरण होऊन पुढें त्यांनीं सर्व मंडळीसह मोठ्या उत्साहानें श्रीगजाननाची गर्जना करून साखरा वाटल्या व कांहीं देकारही केला. नंतर सर्व फौजेसह पुढें जात असतां चतुरसिंगाची गांठ पडून युद्ध सुरू झालें. त्यांत शत्रूचा पराजय होऊन तो पळत असतां विनोबाआबा व विठ्ठलराबाबा यादवाडकर वगैरेंनीं हल्ला करून त्या चतुरसिंगास पकडला आणि त्याच्या फौजेची लूट करून साताऱ्यावर गेले. तेथें थोडें युद्ध होऊन पुढें गांवांत शिरून लूट केलेल्या द्रव्यादि लाभानें सर्वांचे कष्ट दूर झाले. भाऊसाहेबांनीं त्या चतुरसिंगास व त्याला आश्रय देणाऱ्यांस श्रीमंतांकडे पाठवून आपण करवीरकरांचें पारिपत्य करण्यास निघाले तों शत्रूच्या कोणी हितकर्त्या जादुगारानें भाऊसाहेबांच्या कपाळीं विभुती लावून लागलीच तो परत करवीरास

गेला. पुढें कांहीं वेळ गेल्यावर भाऊसाहेबांच्या बुद्धीस कांहीं भ्रम पडत चालला. तो भ्रम उत्तरोत्तर जास्तच वाढत गेला. परंतु त्या भ्रमांतही ते " करवीर सर्व बेचिराक करितों " अशी गर्जना करीत असत. पुढें कोल्हापूरच्या आसपासचे गांव आपल्या अमलांत घेऊन पट्टणकुडीवर येऊन तळ दिला. हे करवीरकरांनीं पाहून तेही तयार होऊन आले. नंतर भाऊसाहेबांचे चिरंजीव रामचंद्रआपा, हरिपंत-बाबा व माधवरावदाजीसाहेब यांनीं निरनिराळ्या तीन टोळ्या करून तिन्हीकडून ते करवीरकरांच्या सैन्यावर चालून गेले. पुढें परस्परांचें युद्ध होऊन करवीरकरांनीं पळ काढला. ते तिघे बंधू त्यांचा पाठलाग करून त्या करवीरकरांचा संहार करूं लागले. इकडे परशरामभाऊ आपले गोटांत असून सोंगट्यांचा डाव चालू केला होता, हें विनोबाआबांनीं पाहून भाऊंस बहुत निष्ठुर भाषणें करून डाव मोडून त्यांस शत्रूचें सैन्य जवळ आल्याचें कळ-विलें. व ते भ्रमिष्ट असल्यामुळें त्यांस उठवून घोड्यावर बसविलें व पट्टा हातीं चढवून म्यान काढून घेतलें. आणि त्यांस शत्रूवर हल्ला करण्यास सुचविलें. तों इतक्यांत शत्रूकडील सन्य पळ काढीत काढीत या गोटावर आलें तों भाऊसाहेब तेथें असून त्यांचा समुदायही अगदीं थोडा असें समजून ते लोक त्यांच्या अंगावर आले. हें विनोबाआबांनीं पाहून भाऊसाहेबांस मागें करून आपण त्यांचे संरक्षणाकरितां पुढें झाले आणि जो जो पुढें येई त्यास ठार करूं लागले. त्यावेळीं विनोबाआबांनीं आपल्या अंगीं असलेल्या युद्धचातुर्यें करून आपणांस हत्यार न लागूं देतां शत्रूवर सारखें हत्यार चालवीत होते. याप्रमाणें सारखें युद्ध चालल्यामुळें करवीरकरांस भाऊसाहेबांवर जाण्यास मार्ग मिळेना. ह्मणून सर्वांनीं एकदम विनोबा-आबावर हत्यार चालविलें. विनोबाच्या अंगावर सत्तावीस हत्या-रांचे वार झाले. तरी तितकेही वार सहन करून धांवत जाऊन गायकवाड सरदाराच्या बाहूवर पट्टा मारिला, हें पाहून शत्रूकडील

एकानें जो तोंडावर वार केला त्या वाराच्या योगानें विनोबा-आबांची हनवटी ओठासुद्धां तुटून लोंबूं लागली व त्यायोगानें मूर्च्छा येऊनही हातांतील पट्टा न सोडतां ते जमिनीवर पडले. हें त्या गायकवाड वगैरेंनीं पाहूनही त्या विनोबाआबाजवळ कोणी जाईनात. कारण, जवळ जातांच कदाचित् उठून मारील कीं काय, असें त्यांस वाटलें. इकडे परशरामभाऊंनीं हें सर्व समजून आलां विनोबाआबा-प्रमाणें आपणही शत्रूंवर जाऊन त्यास मारूं अगर परलोकास जाऊं, असें जवळ असलेल्यांशीं बोलून ते पुढें घोडा उडवीत निघाले तों बुद्धीस भ्रम झाल्यामुळें युद्ध चातुर्यानें होईना. सबब शत्रूंनीं चोहोंकडून हल्ला करून तलवारीचे वार करून घोड्यावरून खालीं पाडिलें. इतक्यांत एका सरदारानें परशरामभाऊस आपल्यापुढें घेऊन कोल्हापुराकडे निघाला. हें त्या गायकवाडानें पाहून तो मोठ्या क्रोधानें त्याला रागें भरून ह्मणाला, अरे, ह्या भाऊनें आह्मांस डोळेभर झोंपसुद्धां येऊं दिली नाहीं. याला जर तूं जिवंत ठेविलेंस तर पुन्हां हा आह्मांस पीडा देईलच. तर तूं याला घोड्यावरून खालीं टाक. तसें तूं न करशील तर त्या भाऊबरोबर मी तुलाही ठार मारितों. असें ह्मणून त्यानें तरवार उगारली. त्याबरोबर भाऊंस खालीं टाकून तो सरदार पळाला. घोड्यावरून खालीं उतरून त्या गायकवाडानें बेशुद्ध असलेल्या भाऊसाहेबांवर तरवारीचे घाव मारून तुकडे तुकडे करून तो तेथून लगबगीनें पळून गेला. हा युद्धप्रसंग शके १७२१ भाद्रपद वद्य ४ दिवशीं सायंकाळीं झाल्यामुळें लगेच काळोख पडला. ज्या गायकवाडानें हें अमानुष कृत्य केलें; त्यास जातिवंत मराठा ह्मणणें शक्यच नाहीं. कारण, जातिवंत मराठा जो असतो तो बेशुद्ध झालेल्या शत्रूंस फार झाले तर धरून नेईल; परंतु त्यांस ठार मारून तुकडे तुकडे कधींच करणार नाहीं. हें अधम कृत्य होय.

चंद्रोदय झाल्यावर त्या शीतळ चंद्रकिरणांनीं विनोबाची मूर्च्छा दूर होऊन ते सावध झाल्यावर चहूंकडे पाहूं लागले तों सर्व

प्रेतमय पाहून ते आपल्या अंगावरील अठ्ठावीस जखमांची पीडा सहन करीत सहा कोसांवर शितोळ्याचे मांजरास आले. तों सूर्योदय झाला. प्रातःकाळीं गांवांतील लोक देवीच्या दर्शनास जात असतां विनोबाची स्थिती पाहून त्यांनीं लगेंच त्यास पालखींत घालून मिरजेस पाठवून दिलें. इकडे रामचंद्रपंत आपासाहेब वगैरे बंधू शत्रूचा पराजय करून परत गोटाकडे आले. तों भाऊसाहेबांना ठार केल्याचें व नारो हरि करंदीकर यांनीं दहन केल्याचें ऐकून तेथून निघोन त्यांनीं भिलवडीवर दशांत कर्म केलें. त्या वेळीं पिंडास काकस्पर्श होईना, ह्याकरितां आपांस बहुत विचार पडून ते वेळीं त्यांनीं असा उद्गार काढिला कीं, " भाऊसाहेब व विनोबा यांवर ज्या ज्या हरामखोरांनीं हत्यारें चालविलीं त्यांचा आजपासून सहा महिन्यांचे आंत शिरच्छेद करीन. " अशी प्रसिद्धपणें प्रतिज्ञा करून उदक सोडतांच कावळ्यांनीं पिंडास स्पर्श केला, हें सर्वांनीं पाहून बहुत आश्चर्य केलें.

पुढें सर्व उत्तरक्रिया आटपल्यावर आपासाहेबांनीं आपल्या थोडक्याशा फौजेनिशीं वारंवार त्या गायकवाड वगैरे मंडळीस धरण्याविषयीं यत्न चालू केला. शत्रू छपून कोल्हापूरकराजवळच असे, सबब हातीं लागेना. पुढें कांहीं महिन्यांनीं आपासाहेबांनीं तिंग्याकडील पलटणी लोक मदतीस घेऊन ते आपल्या सर्व फौजेसह कोल्हापूरकरांवर चालून गेले, तों इकडे राजाही आपल्या जमावानिशीं पुढें आला. हें आपासाहेबांनीं पाहून आपल्या सैन्याच्या दोन टोळ्या व पलटणी लोकांची एक टोळी अशा तीन टोळ्या करून त्या राजसैन्यास तिन्हीकडून एकदम मारूं लागले. त्यांत आपांनीं विनोबाआबा पटवर्धन यांचे चिरंजीव गणपतराव विनायक यांस एका टोळीवर मुख्य नेमून त्यांस शत्रूकडील तोफा चालू आहेत त्यांवर तुह्मी हल्ला करून तोफांचा गोळा बंद करावात असें सांगितलें होतें. तें गणपतराव यांनीं मान्य करून शौर्यानें असें काम केलें कीं, शत्रूकडील आलेला तोफेचा गोळा चुकवून दुसरा गोळा अंगावर येण्याच्या

पूर्वी वेगानें घोडा उडवून तोफेवरचा गोलंदाज ठार मारावा. असें वारंवार केल्यानें त्या वेळीं तोफांचे आवाज बंद झाले. हें महत्त्वाचें काम केल्याचें आपासाहेबांनीं पाहून बहुत संतोषानें त्याच वेळेस त्या गणपतरावास पुढें बोलावून शाबास असा संतोषार्थ शब्द करून, तुला हें घे, असें म्हणून तैनातजाबत्याची याद हवालीं केली. त्यांतील मुख्य कलमें, करवीर येथील मजमु असामी तैनात जातीस दरसाल भोजनखर्च माणसें इतमाम वगैरे कलमें असलेली याद हातीं देऊन असें सांगितलें कीं, आह्मी करवीरांत गेलों ह्मणजे याहूनही बक्षिस जास्त मिळेल. सदर तैनातजाबत्याची याद आज हजर आहे. पुढें थोड्याच वेळांत आपासाहेबांकडील लोकांचा मारा त्या राजास सोसेनासा झाल्यामुळें तो राजा त्या गायकवाड वगैरे अपराधी मंडळींसह पळून पन्हाळगडावर गेला. राजाच्या फौजेचा मोड करून युद्ध संपवून आपासाहेब आपले गोटांत गेले. तों दिवस शिवरात्रीचा असल्यामुळें उपोषण शिवपूजादि करून मग चिंतन करूं लागले कीं, मी सहा महिन्यांत त्या गायकवाडाचा शिरच्छेद करीन ! असी मीं प्रतिज्ञा केली आहे. तो दिवस पूर्ण होण्यास आला. आतां या संकटांतून मी कसा पार होईन ! असें चिंतन होऊन प्रसिद्धपणें मंडळींशींही हेंच बोलत असतां सर्वांनीं असे शब्द केले कीं, आपले मूळपुरुष जे हरिभटबावा त्यांच्या पुण्यप्रभावानें ही संपत्ती आली; तस्मात् त्या हरिभटबावासच ही विनंति करूं ! असें बोलून सर्वेही त्या साक्षात् गणेशरूप हरिभटबावांचे गुणानुवाद करीत करीत आह्मांस या संकटांतून पार करावें, तसें न केल्यास आमरण तुमचे बालकाची अपकीर्ति होणार आहे. असें सप्रेम स्तवन करीत असतां तेथें असा चमत्कार झाला कीं, आपासाहेबांच्या बातमीदाराच्या रूपानें कोणी पुरुष आपासाहेबांपुढें येऊन त्यानें असें कळविलें कीं, या वेळीं राजा आपल्या अपराधी मनुष्यासह गडावर असून तेथें याच वेळीं त्वरा करून आपण आल्यास शत्रू सांपडणार. अशी बातमी ऐकतांच,

त्या बातमीबद्दल भरंवसा वाटून ते आपल्या सडे मंडळी निशीं खुद्द निघाले. त्यास गडावर जाण्याचा गुप्त मार्ग दाखविण्यास तो सदर बातमीदार पुढें चालूं लागला. पुढें आपासाहेब गडावर जाऊन, त्यांनीं दरवाजाजवळ आपले कांहीं लोक ठेविले. कांहीं तटावर चढविले आणि सर्वांनीं एकदम बंदुकीचा आवाज केला; आणि अशी आरोळी केली कीं, कोण युद्ध करण्यास समर्थ नसतील त्यांनीं लुगडीं नेसून दरवाजाबाहेर व्हावें, त्याला आम्ही धरणार नाहीं. हें ऐकून शत्रूकडील लोक लुगडीं नेसून बाहेर जाऊं लागले. राजाही वेषांतर करून जात असतां, त्याला गणपतराव विनायक वगैरेनीं पाहूनही आपासाहेबांची धरण्याबद्दल आज्ञा नसल्यामुळें त्यांनीं दुर्लक्ष केलें. तो अपराधी गायकवाडही वेषांतर करून बाहेर जात असतां, गणपतरावांनीं त्यांस ओळखिलें व त्या हरामखोरास दरवाजांतच पकडून हात बांधून गडावरून खालीं आपल्या सैन्यांत नेलें. नंतर गडावर कांहीं लपून राहिलेले अपराधी लोकांस पकडून त्यांचे हात बांधून त्यांस आपले गोटांत आणिलें. मग त्या गडाची लूट करून आपासाहेबही गोटांत आले. नंतर त्या अपराधी लोकांची दावण बांधून ज्यांनीं ज्यांनीं भाऊसाहेब व विनोबा यांच्या ज्या ज्या अवयवांवर हत्यारें चालविलीं होतीं; त्यांचे ते ते अवयव छेदून शेवटीं शिरच्छेद करून सर्व मंडळीसह ते शिवरात्रीचें पारणें करण्यास उठून गेले. नंतर हरिभटबावांचे प्रसादें आज मी शत्रूंचा शिरच्छेद करून केलेल्या प्रतिज्ञेंतून पार झालों, असें बोलत आपासाहेबांनीं मंडळींसह भोजन करून ते स्वस्थ बसले असतां, इकडे करवीरकरानें शिंद्याकडील पलटणी लोकांस आपासाहेबांस मदत न करण्याविषयीं कांहीं द्रव्य देऊन फितविलें. ही खबर आपासाहेबांस समजतांच ते आपल्या लष्करासह कूच करून मिरजेस आले. एकोप्यानें व एकासंघानें वागा हा हरिभटबावांचा उपदेश स्मरून विनोबाआबांजवळ येऊन करवीरा-

वरील स्वारीचें वर्तमान निवेदन करून, हरिभटबावांच्या कृपेनें मी सत्यप्रतिज्ञ झालों असें सांगून आपण तासगावांस घरीं गेले.

परशरामभाऊंचे चुलत बंधू हरबाआण्णा हे तोतयाच्या पक्षास सामील झाले होते; ह्मणून श्रीमंतांची गैरमर्जी झाली होती. परशरामभाऊ यांचे बंधू ह्मगूनच हे शिक्षेच्या तडाक्यांत सांपडले नाहींत. तरीपण या योगानें उत्तरोत्तर दरबारांत भाऊसाहेबांचें महत्व कमी झालें, हें भाऊसाहेबांनीं समजून विनोबाआबा वगैरेंशीं बोलत कीं, हरबाआण्णा चातुर्यानें दरबारीं राहून एकोप्यानें वागते तर किती उत्तम झालें असतें! असो, दैववशात् भाऊसाहेबांस शत्रूंवर जाण्याची कामगिरी आली त्यावेळीं श्रीमंतांस अशी विनंती केली कीं, मला कामगिरी बजावण्याची शक्ती नाहीं. कारण, मी आपले बंधूचे सहाय्यानें सर्व सरकारी कामें चालवीत असे. जर सरकारांतून हरबाआण्णांस अभय मिळालें तर मी त्यांसह कामगिरीवर जाईन. श्रीमंतांकडून अभय घेऊन भाऊसाहेबांनीं हरबाआण्णांसह कामगिरी बजाविली. हरिभटबावांचा एकोप्याविषयीं जो पुत्रास पूर्वीं हितोपदेश झाला तो पुढें त्यांचे प्रपौत्र ह्मणजे नातूही मनांत वागवीत. त्यांतील एक उदाहरण लिहितों. बाजीराव रघुनाथ पेशव्यांचे वेळेस रामचंद्रपंत आपासाहेब तासगांवकर याविषयीं श्रीमंतांचे मनांत असें आलें कीं, परशरामभाऊंनीं आपल्यास गादीवर न बसवितां, चिमाजीआपास बसविलें. त्याचा हा पुत्र असल्यावरून यापासून आपलें हित होणार नाहीं, सबब यांस कैद करून ठेवावें. परंतु या पटवर्धन घराण्यांत एकोपा विशेष आहे. हा बेत सिद्धीस जाण्यास प्रथम त्यांच्यांत भेद केला पाहिजे आणि मग कैद करण्याचें काम करावें, असें अमृतरावसाहेब वगैरेंच्या विचारें ठरून चिंतामणराव पांडुरंग पटवर्धन सांगलीकर यांस प्रेमानें आपले क्रीडामंडळींत घेऊन नंतर कांहीं दिवसांनीं प्रातःकाळीं रामचंद्रपंतआपांस सडें जरूर भेटून जावें ह्मणून आज्ञा-

पत्र पाठविलें. तें येतांच ठरल्याप्रमाणें अमृतरावांनीं कैद करण्याची व्यवस्था करावी. आज्ञापत्राप्रमाणें आपासाहेब श्रीविघ्नहर्त्या गजाननास वंदन करून विनोबास व इतर शूर मंडळीस बरोबर घेऊन पुण्यास जाण्यास निघाले. चिंतामणरावआपासाहेब यांनीं गुप्त बातमीदाराकडून श्रीमंतांनीं केलेली मसलत समजून घेऊन, आज रामचंद्रपंतास कैद तर उद्यां आह्मांसही तेंच ! तरी या गोष्टीची उपेक्षा न करितां, त्यांच्या सहाय्यार्थ आपणांस पुण्यास गेलेंच पाहिजे. असें मनांत आणून, पूर्वजांनीं केलेल्या उपदेशाप्रमाणें वागावें असें निश्चित करून, पांचशें स्वारांनिशीं दौड चाल करून एकदम श्रीमंतांच्या वाड्यासभोंवतीं वेढा घालून उभें राहिले. त्यापूर्वींच रामचंद्रपंत आपा श्रीमंतांबरोबर बोलत बसले होते. आतां कैदेची इशारत होणार ! तों इकडे स्वारांस सांगलीकरांनीं सरबत्तीचा इशारा केला. आणि त्याप्रमाणें बंदुकांचे आवाज श्रीमंतांच्या कानीं पडतांच त्यांस भय वाटून त्यांनीं सेवकांस विचारलें, हे बार कोणीं केले. तेव्हां सेवकानें चौकशी करून सांगितलें कीं, सांगलीकरांनीं वाड्यासभोंवार गराडा देऊन बंदुकी झाडल्या. हें ऐकून श्रीमंत ह्मणतात; अरे, त्याला येण्याची आज्ञा नसून तो कायनिमित्त येथें आला ? तेव्हां सेवक ह्मणाला, सरकारांनीं रामचंद्रआपांस सडे बोलाविल्यामुळें, त्याची पाठराखण करण्यास सांगलीकर स्वतः आले. हें ऐकून श्रीमंतांनीं लगेच रामचंद्रआपास जाण्याविषयीं विडा देऊन, सांगलीकरांस आवाज बंद करून आपल्याकडे येण्याची आज्ञा केली. तुह्मी आज्ञेशिवाय कां आलांत ? हे श्रीमंतांचे शब्द ऐकतांच सांगलीकर ह्मणाले, आमच्या बंधूस सडे येण्याविषयीं आज्ञा झाली ह्मणून, वेळ बरी वाईट असते सबब त्याच्या रक्षणार्थ आम्ही आलों. तेव्हां श्रीमंत ह्मणाले, तुह्मी विभक्त आहांत ना ? सांगलीकरांनीं सांगितलें, आम्हीं आपापले स्त्रियांचे मात्र विभक्त; परंतु सरकारचाकरीस सर्व

एकत्रच. हें ऐकून श्रीमंतांनीं विचार केला कीं, हरिभटबावांचा उपदेश अद्यापपावेतों या पटवर्धनांच्या हृदयांत जागृत आहे.

श्रीमंत बाजीराव पेशवे सर्व राज्य सोडून उत्तर हिंदुस्तानांत गेल्यावर, इकडील संस्थानिकांनीं कंपनीसरकारांशीं तहनामे करून ते त्यांच्या आश्रयानें वागूं लागले. त्याप्रमाणें सांगलीकर मात्र वागेनात. " सर्व संस्थानिक जर एकविचारें वागते, तर कांहीं निराळेंच स्वरूप आलें असतें. " हें केव्हांही सत्य आहे कीं, आपसांत तंटा तिसऱ्यांस फायदा ! ! शेवटीं सर्वांनीं तह केल्यावर सांगलीकरांसही तह करणें भाग पाडलें. आपण श्रीमंतांचे चाकर हा अभिमान मोठा ह्मणून इतर संस्थानिकांप्रमाणें सांगलीकर वागले नाहींत. पुढें कांहीं दिवस गेल्यावर, कंपनीसरकारांतून पलटणी, तोफा व स्वार घेऊन एक साहेब सांगलीनजीक हरिपूरच्या बागेंत उतरला. त्यानें आपासाहेबास सांगून पाठविलें कीं, " उदईक दोन प्रहर दिवसांपूर्वीं आपण तहनाम्यानें वागण्यास कबूल व्हावें. तसें न झाल्यास पुढें युद्ध चालूं होईल. " असें पत्र चिंतामणरावआपासाहेबाकडे येतांच ते पराक्रमी व शूर असल्यामुळें, त्यांनींही युद्धाची तयारी चालविली. सर्व संस्थानिक कंपनीसरकारच्या बाजूचे, तेव्हां अशावेळीं हे एकटे काय करणार? परंतु " सुंब जळलें तरी पीळ जळत नाहीं. " अशी ह्मण आहे. पत्र पाहतांच आपासाहेबास अत्यंत क्रोध येऊन त्यांनीं लढाईची तयारी केली. मुख्य कारभारी मोरोपंत कुंटे व अंताजीपंत कानिटकर हे उभयतां मिळून आपासाहेबांस सांगूं लागले कीं, अशा वेळीं लढाई करणें फार दुःखद होणार. या सांगण्याचा कांहीं उपयोग होईना. तेव्हां मिरजेस जाऊन विनायक भास्कर ऊर्फ विनोबाआबा यांचेजवळ येऊन सर्व हकीकत कळविली. कारभाऱ्यांचें बोलणें ऐकून आबा मोठ्या घाईनें घोड्यावर बसोन निघाले. सांगलीचे वाड्यांत कारभाऱ्यांसह विनोबा आल्याचें ऐकून, आपासाहेब सामोरे गेले, आणि सर्व लढाईची तयारी केलेली सांगूं लागले. तों विनोबा ह्मणाले,

अहो, ही वेळ कशी आहे हें तुह्मी समजत नाहीं काय ? तें एको-प्यानें वागणारें कंपनीसरकार, त्यांशीं स्नेहानें वागणें हेंच या वेळचें कर्तव्य. मी सांगतों त्याप्रमाणें मान्य केलेंच पाहिजे. कारभारी कानिटकर व कुंटे यांस आपासाहेबांजवळील हत्यारें दूर करण्यास सांगून आह्मी तहनाम्यास खूष आहों असें साहेबांस कळविण्यासही सांगितलें. शूर अनुभवी अशा विनोबाआबापुढें आपासाहेबांचे कांहीं चालेना. मात्र इतरांप्रमाणें पदरीं स्वार ठेवून ह्मणाल तेव्हां चाकरी करूं ! हें मात्र आपासाहेबांनीं मान्य केलें नाहीं. आपल्या मुलुखांपैकीं हुबळी तालुका चाकरीच्या खर्चाकरितां कायमचा देऊन टाकला. प्रसंगीं विनोबांनीं सहाय्य केल्याचें स्मरण आपासाहेब वरचेवर करीत असत. विनोबाचे चौघा पुत्रांपैकीं तिसरे कृष्णराव, चवथे पुरुषोत्तमराव या प्रत्येकास इतमामखुद्धां हजार रुपयांचें वेतन देऊन त्यांनीं आपल्याजवळ ठेवून घेतलें. नारायणराव व गणपतराव यांजवर व त्यांचे संततीवरही ते आपल्या घरच्या मनुष्याप्रमाणें प्रेम ठेवीत. असें कागदपत्रांवरून स्पष्ट दिसतें. त्या कागदांतील एका कागदाचा उतारा असा कीं, राजश्री आण्णाजी नरसिंह स्वामी गोसावी यांसी—सेवक चिंतामणराव पांडुरंग नमस्कार विनंति उपरी—तीर्थस्वरूप कैलासवासी विनोबाआबा यांचे नातू चिरंजीव राजश्री परशरामभाऊ यांस धारवाडास येण्याविषयीं चकती घेऊन सत्वर आले त्यावरून चिरंजीव तिकडे आले आहेत. कोणीं एखाद्यानें गैरवाका समजाविला असतां त्याविषयींचा मजकूर कसा आहे तो लिहून पाठवावा, ह्मणून लिहावें, तसें न होतां येण्याविषयीं चकती घेऊन स्वार आले, अशानें अब्रूवाल्याचा परिणाम कसा लागेल ? सदरहू विषयींचा दर्याप्त दिलांत आणावा, याविषयीं साहेबांजवळ बोलावें. चिरंजीवाची भेट करवून निरोप देववून पाठवावें. चिरंजीव व आम्ही दोन नाहींत. रवाना छ० २२ सफर सन सबासल्लासीन मयातैन बहुत काय लिहिणें हे विनंति.

पूर्वकाळीं हरिभटबावांनीं तीर्थयात्रेस जातेवेळीं पुत्रांस ईश्वरपदावर चित्त ठेवा व एकोप्यानें व एकसंघानें वागा असा जो उपदेश केला तो चिंतामणरावआपासाहेबांचे स्मरणांत चांगला वागत होता हें त्यांच्या श्रीगजाननस्तवनावरून स्पष्ट दिसतें.

---

# १ आंबेकर व मंगळवेढेकर पटवर्धन.

## प्रकरण ३ रें.

हरिभटबावांचे पहिले पुत्र कृष्णंभटबापा यांचे वंशज मंगळवेढें, आंबें व जमखिंडी येथें हल्लीं आहेत. त्यांची माहिती व मंगळवेढें दप्तरांतील अस्सल पत्रें:– श्रीगजानन महाराज सांगली यांस निरंतर त्रिनंति करण्याचीं कलमें, रा. आप्पाजी जिवाजी कुलकर्णी यांच्या जवळील कै० पांडुरंग गोविंद यांनीं पट्टणचे कैदेंतून गंगाधर गोविंद यांस पाठविलेली यादी व द्राविडीशास्त्रयानें पटवर्धनांचें शौर्य वर्णन केलेलें पत्र वगैरे पुढें देत आहे. अस्सल पत्रावर जे नंबर या लेखकानें घातले आहेत ते नंबर पुढील पत्रांवर दिले आहेत. कारण, अस्सल पत्र जर कोणाला पाहण्याची इच्छा झाली तर सदरहू नंबराप्रमाणें मंगळवेढें येथील दप्तरांत पाहण्यास मिळावें.

नं० ७ श्री.

विज्ञापना इकडील वर्तमान तरी श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब हे वैशाख शु॥ ४ सोमवारीं थेऊरचे मुक्कामीं शिंदे यांचे गोटांत गेले. तेथें शिंदे यांनीं आपले डेऱ्यांत ठेऊन घेतलें. समागमें राजश्री रघुनाथरावदादा कुरुंदवाडकर व राजश्री पांडुरंगरावबाबा बारामतीकर व मानाजी फाकडे व हिरोजीराव पाटणकर व मालोजी

घोरपडे वगैरे गेले होते. त्यांस दुसरे दिवशीं निरोप दिल्हा. आपले गोटांत आले. श्रीमंत व मानाजी फाकडे व पाटणकर ऐसे तेथें ठेवून घेतले. सभोंवतीं चौकी आहे. बाजीरावसाहेब शिंद्याचे डेऱ्यांत जातात. श्रीमंत राजश्री चिमाजीआपासाहेब यासी पुण्यास आणिलें. रास्ते यांचे वाड्यांत चार रोज ठेविलें होतें. गुरुवार सप्तमीस वाड्यांत वीस घटका रात्रीस आणिलें. चौकीचा वगैरे बंदोबस्त आहे. श्रीमंत राजश्री बाबासाहेब व जनोबा सुभेदार ( यादवाडकर ) हे नेहमीं वाड्यांत असतात. कोणी परवानगीखेरीज जावयाचें नाहीं. वैशाख शु॥ १० सोमवारीं पंतविधान व्हावयाचा मुहूर्त होता तो राहिला. पुढें वैशाख व॥ ५ चा नेमला आहे. पंतविधानास नानांनीं असावें असें बोलणें पडलें ह्मणोन मुहूर्त राहिला. शिंदे यासी ऐवज देऊं केला त्याचा फडशा व्हावा लागतो व नानाची व आपली निखालसता जाहाली × × × × त्यास त्यांनीं यावें येविशीं बोलणे जालें ह्मणोन मुहूर्त राहिला. राजश्री चिंतोपंत लिमये साताऱ्यास ऐवजाकरितां गेलेवर जाबसालास गेले आहेत. राजश्री रघुनाथरावदादा रुसोन कुरुंदवाडास गेले. भाऊंनीं हा मनसबा केला. आपल्यास कांहींच सांगितलें नाहीं याजमुळें निघोन गेले. दिवसेंदिवस मनसबा कठीण आहे. पुढें कसा प्रसंग पडेल तें न कळे. वैशाख शु॥ ५ दौलतराव शिंदे सरकारचे वाड्यांत आले होते. भाऊसाहेब यांनीं आपले वाड्यांत आणिलें. मेजवानी केली. तिसरे प्रहरीं फराळास बोलाविलें होतें. शंभर मराठे असामी फराळास होती. लष्कर भारी शेणवी मंडळी २०।२५ होती. दौलतराव यांसी पैठणी पोषाख व कंठी मोत्याची व शिरपेंच दिला; व बाळोबा पोतनीस यासी पोषाख व कंठी व शिरपेंच दिला. धोंडीबादादा यासी पोषाख व शिरपेंच दिला; व सदाशिव मल्हार यासी व जिवबादादाचे याचे पुत्र नारायणराव यासी शिरपेंच व पोषाख दिला. वगैरे ५।७ असामी कारभारी शेणवी यांसी वस्त्रें दिलीं. मराठे मंडळीस कांहीं दिलें

नाहीं. दौलतरावबाबास हत्ती व घोडा एक दिला. याप्रमाणें वर्तमान जालें. होळकराचे डेऱ्यास भाऊसाहेब गेले होते. त्यासही मेजवानी होणार आहे. रात्रंदिवस भाऊसाहेब यासी खलबतांमुळें निद्रा देखील नाहीं. मोठी मसलत आहे. श्री पार पाडून शेवटास जाईल तेव्हां खरें. राजश्री लक्ष्मणराव हरिपंततात्या फडके यांचे पुत्र त्याची स्त्री निवर्तली, पाच दिवस जाले. शिंदे शु॥ दशमी सोमवारीं थेऊराहून कुच करून पुण्यानजीक खडकीच्या पुलावर मुक्कामास आले. नारायणराव व जिवाजी एक कंपूचे पलटण घेऊन साताऱ्यांत नानाकडे वस्त्रें व नानास आणावयाकरितां जाणार. शिंदे भाऊसाहेबांच्या घरीं व सरकारवाड्यांत येऊन भाऊंची मेजवानी घेऊन पुलाजवळ मुक्कामास गेले. श्रीमंतांसही मुक्कामास आणिले आहेत. चौकी श्रीमंतांपाशीं आहे. पुढें कसा रंग पडता न कळे. तूर्तचे प्रसंगीं शिंदे यांचा जमाव मोठाच आहे: ते सांगतील त्याप्रमाणें वर्तणूक सर्वांनीं करावी लागते. भाऊस संकटच आहे. दाणे तीन पावणे तीन व कडबा पुले सात आठ पुले मिळतात. कधीं पांच रोजांत सहा रोजांत शिंदे यांची मात्र येती. वरकड लोक खरेदी करून आणितात. नाना येऊन शिंदे यांची भेट होऊन सरकारचा बंदोबस्त व्हावयाचा बहुत प्रयत्न आहे. ईश्वरकृपेंकरून यथास्थित होईल तो सुदीन असे. वरकड सर्व मंडळी लष्करांत. विठ्ठलरावबापू मात्र × × आले आहेत. दोन कोट रुपये यासी देऊं केले. पैकीं पाऊण कोट दिले. कळावें बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं० २३ श्री.

राजश्री दोनीकर जोडून सा. न. विज्ञापना. राजश्री नाना फडणीस वाईंत होते. ते सडे फौजेनिशी निघोन किल्ले रायगडास गेले. त्यांस आणावयाकरितां फौजा गेल्या होत्या. सांपडले नाहींत. रा. चिंतोपंत लिमये व विसाजीपंत गेले होते. जवळच होते. तत्रापि जातात हें वर्तमान समजलें नाहीं. विसाजीपंत सहस्रबुद्धे यासी रवाना

केलें होतें. समागमें हरबाआपा धायगुडे यांचे नि॥ लोक दिले होते. नानास बातमी कळली तेव्हां निघोन गेले. हें वर्तमान त्रिंबकराव परचुरे यांस समजतांच रविवारीं संध्याकाळचे प्रहर दिवसा दोघे बंधू दोन घोड्यावर बसोन पळोन गेले. हे बातमी भाऊसाहेबांस संध्याकाळीं दोन घटका दिवसास समजली. शोधास राऊत गेले. सांपडले नाहींत. नानाच्या वाड्यांत चौकी बसली. आबा रोळुकर वगैरे यांच्या घरीं चौक्या बसल्या. घाटोघाट चौक्या बसल्या. सध्याचे प्रसंगीं मोठा बखेडा जाला आहे. पुढें कसें होईल तें न कळे. वडिलीं सावधपणें असावें. श्रीमंत रा. भाऊसाहेब चिंतेंत आहेत. शिंद्रे कोडीकूर आहेत. रा. दाजीसाहेब तासगांवास गेले. स्त्रीस आठवा महिना गरोदर जाणोन गेले. आपली पागा, घोडी, बारगीर व रामचंद्रपंत वगैरे सुखरूप आहेत. श्रीमंत रा. भाऊसाहेबास विनंति केली, चार दिवस राहणें ह्मणून सांगितलें ह्मणोन राहिलों. आणखी विनंति करून काय ह्मणतील त्याअन्वयें वर्तणूक करीन. आपले कामास कोण वेळ लागली तें न कळे. हातास काम येतें तें नाहींसें होतें. तेव्हां योग चांगला नाहींसें दिसतें. छ. १ जिल्हेज बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं० ३६ श्री.

शेवेसी विनंति सेवक अंताजी रामचंद्र जोशी चरणावर मस्तक ठेवून सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ वैशाख व॥ ५ बुधवार. मुक्काम पुणें येथास्थित आसो वि. श्रीमंत राजश्री चिमाजीआपासाहेब यासी आज आठ घटका दिवसा सकाळचे श्रीमंत महाराज राजे यांचीं वस्त्रें जाहालीं. सिक्केकटार आली. नांव चिमणाजी माधवराव ठेविलें. लोकांनीं नजरा केल्या. चार ठिकाणीं वेगवेगळी कचेरीची बैठका केल्या होत्या. झाडून मानकरी वगैरे शिंदे होळकर सुद्धा आले होते. श्रीगणपती पुळे कोंकणांतील तेथें चौघडा देवास ठेविला. उपाधे यासी हजार रुपयेचा गांव इनाम करून दिल्हा. रा. राघोपंत थथे यासी पालखीचीं वस्त्रें दिल्हीं. शिंदे याणीं श्रीमंतांस विनंती केली

जे भाऊसाहेबांस भरजरी लगी द्यावी. त्याचीं वस्त्रें होतील. श्रीगणपतीनें यासमयीं भाऊसाहेबांस मोठें यश दिलें. श्रीमंतांचे पंत विश्वासाचे पालिग्रण रा. विठ्ठलराव गोळे यांणीं केलें. श्रीमंतांचा हात धरून मातुश्रीबाईसाहेबांचे हातावर उदक घातलें. याप्रमाणें वर्तमान जालें. वडिलास श्रुत व्हावें ह्मणून लि॥ आहे. बहुत काय लिहिणें हें विज्ञापना.

तिसरे प्रहरानंतर श्रीमंतांची स्वारी श्री देव पर्वतीस जाणार. रात्रौ वाड्यांत येणार ह्मणोन बोलणें आहे. मी येणार होतों. त्यास श्रीमंत तख्ती बसले. पुढें कसें होतें पाहून लिहून पाठवितों. आज्ञा होईल तैसी वर्तणूक करीन. हे विज्ञापना. दिवाणगिरीचीं वस्त्रें मोघम व पोतनिशीं व मुतालकीचीं ऐसी कोणास दिल्हीं नाहींत हे विज्ञापना.

शेवेसी धोंडो बापूजी व कृष्णाजी बापूजी जोशी सा. न. विज्ञापना. इकडील सविस्तर ती॥ राजश्री अंताजीपंत काकांनीं लि॥ आहे. काका मंगळवेढ्यास जाणार होते; परंतु राजश्री भाऊसाहेबांनीं तूर्त राहून घेतले आहेत. जेसी आज्ञा होईल तेसे निघोन येतील. सदैव पत्रीं सांभाळीत जावें बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

श्री.

विशेष अमित्र अतिप्रबळ होऊन सरकारच्या तेजःपुंज नक्षेची प्रभेची आंच येक दोन वेळा पोहोंचली. याचे विस्मृतींत जाणोन चढाव करून क्षुद्र बुद्धीनें आसरा पिछा करून मैदानप्रदेशीयांत फैलाव केला. यापूर्वी पट्टणचे सालीं सरकार व मोगलाई व इंग्रज तीन सुभे एकत्र होऊन दाब पोहोंचविला. त्या विद्यमानी नामूद करावयाचा समय प्राप्त जाला असतां शिवशाई सरकार आदालतीचा आणि युगांतराच्या ठाईं पांडवादी पुण्य श्लोक राजे यांणीं धर्मनीती करून राज्यभार केला. शत्रूंनीं आततांईपणा केला असतां जरवा दाखवून पादाक्रांत करावा. पुन्हा राज्यीं स्थापावें. हा मार्ग त्या युगाचे राजीयाचा ! येत निमित्या धर्म सेवेपरी त्याचा समर्पक न व्हावा. येत

कारणास्तव खंडणी घेऊन राज्याची मर्यादा करून कृपा प्रदर्शनांत आणिली असतां पुनःश्च शिलश्चभाव प्रकट केला. सारमेय पुच्छ सरळ व्हावा यदर्थी नळिकाद्वारीं प्रवेश करवला असतां, त्यांत प्रविष्ट जों-पर्यंत तावत्काल सरळपणा कायम; त्यांतून ब्राह्मण प्रदेशीं निर्गला जाला असतां मागती येथा प्रकारेच ! अथयेव जन्मस्वभाव, यास्तव दुष्ट जंतू कंटकरूपीं त्याचा शासन ज्या रीतीनें व्हावा कीं, तद्वत् करून निष्कंटक करावा. ऐसें ध्यानीं सरकारचे निश्चयें आणोन शास्तकर्ता योग्य अवलोकनियांत दृश्य पदार्थी आणीत असतां शत्रूच्या उपम-र्दाची × आपणाशिवाय अन्यत्रास नाहीं. ऐसें ध्यानीं आणोन आप-णास सदरहु शेवा सरकारांतून फर्माविली. आपण स्वामशेवेचे ठाई अंति निःसीम धुरंधर येणें करून पूर्वजास मोक्षप्रद ऐसें दृढतर चित्तीं × × आणोन × × × व तोफखाना वगैरे जंगी सरंजाम × × × × अमित्रावर चाल केली असतां आपल्या जाज्वल्य शौर्यते-करून शत्रूप्रती हतोत पाऊन सहमूल दिग्वलय स्त्रियांस होऊन प्रकाशाचा विस्तार जाहला. आपण युद्धप्रकरणीं आप्रतीम रणपंडित आणि व्यूहरचनीं अती चतुर यास प्रकृत निदर्शनेच कारण. आपल्या साहसास भगिरथ रायाची उपमा पराकाष्ठा तर ही येविसीच्या साम्य-तेस × × कारण हेच कीं भगीरथ रायांनीं आपल्या पित्रोद्धाराक-रितां भागीरथी एकच सरिता आणिली. आपण स्वामशेवेच्या येक-निष्ठतेकरून आवशेष पितृसमोहास समीचीन लोक प्राप्त व्हावा येत निमित्या तीन सरिता त्रिवेणी. स्थाई आणोन रणभूमिका हाच प्रयाग क्षेत्र निर्मित केला. तीन सरिता त्या कोणत्या असा आक्षेप त्या शंकापरिहारोक्तीचा पर्याय शत्रूकडील समोह हननेकरून पोणिताचा प्रवाह ही येक सरिता सरस्वती; आणि शत्रूस माहाल-याते पावला त्या शोकेकरून त्या त्यांच्या स्त्रियांचें नेत्रोदक यांचा कज्जलयुक्त प्रवाह ही दुसरी सरिता यमुना; आणि यशोप्राप्तीच्या कुतुहलेंकरून औदार्य प्रगट करून याचकजनाचे दरिद्रव्यथा परि-

मार्जनार्थ दातृत्व प्रसरणा करून दान-प्रदात करिते समयीं तत्तद्-हस्तें उदक समर्पण केलें ते तिसरी सरिता भागीरथी. आतयेव तीन सरतेच्या संगमेकरून आनायासें समस्त जनांचे पितृगण उत्तम लोकाप्रती स्थीरतेकरून वास्तव्य करिते जाले. क्षात्रधर्माविसी क्षात्रामणी ऐसा आपला लौकिक प्रवर्धमानाते पावला आणि स्वामीस आपण कृत कर्मे ऐसे कृतनिश्चय समजोन कृपावर्धमान करणें हा सहज मार्ग. येतद्विषयींच्या उत्प्रेक्षास लेखन सीमा.

मंगळवेढें येथें विद्यमान असलेले रा० आपाजी येशवंत कुळकर्णी यांचे पणजे येसो जिवाजी हे गोविंद हरि यांचे पदरीं चाकरीस होते. पांडुरंग गोविंद हे कर्नाटकाचे लढाईत शत्रूचे हातीं लागले. त्यावेळीं त्यांच्याबरोबर जीं माणसें होतीं त्यांत येसो जिवाजी कुळकर्णी होते. पांडुरंगरावतात्या हे जखमी जाले असून त्यांत अतिसाराचा आजार झाला होता. यावेळीं त्यांची सुश्रूषा व चाकरी विशेष केल्यावरून येसो जिवाजीस दोनशें रुपये आकाराची जमीन वंशपरं-परेनें इनाम देणेविषयीं, तात्यासाहेब यांनीं पट्टणचे कैदेंत असतांना मरणापूर्वी केलेल्या यादींत नमूद केलें. सबब चिंतामणराव पांडुरंग यांनीं रा० येसो जिवाजी कुळकर्णी यांचे नांवें शके १७१४ त वंशपरंपरेची सनद करून दिली. सनदेप्रमाणें हल्लीं चालू आहे.

"पांडुरंगरावतात्यासाहेब यांना जखमा तीन जाहल्या. बरोबर ब्राम्हण मंडळी सात व भले लोक वगैरे सात एकूण चवदा असामीसही जखमा लागल्या. त्यासुद्धां शत्रूस्वाधीन झाले." हा मजकूर अधि-कारी लागू यांच्या सनदेंत आहे.

यादी के० पांडुरंग गोविंद ऊर्फ तात्यासाहेब यांचा लेख कारागृहांतून आलेला त्यावरून सु॥ समान मया तेन.

१ जोंपावेतों श्रीपंढरीनाथ आपलें चालवील तोंपावेतों तेथील वडिलाचे वेळेप्रमाणें चालवावें.

१ संगम हरिपुर येथील वडिलाप्रमाणें चालवावें.

१ घरचें ब्राह्मणभोजनें पूर्ववत्प्रमाणें चालवावें.

१ पुण्यांतील चाललें तसें चालवावें.

१ नरसिंगपूरचे वडिलाचे वेळेप्रमाणें चालवावें.

१ कर्ज वाम लोकांचें देणें आहे तें वारलेंस बरें. नाहींतरी जें घरीं असेल तें देऊन वारून मुक्त व्हावें.

१ कान्हो माणकेश्वर यास दोन हजार रुपये कर्ज आहे तें चालता काळ परगणेंत करून द्यावें. शिवाय दोनशेंहे रुपयेची जमीन रहिमतपुरास चाकरीखेरीज इनाम द्यावी. उपयोगी आहेत. पूर्ववत्प्रमाणें चालावें.

१ येसो जिवाजी यास पा। मंगळवेढें येथें दोनशेंहेची जमीन द्यावी. पुत्रपौत्रादि चालेशी. घोडे व पोषाख गेलेपेक्षां जाजती द्यावें. चाकरीशिवाय पेशजीप्रमाणें चलवावें.

१ आपले भाऊबंदास टाकून प्राण गेल्यास न चालावें. त्यांतही परशरामाचे दर्शनाचें प्रयोजन नाहीं. वडिलांचे केलेंपणास उत्तीर्ण जाहले. थोर आहेत. वडिलांनीं केलेंस त्यांजकडून अंतर जाहलें असलेस ईश्वर पाहील. अंतर आह्मी केलें असलें तरी आह्मांस तो येकाचे दुःखी दिल्हेच आहे.

१ घरांत फूट पडो देऊं नये.

१ चिरंजीवास व बाईकास अंतर देऊं नये. मुंजी जालेवर चिरंजीव चिंतामणराव व माहादेवभटकाकास जरूर जरूर वाराणशीस पाठवावें. राव, नाना व बाबा आमचें उत्तरकार्य सांग होई तें करावें निदान महादेवभटकाकास तरी पाठवावें.

१ धणी तात्या ह्मणोन चौघे लुचे चिरंजीवाकडे, चौघे तुह्माकडे मिळतील त्यांत वोळखून घालवणें त्यास घालवावें.

१ सर्वस्व नाश जाहला तरी श्रीमंतांशीं दुजा प्रकार प्राणही गेल्यास करूं नये.

१ ईश्वर सामर्थ्य दिल्यास आह्मा प्रीत्यर्थ चिरंजीवाकडून सांग गोदान व पांच हजार रुपये लाऊन सार्थक करावें.

१ अलाहिदा पत्रांतील सारांश मजकूर वडिलीं आज तागाईन सिलविलें तें सर्वही देवाधीन. आम्ही याजकरितां गमावून संकटांत पडलों. देवादिकांच्याही संपत्ती गेल्या; आमची कथा काय आहे. संतोष होणारास ईश्वर दाखवील. कच्या रंगाच्या ग्रहस्थाच्या बुद्धीनें पुढील दिवस घालवणें. सर्वही पेंच ईश्वरी एकवेळ आणिले. जेणेंकरून परिणाम दिसेल तसें करणें. यंत्रधारी याचा स्नेह कागदीं पत्रीं उत्तम राखावा. तुमचें दैव पार पाडील. आह्मी केले प्रकार सर्वही अंगावर दैवहीनतेनें आले. वाचलेस भेटही होई. आपला परिणाम पाहून वर्तणूक करणें. येकाकरितां सर्वही गमावणें वाईट. परिणाम न लागे तरी वोपून मुस्तही होणेस जालें तरी व्हावें. आमचे सुटकेकरितां कोणासही करुणा भाकणें ठीक नव्हे. आमची सुटका येक पंढरीनाथच करील, दुसरेस म्लानतेनें बोलणें प्राणही गेलेस न करणें. सर्व सवक ब्राह्मण आदीकरून व वडील व बालकें यांस अनुक्रमें करून आशिरवाद व नमस्कार व रामराम सांगणें. वडील कैलासवासी यांचे आशिरवादें तुह्मांस ज्ञान येईल. तुह्मीच सांभाळावें. आम्ही आहों नाहीं बरोबर. चिरंजीवास लेखाचे ठाई प्रवीण करावा. चिंता कराल तर आमची शपथ. अकास बहुत दुःख ईश्वरें दाखविलें.

श्री

पुरवणी कित्ता कलमें दुसरेचीं हातचीं—

१ अंताजीपंतमामा व गोविंदपंतमामा सरकारचे उपयोगी आहेत. यांच्या मामलती त्यांजकडे चालवाव्या.

१ राजश्री आपा बळवंत यासी कागदोपत्रीं स्नेह राखावा.

१ केसोपंत काळे यासी संभाषण नसावें. हिशेबीं कितेबीं कारकुनाशीं बोलावें; अघटांत आणूं नये.

१ केसोपंत गोरे पदरचे आहेत यांचें चालवावें.

१ रामभट नातू, विठोबा लेला वगैरे सर्वांवर कृपा असावी.

१ बळवंतराव मंगळवेढेकर आमचेविशीं बरे आहेत. यांचें चालवावें व योगाबाई वगैरे यांचें चालवावें.

यादी श्रीमंत राजश्री आपासाहेब यांनीं श्रीगणपतीमहाराज यासी निरंतर विनंति करावयाचीं कलमें बी॥

१ दौलतीचा मान, अभिमान, कीर्ति, लौकिक, यश, व लाभ तुझा. चिरंजीव राजश्री धुंडीरावतात्या यांचें कल्याण करावें. त्याचे उदरीं जन्म घ्यावा. इंग्रजी सरकार जिंमेदार त्याचे पदरचे कामदार यांनीं विनाकारण अब्रु घेतली तो गुन्हा त्याचे पदरीं दस्ताऐवजीं घालावा आणि अब्रूचा जाबसाल त्याजकडून करून घ्यावा. इंग्रजीसरकार जिंमेदार त्याचा पंढरपूरचे मुक्कामाचा करार त्यांतील मुद्दे हशील करावयाचे ते हशील जाले नाहींत, ते त्याजकडून कराराअन्वयें वाजवी जाबसाल तें उलगडून द्यावें ह्मणून बोलावें. कराराबरहुकूम जाबसाल उलगडून घ्यावा.

१ चिरंजीव विनायकरावभाऊ व गणतरावबाबा व विठ्ठलरावबापू व नरसिंगरावजी व आण्णा व गोंदूनाना व कृष्णरावजी व पुरुषोत्तमरावदाजी यांचें कल्याण करावें.

१ भाईबंद शत्रुमित्र इत्यादिकरून सर्वत्रांचें कल्याण करावें.

१ चिरंजीव राजश्री हरिहररावदादा लागू व सर्वत्र लागूमंडळी यांचें कल्याण करावें. व कोन्हेररावबापू सर्वत्र मंडळीसह व राजश्री बळवंराव फडणीस याचे पत्नीस वे॥रा. बनोशीकरबाबा यांनीं दोन महिनेंत पुत्रगर्भ राहील; पुत्र होईल, ह्मणून सांगितलें त्याप्रमाणें पुत्र व्हावा. व चिरंजीव राजश्री रामाजी-

नाईक भिडे व वे॥ रा. दाजीबा वाटवे उपाध्ये व विष्णुभटजी सांबारे वैद्य व नारायगशास्त्री व चिरंजीव जिवाजी येशवंत व रा. भाऊ छापखाने व गोविंदपंत बिनिवाले व बापू नारायण व शागीर्दमंडळी यांचें कल्याण करावें.

१ पदरची ब्राह्मणमंडळी, तुझें दौलतींतील इत्यादि सर्वांचें कल्याण करावें.

१ आबाजी फडतरा हुजऱ्या व सर्वत्र हुजरेमंडळी व मराठे व शूद्रादि सर्वत्र पदरचे यांचें कल्याण करावें.

१ शिलेदार व हवलदार व बारगीर्द बहुलस्वार यांचें कल्याण करावें.

१ गुलाब नायकीण व रमा व पन्हा व निली व ऐली इत्यादि नृत्यांगना यांचें कल्याण करावें. त्यांचे पोटीं वंश व्हावा. तुझी चाकरी व्हावी.

१ दासदासी लहान थोरादीकरून सर्वांचें कल्याण करावें.

१ पागेकडील माणसें व तोफखान्याकडील माणसें व मळे व मळींतील व देवालयांतील व कारखान्यांतील लहान थोर माणसें यांचें कल्याण करावें.

१ यवन अंत्यजादीकरून तुझे दौलतींतील यांचें कल्याण करावें.

१ महालकरी, जमेदार व गांवकरी, रयत यांचें कल्याण करावें.

१ श्वापद चतुःष्पाद व पक्षी व द्विपाद कीटकादीकरून सर्व जीवांचें रक्षण करावें.

१ तुझे पेठेंतील बाजारकरी वगैरे यांचें कल्याण करावें.

" चिंतामणराव पांडुरंग ऊर्फ आपासाहेब सांगलीकर यांनीं सांगली येथें स्थापन केलेल्या श्रीगजाननापुढें उभें राहून वर नमूद केल्याप्रमाणें भक्तीपूर्वक मागणी करीत असत. आपासाहेबासारखें कुलभूषण पुरुष क्वचितच ! हरिभटबावांचे पुण्यप्रतापें तिसरे पिढींत

प्रत्यक्ष चिंतामणीरूपींच पणतू जन्मास आला ह्मणण्यास कांहींच हरकत नाहीं. "

नं० १७ श्रीगणपतीर्जयती.

चिं॥ रा० नारायणरावनाना यासी प्रती चिंतामणराव पांडुरंग आसिरवाद उपरी आमचे घराण्यांतील मुलांचे जन्म कोणाचे कधीं जाले व मुंजी व लग्नें जालीं त्याचीं पत्रें व श्रीमंतांचे कारकीर्दींत लढाया वगैरे कोणाच्या स्वारीस काय काय जालें त्याचीं पत्रें तुमचे येथें असतील तीं एकंदर रुमाल पाहून जे कागद सांपडतील ते फेरिस्त लावून पाठवून द्यावे. रा॥ छ० ६ सव्वाल बहुत काय लिहिणें लोभ करावा हे आसिरवाद. छ० १४ सव्वाल ऊर्फ पौष मास स० १२४८

नं० २० श्रीगणपतीर्जयती.

चिं॥ रा० नारायणरावनाना यासी प्रती चिंतामणराव पांडुरंग आसिरवाद उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें विो श्रीगणपतीमहाराज पंचायतन यांचे प्रतिष्ठेस मुहूर्त चैत्र शु॥ १० भृगुवारीं पाहिला. त्यास तुह्मी समारंभास यावें रा॥ छ० २५ सफर बहुत काय लिहिणें लोभ करावा हे आसिरवाद.

" चिंतामणराव पांडुरंग ऊर्फ आपासाहेब सांगलीकर यांनीं, नारायणराव कृष्ण यांस जीं पत्रें लिहिलीं त्यांवरून पहातां, मंगळवेढें येथील सर्व कारभार नानांचे विचारेंच चालला होता असें दिसतें नारायणराव कृष्ण हे मेघश्शामरावबापू यांचे नातू होत. नारायणराव कृष्ण पटवर्धन यांना इ.स.१८५७ चे बंडांतील धामधुमींत व त्यांचे जांवई गंगाधरराव आपटे सायगांवकर यांनाही इंग्रजसरकारचे रक्षक दंडुकबहाद्दर पोलिसांनीं पकडून सातान्यास नेलें होतें. "

नं० १९ श्री.

राजश्री पुरुषोत्तमरावदाजी स्वामीस—

विनंति उपरी आपण काल माचीस येऊन दरवाजापासून श्रीमंत

राजश्री माधवरावसाहेब यांजवर रागें भरून गेला ह्मणोन कळलें. त्यांत दरवाजावर नित्य कारकून असतो तो नव्हता. कालच नवा नेमून दिला त्यामुळें त्यास समजलें नसेल तर आपण असें करूं नये. असो, आज राग टाकोन यावें नाहीतर मला आज्ञा जाहलीयास मीच आपले राहुटीस येईन हे विनंति पो छ. जमादिलाखर.

मौजे आंवें हा गांव श्रीक्षेत्र पंढरपुरापासून अदमासें ७।८ मैल आहे. आंव्याहून मंगळवेढेंही अदमासें ७।८ मैल आहे. श्रीमंत नानासाहेब पेशवे यांचे कारकीर्दीत पुरुषोत्तमदाजी यांनीं आंवें हा गांव मिळवून तेथें चौबुरुजी वाडा बांधून सभोंवार तट बांधिला. हल्लीं तो वाडा साधारण स्थितींत आहे. वाड्याचे सभोंवार असलेला तट मात्र सर्व पडला आहे. चौबुरुजी गढी ऊर्फ वाडा चंद्रभागेच्या कांठीं पश्चिमाभिमुख बांधिला असून उत्तर बुरुजावर श्रीउत्तरेश्वराचे लहानसें दगडी देवालय बांधिलें आहे. गांवांत तळीं विहिरी बांधून गांव उत्तम वसविला. गढीचे बुरुजावर जाऊन चोहोंकडे पाहिल्यास ती अपूर्व चंद्रभागेच्या कांठची शोभा पाहून व उत्तर-दक्षिणवाहिनी चंद्रभागेच्या विस्तीर्ण पात्राची शोभा पाहून मनास फारच आनंद होतो. त्या आनंदाचे भरांत चोहोंकडे सारखें पहातच रहावें असें वाटतें! गांवांत ४।५ देवालयें आहेत. श्रीगणपतीचें देवालय, लक्ष्मीबाई भ्रतार नारायणराव पटवर्धन इनें बांधिलें. श्रीमारुतीचें देवालय पुरुषोत्तम विठ्ठल पटवर्धन यांनीं बांधिलें असुन, कळसाचें काम द्वारकाबाई भ्रतार पुरुषोत्तम विठ्ठल इनें सुवर्णाचें केलें; त्यास पक्काशेर सुवर्ण लागलें असें ह्मणतात. श्रीराधाकृष्णाचे देवळाचा जीर्णोद्धार कृष्णाबाई भ्रतार विनायकराव हरिहर इनें केला. वाड्याचे बाहेर उत्तर तटास लागून चंद्रभागेच्या कांठीं श्रीअमृतेश्वराचें देवालय आहे. हें मंगळवेढेकर पटवर्धन यांनीं बांधिलें.

आंवेकर घराण्यांत पुरुषोत्तमदाजीसारखा विद्वन्मुकुट कोणी झाला नाहीं. पुरुषोत्तमदाजी यांचे नातू बाळकृष्णपंत हरिहर

पटवर्धन यांनीं " हरिवंशाची बखर " लिहिली. ती बखर संशोधन करून ऐतिहासिक लेखसंग्रहाचे संपादक वासुदेव वामनशास्त्री खरे यांनीं इ. स. १९०९ त प्रसिद्ध केली, " हरिवंशाची बखर " लिहिणारे बाळकृष्णपंत बखरीचे शेवटीं असें लिहितात कीं, " याप्रमाणें हरिवंशाचा विस्तार व कीर्तीचें वर्णन यथामति लेखन केलें असे. श्रमेंकरून वाचिल्यास मनोरथ पूर्ण होतील व वंशावृद्धि होईल. याची फलश्रुति हीच. हरिवंशांचे कीर्तीचें वर्णन करील व हरिवंश वाचील त्याच्या वंशाची वृद्धि होईल. या वंशाची प्रत लिहून जो आपले गृहाचे ठायीं संरक्षण करील त्यास दुःख, दारिद्र्य प्राप्त होणार नाहीं. याप्रमाणें फलश्रुति असे. शके १७६४ शुभकृन्नामसंवत्सरे वैशाख शुद्ध ५ इंदुवारीं हा ग्रंथ लिहिला असे. मु० आंबेनजीक श्रीक्षेत्र पंढरपूर. श्रीभीमातीर. श्रीउत्तरेश्वरसंनिध. "

ही फलश्रुति यथार्थ आहे. ज्याप्रमाणें भारतीयांचें युद्ध, पराक्रमाचें वर्णन वाचलें असतां पुण्यदायक तसेंच हरिभटबावा पटवर्धन वंशाचें वर्णन वाचलें असतां पुण्यदायक होय.

हरिवंशाची बखर लिहिणारे कै० बाळकृष्णराव हरिहर पटवर्धन हे जमखंडी संस्थानचे कारभारी होते. इ. स. १८५८ त सरकारांत दाखल केलेल्या मजकुराचा एक अस्सल कागद ( अर्ज ) आम्हांस मिळाला आहे. तो कागद जुन्नरीं असून त्यांवर सोनेरी वर्खाचे बुंद आहेत. तो येणेप्रमाणें:—

श्री.

साहेब मुषफक वकीली नामक बकेरदान दोस्ता रैटहनराबल जॉर्ज लार्ड एलफिस्तनसाहेब गौरनर बहादुर मकान जंजिरे मुंबई दाआलतादहुर.

अर्जी सौभदस्तगाहा बालकृष्ण हरी आंबेकर कारभारी निसबत आपासाहेब इ॥ जमखंडी सलाम बाजत सलाम अकी येथील खैर आफियत तागाईत ता० २० आगटंबर सन १८५८ इ॥ सु॥ तिसा

खमसेन मयातैन व अलफ पावेतों आपली षादमानी हमेशा कलमी होऊन दिल आराम होत असिला पाहिजे. दरी आयाम चिरंजीव राजश्री आपासाहेब याणीं जास्ती सिबंदी व स्वार ठेविले व दारू-गोळा केला व जुन्या तोफा दुरुस्त केल्या याजबद्दल मेहरबान सिटन-कारसाहेब व म्यानसिलसाहेब व यत्रीजंटसाहेब येऊन चौकशी पाहून चौकशीतील कांहीं लोक हल्लीं बेळगावांस घेऊन गेले. पुढें कोणते प्रकारें चौकशी होणार हें कळत नाहीं. असो—माझा सरकारास आसा अर्ज आहे कीं, सदरहु कारणामुळें चिरंजीव प्रतिबंधांत असून चौकशी चालले त्यास सरकारांनीं कृपावंत होऊन मेहरबान बालेस्टरसाहेब वकील व दौलतींतील तीर्थस्वरूप कैलासवासी आपासाहेब व रावसाहेब यांचे कारकीर्दींत वागलेले वृद्ध बहाणे लोक पांचचार असून अभयपूर्वक आमचा मजकूर सरकारांनीं खुद्द समजून घेऊन याची दरयाप्ती करावी ह्मणजे हा निखालस शब्ददोष आहे अशी सरकारास खात्री होईल. यास्तव उत्तराची मार्गप्रतीक्षा करीत आहे. विशेष अर्ज करण्यास शक्त नाहीं. क्षमा असावी. आदा काय लिहिणें. खातर माहुबत असो दिल्ही पाहिजे हे किता (शिक्का.)

वरील अर्जास सरकारांतून आलेलें उत्तर.

अर्जदार यास हुकूम कीं, तुह्मास सरकारास अर्ज करणें तो पत्राचे रीतीनें लिहून पाठविण्याची तुमची योग्यता नाहीं ह्मणोन तुमचें पत्र परत पाठविलें आहेत. तारिख १८ नवेंबर सन १८५८ ईसवी.

सरकारी अधिकारी वर्ग कसें अरेरावीनें वागतात ते वरील हुकुमावरून स्पष्ट दिसत आहे. वास्तविक पहातां संस्थानचे कारभारी ह्मणजे मोठे अधिकारी असून सुशिक्षित कायदा जाणणारेच असतात. असें असून, कारभाऱ्यासारख्या मोठ्या हुद्याचे जागेवर असणाऱ्यास अशा तऱ्हेनें विक्षिप्त हुकूम करणें ह्मणजे मोठ्या अधिकाऱ्यास हें दूषणास्पद आहे. येवढ्याचकरितां खुद्द सरकारनें प्रजेस सुख देणारे योग्य सुशिक्षित असे अधिकारी ज्या देशावर नेमावयाचे ते अधिकारी

तद्देशीयच पाहून नेमावेत. असें झाल्यास अन्याय क्वचितच होईल.

हल्लीं मौजे आंबें येथें कृष्णंभट बापाजींचे पहिले पुत्र नारायणरावनाना व दुसरे पुत्र पुरुषोत्तमदाजी यांचे वंशज रहात आहेत. नारायणरावनानापैकीं, कै० माधवराव सदाशिव यांचीं मुलें व पांडुरंगराव काशीनाथ ऊर्फ दादासाहेब हे आपल्या मुलांसह वाड्यांतील एका भागांत रहात आहेत. पुरुषोत्तमदाजीपैकीं रा. गणपतराव विश्वनाथ ऊर्फ बाबासाहेब हे आपल्या चार पुत्रांसह वाड्यांत रहात आहेत. वाड्याचे बाहेर पांडुरंगराव रामचंद्र हे आपल्या चार पुत्र व दोन पुतणे यांसह रहात आहेत.

श्रीमंत पेशवे यांनीं मौजे मंगळवेढें हा गांव स. १७५० त घेतला. यापूर्वी, मंगळवेढें, करकंब, पंढरपूर व विजापूर हा सर्व मुलुख शाहूमहाराजांनीं प्रतिनिधीस जहागीर दिला होता. मंगळवेढ्याची मामलत १७५०।५१ सालीं पटवर्धनाकडे दिली. श्रीमंतांकडून मेघःशामराव कृष्ण यांचे नांवें मंगळवेढ्याची मामलत झाल्यावर मेघःशामराव यांनीं आपलें राहण्याचें मुख्य ठिकाण मंगळवेढेंच केलें. कृष्णंभटबापाजी कुरुंदवाडास सर्व प्रपंच पहात असत. परंतु तेथें पटेना ह्मणून बापाजी मंगळवेढीं येऊन राहिले. मंगळवेढें हा गांव श्रीक्षेत्र पंढरपुरापासून अदमासें १३ मैलांवर दक्षिण दिशेस आहे. हा गांव ऐतिहासिकदृष्ट्या फारच महत्वाचा आहे. मंगळवेढें हें नांव या गांवास ज्या कारणावरून पडलें, त्या कारणाचा हल्लीं मागमूसही नाहीं. तें कारण असेंः— पूर्वी या गांवीं मंगळाई देवीचें विस्तीर्ण देवालय होतें. सदरहू देवीचे नांवावरून मंगळवेढें असें नांव प्राप्त झालें, अशी ऐकीव परंपरा आहे. या गांवाची सद्यःस्थिति पाहिल्याबरोबर पूर्वकालीं या गांवांत बरींच देवालयें असावींत असा तर्क पोहोंचतो. यवनी बादशहाचे कारकीर्दीत देवालयाचा विध्वंस होऊन त्या देवालयाचे दगडाचा उपयोग किल्ल्याचे तटास व बुरुजास करण्यांत आला आहे.

सांगली संस्थानचे दुसरे अधिपती सरदार धुंडिराजतात्यासाहेब यांचे ॲडमिनिस्ट्रेटरी कारकीर्दींत मंगळवेढें येथील मुख्य गढीचे भोंवतालीं असलेला तट पाडण्यांत आला, तेव्हां त्या तटांतून निघालेले शेंकडों विस्तीर्ण दगड नक्षीकाम खोदलेले कित्येक रस्तोरस्तीं व घरोघरीं विद्यमान दृष्टीस पडत आहेत. एक शिलालेख सांपडलेला पुढें कितीएक दिवस वाड्यासमोरील मारुतीचे देवळाजवळ ठेविलेला होता. हल्लीं तो शिलालेख तेथें नसून संस्थानीं असल्याचें समजतें. येथील चौबुरुजी गढी ऊर्फ वाडा पूर्वाभिमुखी आहे. ही गढी व सभोंवतालचा तट व खंदक मुसलमानी रियासतींत बांधिले असावेत. हल्लीं फक्त गढी मात्र साधारण स्थितींत असून तट व खंदक नामशेष झाले. नैऋत्येकडील तटाचा बेरड-बुरुज निम्मा-अधिक ढासळलेला आहे. वाड्यांतच मेघःशामबापू यांचें वास्तव्य होतें. या वाड्याचे पश्चिम बाजूस तटाचे आंत श्रीकाशीविश्वेश्वराचें देवालय आहे. हें देवालय हजार बाराशें वर्षांपूर्वीचें असावें असें वाटतें. या देवालयांत शिरल्याबरोबर डावे बाजूचे पहिले खांबावर चौबाजूनें लेख कोरलेला आहे. तसेंच त्या खांबास लागून असलेल्या दुसऱ्या खांबावर एका बाजूस लेख कोरलेला आहे. सदरहु लेखांतील सारांशः—" शके १४९४ भाद्रपद शु॥ ३ अंगिरानाम संवत्सरे हिप्परगिचा कुळकर्णी त्यावेळीं मंगळवेढीं मुजुमदारीवर होता. त्यानें मुल्ला याकुबखान याच्या परवानगीनें जगभावी नजीकचे पूर्वी असलेल्या देवळाचा जीर्णोद्धार केला व त्यांत विश्वेश्वराचे लिंगाची स्थापना केली. " हें पूर्वीचें स्वयंभू स्थान होतें. इ० स० १५७२ त ज्याअर्थी जीर्णोद्धार झालेला आहे त्याअर्थी व देवालयाच्या पहिल्या बांधणीवरून हें देवालय फार जुनें आहे. या देवालयास लागून उत्तर बाजूस जगभावी नांवाची मोठी विहीर आहे. या विहिरीस लागून एक गुहा आहे. देवालयाचे पिछाडीस खंदकाचे पलीकडे फार जुना तलाव आहे. ह्या तलावास कृष्णतलाव असें ह्मणतात. दामाजीचे

चरित्रावरून या गांवाची मामलत बेदरशाहींत दामाजीपंताकडे होती. गांवाचे उत्तरेस दामाजींचें मंदिर असून मंदिराचा पूर्व दरवाजा दगडी आहे. सदरहू दरवाजाचे दगड तटाच्या दरवाजाचे होत. हें मंदिर कै० रघुनाथराव अभ्यंकर मामलेदार यांनीं ग्रामस्थांच्या सहाय्यानें बांधिलें. हल्लीं पूजा-नैवेद्याची व्यवस्था त्यांचे चिरंजीव रा. गणपतराव रघुनाथराव अभ्यंकर बीए. एल्. एल्. बी. सांगली येथील प्रसिद्ध वकील यांचेकडून चालू आहे. या गांवांत ऐतिहासिक पुरुष प्रसिद्ध बापू गोखले यांचा वाडा होता. हल्लीं वाडा मोडला गेला असून, खुली जागा सरकारचे ताब्यांत आहे.

हल्लीं ज्या ठिकाणीं गैबीसाहेबाचें थडगें आहे. त्या थडग्यास लागून पूर्व दिशेस विद्यमान असलेला दगडी दरवाजा व ओऱ्या उत्तम नक्षीकाम केलेल्या पाहून, या ठिकाणीं पूर्वी मोठें देवालय खात्रीपूर्वक होतें, असें इतर पहाणारेही सहज सांगतील. हिंदूधर्मद्वेष्ट्यांनीं तें देवालय पाडिलें असून, त्या दगडाचें तेथेंच वरील थडगें बांधिलें आहे. सदरहु देवालय मंगळाई देवीचें होतें असें समजतें. या मंगळाई देवीचे देवालयावरून या गांवास मंगळवेढ हें नांव पडलें असावें. या मंगळवेढ्यांत व या गांवाचे आसपास १०।२० कोसांचे आंत ऐतिहासिकदृष्ट्या जर कोणी संशोधन करील तर प्राचीन विश्वसनीय ऐतिहासिक माहिती बरीच उपलब्ध होईल.

कृष्णंभटबापाजीचे तिसरे पुत्र मेघःशामबापू; यांचे नातू नारायणराव कृष्ण यांनीं सरकारी वाड्याचे पिछाडीस नवा वाडा बांधिला कीं, हरिहरराव नारायणराव ऊर्फ बापूसाहेब यांनीं बांधिला हें समजलें नाहीं. परंतु हरिहरराव बापूसाहेब यांनीं वाड्याचे दरवाजावरील माडी, वाड्याला लागून बंगला व लहानसा बगीचा वगैरे बरीच सुधारणा करून लक्ष्मीनारायणाचें देवालय बांधून, देवाची पूजा-नैवेद्याची कायमची व्यवस्था केली आहे. कै० बापूसाहेब हे सरदारी थाटानें रहात असत. त्यांचे दत्तक चिं० नारायणराव हरिहरराव ऊर्फ

नानासाहेब पटवर्धन हे नुकतेच वारल्यामुळें कुटुंबाचें फारच नुकसान झालें. हे स्नानसंध्येशील असून, अगदीं साध्या रहाणीचे होते. यांनींही वाड्यांत उत्तम सोई करून, स्वच्छता व टापटीप सुरेख ठेविली. यांना दोन पुत्र आहेत. थोरले हरिहरराव व धाकटे पुरुषोत्तमराव. नानासाहेबांना शेतकीचा नाद विशेष होता.

संस्थान सरकारनें विचारल्यावरून नानासाहेब पटवर्धन मंगळवेढेकर यांनीं मंगळवेढें घराण्याची हकिगत विशेष विस्तृत न देतां थोडक्यांत पण मुद्देसूद उत्तम रीतीनें लिहून ता० ५।१०।१९१४ रोजीं सांगलीदरबाराकडे पाठविली आहे.

मंगळवेढें हा गांव सांगलीकरांचा तालुक्याचा आहे. जुन्या वाड्यांतच सरकारी कचेऱ्या असतात.

कृष्णंभटबापाजींचे पांचवे पुत्र महादेवराव हे हैदरनायकाचे छाप्यांत कामास आलेबद्दल श्रीमंत नारायणराव पेशवे यांनीं त्यांचे पुत्रास नांदोरें हा गांव इनाम दिला. सनद मात्र श्रीमंत माधवराव नारायणराव पेशवे यांचे कारकीर्दींत झाली. दामोदर महादेवराव पटवर्धन हे वारल्यामुळें महादेवराव कृष्ण यांच्या कुटुंबानें आपल्याच मंगळवेढें घराण्यांतील गोपाळराव यांना दत्तक घेतलें. गोपाळराव यांचे पुत्र व गोपाळरावही वारल्यामुळें गोपाळरावांचे कुटुंब सुंद्राबाई यांनीं मंगळवेढें घराण्यांतीलच दत्तक घेतला. सुंद्राबाई व यांचे दत्तक पुत्र महादेवराव हे इनामगांव नांदोरें येथें राहून प्रपंच करीत होते. पुढें सुंद्राबाई वारल्यावर इनाम गांव खालसा झाला. दत्तकपुत्र महादेवराव, गोपाळराव पटवर्धन यांचे नांवें सरकारानें इनामगांव नांदोरें चालविला नाहीं. हल्लीं महादेवराव गोपाळराव यांचे औरस पुत्र दामोदरपंत असून हे संस्थान जमखंडी येथेंच रहात आहेत. यांना श्रीमंत जमखंडीकर सरकार यांचेकडून ११०रुपयांची तैनात चालू आहे. दामोदरपंतास एक पुत्र माधवराव म्हणून आहेत.

कृष्णंभटबापाजीचे सहावे पुत्र लक्ष्मणराव ऊर्फ बळवंतराव; बळवंतरावांचे पणतू विठ्ठलराव लक्ष्मणराव हे मयत असून, त्यांचें कुटुंब रखमाबाई ह्या जमखंडी येथें असतात. ह्या रखमाबाईनीं यादवाडकर पटवर्धनांपैकीं दत्तक पुत्र घेतला आहे. त्याचें नांव लक्ष्मणराव होय. बळवंतरावांचे पुत्र गणपतराव; गणपरावांचे पणतू हरिहरराव रामचंद्रराव हे मयत असून, त्यांचे पुत्र गणपतराव हरिहरराव ऊर्फ दादासाहेब हे मंगळवेढ्यास आपले वाड्यांत असतात. यांचे पुत्र पांडुरंगराव हे लहान आहेत. गणपतराव ऊर्फ दादासाहेब हे वर्षांतून कांहीं दिवस पुण्यांतही रहातात. दादासाहेब पटवर्धन हे सरदारी थाटानें असतात.

---

## २ मिरज किल्ल्यांतील पटवर्धन.

हरिभटबावांचे द्वितीय चिरंजीव बाळंभटआण्णा यांचे वंशाची माहितीः— बाळंभटआण्णा आपले परमपूज्य तीर्थरूपासंन्निध कुरुंदवाड येथें रहात. आण्णांची सुशील पत्नी सौ० काशीबाई ऊर्फ काशीकाकी हिला पुष्कळ दिवसांत मूल झालें नव्हतें. यामुळें ती बहुत कष्टी असे. तथापि पुण्यशील श्वशुरांचे ठिकाणीं पितृतुल्य भक्ती ठेवून त्यांचे व पतीचे सेवेंत अहर्निश तत्पर असे. पुढें बावांचे अनुग्रहानें तिनें श्रीमयुरेश्वराची आराधना केली. श्रीच्या कृपेनें पुत्र झाला म्हणून त्याचें नांव " मयुरेश्वर " असें ठेविलें. तो मुलगा पुढें " मोरोबाआबा " या नांवानें प्रसिद्धीस आला. तो बावांचे नजरेखालीं असल्यामुळें त्याचें धार्मिक शिक्षण उत्तम झालें. वडील लवकरच वारल्यामुळें मातोश्रीनें आबा मोठा धूर्त असें जाणून त्याला वयांत येतांच त्याचा चुलता गोविंद हरि याजबरोबर पुण्यास पाठविलें. गोविंद हरि यांनीं आपला मुलगा गोपाळराव याजबरोबर

त्यांस त्या कालानुरूप योग्य तें शिक्षण देऊन मुत्सद्दीगिरी, मुलुखगिरी, जमाबंदी वगैरे हिशोबी कामांत तरबेज केलें. शिवाय मोरोबांचे अंगीं स्नेह संपादण्याचा मोठा गुण असल्यामुळें, गोविंदपंतनाना त्यांजवर फार प्रेम करीत. गोपाळराव व मोरोबा हे उभयता जिवश्चकंठश्च असे स्नेही होते. ते राजकारणी व लष्करी कामांत एकमेकांचे विचारानें वागत. पुण्यास श्रीमंत पेशवेसरकार यांचा परिचय झाल्यावर या बंधुद्वयास श्रीमंतांनीं आपले खास दिमतीस घेऊन महाल–मुलुखगिरीचे स्वारीवर नेलें. त्यावेळीं त्या उभयतांची एकनिष्ठ सेवा व कर्तृत्व पाहून पुण्यास स्वारी परत आल्यावर त्यांना मोठें बक्षिस देऊन, प्रथमतः खासपागेंत कारकुनी काम दिलें.

पुढें सन १७४६ त दमाजी गायकवाड यांजबरोबर पेशव्यांची लढाई झाली. त्यांत गोविंद हरीबरोबर गोपाळराव व मोरोबा होते त्या स्वारींत पटवर्धनांनीं गायकवाडांचा मोड करून त्यांस धरून कैद केलें. त्याचप्रमाणें स. १७५६ त सावनूरकर नबाबाचा पूर्ण मोड करून त्यांस श्रीमंतांशीं मोठ्या मिनतवारीनें तह करून घेणें भाग पडलें. तो तह या उभयता पटवर्धन बंधूंच्या मध्यस्थीनें अमलांत आला आणखी १७६३।६४ मध्यें हैदरानें सावनुरास वेढा दिला. त्यावेळीं नबाबाच्या मदतीस पटवर्धनांची फौज गेली होती. त्यावेळीं त्यांच्याच मदतीनें नबाबावरील संकट निभावलें. त्या मदतीचा व स्नेहभावाचा मोबदला म्हणून सावनूरकर नबाब अब्दुल हकीम यानें सन १७६५ १७६६ त गोपाळराव गोविंद यांस ठाणें " दोदवाड " आणि मोरो बल्लाळ यांस " गुडदहुलीकट्टी " महाल करचगी हें गांव वंशपरंपरेनें इनाम करून दिलें. त्या सनदेअन्वयें श्रीमंत थोरले माधवराव पेशवे यांनीं सन१७६९।७० इ. त नवीन सनद करून देऊन पुढें चालविलें. श्री० माधवराव बल्लाळ यांचे कारकीर्दींत कर्नाटकांत हैदर व इतर संस्थानिक यांजवर स्वाऱ्या झाल्या. त्यांत गोपाळराव व मोरोबा हे पटवर्धन बंधूच प्रमुख होते. गोपाळराव आघाडीवर रहात



श्री. कै. श्रीपतराव मोरो पटवर्धन मु॥ मिरज-किल्ला.



श्री० कै० दाजीसाहेब पटवर्धन,
मु० मिरज.



श्री० नारायणराव श्रीपतराव पटवर्धन,
मु० मिरज–किल्ला.

व आबा तळावर श्रीमंतांचे सन्निध राहून लष्करी डावपेच व स्वारीच्या हालचालीची सल्लामसलत देत व इतर सूत्रें संभाळीत.

अशा रीतीनें हरहमेष दरबाराचे कामीं व मुलुखगिरींत संस्थानिकांचे खंडणी-ठराव वगैरे प्रकरणीं मोरोबाआबांचे चातुर्याचा फार उपयोग झाल्यामुळें, पुणें दरबारांत त्यांचें वजन होतें. या कारणानें गोविंद हरि व इतर पटवर्धन सरदार यांच्याप्रमाणें मोरो बल्लाळ यांसही साडेतीन वस्त्रांचा मान मिळून खास ( जातीचा ) सरंजामही मिळाला. सन १७५१ त पटवर्धनांस पेशवे सरकारांनीं तैनातजाबता करून दिला. त्यांत गोविंद हरीस ४०००० व मोरो बल्लाळ यास ४००० व पुढें सन १७६३।६४ मध्यें सर्व पटवर्धन सरदारांच्या वतीनें गोविंद हरि यांचें नांवें बेहेडा करून २५ लक्षांचा मुलुख लावून दिला. त्यावेळीं १००० रु. जास्ती मिळून ५००० रुपयांचा जातसरंजाम मोरो बल्लाळ यांचे नांवें स्वतंत्र नमूद आहे. त्याजप्रमाणें सन १७७२।७३ चे बेहेड्यांतही मोरो बल्लाळ यांचे चिरंजीव श्रीपतराव मोरो यांचे नांवें नमूद आहे. त्याबरहुकूम सु॥ अर्बा सितैन मया व अलफ चे " गोविंद हरि, परशुराम रामचंद्र व निळकंठ त्रिंबक यांजमधील भाऊबंदाच्या तैनाती पेशजीच्या असतील त्या चालणेच्या." असा करारांतही उल्लेख आहे. याखेरीज गोविंद हरीस व गोपाळराव यांस ज्याज्यावेळीं पेशवे यांजकडून इनाम जमिनी व कुरणें वगैरे मिळत असत, त्यावेळीं मोरोबांसही मिळत असत. गोविंद हरीस कुटुंब ठेवणेकरितां वगैरेस ( मिरजेचा ) किल्ला दिला. त्याच किल्ल्यांत मोरोबासही घर बांधण्यास जागा देण्यांत आली. मोरोबांनीं किल्ल्यांत निराळा वाडा बांधिल्यामुळें, त्यांचे वंशास किल्ल्यांतील पटवर्धन असें ह्मणतात. बेहेड्यांतील ५००० रु. सरंजामाखेरीज मोरोबास हरिभटबावांनीं संपादन केलेलें कोतवडें व गणेशवाडी येथील इनाम आणि श्रीमंत पेशवे यांचेकडून मिरज, सांगली, वाटेगांव, कवठेएकंद, कवठेगुळंद, जुगुळ

वगैरे ठिकाणीं इनाम जमिनी मिळाल्या, याखेरीज गोविंद हरि यांनीं स्वतः प्रेमाचें द्योतक ह्मणून आपले बरोबरीनें खास शिबंदीचे चौकीदार, उंट, घोडेस्वार व चंदीसामानसुद्धां खर्चाची एक आमचालवणूक दिली होती. अशा रीतीनें मोरोबांचें वैभव दिवसेंदिवस वाढून त्यांनीं कित्येक सरदार, सरंजामदार वगैरेस कर्ज देऊन ऋणी केलें होतें. त्या व्यापाराचे योगानें उत्पन्नांत भर पडून त्यांचे वैभवाची व कर्तृत्वाची दरबारी लोकांवर त्यांची मोठी छाप होती. त्यामुळें मोरोबाआबा बारमाही पुणें दरबारीं राहून कारभार कारस्थानाचीं सूत्रें संभाळींत व गोपाळराव गोविंद स्वारीवर असत. गोविंद हरि व मोरोबाआबा यांचेच तालमींत तयार झालेले नारायणराव कृष्ण हे गोपाळरावांचे कारभारी होते. हे सन १७६५ त वारले. त्यानंतर गोविंद हरि स० १७७१ त वारले. यामुळें सर्व पटवर्धन दौलतीचा कारभार आबाच पहात होते. यांचे कारकिर्दींत पटवर्धन जहागिरीचें सुकाणू मोठमोठ्या राजकारणी उलाढालीच्या वादळांतून त्यांनीं फार चातुर्यानें हांकलें. सन१७७३ त आंबची प्रकृती बिघडल्यामुळें ते नरसिंहवाडीस जाऊन राहिले. अनुष्ठानें करविलीं. क्लेशनिवारणार्थ सुवर्णाची तुला करून दानधर्म केला. ते सन १७७४ मध्यें वारले. यांनीं पुष्कळ दानधर्म करून लोकोपयोगीं कामें बरींच केलीं. मिरज येथील श्रीकाशीविश्वेश्वराचें देवालय, धर्मशाळा व कुरुंदवाड येथें मयुरेश्वराचें देवालय बांधिलें; आणि श्रीपुळ्याचे गणपतीजवळ दिपमाळ बांधिली. याखेरीज आपल्या कुटुंबाचे स्वास्थ्याकरितां मिरज किल्ल्यांत वाडा बांधिला. गांवांतही घरजागा नवीन घेऊन शिवाय पुणें, पंढरपूर गणेशपूर, हरिहर, व कवठेगुळंद वगैरे ठिकाणींही घरें बांधिलीं.

श्री.

राजश्री मोरो बल्लाळ उपनांव पटवर्धन गोत्र कौंडिण्य सूत्र आश्वलायन गोसावी यासीः—

सेवक माधवराव बल्लाळ नमस्कार सु॥ सबैन मया व अल्लफ शके १६९१ विरोधिनाम संवत्सरे तुह्मी हुजुरनजीक बेंगरूळनजीक प्रांत श्रीरंगपट्टण येथील मुक्कामीं येऊन विनंति केली कीं, आपणांस नबाब अबदुल हकीमखान सावनूरकर यांनीं मौजे " गुडदहुली-कटे " परगणे करचगी, सरकार बंकापूर हा गांव इनाम करार करून देऊन भोगवटीयास पत्र करून दिल्हीं त्याप्रमाणें चालत आहे. त्यास स्वामींनीं कृपाळू होऊन आपणाजवळ पत्रें आहेत तीं पाहून त्याप्रमाणें सरकारांतून इनाम करार करून देऊन भोगवटीयास पत्रें करून दिल्हीं पाहिजेत ह्मणून त्यावरून मनास आणून तुमचें चाल-वणें अवश्यक जाणून तुह्मी सावनूरकर यांचीं पत्रें आणून दाखविलीं, तीं पाहून मौजे मजकूर हा गांव कुलबाब, कुलकानु, हाल्लीपट्टी पेस्त-रपट्टीखेरीज हक्कदार व इनामदार करून जलतरु काष्ठपाषाण निधिनिक्षेप आदि दरोबस्त इनाम करार करून दिल्हे असे. तरी मौजे मजकुरी तुह्मी आपले दुमाला करून घेऊन तुह्मी व तुमचे पुत्र-पौत्रादि वंशपरंपरेनें इनाम अनभवून सुखरूप राहणें. जाणिजे छ १० जिल्काद आज्ञा प्रमाण. ( सदरहू गांव हल्लीं चालू आहे. )

मोरोबल्लाळ यांचे चिरंजीव श्रीपतराव हे लहानपणापासून वडि-लाजवळ पुण्यास रहात. श्रीपतराव यांचें सर्व शिक्षण वडिलांचे हाताखालीं पांडुरंग गोविंद व गंगाधर गोविंद यांचेबरोबर झालें. पांडुरंगराव व गंगाधरराव हे कारभारांत व मुत्सद्दीगिरींत वाकबगार झाले. आणि श्रीपतराव लष्करी-मुलुगिरींत तयार झाले. हे लहान असतांनाच वडिलाबरोबर हैदराचे स्वारींत गेले होते. पुढें स. १७७६ त श्रीरंगपट्टणचे लढाईंत पटवर्धनांचे छावणीवर शत्रूनें अकस्मात् घाला घालून पांडुरंगराव व श्रीपतराव यांना धरून नेऊन कैदेंत ठेविलें. श्रीरंगपट्टणाचे दुर्गांत कैदेंत असतां पांडुरंगरावतात्या अति-साराचे विकारानें मृत्यू पावले. यांचें और्ध्वदेहिक श्रीपतराव यांनीं केलें. श्रीपतराव पट्टणाचे दुर्गांत तीन वर्षे सुमारें होते. श्रीपतराव

व त्यांचेबरोबर असलेल्या मंडळींनीं कांहीं युक्तीचें राजकारण करून शत्रूस खंड भरून सुटका करून घेण्याची खटपट हैदरचा दरोगा " अंची शामय्या " ह्मणून ( कामगार ) होता. त्याचेमार्फत केली. त्यांत यश येऊन त्याचेमार्फत हैदरानें मुख्य खासे ' श्रीपत-राव ' याजबद्दल १८०००० रुपये खंडणी मागितली. एवढी मोठी रक्कम परमुलुखांत शत्रूचे ताब्यांत असलेल्यास कोण देणार ? तथापि श्रीपतराव यांची आजी काशीकाकी फार खटपटी बाई होती. तिनें कर्नाटकांतील कोणी राघवेंद्रनाईक नकाते नांवाचे सावकाराकडे हमी देऊन त्यांचेकडून हैदरखानाकडे १८०००० रुपये भरून सुटका करविली. सुटकेचे देण्याबद्दल श्रीपतराव यांणीं पुणें दरबाराकडे मागणें केलें; परंतु मिळाली नसावी; किंवा मिरज एकत्र पथकाचे हिशेबीं जमा असली तत्रापि श्रीपतराव यांस किंवा यांचे वंशजांचे हातीं ती रक्कम आली नाहीं. यामुळें त्या देण्याचें ओझें त्यांचे घराण्यावर मोठें झालें व तें अद्यापि पर्यायानें जाचकच होत आहे.

श्रीपतराव व पांडुरंगराव या उभयतांचा बाळपणापासून निकट स्नेहसंबंध असल्यामुळें ते एकमेकांवर फार लोभ करीत. पुढें पांडुरंगराव यांचे चिरंजीव चिंतामणरावआपासाहेब सांगलीकर यांज-बरोबरही स्नेह वृद्धिंगत झाला. त्याचप्रमाणें परशरामभाऊ यांज-बरोबरही " श्रीपतरावभाऊ " यांचें ' समानशीले व्यसनेषुसख्यं ' अशा प्रकारचें सहकारित्व होतें. याचें कारण परशरामभाऊ त्या-वेळीं पटवर्धनी फौजेचे केवळ नव्हे तर पेशव्यांच्या फौजेचे मुख्य सेनापती असल्यामुळें यांचेबरोबर प्रत्येक स्वारींत श्रीपतराव कामा-वर जात. श्रीपतराव यांस मूळ बेहेड्यांत केवळ जातीची तैनात ( सरंजाम ) नमूद असल्यानें यांनीं कायमचे स्वार ठेवणेचें नव्हेत. परंतु स्वारीचे जरूरीप्रमाणें यांचे दिमतीस खास स्वारांचें पथक अगर तुकडी देण्यांत येई; तिचें आधिपत्य हेच सभाळीत. एकंदरींत श्रीपतराव हे शूर व धाडसी असल्यानें परशरामभाऊंची व यांची

जोडी अखेरपर्यंत कायम होती. पट्टणकुडीचे लढाईंत परशरामभाऊ पडल्यानंतर पटवर्धनीफौजा सैरावैरा झाल्या. त्यावेळीं श्रीपतराव यांस शत्रूचे स्वारांनीं वेढलें असतां एका स्वारानें त्यांचे पाठींत जोरानें भाल्याची फेंक केली. भाल्याचें टोंक पाठींत घुसलें तों श्रीपतरावांनीं कमरेच्या तेग्यानें भाल्याची काठी छाटली आणि पाठींत घुसलेल्या टोंकासह दौड करून कृष्णानदीचे उतारानें आपल्या हद्दींत येऊन, पाठींत घुसलेलें भाल्याचें टोंक १ ( पातें ) उपसून काढविलें आणि त्या जखमेवर तावडतोब उपाय केल्यावर मिरजेस आले. यांना यांच्या वडिलाप्रमाणें पुणेंदरबारांत साडेतीन वस्त्रांचा मान असून इतर सरंजाम मिळत असे. यांनीं संपादन केलेलें उत्पन्नः– " गोडी-कोप व इडकल ह्या गांवांची सनद; बसगडे येथील इनाम जमीन; सांगली येथील इनाम जमीन; मुळगुंद येथील फडणविसी व कर्नाटक प्रांतांतील जकात; औरंगाबाद, अमदाबाद व मंदोसर वगैरे प्रांताची कमाविशी वगैरे हकही बरेच कालपर्यंत यांनीं उपभोगिले." सांगली, ऐनापूर व मिरज येथें वाडे बांधिले; मळे व बागा तयार करविल्या; मिरज येथें विष्णूचें देवालय; कोंकणांत वांगी गांवीं धर्मशाळा. कवठेएकंद येथील श्रीसिद्धेश्वरास कायमचा नंदादीप व मुखवटा आणि मोरेश्वर येथील देवास अबदागीर वगैरे धार्मिक व लोकोपयोगीं कामें पुष्कळ केलीं. यांच्या पहिल्या कुटुंबाचा मुलगा मोरेश्वर हा यांच्या हयातींतच २६ वे वर्षींच वारला. हा मुलगा मोठा बुद्धिमान व चतुर असल्यामुळें थोरात सरदार यांनीं बसगडे येथील जमीन सदरहू मुलाचे नांवें करून दिली. ती यांचे वंशजाकडे अद्यापि चालत आहे.

---

१ सदरहु भाल्याचें पातें यांचे वंशज श्री. रावसाहेब पटवर्धन यांचेजवळ असून शिवाय श्रीपतरावांची रणविजयी तलवार, जंबिया, पिस्तोल ( गेरेचे ) आणि तमचाची स्फटिकाची मूठ इत्यादि ऐतिहासिक वस्तु फार पाहण्यासारख्या आहेत.

सन १८०७ मध्यें चिंतामणराव पांडुरंग व गंगाधर गोविंद या उभयतांमध्यें मिरजकुलसरंजामाचे दोन विभाग झाले. चिंतामणराव पांडुरंग ऊर्फ आपासाहेब यांनीं सांगली येथें वास्तव्य केलें व गंगाधर गोविंद मिरजेसच राहिले. सन १८०८ मध्यें श्रीमंत पेशवेसरकारांनीं या उभयतांची वाटणी मंजूर केली. श्रीमंतांच्या मंजूरीनें उभयतांमध्यें जी कलमबंदी वाटणी झाली त्या कलमबंदी यादींत-" श्रीपतराव मोरेश्वर यांचे तैनातेस जे गांव लावून दिले ते सुदामत चालत आल्याप्रमाणें चालावे " असें एक कलम आहे. पुढें श्रीपतराव वारल्यानंतर बळवंतराव मोरेश्वर यांनीं सरंजामाची व्यवस्था आपले हातीं घेतली. यापूर्वी गांवगन्नाचा वसूल वेळेवारी होईना. ह्मणून ३ पथकाच्या वाटण्या निराळ्या झाल्या. त्यावेळीं श्रीपतराव यांनीं आपले अंशाबद्दल स. ११८८ फसली सालीं मागणें केलें. त्यावेळीं मिरजकुलसरंजामाचा सर्व कारभार गंगाधरराव पहात होते. त्यांनीं श्रीपतराव यांचे सरंजामापैकीं २८०० रु. वसुलाचे दोन गांव दहिवडी व वायफळें सन १२१३ फसलींत स्वाधीन केले. बाकीची रकम २२०० रु. नक्त देणेची हमी घेतली होती. सन १२३० फसली अखेर गंगाधररावाकडे ५८८०० रुपये येणें होतें. त्याबद्दल बळवंतरावांनीं मागणी केली, परंतु याच सुमारास गंगाधरराव यांच्या सरंजामाचे ४ पोटविभाग झाले. सदरहु विभाग होण्याचे सुमारास बळवंतराव मोरेश्वर यांनीं कंपनीसरकारांचे अधिकाऱ्याकडे तक्रार करून आमचे सरंजामाची स्वतंत्र व कायमची व्यवस्था ह्यावेळीं व्हावी ह्मणून कळविल्यावरून मे. चापलीनसाहेब बहादुर यांनीं पूर्वी चालत आलेल्यासुद्धां गांवगन्ना भरतीस जमीनी वगैरे लावून देऊन स्वतंत्र यादी कंपनीसरकारचे सहीशिक्यानिशीं ता. ३ मे सन १८२१ इसवीची करून दिली. त्याप्रमाणें माधवराव गंगाधर यांस मे. चापलीनसाहेब बहादुर यांनीं ता. २२ फेब्रुवारी १८२२ इ. हुकूम केला कीं, बळवंतराव मोरेश्वर यांचे स्वाधीन त्यांचे

गांवगन्ना जमिनी व गांव अम्मलसुद्धां स्वाधीन करावेत. मे. साहेब बहादुर यांचे हुकुमाप्रमाणें माधवराव गोविंद यांनीं खालीलप्रमाणें लिहून पाठविलें तें:-

श्री

आज स्वारी राजश्री माधवराव गंगाधर ताा मोकदमानी मौजे मडगिनहाळ पे॥ लक्ष्मेश्वर सु॥ इसन्ने अशरीन मया तैन व अलफ. मे. चापलीनसाहेब बहादुर यांचा हुकुम आल्यावरून चिरंजीव राजश्री बळवंतराव मोरेश्वर यांचे तैनातीस मौजे मजकूर हा गांव लावून देऊन तुह्मांस हें आज्ञापत्र सादर केलें असे. तरी चिरंजिवाचे रजतलबेत वर्तणूक करून वसूल त्याजकडे देत जाणे जाणिजे. छ.२० जमादिलाखर. ( सदरहू गांव हल्लीं चालू आहे. )

सन १८२७ चे २९ अॅक्टान्वयें ( पेशवाईपासूनचे ) खानदानी सरदारांची दर्जेपट्टी करण्यांत आली. त्यांत दक्षिणेंतील सरदारांचे २ रे वर्गांत बळवंतराव मोरेश्वर पटवर्धन यांचें नांव ता. ४ जानेवारी १८२७ इ. रोजीं दाखल केलें गेलें. बळवंतराव ऊर्फ आण्णासाहेब हे पटवर्धनी बाण्याप्रमाणेंच शूर, करारी, स्वाभिमानी व तापट स्वभावाचे होते. मुलगे वयांत येऊन कर्ते सवर्ते होतात तोंच यांची पत्नी सौ. काशीताई निवर्तली. त्यामुळें मनास विरक्तता वाटून हे श्रीकाशीक्षेत्रीं वास करण्याकरितां आपले मातोश्रीसह निघून गेले. जाणेपूर्वी बळवंतरावांनीं मोठा दानधर्म केला व देवब्राह्मणांस इनामें दिलीं; व आपल्या स्वतःचे खर्चाची नेमणूकही करून घेतली होती. काशीक्षेत्रीं हे एकाद्या राजऋषीप्रमाणें रहात असत. तेथें यांच्या मातोश्री कैलासवासी झाल्या. नंतर यांनीं संन्यासाश्रम स्वीकारला. अशा प्रकारें चारी आश्रमांतून आयुष्यक्रमाचे सार्थक झालें. हे सन १८६० त त्या पुण्यक्षेत्रीं समाधिस्त झाले. यांना पुत्र पांच; पैकीं दुसरे श्रीपतराव हे सांगली संस्थानांत दत्तक गेले. पुढें लवकरच सांगलीकरास औरस पुत्र धुंडिराज झाले; तेव्हां दत्तक श्रीपतराव ऊर्फ विनायक-

राव भाऊसाहेब यांना नेमणूक झाली. धुंडिराजतात्यासाहेब सांगलीकर निपुत्रिक वारल्यामुळें भाऊसाहेब सांगलीकर यांचे पणतू विनायकराव चिंतामणराव हे हल्लीं सांगली संस्थानचे मालक होऊन यांनीं आपणांस चिंतामणराव आपासाहेब हें नांव धारण केलें आहे. बळवंतरावांचे तिसरे पुत्र गणपतराव; यांचे पुत्र त्रिंबकराव हे मिरजगादीवर दत्तक गेले. त्रिंबकराव निपुत्रिक वारल्यामुळें, भाऊसाहेब सांगलीकर यांचे नातू गोपाळराव गणपतराव हे मिरजगादीवर दत्तक आल्यामुळें गंगाधरराव बाळासाहेब हें नांव प्राप्त झालें असून हेच हल्लीं मिरजसंस्थानाधिपति आहेत. मिळून हल्लींचे सांगलीकर व मिरजकर हे बळवंतराव मोरेश्वर यांचेच वंशज होत. बळवंतराव काशीक्षेत्रीं गेल्यावर त्यांच्या व पो. ए. च्या सल्लयानें सरंजामगांवचे अधिकार त्यांचे पुत्र मोरेश्वरराव व गणपतराव हे चालवूं लागले. मोरेश्वरराव फार शांत व सुशील होते. तें बंधुवर्गाच्या संमतीनें सर्व कामकाज पहात असत. यांना पुत्रसंतान नसल्यामुळें दत्तकाची परवानगी येईपावेतों सर्व सरंजामाची व्यवस्था कृष्णराव ऊर्फ दाजीसाहेब पहात असत. पुढें दत्तकाची मंजुरी आल्यावर गोविंदराव यांचे पुत्र केशवराव हे मोरेश्वररावास दत्तक गेले. नंतर त्यांना श्रीपतराव मोरेश्वर असे ह्मणूं लागले. मोरेश्वररावांच्या पत्नीनें ( लक्ष्मीबाई ) मिरज गांवांत काशीविश्वेश्वराचे देवालयाचे आवारांत लोकोपयोगाकरितां पाण्याचें हौद बांधिले ते विद्यमान चालूं आहेत.

मोरेश्वरराव यांचे दत्तक चिरंजीव केशवराव ऊर्फ श्रीपतराव हे जुन्या खानदानी चालीचे मोठे बाणेदार, मानी व करारी होते. जरा स्वभावानें तापट असल्यामुळें, सर्वांशीं जरा तुटकपणानें वागत असत. तत्रापि बहुत कालपर्यंत पूर्वीचे वहिवाटीस धरून आपले बंधुवर्ग यांचे योग्य हक्क संभाळून मिळून वागत होते. हे कोठें प्रवासास गेले तर मामुली पद्धतीप्रमाणें त्यांचे पुतणे बळवंतरावआण्णासाहेब हे त्यांचे जागीं दाखल्याप्रमाणें सरंजाम वगैरेचे अधिकार



श्री० कै० आण्णासाहेब पटवर्धन.
मु० मिरज-किल्ला.





श्री. रावसाहेब [illegible] *B. A.* मु॥ मिरज – किल्ला.

व्यवस्था पहात असत. श्रीपतराव सन १९१५ त मधुमेहाचे विकारानें अजारी होऊन वारले. त्यापूर्वी आपले पश्चात् आपले अज्ञान चिरंजीवांचे व घराण्याच्या हिताचे दृष्टीनें सरंजाम वगैरे उत्पन्नाचे हक्क, अधिकार यांचे व्यवस्थेबद्दल त्यांनीं "व्यवस्थापत्र" करून ठेविलें होतें. परंतु त्यांच्या इच्छेविरुद्ध पोलिटिकल एजंटानें निराळीच योजना केली. त्या योगानें श्रीपतराव यास अनिष्ट वाटणारीच गोष्ट अमलांत आली. श्रीपतराव यांचें कुटुंब आपल्या लहान चिरंजीव नारायणराव ऊर्फ आबासाहेब या अर्भकासह सांगली रस्त्यावर बांधलेल्या बंगल्यांत हल्लीं रहात आहेत.

निळकंठराव यांचे चिरंजीव बळवंतराव ऊर्फ आण्णासाहेब हे लहानपणीं अशक्त प्रकृतीचे होते; पण पुढें वडिलाप्रमाणें सदृढ झाले. यांना वडिलाप्रमाणें अश्वविद्या, गाणें, बजावणें वगैरे शोक फार होता. हे माणसांचे विशेष भोक्ते असून थोर मनाचे होते. आपल्या आजोबाप्रमाणें घराण्याचे अभिमानी असून बंधुवर्गाबद्दल फार लोभ बाळगीत. यांनींही आजोबाप्रमाणें कागदपत्रांचा संग्रह व बहुतेक आलिकडील सर्व भाऊबंदांचे फोटो, ( कांहीं बायकांचे ) सुद्धां संग्रहास ठेविले आहेत. "खुद्द ग्रंथकर्त्यास त्यांचे संग्रही असलेल्या पटवर्धन घराण्यांतील निरनिराळ्या शाखेंतील पुरुषांचे फोटोचा विशेष उपयोग झाला आहे." त्याचें श्रेय त्यांचे चिरंजीव रावसाहेब यांचेकडेच आहे. आण्णासाहेब यांना संधिवाताचा विकार झाला होता. त्यांतून साधारण बरे होते. परंतु पुढें १२ वर्षांनीं पहिल्या विकाराचेंच पर्यवसान होऊन ते हृद्रोगानें सन १९१० त वारले. यांच्या मातोश्री ७२ वर्षांच्या वयाच्या असून पुत्रशोक आवरून प्रपंच कंठीत आहेत. आण्णासाहेबांनीं दोन लग्नें केलीं. पहिल्या कुटुंबाचे चिरंजीव निळकंठराव ऊर्फ रावसाहेब व दुसऱ्या कुटुंबाचे गणपतराव व रामचंद्रराव असे दोन पुत्र मिळून तीन आहेत. गणपतराव व रामचंद्रराव विद्यार्थी आहेत. निळकंठराव ऊर्फ रावसाहेब हे मुंबई

युनिव्हर्सिटीचे ग्रॅज्युएट असून एल्. एल्. बी. पर्यंत अभ्यास केलेले आहेत. यांनीं आपलें शिक्षण पुणें व मुंबई येथें केलें. यांना प्रवासाचा नाद असून वाचनाचा व्यासंग विशेष आहे. यांचा स्वभाव दिलदार असून घराण्याचे आभिमानी आहेत. साताराचे प्रसिद्ध वकील श्रीयुत दादासाहेब करंदीकर यांचे श्रीमंत रावसाहेब पटवर्धन हे जांवई होत. रावसाहेबांनीं आपले संग्रहांतील कागदपत्रांवरून आपल्या घराण्याची थोडक्यांत पण मुद्देसूद अशा माहितीचें टाचण देऊन, मागें वर्णिलेल्या ऐतिहासिक वस्तु दाखविल्या व आपले शक्त्यनुसार थोडीफार मदतही केली. याबद्दल याच स्थलीं " ग्रंथकर्ता " त्यांचें अभिनंदन करीत आहे ! !

गोविंदराव बल्लाळ यांना दोन पुत्र; हरिहरराव व केशवराव. केशवराव हे मोरेश्वरराव यांना दत्तक गेले. त्यांची हकिकत मागें गेलीच आहे. हरिहरराव ऊर्फ दादासाहेब हे स्नानसंधेशील आहेत. यांचे एकुलतेएक चिरंजीव माधवराव यांचा इंग्रजी अभ्यास मिरज हायस्कुलांतच झाला होता. माधवराव हे शांत व गरीब स्वभावाचे होते. हे तरुणपणांतच सन १९१४ त वारल्यामुळें दादासाहेबास अनिवार दुःख झालें आहे. आतां माधवरावांचे दोन पुत्र आहेत. माधवराव हरिहर पटवर्धन हे या ' ग्रंथकर्त्याचे ' मिरज-हायस्कुलांतील क्लासबंधू होत.

कृष्णराव बल्लाळ ऊर्फ दाजीसाहेब हे आपल्या बंधूप्रमाणें गाणें-बजावणें व घोड्यावर बसण्याचे फार शोकी असून, ऐषआरामी होते. हे रुबाबदार असून तापट होते. परंतु बंधुवर्गाबद्दल आस्था बाळगणारे होते. यांचे वडील बंधू मोरेश्वरराव वारल्यापासून सरंजामाचे अधिकार वगैरे व्यवस्था हे पहात होते. दाजीसाहेब स० १८८७ त वारले. त्या पूर्वी त्यांनीं व्यवस्थापत्र करून ठेविलें होतें. त्यांत आपले पश्चात् आपले हिस्शाचें सर्व उत्पन्न बंधुवर्गांनीं घ्यावें. परंतु, आपले कुटुंबाचे हयातीपर्यंत तिला आपले हिस्शास येणारे उत्पन्ना-

पैकीं बायकोच्या निर्वाहाकरितां १५०० रुपये नेमणूक व लोकोपयोगी धर्मादायाकरितां ५०० रु० एकूण २००० रुपये देत जावे असें लिहून ठेविलें आहे. त्याप्रमाणें नेमणूक घेऊन त्यांचें कुटुंब राधाबाईसाहेब आपल्या गांवांतील वाड्यांतच रहात आहेत.

हरिभटबावांचे दुसरे चिरंजीव बाळंभट आण्णा यांचे नातू श्रीपतराव यांचे घराण्याची हकिकत झाली. या घराण्याकडे हल्लीं जहागिरीचे ( सरंजामाचे ) दिवाणी—फौजदारी—दारु-आबकारी, स्टॉप, बेवारशी वगैरे सर्व हक्कासुद्धां १०००० दहाहजार व इनाम गांव जमिनी वगैरेंचे १२००० बारा हजार एकूण बावीस हजारपर्यंत उत्पन्न असून त्याची व्यवस्था मागें सांगितल्याप्रमाणें श्री० कै० श्रीपतराव यांनीं ' व्यवस्थापत्र ' केलें असतांही त्यांच्या इच्छेविरुद्ध पोलिटिकल एजंटानें वरील जहागिरीची व्यवस्था पाहण्यास मिरज संस्थानचे कारभारी यांस म्यानेजर ह्मणून नेमिलें आहे.

---

## ३ कुरुंदवाडकर, वाडीकर व कागवाडकर पटवर्धन.

महान भगवत्भक्त हरिभटबावा यांचे तृतीय पुत्र त्रिंबकपंतआपा हे प्रथम अक्कलकोटकर भोसले यांचे पदरीं होते. पुढें सन १७३६ सालांत कापशीकर राणोजी घोरपडे यानें त्रिंबकपंतआपांकडून कर्ज घेतलें; आणि कर्जाचे फेडीस कुरुंदवाड गांव लावून दिला. तेव्हां कुरुंदवाड येथें त्रिंबकपंत राहूं लागले. इ. स. १७५० पर्यंत बावांचे सर्व पुत्र कुरुंदवाडीं रहात होते. सन १७५०।५१ त कृष्णंभटबाप्पा हे मंगळवेढ्यास राहूं लागले. तसेंच सन १७६२ त गोविंदपंतनाना हे मिरजेस राहूं लागले. ज्याच्या त्याच्या सोईप्रमाणें जरी निरनिराळे रहात असत तरी प्रपंचाची सर्व सूत्रें सर्वांत वडील जे असतील त्यांच्या विचारेंच सर्व कुटुंब चालत असे. अदमासें

सन १८०० पर्यंत ह्मणजे परशरामभाऊसाहेब होते तोंपर्यंत सर्व ठिकाणची व्यवस्था भाऊंच्या विचारेंच चाले.

त्रिंबकपंतआप्पांचे दोन पुत्र; निळकंठराव व कोन्हेरराव हे दोघे बंधू मोठे पराक्रमी व धाडसी होते. निळकंठराव त्रिंबक हे हैदरावरील तिसऱ्या स्वारींत सन १७७१ त ठार झाले. नंतर कोन्हेरराव त्रिंबक हे सांवशीच्या लढाईंत सन १७७७ त ता. ९ जानेवारी रोजीं ठार झाले. निळकंठरावाचे पुत्र रघुनाथराव व शिवराव हे दोघेही पुष्कळ लढायांत होते. रघुनाथरावदादा हे परशराभाऊबरोबर प्रत्येक स्वारींत हजर होते. यांना अनेक वेळां जखमा झाल्या होत्या. रघुनाथ निळकंठ ऊर्फ दादासाहेब यांनीं "श्रीराघवजीचे" मंदीर ज्याला हल्लीं विष्णूचें देवालय ) ह्मणतात तें मंदीर स. १७९५ त बांधिलें. आणि कुरुंदवाडचा घाटही यांनींच बांधिला. हीं दोन्हीं कामें लाखों रुपये खर्चून केलीं असून, फारच प्रेक्षणीय आहेत. श्री० खासेसाहेब यांच्या पत्नी सिताबाईसाहेब यांनीं राघवजीचे मंदिरापुढें सन १८८० त सभामंडप बांधिला. शिवराव सुभेदार हेही बहुतेक स्वारींत होतेच. शिवराव यांना सुभेदार हे विशेषण मिळालें होतें. पुढें रघुनाथरावाचे पुत्र त्रिंबकराव, कोन्हेररावाचे पुत्र गणपतराव आणि शिवरावाचे पुत्र तीन; यांच्यांत निरनिराळे ठराव होऊन त्रिंबकराव रघुनाथराव कुरुंदवाडकर; गणपतराव कोन्हेरराव कागवाडकर व शिवरावाचे पुत्रांस वाडीकर असें ह्मणूं लागले. पुढें, कुरुंदवाडकरांत सीनीयर व ज्युनियर असे दोन भाग झाले. सरकारांशीं झालेले तहनामे वगैरे सर्व माहिती पुढें देत आहे. यादी त्रिंबकराव रघुनाथराव यांचे नांवें सरंजाम पडल्यानंतर वाटणीचे बाबतींत जाहल्या व्यवस्थेसंबंधें—

२४७२८४८५ सन १८०० सालीं त्रिंबकराव रघुनाथराव यांचे नांवें सरंजाम पडला तो, यानंतर खालीं लिहिल्याप्रमाणें व्यवस्था जाहल्याचा तपशील:—



श्री० कै० रघुनाथराव निळकंठ पटवर्धन, कुरुंदवाडकर.

सन १८८२ सालीं मि. थ्याकरे यांनीं शिवराव निळकंठ यांचे पुत्र कृष्णराव निळकंठराव व कोन्हेरराव यांच्या वाटण्या समान केल्या.

यादी वाटणी रा. रघुनाथराव निळकंठ व शिवराव निळकंठ यांची सु॥ सन सालास तिसैन मया व अल्लफ.

१ सरकारी पथकाचा सरंजाम आहे, त्याची वाटणी शिवराव यास द्यावयाची नाहीं.

२ फत्तेसिंग भोसले यांजकडील सरंजाम आहे त्यापैकीं जातीचे तैनातीस गांव लावले असतील त्यासुद्धां तैनात वजा करून बाकी सरंजाम राहील त्यांपैकीं गणपतराव कोन्हेर यांचे वाटणीचा वजा करून बाकी राहील सरंजाम तो शिवराव यास द्यावा. सरंजामाची चाकरी शिवराव यांचे पुत्रांनीं स्वारसुद्धां रघुनाथराव यांचे पथकांत करावी.

३ घरांतील वित्तविषय हत्ती, घोडीं वगैरे यांची वाटणी गणपतराव कोन्हेर याजप्रों तिसरा हिस्सा किंवा निम्मी द्यावी. याचा ठराव ती॥ स्व. रा. भाऊसाहेब व बाळासाहेब सांगतील त्याप्रमाणें रघुनाथराव व शिवराव यांनीं कबूल करावी.

४ शिवराव यास राहण्यास कुरुंदवाडची वाडी द्यावी. गणपतराव यांस वाडा बांधावयास ऐवज दिला आहे त्याप्रों ऐवज द्यावा.

५ पुरुषांकडील व बायकांकडील वस्तभाव वगैरे ज्याची त्याकडे असावी. त्याची वाटणी करूं नये.

६ मजमूचे कारभारांत शिवराव यासी संबंध नाहीं.

७ इनामगांव व किरकोळ इनामें यांची वाटणी उभयतां वडील सांगतील त्याप्रों उभयतांनीं कबूल करावी.

८ शिवराव यांची तैनात सरकारी पथकांत आहे. ३००० बेहद्यांत नेमणूक आहे. दोन हजार २००० सन तिसैन सालीं ती॥ रा. भाऊसाहेब पुण्यास आले तेसमयीं दोन हजार तैनात जाजती करून दिल्ही आहे. त्याची नेमणूक सरंजामांत नाहीं. सबब वडिलांनीं

दोन हजार ऐवजाचे स्वार होतील तितके सरकारांतून कमी करून तैनातीची नेमणूक करून दिल्यानंतर द्यावयाचे. ५००० पांच हजार येकूण तैनात पांचहजार रुपयांपैकीं कदीम तीन हजार व जाजती दोन हजार येकूण पांच हजार रुपयेचीं खेडीं सरंजामाचे बेरजे-बद्दल खेडीं नेमून देऊं.

येकूण खलमें आठ करार—

सदरहुप्रों आठ कलमें रघुनाथराव निळकंठ मुजुमदार यास मान्य असत. सदरहु लिा प्रों शिवराव निळकंठ कलम आठ मान्य असत. ता छ० २२ रमजान सल्लास तिसैन वैशाख अधिक-म्मास मुा नजीक कातरज.

# कुरुंदवाड घराण्याची माहिती.

हरभटजीचे तिसरे पुत्र त्रिंबकराव यांचा वंश कुरुंदवाडघराणें होय. त्रिंबकरावास निळकंठराव व कोन्हेरराव असे दोन पुत्र; पुढें वाटण्या होऊं लागल्या तेव्हां कुरुंदवाडचा सरंजाम निळकंठरावजीचे पुत्र रघुनाथराव आणि कोन्हेररावजीचे पुत्र गणपतराव या उभयतां-मध्यें सारखा वाटला गेला. रघुनाथराव यांस कुरुंदवाडकर ह्मणतात. रघुनाथरावास एक कनिष्ट बंधू शिवराव होते ते वाडीस रहात ह्मणून त्यांस वाडीकर ह्मणतात. गणपतराव कागवाडास राहूं लागले ह्मणून त्यांस कागवाडकर ह्मणूं लागले. या तिन्हीं घराण्यांविषयीं वेगळी हकिकत दिली आहे. कुरुंदवाडकरांकडे सरंजाम १२७९८९ रुपयांचा असून नोकरीस्वारांची संख्या२८० होती. कागवाडकरांकडे सरंजाम १००६९१ रुपयांचा होता व नोकरीस्वारांची संख्या २८० च होती.

पेशवाई बुडाल्यावर केशवराव पटवर्धन यांसी कंपनीसकारांतून तह जाहला. तो बहुतेक मिरजकरांशीं ज्या तऱ्हेचा झाला त्याच

प्रकारचा होता. मात्र नोकरीच्या स्वारांची संख्या सत्तर ७० होती. केशवरावजीस जातीची तैनात तीस हजार ३०००० रुपयांची दिल्ही. तहनामा खालीं दिला आहे.

यादी कंपनीसरकारांकडून आजम केशवरावबाबा पटवर्धन यांस ठरावून दिली पाहिजे. श्रीमंत राव पंडीत प्रधान यांचे सरकारांतून आसाहेबाकडे फौजेचे व जातीस वगैरे तैनातीचे सरंजामास मुलुख पेशजीपासोन चालत होता त्याविषयीं सु॥ सन अशरीन मया तैन व अल्लफ सन १८१९ ईसवी—कलमें—

१ फौजेची चाकरी कदीम मामुल स्वराज्याचे दौलतीचे बेमाजी व तैनातजाबत्यावरून जसे जाहिरात येतें, त्याप्रों श्रीमंतांची नोकरी करावी. ह्मणून सन सल्लास आशर मया तैनात पंढरपूरचे मुक्कामीं ठराव होऊन कंपनीसरकारतर्फेनें करार ठरावून यादी व पत्र रवाना केलें. त्या यादीचे तिसरे कलमांत लिा आहे. त्यास तैनात-जाबत्याप्रों चाकरी करण्यांत सरदारलोकांचा निभाव लागणार नाहीं. सबब मुलाहिजा करून हल्लीं ठराव केला कीं, सरंजामाचा मुलुख चालत आहे त्यापैकीं चौथाई स्वार चाकरीस द्यावे अगर त्याचे मोबदला सदरहू स्वारांचे तैनातीचा ऐवज तैनातजाबत्याचे शेन्यानें तिनशें रुपयेप्रमाणें होईल तो रोख सरकारांत द्यावा. अथवा त्या ऐवजास मुलुख तोडून द्यावा. त्याजवरून आसाहेबांनीं चौथायी स्वार आसामी ७० चाकरीस द्यावयाचा करार केला. त्याप्रमाणें सरकारांतून बहाल केला असे.

२ स्वारांची हजीरी हुकुम होयील तेव्हां द्यावी. घोडीं, माणूस धड-धडीत चांगले ठेवून बारमाही चाकरी करावी. स्वार कमी असल्यास त्याचे तैनातीचा ऐवज शेन्याप्रमाणें सरकारांत द्यावा. लष्करांतील कामकाजास ५।७ स्वार पाठविणें जाहल्यास सरकारतर्फेचे मुखत्यार असेल त्यास जाहीर करून पाठवावें, ह्मणजे गणतींत येतील. फौजेस काम नसल्यास चार महिने पर्जन्यकालांत छावणीकरितां आपले

जागेंत जाणेस रुखमत दिली जाईल. काम असल्यास रहावें लागेल.

३ चाकरी हुकूम होयील त्याप्रों करावी. तुंगभद्रा व गोदातीर यांवर चाकरी बहुतकरून येणार नाहीं. कदाचित् काम पडेल तेव्हां जावें लागेल. त्यास उत्तर करूं नये. तशा वेळेस फौजेच्या खर्चास शेन्याच्या अदमासानें मोहिमेंत सरकारांतून ऐवज देऊन तो ऐवज आपले स्वदेशी सरकारांत परत घेतला जाईल.

४ लढायींत, घोडा, माणूस जखमी व ठार जाहल्यास त्याचे सरकारांत कांहीं मागूं नये. कूल पडेल पान दारू गोळा वगैरे शेन्यांत समजून घ्यावें. या बेमाजीव शिरस्ता आहे. लेकीन मोठा मनुष्य सरकारचाकरीवर लढायींत जखमी होयील त्यास बक्षीस व कामास येईल त्यास बाळप्रत्रेशी करून देवून चालविलें जाईल.

५ जाहागिरीचे तालुक्यादि महाल मजकूर व बंदोबस्तास शिबंदी खर्च लागेल तो चाकरीचे स्वाराशिवाय करावा. नजीकचे महालीं खटला हंगामा पडल्यास महालीं जमात असेल त्यास कुमक करावी. सरंजामाचे महालांत बखेडा, मारामार जाहल्यास सरकारास जाहीर करावें. कुमक केली जाईल.

६ आसाहेबांना पावेतों इमानें इतबारें व बफादारीनें चालून चाकरी करतील तोंपर्यंत आपलेकडे व आपले खानदानीचे सरदाराकडे जहागिर बेखानश व बेफुरशीस आपले कबजेंत राहून चालेल. या बावी पंढरपूरचे करारांत पाचवे कलमीं लिहिलें आहे. त्यावरून हा करार केला असे याविषयीं नबाब मो अल्ला अलकाब गव्हरनर जनरल लॉटसाहेब बहादूर यांचे हुजूरची सनद सादर केली जाईल व पुढें ज्यांचे त्याचे अवलादीचे नांवें वंशपरंपरेनें नवी सनद घेणें लागेल त्याविषयीं सरकारांत अर्ज करावा. सरकारांतून मेहर्बानी करून नजर न घेतां सनद करून देवून जहागिर चालविली जाईल.

७ आसाहेबांकडील सरंजामाचें गांव व इनाम जमीनी वगैरे सरकार इलाखतें असतील ते चालत आल्याप्रमाणें चालतील निक्षत पडणार नाहीं.

८ आपले जहागिरीचे तालुक्यांत सरकारी अम्मल दुमाले सरंजामी व इनामगांव व जमिनी व वर्षासनें, धर्मादाय, देवस्थानें, रोजीनदार, खैरात व नेमणुका वगैरे पेशजीपासून चालत आहेत. ते व एखादे बाबत सरकारतर्फेनें बहाल असतां दरम्यान दिक्कत पडली असल्यास त्यासुद्धां सरकारी बेहड्याचे नेमणुके बमोजीब बिनदिक्कत जिकडे तिकडे चालावें व त्याचा कोणेविषयीं बोभाटा ठेवूं नये. कोणी जमीनदारांनीं खटला फंद फितूर केला अगर आपल्याशीं गैररुजू जाहल्यास तखशीर पाहून त्यास नशीहत करण्याबद्दल जपती करणें ती करावी. बाकीच्यांतून कोणी तक्रार केली असतां अगर कोणाचे नक्कल जाहल्यास सरकारांत इतला द्यावा. त्याचा बंदोबस्त व पारिपत्य सरकारांतून केलें जाईल.

९ आसाहेबांकडील जहागिरीचे मुलखांत रयत आबाद रहावी. इनसाफ वाजवी करून चोर, खुनी, तळीगार वगैरे यांचा बंदोबस्त चांगला ठेवावा. ह्मणजे सरंजाम इलाख्याचे तालुक्यांतील हर कोणाची दाद फिर्याद सरकारांत ऐकून फुरशीस करण्यास गरज नाहीं. फिर्याद येतील त्यास आपलेकडे पाठविले जातील. त्याचा इनूफिसाल वाजवी होत जावा. कदाचित् जहागिरीचे मुलुखांत बहुत बंदोमस्त होऊन चोऱ्या होवूं लागल्यास अगर भारी तखशीर झाली असतां त्याचा बंदोबस्त वाजवी इनसाफ आपलेकडून न झाल्यास सरकारांतून बंदोबस्त करणें लागेल.

१० सरकारचे हुकुमाशिवाय जमात करून लढायी कोणाशीं इरगीर करूं नये व आपसांत कांहीं मुकदमा तक्रारीचा पडल्यास लढाई नमूद न होतां तो मुकदमा फैसल्याकरितां सरकारांत जाहीर करावा. त्या इनफैसल सरकारांतून वाजवी करण्यांत येतील. त्याजवर कायम रहावें. या अनवयें चवथें कलम पंढरपूरचे यादींत लिहिलें आहे. त्या माफक हाली इजर करार असे.

११ आपले इलाख्याचे व तालुक्याचे नखशीरदार सरकारचे

तालुक्यांत आल्यास समजावें. चौकशी पाहून हवालीं केलें आतील व सरकारी इलाख्याचे मुलखांतील तखशीरदार वगैरे सरंजामाचे तालुक्यांत असल्यास त्याचे तलासाकरितां सरकारी लोक जातील. त्याची कुमक करून ते असामी हवालीं करून देत असावे.

१२ आसाहेबांचा दर्जा मरातब पेशजी श्रीमंतराव पेशवे बहादुर यांचे सरकारांतून पहिले दिवसांत चालत होता, त्याप्रमाणें कंपनीसरकारांतून चालविला जाईल. आपला मजकूर असेल तो जाहीर करावा. ऐकून वाजवी असेल तें केलें जाईल. कोणेविषयीं दिलेल पोंचणार नाहीं.

येकूण बारा कलमी सदहु लिहिल्याप्रमाणें करार ता० १२ माहे में अक्टोबर सन १८१९ इसवी याप्रमाणें तह झाल्यावर सन१८२१ सालीं कृष्णराव शिवराव वाडीकर निळकंठरावाचे नातू यांनीं आपणास हिस्सा मिळावा ह्मणून सरकारास थैली लिहिली, परंतु तपासाअंतीं असें कळलें कीं, केशवरावांचे वडील त्रिंबकराव यासी शिवरावांचे पुत्र कृष्णराव आणि निळकंठराव याणीं करार करून खुर्षीचे नेमणुका तोडून घेतल्या आणि सरंजामावरील आपल्या हक्काची सोडचिठ्ठी दिली. या कारणावरून हिस्सा मिळणार नाहीं असा ठराव झाला. सन १८२७ सालीं केशवराव वारले. त्यास रघुनाथराव, दादासाहेब, हरिहररावभाऊसाहेब, विनायकरावआपासाहेब आणि त्रिंबकरावआबासाहेब असे चार पुत्र होते. यांची मातोश्री हुशार, शहाणी व दक्ष होती. ती व दुसरे तीन असामी कारभारी याणीं सरंजामाचा कारभार चालवावा. आणि पुलिटिकल एजंट याणीं हिशेब तपासून साधारण देखरेख ठेवावी असें ठरलें. ही व्यवस्था येथें सुरळीतपणें चांगली चालून कांहीं गोंधळ वगैरे उत्पन्न झाला नाहीं. सन १८३७सालीं रघुनाथराव प्रौढ झाल्यावर त्यांस मुखत्यारी देऊन त्यांचे स्वाधीन सर्व सरंजाम केला. या वेळीं कर्ज वगैरे कांहीं नसून बरीच शिलक होती. या चांगल्या व्यवस्थेबद्दल रघुनाथरावाची मातोश्री

लक्षुमीबाई यांची सरकारांनीं फार स्तुति केली. रघुनाथरावांनीं संस्थानची व्यवस्था चांगली ठेविली नाहीं. फाजील खर्च वाढविला. आईचे कांहीं ऐकेनात. सर्व शिल्लक उधळून कर्ज केलें; याप्रों. अव्यवस्था कांहीं दिवस चालल्यावर आपणांस कारभार रेटत नाहीं असें पाहून त्यांनीं सर्व कारभार आपले बंधू हरिहरराव ऊर्फ भाऊसाहेब यांच्या स्वाधीन करून आपण स्वस्थ एकीकडे राहूं लागले. पुढें कांहीं काळानें हिस्से घेण्याचें भय दाखवून सर्व कारभार विनायकराव व त्रिंबकराव यांनीं बळकाविला. त्यांनीं व्यवस्था चांगली ठेवून बरीच सुधारणा केली. नंतर हिस्से घेण्याची आणखी भीति घालून विनायकरावांचे हातीं सर्व कारभार दिल्याचे व पुढें न जमल्यास हिस्से देण्याचे मोळसर रघुनाथरावांकडून या उभयतांनीं करार करून घेतले. सर्व व्यवस्था रघुनाथरावांचे ज्येष्ठ चिरंजीव केशवराव यांस आवडली नाहीं. परंतु वडिलांचे अर्धवट स्वभावापुढें व आपल्या चुलत्यांच्या धूर्ततेपुढें त्यांचें कांहीं चालेना. तेव्हां त्यांनीं कंटाळून कुरुंदवाड सोडलें. आणि इचलकरंजीस आपल्या मामाचे घरीं जाऊन राहिले. याप्रों कलह दिवसानुदिवस वाढत चालला तेव्हां सन १८४९ सालीं हिस्से करण्याविषयीं पोलिटिकल एजंट यांनीं सरकारास विचारिलें. त्यावरून सरकारांतून लिहून आलें कीं, हिस्से देण्याविषयीं कधींहि अनुमोदन देऊं नये आणि कनिष्ठ बंधूचा हात कारभारांतून अगदीं काढावा. याप्रमाणें अमलांत आल्यावर तिघां भावांनीं सरकारांत थैल्या पाठविल्या कीं, पेशवे सरकारच्या वेळेपासून हिस्से देण्याची वहिवाट असून त्या शिरस्त्याप्रों इतर पटवर्धनघराण्यांत हिस्से झाले असतां आह्मांसच विभाग न मिळण्यास कांहीं कारण नाहीं. याकरितां सरकारानें आह्मांस हिस्से द्यावे. तेव्हां पोलिटिकल एजंटास लिहून आलें कीं, जर हिस्से घेण्यास तिघां भावांचा फारच आग्रह असेल तर हिस्से करून द्यावे. परंतु हिस्से फार लहान होतील ह्मणून हिस्सेदारांस जमेदार समजलें जाऊन सरंजामाचे

मुलुखांवरील सर्व दिवाणी फौजदारी अंमल सरकारांत घ्यावा. यावर त्रिवर्गांनीं पुन्हा सरकारांत थैल्या पाठविल्या. अखेर सन १८५४ सालीं कोर्टऑफ डायरेक्टर्स यांनीं हिस्से करून देण्याचा ठराव केला. त्यांत वडील भावांकडे मोठा हिस्सा रहावा आणि त्यांजकडे सर्व नोकरीबद्दलचा ९६१८८१२ रुपयांचा मुलुख रहावा. वडील भावाकडे मात्र दिवाणी फौजदारी वगैरे पूर्ण अधिकार रहावा आणि बाकी त्रिवर्गांस जमेदारप्रमाणें समजावें. या अन्वयें मेजर इनव्हे-रारटीसाहेबांनीं वडीलकीबद्दल वडील भावाकडे १०००० रुपयेचा मुलुख निराळा काढिला. तसेंच नोकरीबद्दल १२००० रुपयांचा असा एकंदर २२०००रु०चा मुलुख; एकंदर उत्पन्न ९४०१३८८९ यांतून वजा करून बाकी ७२०१३८८९ चा सरंजाम चौघा भावांत सारखा वांटून १८००३८६८२ रुपयांचा मुलुख याप्रमाणें द्यावा. शिवाय ११९७३ रुपयांचे इनाम गांव आहेत ते सर्व वडील भावा-कडेच रहावेत आणि तिघां भावांस प्रत्येकीं ३००० रुपये मिळावे. सर्व कर्ज २२५२१०८२८४ उत्पन्नाच्या हिश्शाप्रमाणें वांटून द्यावें. आणि तिजोरींत जी रोकड व जवाहीर असेल तेंही सारखें वाटून घ्यावें, असा ठराव केला. परंतु हा ठराव अमलांत आणण्याचे पूर्वींच ते साहेब जाऊन त्यांचे जागीं बेलसाहेब पो० एजंट झाले. त्यापुढें हें हिश्शाचें प्रकरण आलें. तेव्हां त्यांनीं वरील वांटण्या नापसंत करून कांहीं नवीन शिफारशी सरकाराकडे केल्या. गेल्या दहा वर्षांच्या उत्पन्नाची सरासरी काढून हिस्से करावे. सर्व कर्ज वडील भावानें फेडावें. कारण त्यानें धाकट्या भावास कांहीं दिलें नाहीं व कर्ज वडिलार्जित नाहीं. तिघां हिस्सेदारांच्या जहागिरी-वरील दिवाणी फौजदारी अधिकार तिघांपैकीं एकाचे हातीं द्यावा आणि सर्व सरंजामाचे पांच विभाग करून त्यापैकीं दोन विभाग वडील भावास द्यावे. बाकी तीन त्रिवर्गांस द्यावे. ह्याप्रों भाग होऊन हिस्से झाले. त्रिवर्ग बंधूंनीं विनायकरावांस दिवाणी फौजदारी देण्या-

विषयीं नमुद केल्यावरून त्यांजकडे फक्त फौजदारी अधिकार मात्र दिला. दिवाणी अधिकार वडील भावाकडे राहिला. याविषयीं तक्रारी सरकारांत जाऊन कुरुंदवाडच्या वाड्याविषयीं नवीन तक्रार उपस्थित झाली. त्याजवरोन शेवटचा ठराव केला कीं, हिश्शाविषयीं कांहीं तक्रार सरकार इतःपर ऐकणार नाहीं. त्रिवर्गबंधूच्या हिश्शावरील दिवाणी अधिकार विनायकरावास द्यावा. त्रिवर्ग लहान भावांचीं नांवें पहिल्या प्रतीचे सरदारांत घालावीं. त्रिवर्गास दत्तकाची निराळी सनद देण्याची गरज नाहीं. कारण पडेल तेव्हां सरकार त्याचा योग्य विचार करील. वाडा वडील भावाचा असा समजला जाईल. परंतु त्यांनीं त्रिवर्गास रहाण्यास जागा अवश्य द्यावी. व ते देतील. याप्रमाणें शेवटीं कुरुंदवाड प्रकरणाच्या सर्व तक्रारी मिटल्या.

सन १८५५ सालीं वाटण्या झाल्यापासून दादासाहेब आपल्या हिश्शाचे दौलतीचें काम वीस वर्षें करून सन १८७५ त निवर्तले. हे शरीरसंपत्तीनें चांगले असून देखणे होते. यांस शिकारीचा फार शोक होता. दौलतीचे कारभारांत यांचे कुटुंब सीताबाईसाहेब मदत करीत. यांचा जन्म शके १७३४ सालीं झाला व यांचा काल शके १७९७ पौष व॥ १४ रोजीं झाला. यांस दोन पुत्र होते. पैकीं वडील पुत्र केशवराव पूर्वींच वारले होते. कनिष्ट पुत्र चिंतामणराव ऊर्फ बाळासाहेब यांचा जन्म शके १७७१ फाल्गुन शु॥ २ रोजीं झाला. यांचा मराठी व इंग्रजी अभ्यास एक ट्यूटर ठेवून वडिलांनीं करविला होता. त्यांनीं करवीर हायस्कुलांतही एक वर्ष अभ्यास करून म्याट्रिक्युलेशनची परिक्षा दिली. त्यांत पसार झाल्यावर कॉलेजांत राहून पुढील अभ्यास करावा असा त्यांचा मनोदय होता, परंतु इतक्यांत वडील निवर्तले व सर्व दौलत सरकारांनीं बाळासाहेबांचे स्वाधीन केली. यास्तव तत्काळ तो हेतू सिद्धीस गेला नाहीं. तत्रापि त्यांनीं दौलतीची व्यवस्था करून व कारभाऱ्याचे कामाची व्यवस्था करून पुणें येथील डेक्कन कॉलेजांत अभ्यास

करण्याची सवड काढिली. त्यांनीं लिटलगो परिक्षेची टर्म भरली व त्यावेळीं परिक्षेस बसणारही होते.

श्रीमंत बाळासाहेब सर्वांचे चहाते व धर्मात्मे होते. यांना तालमीचा व्यासंग विशेष होता. त्यांच्या शरीराचा बांधा जरी ठेंगणा होता तरी शरीर पिळदार होतें. यांची रहाणी जुन्या पद्धतीची होती. हे श्रीगणेशचतुर्थीचा वार्षिक उत्सव मोठ्या थाटाचा करीत. या उत्सवांत अन्नसंतर्पण व देकार विशेष असे. यांनीं आपल्या कारकीर्दींत संस्थानांत प्राथमिक व दुय्यम शिक्षणाचा फैलाव केला. कुरुंदवाड व तिकोटें येथें दवाखाने उघडणेंत आले. इंग्रजी राज्याचे धर्तीवर पोलीस, न्यायखातें व जमीनमहसुलीचे खात्याची रचना करून इंग्रजी कायद्यांत योग्य ते फेरफार करून लागूं करणेंत आले. यांना वक्तृत्वाचा नाद होता. एकेवेळीं कुरुंदवाड मुक्कामीं श्रीमंत सरकार आण्णासाहेब यांच्या अध्यक्षतेखालीं मुंबईकर पुनर्विवाहितांचीं व्याख्यानें करविलीं. त्यावेळीं श्री० बाळासाहेबांनीं त्यांचें खंडण केलें. त्याच सभेला या लेखकासही दोन शब्द बोलणें भाग पडलें. आपल्या देशांत उद्योगधंदे विशेष वाढावेत असें त्यांचें मत होतें. कुरुंदवाड येथें साखरेचा कारखाना काढण्याकरितां पुणें मुंबईकडील कांहीं माणसांस लॉटरी काढण्याची परवानगी सन १९०७ मार्च महिन्यांत दिली होती. श्री० बाळासाहेबांनीं आपल्या संस्थानांत एक उपयुक्त कारखाना चालवा या हेतूनें सदरहू मंडळीस लॉटरीची परवानगी दिली. पुढें सन १९०७ आक्टोबरमध्यें "दुसरा हुकूम होईपावेतों लॉटरीचीं सर्व कामें बंद ठेवावींत" असा हुकूम झाला. त्यानंतर तिसऱ्या सन १९०८ जानेवारी ता. १६ च्या हुकुमानें लॉटरी अजी बंद करण्यांत आली. संस्थानिकांच्या हक्कांची पायमल्ली झाल्याचें धडधडीत हें एक उदाहरण आहे. श्री० बाळासाहेबांनीं लॉटरीस परवानगी दिली असतां, लॉटरी बंद कां करविली ! ह्याचें उत्तर इतकेंच कीं, इंग्रज सरकारास तें रुचलें

नाहीं. या अपमानाच्या परिणामानें श्रीमंत बाळासाहेब यांचे मनास धक्का बसला. पुढें फेब्रुवारींत श्रीमंत बाळासाहेब आजारी पडले. जास्त प्रकृती बिघडल्याचें ऐकतांच हा लेखक श्रीमंतांचे चरण-दर्शनास जाऊन, श्रीमंतांच्याजवळ बसला. तों श्रीमंतांनीं माझे आंगावर हात टाकून ह्मटलें, "आपटे, हात दाब! मी आतां कसला बरा होतों." तेव्हां मी ह्मणालों, सरकार भिण्याचें कांहीं कारण नाहीं; श्रीगजाननाचे कृपेनें लवकरच बरें वाटेल. तों श्रीमंत पुन्हा ह्मणाले; "तूं उतरलास कोणाकडे?" मीं सांगितलें, लॉटरीऑफिसांत. तेव्हां श्रीमंत ह्मणाले, "आपटे, आतां मी जर बरा झालों तर काशीस जाऊन राहीन. हें राज्य आणि हे आण्णासाहेब! मला आतां कांहीं नको." नंतर लॉटरीसंबंधीं माझेबरोबर कांहीं बोलणें चाललें असतां, जवळ असलेले डॉक्टर यांनीं मला श्रीमंतांबरोबर बोलूं नका ह्मणाले; म्हणून मीं बोलणें बंद केलें. त्यावेळीं श्रीमंतांजवळ आण्णासाहेबही होते. त्याच दिवशीं श्री०बाळासाहेब यांचे दुसरें चिरंजीव दत्तक गेलेले श्री०बाबासाहेब व श्री०कोल्हापूरकर महाराज हे श्री०बाळासाहेबांना भेटण्यास आले होते.

सदरहु दुखण्यांतच सन १९०८ फेब्रुवारी ता. १६ रोजीं श्रीमंत बाळासाहेब कैलासवासी झाले. बाळासाहेब बुद्धीचे खोल, हुशार व मनमिळाऊ होते. दातृत्वांत यांचे बरोबरीचा आजपर्यंत एकही संस्थानिक झाला नाहीं. त्यामुळें यांना कर्जही बरेंच झालें होतें. यांना पुत्र दोन, पहिले भालचंद्र ऊर्फ आण्णासाहेब व दुसरे रघुनाथराव ऊर्फ बाबासाहेब. श्री० बाळासाहेब मोठे मुत्सद्दीही होते ह्मणण्यास हरकत नाहीं. यांनीं द्रव्याकडे वगैरे न पहातां मोठ्या खटपटीनें आपले दुसरे चिरंजिवास मिरज-मळा संस्थानच्या गादीवर बसविलें. श्री० बाळासाहेब देशाभिमानी व स्वाजसंध्येशील होते. श्री० कै० बाळासाहेब सन १८९५ त व पुन्हा सन १९०३ त असे दोन वेळ (चार वर्षे) नामदार जहाले होते.



श्री० कै० कविवर्य बापूसाहेब पटवर्धन, कुरुंदवाडकर, ज्युनियर.



श्री० सरदार आपासाहेब पटवर्धन, बी. ए. कुरुंदवाडकर,
सीनियर.

श्रीमंत भालचंद्र यांचा जन्म शके १७९५ वैशाख शु॥ १५ रोजीं झाला. भालचंद्रराव आण्णासाहेब यांचा मराठी अभ्यास जाहल्यावर इंग्रजी अभ्यास मिरज हायस्कुलांत झाला. " त्याच वेळीं त्या हायस्कुलांत हा लेखकही होता. " पुढें हे त्यांची सावत्र बहिण रावराजे दिनकरराव राजवाडे यांच्या नातवास दिली होती. त्या कारणानें त्यांच्याजवळच विद्याभ्यासास रहावें अशा हेतूनें अलाहाबाद येथें कॉलेजच्या अभ्यासास राहिले होते. सन १८९८ सालीं ग्रॅज्युएट होऊन संस्कृतांत पहिले आलेबद्दल त्यांना पदक मिळालें आहे.

श्रीमंत आण्णासाहेब यांचे हातीं संस्थानचीं सूत्रें औपचारिकरीत्या सन १९०८ च्या एप्रिलचे २३ तारखेस आलीं. त्याचे पूर्वींच सन १९०३ सालापासून ते आपले तीर्थरूपांच्या हाताखालीं संस्थानचे कारभारांत भाग घेत आले होते.

श्रीमंत अण्णासाहेब यांनीं आपले संस्थानांत प्राथमिक शिक्षण मोफत केलें. एक हजार वस्तीच्या गांवांत एक प्राथमिक शिक्षणाची शाळा, दोन हजार लोकवस्तीच्या गांवीं मुलांची व मुलींची प्राथमिक शाळा; पांच हजार लोकवस्तीच्या गांवीं इंग्रजी तीन इयत्तेपर्यंत शिक्षण देणाऱ्या शाळा उघडण्यांत येण्याबद्दल नियम मंजूर करून अंमल सुरूं आहे. कुरुंदवाड येथें मराठी सात इयत्तेपर्यंत व इंग्रजी पांच इयत्तेपर्यंत शिक्षण मिळतें. उचगांव तो अनगोळ येथें दवाखाना काढणेंत आला. प्रत्येक शाळेस स्वतंत्र इमारत करणेचा उपक्रम सुरूं केला असून त्याप्रों तीन इमारती झाल्या. लोकल सेसचे वसुलांतून $\frac{1}{3}$ रक्कम शिक्षण, आरोग्य वगैरे खातेकरितां वजा करून बाकीचे रकमेचा विनियोग योग्य तो होणेकरितां लोकलबोर्ड अस्तित्वांत आणिलें असून त्या बोर्डाचे शिफारशीस अनुसरून विनियोग होत आहे.

कुरुंदवाड येथील कारभारी ऑफिस, अनगोळ येथील मामलेदार ऑफिस, कुरुंदवाड येथील घाट व इतर सरकारी इमारती बऱ्याच अंशी नादुरुस्त असल्यानें त्या योग्य प्रकारें दुरुस्त करण्यांत आल्या. रेकार्ड

ऑफिस १८००० रु. खर्च करून नवीन बांधवून तेथें आतां रेकार्ड गोळा करून ठेवण्याचें काम चाललें आहे. श्रीमंत सरकार आण्णासाहेब यांना स. १९१६ फेब्रुवारी १ तारखेस अर्धांगवायूचा झटका आला. त्यांतून ईशकृपेनें ते पार पडले. या प्रसंगाचें स्मरण रहावें म्हणून संस्थानचे प्रजेनें श्रीमंतांचें नांव दिलेला एक हॉल कुरुंदवाडांत बांधणेंत यावा म्हणून सुमारें ९००० रु. रक्कम वर्गणीनें जमवून श्रीमंतांना नजर केली. श्रीमंतांनीं त्यांत २०००० रु. भरती घालून "भालचंद्र मेमोरियल हॉल" बांधविण्याचें काम सुरू असलेलें, आतां लवकरच पुरें होईल. कुरुंदवाडचे गांवचे अग्नेय दिशेस नवीन प्रकारचा कुस्तीचा आखाडा तयार केला असून त्यास त्यांचे परमप्रिय चुलते श्री. कै० गणपतराव बापूसाहेब यांचें नांव देण्यांत आलें आहे. याशिवाय विशेष उपयुक्त व किरकोळ इमारती सुमारें ३०००० रु. खर्चून बांधविल्या आहेत. सार्वजनिक लायब्ररीकरितां ५०००रु. किंमतीची इमारत नवीन दिली आहे.

कोआपरेटिव्ह संस्था अस्तित्वांत आणणें, शिक्षणाचा शक्य तितका फैलाव करणें व संस्थानचे अधिकाऱ्यांचे जागीं संस्थानचेच प्रजेपैकीं लायख इसम शिकवून आणून नेमणें अशा गोष्टींकडे श्रीमंतांनीं नजर दिली आहे. सर्व गांवीं पिण्याचे पाण्याची, शेतीकरितां पाण्याची, शाळा, चावडी व रस्ते वगैरे व्यवस्था चांगली करण्याकडे श्रीमंतांचें विशेष लक्ष आहे. नोकरांचे पगार जरूरीप्रमाणें वाढविण्याचेंही चाललें आहे.

खुद्द कुरुंदवाड येथें जेल, दवाखाना ( रात्रीं रहातां येईल असा ) मुलांची इंग्रजी शाळा व मुलींची शाळा, हेडक्वार्टर, पोलिसलाईन्स, पोलिस ठाणें व रिसाला वगैरेकरितां इमारती बांधण्याच्या असून, त्याप्रमाणें जेलचे कामास सुरवात झाली आहे. एक मार्केट बांधण्यांत येणार असून त्याचाच भाग म्हणून म्युनिसिपल ऑफिसही लवकरच बांधण्यांत येणार आहे. कुरुंदवाड गांवास महापुराचे पाण्या-

पासून उपद्रव होतो तो नाहींसा व्हावा म्हणून गांवचे कांहीं भागाची लेव्हल वाढविणें व नवीन वसाहत करणें असा प्रयोग चालू केला आहे. कुरुंदवाड गांवास नदीचें पाणी आणण्याकरितां २२५००० रुपयांच्या रकमेची उभारणी केलेली आहे. युद्धाचे कारणाकरितां कामगिरी तूर्त तहकूब आहे. कुरुंदवाडचे घाटावर ७००० रुपये अधिक खर्च करून एक देवालय बांधण्याचें काम पुरें होत आलें आहे. या देवालयांत श्रीगणेशाची मूर्ती स्फटिकाची ७ इंच उंच व ४ इंच रुंद अशी असलेली बसविण्यांत येणार आहे.

श्रीमंत अण्णासाहेब यांनीं संस्थानची प्रगती नेटानें चालविली आहे. पूर्वी पेक्षां संस्थानांत पुष्कळच उपयुक्त सुधारणा झाल्या असून अांगखी होत आहेत. श्रीमंत सन १९१२ सालीं नामदार झाले ते पुढें साडेतीन वर्षें होते. श्रीमंतांचा स्वभाव विनोदी, करारी व ममताळू असा आहे. श्रीमंतांची प्रकृति पूर्वीप्रमाणें ( निकोप ) व्हावी म्हणून हा अज्ञ लेखक श्रीगजाननाची प्रार्थना करीत आहे.

त्रिवर्ग बंधू पैकीं हरिहरराव भाऊसाहेब यांनीं सन १८३९ इसवी पासून सन १८४६ प्रर्यंत समाईक दौलतीचा कारभार वडील बंधू दादासाहेब यांचे नांवानें केला. अखेर दौलतीची वाटणी मिळण्यापूर्वी सन १८५१ त कैलासवासी झाले. यांची मुद्रा उग्र होती. शरीरानें भव्य व मनानें उदार होते. यांचा जन्म शके १७३६ सालीं झाला; व काळ शके १७७२ फाल्गुन शु॥ ४ रोजीं झाला. यांचे पुत्र बापूसाहेब वडिलामागें त्यांचे हिस्शाचा उपभोग घेऊं लागले. बापूसाहेब स्वभावानें फार मनमिळाऊ, खोल बुद्धीचे व गंभीर वर्तनाचे असे होते. यांना जरी फारसें इंग्रजी येत नव्हतें तरी यांचे विचार व करणी मोठ्या सुशिक्षित विद्वानासारखी होती. यांनीं संस्कृत भाषेचें चांगलें अध्ययन केलें असून, संस्कृत ग्रंथांचे अवलोकन सर्वदा चालत असे. यांनीं संस्कृत ग्रंथांचा मोठा संग्रह केला आहे. तसाच उपलब्ध प्राकृत ग्रंथांचाही केला आहे. यांना आरंभापासूनच कविता

करण्याचा विशेष नाद होता. यांची आर्या बहुतेक मोरोपंतांच्यास तोडीची ह्मणावयास कांहींच हरकत नाहीं. याचें कारण त्यांचे अंगीं प्रास, यमकें, अलंकार आणि कविविशिष्ट कल्पनाशक्ति व वर्णनशक्ति या गुणांचा अंकुर मुळापासूनच होता. इंग्रजींतील शेक्सपियर, मिल्टनवर्ड या महाकवींचीही थोडी थोडी ओळख यांनीं गुरुद्वारें करून घेतली होती. बापूसाहेबांनीं प्रथम शेक्सपियरकृत मॅकवेथ नाटकाचें कवितारूप मराठी भाषांतर केलें असून, द० प्रा० कमेटीकडे पाठविलें होतें. तें कमेटीनें पसंत केलें होतें. त्यानंतर त्यांनीं गंगावर्णन या नांवाच्या आर्या केल्या, त्याही कमेटीकडून पसंत झाल्या होत्या व मोरोपंताप्रमाणें आर्या करण्याची पद्धत असल्याबद्दल तारीफही केली. त्यानंतर त्यांनीं अलीकडे 'गणेशपुराण' आर्या रचून प्रसिद्ध केल्या होत्या. या तर फारच चांगल्या झाल्या असून कित्येक अगदीं हुबेहुब पंतांसारख्या उतरल्यां आहेत. यांना केवळ विद्येचें व्यसन असून, बाकीकडे हे दुर्लक्ष करीत नव्हते. आपले हिश्शाचे दौलतीचा व अलीकडे त्रिवर्गांच्या तिन्ही हिश्शांचा कारभार शिस्तपूर्वक चालवीत होते. यांचे चुलते विनायकराव आप्पासाहेब यांस अखेरीस वायूचा विकार होऊन त्यांनीं आपला पूर्वीचा क्रम कांहीं वर्षं सोडला. तरी बापूसाहेबांनीं उच्छृंखळपणा न करितां निराळे होण्याचा प्रसंग येऊं दिला नाहीं. यांना बाग, व इमारतींचाही फारच शोक होता. कुरुंदवाड येथें परठिकाणची बरींच झाडें आणून लाविलीं होतीं. देशी व्यापारास उत्तेजन द्यावें; देशी कला सुधारण्याचे उद्योग धंदे वाढवावे इत्यादि त्यांचे विचार उदात्त होते. अशा कामीं सहाय्य करण्यास ते तत्पर असत. पुण्यास मेणबत्त्या व सुताच्या गुंड्या व दुसरे जे उद्योग निघाले त्यास यथाशक्ति द्रव्यद्वारासुद्धां आह्मी सहाय्य करूं असें तेथील उत्पादकास त्यांनीं कळविलें होतें. देशी कापड वापरण्याचा नियम चालविला असोन, कुरुंदवाडास पैठणी चंदेरीसारखीं रंगानें व सुतानें व विणकरीनें



श्री० कै० आप्पासाहेब पटवर्धन कुरुंदवाडकर, ज्युनियर



श्री० कै० दाजीसाहेब पटवर्धन कुरुंदवाडकर,



श्री० सरदार नानासाहेब पटवर्धन, कुरुंदवाडकर, ज्युनियर.

भर्शी पागोटीं विणण्याचे माग ठेविले होते. तसेच धोतरजोडे, लुगडीं, पंचेजोडच्या वगैरे कापड विणण्याचे माग ठेविले होते. त्यांनीं कुरुंदवाडास एक ज्योतिषशाळा स्थापन केली होती. रावबहादुर केरोपंत छत्र्यांनीं ज्योतिष शिकविण्याचें अभिवचन दिल्यावरून ती शाळा त्यांनीं मोठ्या आनंदानें पुण्यास ठेविली. पुणें मुंबईकडे वारंवार जाऊन विद्वानांच्या गाठी घेऊन त्यांचेबरोबर संभाषण वादविवाद करणें त्यांना फार आवडत असे. त्यांना तसबिरी काढण्याचा शोक असून तत्संबंधीं यंत्रें वगैरे बाळगिलीं होतीं. यांना माधवरावभाऊसाहेब ऊर्फ गणेशदास या नांवाचे पुत्र आहेत. हल्लीं कुरुंदवाड ज्युनियरचे अधिकार भाऊसाहेब यांच्याकडेच आहेत. त्यांना घोडयाचा शोक फार आहे. श्रीमंत भाऊसाहेबांनीं तर या घोडयाचे शोकांत हजारों रुपये खर्च केले. यांचे पुत्र श्रीमंत गणपतरावबापूसाहेब हे पी० इ० चे परिक्षेंत उत्तीर्ण झाले आहेत.

विनायकरावआपासाहेब यांचा जन्म शके १७४४ सालीं झाला. दौलतीची वाटणी मिळाल्यावर दिवाणी, फौजदारी वगैरे अधिकार मिळाले ते यांच्या हुषारीनें व कर्तृत्वानें मिळाले. लोकव्यवहार, राजनीति, वादविवाद करणें वगैरे कामीं यांची हुषारी व शहाणपण फार होतें. साहेबलोकांच्या भेटी घेऊन त्यांजवर आपली छाप बसवून त्यांचीं मनें आपल्यासारखीं करून घेणें यांत तर हे फार वाकबगार असत. सर्व सरदार व राजे लोकांत यांचें मोठें वजन व प्रतिष्ठा असोन इकडील सरदारांत ते प्रमुख असत; जसे सरदारलोकांत तसेंच साहेबलोकांतही यांचें वजन असे. जेव्हां कुरुंदवाडदौलतीच्या वाटण्या झाल्या तेव्हां वडील भावाखेरीज बाकीच्यांस फारच लहान हिस्से ह्मणजे २०।२५ हजारांचे येऊं लागले ह्मणून त्रिवर्ग कनिष्ठ बंधूंनीं एकत्र रहाण्याचें करून आपला बोज जाऊं दिला नाहीं; हें केवळ यांच्याच कर्तृत्वाचें फळ होय. त्रिवर्गबंधूंमध्यें वितुष्ट येण्याचा प्रसंग न येण्याजोगी शिस्त ठेवून यांनीं अखेरपर्यंत तसें चालविलें व त्याचें

फळही त्यांस अखेर मिळालें. कारण त्यांचे तिसरे बंधू त्रिंबकराव आबासाहेब सन १८६८ सालीं वारले. तेव्हां त्रिवर्गबंधूंची एकवाक्यता व एकविचार मनांत आणून सरकारांनीं इनामाशिवाय बाकी त्यांचा हिस्सा दोन बंधूंसच दिला. तसेच आपासाहेब यांची हुषारी पाहून त्यांस सन १८६८ सालीं मुंबईसरकारनें कायदे कौंसिलचे मेंबर नेमिलें. पुढें वायूचे विकारानें शरीरभाग निर्जीव झाले व त्याच व्यार्धीत सन १८७६ सालीं ते वारले. हे चांगले देखणे होते. यांची भाषण करण्याची शैली फार मोहक होती. यांचे वरचेवर पुण्यास जाणें येणें असे. सर्व सरदारांत एकवाक्यता असून आपले हक्कासंबंधीं किंवा हरएक प्रकरणीं सरकारांशीं मागणें करणें तें सर्वांनीं मिळून करावें व त्याकरितां सरदारांचें एक कौन्सिल असावें असाही त्यांचा विचार होता. हे सर्वांस प्रिय होते. यांस आपलेजवळ चांगले मल्ल बाळगुन कुस्त्या करविण्याचा फार शोक होता. यांचे पश्चात् यांचे पुत्र दाजीसाहेब यांच्या स्वाधीन त्यांचा हिस्सा सरकारानें केला. दाजीसाहेब यांचा अभ्यास बाळासाहेबांबरोबर कुरुंदवाड व करवीर येथें जाहला हरिहरराव ऊर्फ दाजीसाहेब व गणपतराव ऊर्फ बापूसाहेब हे एकविचारानें वागत होते.

त्रिंबकराव आबासाहेब हे शके १७४५ सालीं जन्मले. हे वडील बंधूंच्या विचारें वागत होते. यांणीं मृत्युलेख केला होता त्यांत आपला हिस्सा दोघा बंधूस द्यावा असें होतें. या लेखाप्रमाणेंच सरकारांनीं केलें. श्री० दाजीसाहेब यांचा प्रपंच मोठा होता तरी त्यांनीं व्यवस्थेशीर वागुन संस्थानचें कामही उत्तम चालविलें होतें. हे सन १९११ आगष्ट ता. २८ रोजीं स्वानंदवासी झाले. यांचे पश्चात् यांच्या सहा पुत्रांपैकीं हल्लीं पांच पुत्र आहेत. या पांच पुत्रांत सर्वांत वडील विनायकराव ऊर्फ नानासाहेब यांच्यावर सर्व कुटुंबाची जबाबदारी पडली. श्रीमंत नानासाहेबांनीं आपल्या वडिलांप्रमाणेंच सर्व व्यवस्था उत्तम ठेविली आहे. श्रीमंत नानासाहेबांनीं आपल्या बंधूंची व्यवस्था



श्री० आबासाहेब पटवर्धन, कुरुंदवाडकर.



श्री० आण्णासाहेब पटवर्धन, कुरुंदवाडकर.



श्री० कै० नानासाहेब पटवर्धन, वाडीकर.



श्री० बाबासाहेब पटवर्धन, वाडीकर मु० पुणें.

आपल्याप्रमाणेंच ठेविली असून सर्वांना हे विशेष प्रिय आहेत. हें श्रीमंत नानासाहेबास भूषणावह आहे. श्री० नानासाहेबांस घोड्याचा शोक विशेष आहे. बहुतेक रोज सकाळीं श्रीमंत पागेंत दोन तास बसतातच. यांचें शिक्षण मिरज हायस्कुलांत मॅट्रिकपर्यंत झालें आहे. तसेंच यांचे कनिष्ठ बंधू आबासाहेब मॅट्रिकचे परिक्षेस गेले होते. एवढें मात्र खचित आहे कीं, अद्यापीहि कुरुंदवाड येथें जसे उत्तम घोडे असतात तसे दक्षिणेंतील इतर संस्थानिकांत नसतात.

---

# कुरुंदवाड-वाडीकर पटवर्धन.

त्रिंबक हरीचे नातू रघुनाथराव नीळकंठ व शिवराव नीळकंठ या उभयतांमध्यें सन १७९२ सालीं वाटण्याविषयीं बोलणें निघालें. तेव्हां परशरामभाऊंच्या विद्यमानें ठराव होऊन यादी जाहल्या. त्यांत पेशव्यांनीं दिलेल्या सरंजामावरील शिवरावांनीं आपल्या हक्काचा राजीनामा दिला. आणि अक्कलकोटच्या राजाकडून मुळारंभीं मिळालेला गांव आणि कांहीं नेमणुक घ्यावें व आपल्या वडील भावाचा पोटसरंजामदार रहाण्याचें कबूल केलें. शिवराव बहुतेक वाडीस रहात असत ह्मणून यांना वाडीकर* असें ह्मणतात.

श्रीगणपती. फे. नं. १०८२ कु. द.

चिरंजीव राजश्री त्रिंबकरावआपा यांसी प्रती परशराम रामचंद्र आशिरवाद उपरी चिरंजीव राजश्री रघुनाथरावदादांनीं चिरंजीव राजश्री शिवराव सुभेदार यांस कुरुंदवाडची वाडी ठाणें सुद्धां ठेविली आहे. त्याप्रमाणें तुह्मासीं पत्र आहे. तरी वाडी ठाणेंसुद्धां चिरंजिवाचें जिम्मे सदर बाबी तेथील पाटलाचे पेशजी चालत आल्याप्रमाणें चालवावें असें चिरंजीव दादांनीं लिहिलें होतें. त्याजवरून चिरंजीव

---

*वाडीकर ह्मणजे नरसिंहवाडी नव्हे; कुरुंदवाडची वाडी निराळी आहे.

राजश्री सुभेदार यांची बेरीज पेशजीपासून वाडीची वतनदारी व इनाम चालत आल्याप्रमाणें चालवावें. असा करार करून चिरंजीवाची चिठी घेतली तीही पाठविली आहे. तर वाडी ठाणेंसुद्धां हवाली करावें. छ. २७ सव्वाल सु॥ सन अर्बा तिसैन मया व अल्लफ बहुत काय लिहिणें हे आशिरवाद. ( सन १७९४ )

श्रीगणराज.

चिरंजीव राजश्री आपा यासी प्रती रघुनाथराव नीळकंठ आसिरवाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जावें. विशेष चिरंजीव राजश्री सुभेदार यांजकडे वाडी मौजे कुरुंदवाड हा गांव देणेविषयीं पेशजीं लिहिलेंच आहे. त्याचें उत्तर तुम्हीं लिहिलें कीं, तासगांवाहून वडिलांचें पत्र गांव हवालीं करण्याविशीं आलें. त्यास गांव हवालीं करतों म्हणून त्यास वाडी मजकूरचा पायगोंडा पाटील येथें पुण्याचे मुक्कामीं आला. त्यानें वर्तमान सांगितलें. त्यास वडिलांचे आज्ञेप्रमाणें जिरांजिवाचे हवालीं गांव केला असल्यास उत्तमच जाहलें. कदाचित् पाटील इकडे आल्याकरितां गांव हवालीं होण्यास दिकत पडली असली तर हल्लीं पाटलाची चिट्ठीही पाठविली आहे. व तुम्हांस हें पत्र लिहिलें आहे. तर वडिलांचे आज्ञेप्रमाणें वाडी गांव बिन दिकत चिरंजीव राजश्री * सुभेदार यांचे स्वाधीन करावा व वाडीकर पाटील यांस आपली वस्तभाव व दाणा आणून ठेवावयास कुरुंदवाडी घराची सोय करून द्यावी. रा॥ छ. ७ जिलकाद सन आर्बा तिसैन मया व अल्लफ बहुत काय लिहिणें हे आशिरवाद. ( सन १७९४ )

याप्रमाणें निर्वेधपणें पुष्कळ दिवस चाललें होतें पुढें सन १८२१ सालीं शिवरावांच्या मुलांनीं आपणांस कुरुंदवाड जहागिरींतून हिस्सा मिळावा म्हणून सरकाराकडे थैल्या पाठविल्या. परंतु पूर्वींचा ठराव सरकारास कळनांच वडिलांनीं सरंजामावरील हक्क सोडून दिल्यामुळें हिस्सा मिळणार नाहीं असा ठराव केला. सन १८२२ सालीं

* या घराण्यांत दोन सुभेदार व यादवाडकरांत एक असे सुभेदार झाले.

शिवरावांच्या इस्टेटीचे बरोबर दोन विभाग करून कृष्णराव व निळकंठराव यांस दिले. पुढें शिवरावाचे द्वितीय कुटुंबास कोन्हेरराव तिसरे पुत्र झाले. तेव्हां धारवाडचे कलेक्टर यांनीं तिघांस शिवरावाची इस्टेट सारखी वाटून दिली. सन १८३७ सालीं निळकंठराव निपुत्रिक वारले; तेव्हां त्यांचा हिस्सा २१७८ रुपयांचा सरकारानें खालसा केला. आणि त्यांच्या बायकोस कांहीं पेन्शन दिलें. पुढें सन १८४० सालीं कृष्णराव वारले. त्यांस चिंतामणराव आणि त्रिंबकराव असे दोन पुत्र होते. चिंतामणरावास कृष्णरावाची नेमणूक द्यावी किंवा नाहीं याचा विचार पडला. परंतु तो शेवटीं औरस असल्यामुळें द्यावी असा ठराव झाला. पुढें तोही सन १८४८ सालीं निवर्तला. तेव्हां त्यांचा हिस्सा खालसा केला. फक्त इनाम गांवें त्यांच्या दोघी बायकांकडे चालविलीं. कोन्हेरराव आपल्या इस्टेटीचा उपभोग घेत मिरजेस जाऊन राहिले. यांना पुत्र तीन; गणपतराव, निळकंठराव व विनायकराव. गणपतराव दत्तक गेले. सन १८८२ त कोन्हेरराव स्वर्गवासी झाले. त्यानंतर दोनच वर्षें निळकंठराव होते. म्हणजे निळकंठराव सन १८८४ त वारले. यांचे पुत्र गंगाधररावनानासाहेब हे संस्थानचे अधिकारी झाले. हे वाडीकर संस्थानिक नेहमीं मिरज येथेंच वडिलार्जित वाड्यांत रहात असत. या संस्थानचें उत्पन्न अगदीं थोडें आहे. इतर संस्थानिकांपेक्षां उत्पन्नाचें मानानें हें वाडी संस्थान अगदींच लहान आहे. वाडीकर यांना दिवाणी फौजदारीचा अधिकार आहे. श्रीमंत नानासाहेब वाडीकर हे सन १९१४ त कैलासवासी झाले. कै० श्रीमंत गंगाधररावनानासाहेब यांचें कुटुंब व एक पुत्र हल्लीं आहेत. पुत्राचें नांव श्रीमंत गणपतराव गंगाधरराव ऊर्फ दाजीसाहेब पटवर्धन वाडीकर होय. हे वयानें लहान असल्यामुळें, मे. पो. एजंटसाहेब बहादूर यांचे देखरेखीखालीं तूर्त वाडीसंस्थान आहे. श्रीमंत गणपतरावदाजीसाहेब यांचा विद्याभ्यास चालू आहे.

श्री० विनायकराव कोन्हेरराव ऊर्फ बाबासाहेब पटवर्धन वाडी-

कर हे नेहमीं पुण्यास असतात. पुणें येथें शुक्रवार पेठेंत यांनीं आपल्याकरितां जें घर बांधविलें आहे; त्यांत थोड्या जागेंत सर्व सोयी उत्तम केलेल्या आहेत. घराची जागा जरी अरुंद आहे तरी विशेष सोईकरितां घर तीन मजली बांधिलें आहे. यांना बगीच्याचा शोक असल्यामुळें, या लहानशा घरास बगीच्यानें सुशोभित केलें आहे. श्रीमंत विनायकरावबाबासाहेब वाडीकर पटवर्धन यांचा जन्म सन १८५८ त झाला. यांचा विद्याभ्यास कोल्हापूर येथें सरदारस्कूलमध्यें झाला. त्यावेळीं त्यांचेबरोबर हल्लींचे मिरजकर, इचलकरंजीकर, विशाळगडकर व माजी मुधोळकर व सावंतवाडीकर वगैरे चीफ शिकत होते. सिव्हीलसर्विसच्या कोर्समध्यें दाखल होण्याकरितां यांची शिफारस झाली होती; परंतु ओव्हरएजमुळें तें शिक्षण मिळालें नाहीं. सन १८८६ त कर्नल जे डब्ल्यू. वॉटसन पो. ए. यांनीं बाबासाहेबांस काठेवाडांत वाकानेर स्टेटमध्यें ट्रेझरी आफिसर नेमिलें. तेथें जेलसुपरिंटेंडेंट, पोलिस सुपरिंटेंडेंट व म्याजिस्ट्रेट वगैरे कामें केलीं. पुढें सन १८९४ त मोहनपूर संस्थानचे हे फुलपावर कारभारी होते. नंतर हे सन १८९७ त प्रकृतीच्या स्वास्थतेकरितां पुणें मुक्कामीं राहण्यास आले. त्या सालापासून त्यांनीं पुणें येथें माजिस्ट्रेट व स्पेशल माजिस्ट्रेटचीं कामें सन १९११ पर्यंत केलीं. पुढें प्रकृतीच्या त्रासामुळें यांनीं कामें सोडिलीं. यांनीं वेळोवेळीं उत्तम कामगिरी केल्याबद्दल सर डब्ल्यू लिवारनरसारख्यांची पुष्कळ सरटिफिकिटेंही यांना मिळालीं आहेत.

बाबासाहेबांनीं शुक्रवार पेठेंत पुणें येथें सन १९०८ सालीं घर बांधिलें. यांना गाण्याचा व वैद्यकीचा नाद विशेष आहे. वैद्यकी धर्मार्थ करितात. हे विद्यमान पर्वती देवस्थानचें पंचाचें काम करीत आहेत. संस्थानचे हिस्से होण्याच्या पद्धतीप्रमाणें यांना बरोबर हिस्साही मिळाला असता; परंतु आपलें संस्थान उत्पन्नाचे मानानें अगदीं लहान, त्यांत वाटण्या होण्यानें संस्थान फारच निकृष्ट स्थितींत

राहिलें असतें हें लक्षांत आणून, बाबासाहेबांनीं आपलें नुकसान सोसून " पो. ए. कर्नल फेरिस यांचे विचारें सन १९०८ मार्चमध्यें इतर कोणतीही वाटणी न घेतां आपले निर्वाहापुरती कायमची नेमणुक १५०० शेची करून घेतली. आणि आपणास औरसपुत्र झाल्यास सदरहु नेमणूक सतत चालावी न झाल्यास सदरहु नेमणूक संस्थानकडे जमा व्हावी. " अशा रीतीनें संस्थानचें हित बाबासाहेबांनीं केलें हें त्यांना अत्यंत भूषणास्पद आहे.

ह्या वाडीकर पटवर्धन संस्थानासंबंधानें इंग्रज सरकारांनीं केलेली परिस्थिती लक्षांत आणितां, मनास अत्यंत वाईट वाटतें. प्रत्यक्ष सख्या भावाचे हिस्से — सख्या भावास न देणें हें कृत्य न्यायाचे दृष्टीनें इंग्रज सरकारास गैर आहे. तरी अशा अन्यायी कृत्याचा त्याग करून इंग्रज सरकारानें सदर उत्पन्न परत करून आपणास न्यायी हें भूषणपद भूषवतील अशी फार फार उमेद आहे.

---

## कुरुंदवाड-कागवाडकर पटवर्धन.

पेशवाई बुडाली तेव्हां कोन्हेरराव त्रिंबक यांचे पुत्र गणपतराव हयात होते. केशवराव रघुनाथ आणि गणपतराव या उभयतांस कुरुंदवाडचा सरंजाम वाटून दिला होता. केशवरावांशीं ज्या प्रकारचा कंपनीसरकारचा तह जाला. त्याच प्रकारचा तह गणपतरावांशीं निराळा झाला. यांस २०००० रुपयांची जातीची तैनात मिळाली; व पुढें इतर सरदारांप्रमाणें नोकरीच्या स्वाराबद्दल ९६१२४१२ नेमणूक ठरली. सन १८२१ सालीं गणपतरावजींनीं चापलीनसाहेबाचे अनुमतानें त्रिंबकराव वाडीकर हा कृष्णराव वाडीकराचा मुलगा दत्तक घेतला. व त्याची मुंज केली आणि त्यांस आपल्या पश्चात् जहागिरी चालवावी म्हणून सरकारास गणपतरावांनीं थैली लिहिली. परंतु ही गोष्ट त्यावेळीं सरकारांनीं कबुल केली नाहीं. पुढें सन १८२५ सालीं

गणपतराव मरले. पुढें सरकारांनीं त्यांचे पुत्रास गादीवर बसवून त्यांच्या नांवें जहागीर चालविली. त्यावेळीं त्रिंबकरावांचे वय ११ वर्षांचें होतें ह्मणून संस्थानचे जुने कारभारी व त्रिंबकरावांचें पूर्व घरचे वडील कृष्णराव वाडीकर यांस कारभार पहावयास नेमिलें. त्यांच्या हातून व्यवस्था नीट राहीना तेव्हां सन १८३२ सालीं जुन्या कारभाऱ्यास काढून एकट्या कृष्णरावाचे हातींच कारभार दिला. तरी कांहीं कारभार सुरळीत चालेना. कृष्णरावानें कर्ज केलें आणि गांव सावकाराकडे गहाण टाकिले. इतक्यांत त्रिंबकराव वयांत येऊन प्रौढ झाले. तेव्हां सर्व संस्थान त्यांच्या स्वाधीन केलें. त्यांच्या हातूनही संस्थानची व्यवस्था नीट राहीना. ते व्यसनांत गुंग राहूं लागले. जवळ वाईट लोकांस बाळगिलें. पाहिजे ती उधळपट्टी चालविली. कर्ज न फिटतां आणखी कर्ज होऊन गांवें दिवाणी फौजदारीसुद्धां सावकाराकडे गहाण टाकिलीं. ते रयतेस नागवून फार जुलुम करूं लागले. याविषयीं सरकाराकडे तक्रारी गेल्या तेव्हां सरकारानें याजकडून गुन्हेगारी घेतली. सन १८५१ सालीं त्रिंबकरावास वायू झाला. तेव्हां त्यांनीं दत्तक घेण्याची परवानगी मागितली. ती सरकारांनीं दिली नाहीं. पुढें सन १८५७ सालीं त्रिंबकराव वारले. आणि सर्व दौलत सरकारांनीं खालसा केली. मात्र त्यांच्या दोघा बायकांकडे ८८००० हजार रुपयांची जिनगी होती ती तशीच राहूं दिली. शिवाय ११००० रुपयांची नेमणूक दिलीं व राहण्यास वाडा दिला. सन १८६१ सालीं धाकटी बायको वारली. तेव्हां तिची नेमणूक खालसा केली. येणेंकरून एकंदर ११२००० वसुलाचा मुलुख इंग्रज सरकारांनीं आपल्याकडे घेतला या संस्थानी मुलुखापैकीं ५६ गांवें बेळगांव जिल्ह्यांत. १५ सोलापूर जिल्ह्यांत आणि तीन पुणें जिल्ह्यांत याप्रमाणें सरकारानें खालसा केलीं.

कागवाडचा वाडा गणपतरावांनीं बांधविला. वाड्यास लागून असलेलें श्रीगणपतीचें देवालय कै० त्रिंबकरावसाहेब यांनीं बांधविलें.

देवळाचे गाभाऱ्यास लागून असलेला मंडप आपासाहेब यांचें कुटुंब श्री० ग० पार्वतीबाईसाहेब यांनीं बांधविला. देवळापुढील मोठा सभामंडप विद्यमान असलेले श्री० त्रिंबकराव गणपतराव ऊर्फ आपासाहेब पटवर्धन कागवाडकर यांनीं बांधविला आहे.

श्री० कै० आपासाहेब यांनीं २१ वर्षें श्रीगजाननाची सेवा केल्यावर दृष्टांत झाला कीं, मी मांदाराचे मुळांशीं आहे. तेव्हां मांदाराचे मुळांशीं सांपडलेला मांदार–गणपती गाभाऱ्यांत बसविला आहे. आपासाहेब काव्यप्रवीण होते. त्यांनीं गणपतीवर पदें व मांदार-आख्यान वगैरे केलें आहे. ते गाण्यांतही मर्मज्ञ होते. संगत चांगल्याची नसल्यामुळें, राज्यकारभारांत अव्यवस्था झाली. श्रीगणपतीचे सेवेकरी, गवई, घडशी, हरदास वगैरे सेवेकरी यांस जमिनी इनाम दिल्या आहेत. श्रीगणपतीसही गांव इनाम देणार होते, परंतु अकस्मिक मृत्यूमुळें तसेंच राहिलें. गणेशवाडीचे मूळ इनामांत यांची वाटणी नाहीं. कारण इनामवाटणीचे वेळीं कुरुंदवाडकर यांनीं इनामी उत्पन्नाबद्दल बोरगांव दिलें. हें बोरगांव श्रीमंत सवाईमाधवराव पेशवे सरकार यांचेकडून इनाम मिळालें होतें. हें इनामगांव सन१८१८ पर्यंत चाललें. सदहू गांव निपाणीकरांनीं दडपून घेतला असें समजतें.

श्री० कै० आपासाहेब यांनीं आपला औरस पुत्र नारायणराव निवर्तल्यामुळें शाळ घराण्यांतील दत्तक घेतला. दत्तकपुत्र गणपतराव यांनीं चार बायका केल्या. हे सन १८९१ त वारले. गणपतरावांचे पुत्र त्रिंबकराव हे हल्लीं आहेत. त्रिंबकरावआपासाहेब हे लहानपणीं श्रीक्षेत्र काशी येथें आपल्या आजी पार्वतीबाईसाहेब यांचेजवळ होते. पुढें आजीबाई काशीस वारल्यामुळें, श्रीमंत कै० व्यंकटराव बाळासाहेब रामदुर्गकर यांनीं आपासाहेबांस आपल्या बरोबरीचे मानानें वागवून उत्तम संगोपन केलें. आपासाहेब कॉलेजांत इंटरमध्यें होते. श्री० कै० गं. पार्वतीबाईसाहेब यांना त्यांच्या माहेरा-

कडून, म्हणजे श्रीमंत रामदुर्गकर यांच्याकडून चोळीबांगडीस म्हणून ' गोणागर ' हा गांव इनाम दिला आहे. तो गांव हल्लीं आपासाहेबांकडे चालू आहे, या गांवापैकीं शंभर रुपये उत्पन्नाची जमीन बाईनीं श्रीगणपतीस इनाम दिली आहे. शिवाय श्रीमंत आपासाहेबांनीं हल्लीं श्रीगणपतीस शंभर रुपये उत्पन्नाची जमीन इनाम दिली आहे. आपासाहेबांनीं " श्रीगणेशवाचनमंदीर " या संस्थेस बरेंच सहाय्य केलें आहे. आपासाहेब यांना तीन पुत्र आहेत. यांचा स्वभाव फार भिडस्त असून, गरिबांचे कनवाळू आहेत. पूर्वजांची जाणीव उत्तम आहे. तसेंच ते चाणाक्ष असून अत्यंत देवभोळे आहेत.

कागवाडची देणगी सन १७४५ चे पूर्वीची आहे. इंग्रज सरकारांनीं सरंजामसंबंधीं जे नियम केलेले आहेत; त्यांत असा स्पष्ट उल्लेख आहे कीं, सन १७५१ च्या पूर्वी जे सरंजाम बहाल झालेले आहेत ते वंशपरंपरेनें चालवावेत. सदरहू सरंजाम सन १७४५ ते १८५७ पर्यंत चालला असून पुढें बंद कां ? हा न्याय कां न्यायाची पायमल्ली ! !

---

# ४ मिरजकर, सांगलीकर व बुदगांवकर पटवर्धन.

## प्रकरण ४ थें.

हरिभटबावांचे चवथे पुत्र गोविंदपंतनाना यांचे वंशाची माहितीः— गोविंदपंतास श्रीमंत बाजीराव बल्लाळ पेशवे यांनीं आपल्या बावन्न पागापैकीं इंद्रोजी कदम याच्या पागेची फडणविशी इ. स. १७३० त सांगितली. गोविंदपंतांचें शूरत्व व हुषारी पाहून कदम यांनीं श्रीमंताजवळ त्यांची शिफारस केली. इ. स. १७३६ त कदम मृत्यु पावले. यांचें काम गोविंदपंतच पहात होते. पुढें सन १७४१ त कद-

यांच्या पागेची सरदारी मिळाल्यावर गोविंदपंतांनीं बरींच महत्वाचीं कामें केलीं. गोविंद हरि इ. स. १७७१ सालीं पुत्रशोकामुळें वारले.

गोविंद हरीच्या चार पुत्रांपैकीं पहिले गोपाळराव गोविंद हे महा प्रतापी, मोठे चतुर, रणधुरंधर व करारी होते. हैदराच्या स्वारीवर असतां, प्रकृती बिघडल्यामुळें ते तावडतोब मिरजेस आले. दुखणें विशेष होऊन वयाच्या ४२ वे वर्षीं इ. स. १७७१ त ते कै० झाले. दुसरे पुत्र वामनराव यांचे नांवें सरदारी चालली. इ. स. १७७३ त सरंजामाचा बेहडा वामनराव गोविंद यांचे नांवें झाला. पहिला बेहडा इ. स. १७६४ त गोविंद हरि, परशराम रामचंद्र व निळकंठ त्रिंबक यांचे नांवें पंचवीस लक्षांचा झाला होता. वामनरावही पराक्रमी होते. हे इ. स. १७७५ त खानदेशांत लढाईवर गेले असतां तिकडेच वरणगांव मुक्कामीं मरण पावले. यांचेमागून पांडुरंगराव-तात्या यांस जहागिरीचा अधिकार मिळाला. इ. स. १७७६ त हैदर अल्लीवरील स्वारींत पांडुरंगराव होते. हैदराचा सरदार अलिकुमदान याच्या फौजेची व त्यांची गांठ पडून लढाई झाली. पांडुरंगरावतात्यास जखमा होऊन ते कांहीं मंडळीसह शत्रूचे हातीं लागले. हैदरानें सर्वांस कैदेंत ठेविलें. शत्रूचे कैदेंत असतां पांडुरंगरावतात्यास अतिसाराचा विकार झाला. या दुखण्यांतून आपण बरे होणार नाहीं हे जाणोन, कनिष्ट बंधू गंगाधरराव गोविंद यांस उपदेशपर एक यादी तयार करून, ती याद बंधूस देण्याकरितां श्रीपतराव मोरो पटवर्धन यांचेजवळ दिली. इ. स. १७७७ सालीं कैदेंतच पांडुरंगरावतात्या-साहेब मरण पावले. नंतर बरेच दिवसांनीं पांडुरंगराव यांचेबरोबर कैदेंत असलेल्या मंडळींस हैदरानें सोडून दिलें. सदरहू यादी मागील प्रकरणीं मंगळवेढेकरांच्या वर्णनांत दिली आहे. पांडुरंगराव वारल्या-नंतर सरदारीचीं वस्त्रें हरिहरराव पांडुरंग यांस इ. स. १७७९ त मिळालीं. हे थोड्याच काळांत ह्मणजे इ. स. १७८२ त ज्वरानें मरण

पावले. यांस संतती नसल्यामुळें यांचे धाकटे बंधू चिंतामणराव आपासाहेब यांस इ. स. १७८२ तच सरदारी मिळाली.

चिंतामणरावआपासाहेब व यांचे चुलते गंगाधरराव गोविंद ( पहिले बाळासाहेब ) यांचेमध्यें वाटणीविषयीं कलह सुरू झाला. बाजीराव रघुनाथ पेशवे यांनीं बाळासाहेबांकडून नजराणा घेऊन इ. स. १८०८ त सरंजामाच्या वाटण्या केल्या. चिंतामणरावआपासाहेब यांच्या हिश्शास ६,३५,१७८८८८९ चा सरंजाम आला. आणि ४,७९,७९८८८८९चा सरंजाम गंगाधरराव बाळासाहेबांस आला. चिंतामणरावआपासाहेब हे सांगली येथें राहूं लागल्यामुळें त्यांस सांगलीकर असें ह्मणूं लागले. आपासाहेबांनीं सांगली येथें किल्ला बांधून किल्ल्यांत वाडा बांधिला. श्रीकृष्णाकांठीं श्रीगजानन महाराजांचें देवालय बांधिलें. कंपनी सरकारानें असें ठरविलें कीं, " पेशवाई चाकरी केल्याप्रमाणें, आमची नोकरी जे करतील त्यांची जहागीर पूर्ववत चालवूं. " त्यावेळीं आपासाहेबांनीं कंपनी सरकारास असें कळविलें कीं, ब्राह्मणांनीं परधर्मीयांची नोकरी करणें हें ब्राह्मणधर्मास विरुद्ध आहे. ह्मणून आह्मी तुमची नोकरी करणार नाहीं. नोकरीच्या स्वारांच्या खर्चापुरता मुलुख तोडून द्या; ह्मणजे नोकरी करावयास नको. असें कंपनी सरकारानें कळविल्यावरून, आपासाहेबांनीं इ. स. १८२० त १३९००० रुपये वसुलाचा मुलुख कंपनी सरकारास तोडून देऊन नोकरी न करण्याबद्दल ठराव करून घेतला. आपासाहेब कंपनी सरकाराशीं मोठ्या स्नेहभावानें वागले. सन १८३० त कित्तूरकर देसायांचें व १८४४ त कोल्हापूरचें बंड मोडण्यास यांनीं कंपनी सरकारास चांगली मदत केली. ह्मणून कंपनीसरकार खुष होऊन यळवत्ती व होळलापूर हे दोन गांव आपासाहेबांस इनाम करून दिले. व कोर्ट आफ् डायरेक्टर्सकडून आपासाहेबांस बक्षीस आलेली मौल्यवान् तरवार बेळगांवास दरबार भरवून नजर करण्यांत आली. आपासाहेब शूर शिपाई होते. धोंडजी

वाघाशीं यांची लढाई झाली. तींत त्यांस तोंडावर जखम लागली होती. त्या काळच्या इतर बहुतेक धामधुमींत हे प्रमुख होते.

आपासाहेबांनीं आपल्या वडिलार्जित घराचें पुनरुज्जीवन केलें असें म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं. कारण कोतवडें येथील मूळचें जुनें घर व त्याचे आसपासची जागा कोणीं एकानें लाटली होती. एके वेळीं आपासाहेब कोतवड्यास गेले तेव्हां तेथील वृद्ध माणसांनीं, आपासाहेबास वडिलार्जित घर जागा दाखविली. नंतर आपासाहेबांनीं कोंकणांतील अधिकारी मोकादम बरवे, नेवरेकर यांस लिहिलें आणि कोतवडें येथील घर जागा आपले ताब्यांत घेऊन तेथें एक मनुष्य नेमून घराची दुरुस्ती केली. आपली पूर्वस्थिति अत्यंत गरिबीची हे आपासाहेब जाणत होते. एकदां आपासाहेब पालखींत बसून कोतवडें गांवांतून जात असतां, मध्यें यजमानाचें ( सहस्रबुद्धे यांचें ) घर लागलें. तों तेथें ते पालखींतून खालीं उतरले आणि जरा पुढें जाऊन मग पालखींत बसले. हे पाहून त्यावेळीं सर्व गांवांतील लोकांस आपासाहेबांच्या सौजन्याबद्दल फारच आश्चर्य वाटलें. देशावरील यजमान इचलकरंजीकर जोशी ( घोरपडे ) होत. परंतु कोंकणांतील यजमान कोतवडें येथील खोत सहस्रबुद्धे होत. आपणास पूर्वार्जित पुण्याईनें जरी श्रीमंती आली तरी यजमानाचा मान हे विशेष ठेवित असत. आपासाहेबांनीं नेवरेकर बरवे यांस पाठविले पत्रांचा उतारा पुढील प्रमाणेः—

श्रीगणपतीर्जयती.

राजश्री यावी राजीत राजमान्य राजश्री

विनायकपंत बरवे स्वामी गोसावी यांसः-

पो चिंतामणराव पांडुरंग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष चिरंजीव राजश्री विनायकरावभाऊ यांची पत्नी चिरंजीव सौ. गंगाबाई, कार्तिक व॥ ६ मंदवारीं प्रातःकालीं पांच घटका दिवसास प्रसूत जाहाली पुत्र

जाहाला. तुम्हांस कळावें, रवाना छ. २७ माहे सवाल बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

नेवरें येथील मोकादम बरवे यांचे दप्तरांत आपासाहेबांकडून गेलेलीं पत्रें बरींच आहेत, मोकादम बरवे व आपासाहेब यांचा घरोबा विशेष होता हें वरील पत्रावरून सिद्ध होत आहे, आपासाहेबांनीं दौलतीचा कारभार चांगल्या रीतीनें केला, नवी पेठ वसविली, कारागीर व गुणी लोकांस पदरीं ठेविलें, यांना बागाइताचा विशेष शोक असल्यामुळें यांनीं सांगलीस बागा व मळे केले, मोठमोठ्या विहिरी बांधविल्या, मिरज येथें मालगांव वेशीजवळ आपासाहेबांचा मोठा मळा असून या मळ्यांत बारा मोटांची विस्तीर्ण विहीर आहे, यांनीं नारळाचीं झाडें विशेष लावविलीं, आपासाहेब मोठे बाणेदार, तेजस्वी व करारी होते; श्रीगजाननमहाराजांची स्तुति नित्य नेमानें करीत; स्तुतींत श्रीस काय मागावयाचें तें मागें ( मंगळवेढेकर यांचे प्रकारणांत ) छापिलेल्या यादीवरून समजेल, हे इ. सन १८५१ त परलोकवासी झाले,

आपासाहेबांचे मागून धुंडिराजतात्यासाहेब संस्थानचे अधिपती झाले. या वेळीं हे अदमासें १३ वर्षांचे होते. ह्यांचा अभ्यास बेळगांव येथें सरकारच्या देखरेखीखालीं झाला, यांचें लहानपणीं घोड्यावर बसणें, बोथाटी, भाला खेळणें वगैरे खेळांकडे विशेष लक्ष असे यांना राज्याधिकार मिळण्यापूर्वी यांचे मुखत्यार म्हणून गोविंद हरि बिनिवाले हे काम पहात असत. हे पुढील टिपणावरून समजलें:— " सदरहू उपकल गांवची जमीन श्री० माधवराव बल्लाळ प्रधान यांनीं श्रीगणपतीस सरकार खालसातींतून सरंजाम करून दिल्ही. सन १२६१ फसलींत आपासाहेब मयत झाले. तेव्हां सदरहु जमीन सरकारजमा झाली होती. ती बद्दल सरदार धुंडिराजतात्यासाहेब वय वर्षें १८ यांचे मुखत्यार गोविंद हरि बिनिवाले यांनीं १६ कलमांची कैफियत दिली होती

त्याप्रमाणें १२६१ ते १२६४ फसलीपर्यंतचें जमीनीचें उत्पन्न सरकारांत अनामत असलेलेसह जमीन ताब्यांत देऊन सन १२६४ फसलींत वारसा विचार होऊन नांव दाखल झालें. सदरहु जमीन पूर्वीप्रमाणें श्रीगणपतीचे देवस्थानाकडे दिल्ही आहे. ''

श्रीगणपती देवस्थानचें एकंदर उत्पन्न.

१८८ सदरहु जमीनीचें लागवड खर्च वजा जातां उत्पन्न.

३०००० देवाचे खर्चाकडे आह्मी आपले सरंजामापैकीं चौघडा वगैरे इतमाम खर्चास गांव वगैरे इनाम करून दिल्हे आहेत. त्याचा अजमास—बेरीज.

२००० श्री देवास निरलगीकर वगैरे इनामदार या लोकांकडून जमीनी मिळाल्या आहेत. त्याबद्दल उत्पन्नाचा अजमास.

३२१८८

० सरकारास द्यावयाचें कांहीं नाहीं.

३२१८८ बाकी ऐन नफा देवाचे संस्थानाकडेस खर्च होत आहे.

३२१८८

पुढें तात्यासाहेब वयांत आल्यावर त्यांस ता. १२ जुलई सन १८५९ रोजीं संस्थानची पूर्ण मुखत्यारी मिळाली. त्यावेळीं संस्थानास कर्ज होतें. तें पुढें लवकरच फेडण्यांत आलें. तात्यासाहेब भोळसर असल्यामुळें कांहीं वर्षें एक युरोपियन अधिकारी मदतनीस ह्मणून होता. पुढें सरकारनें सन १८८७ त मदतनीस काढून तात्यासाहेबांना पूर्ण मुखत्यारी दिली. तात्यासाहेबांनीं संस्थानचा कारभार उत्तम चालविला. सांगलींत ८ मैलांवरून नळानें पाणी आणिलें. दुष्काळ व प्लेग वगैरे प्रसंगीं व इतर प्रजाहिताचे कामीं पुष्कळ द्रव्य खर्चून प्रजेचें रक्षण केलें. ह्यांच्या खजिन्यांत कधीं उणीव नसे. हे धर्मनिष्ठ, उत्साही व न्यायाचे कामीं निःपक्षपाती होते. ह्यांची वागणूक, पेहराव व दरबार वगैरे वडिलांचे वळणावर ह्मणजे पेशवाई थाटाचा असे. यांना हत्तीचा शोक फार असे. यांचे कारकीर्दींत सांगली येथें १४ हत्ती

होते. तात्यासाहेबांनीं इचलकरंजीकरांचा मस्त झालेला हत्ती भाल्याचे कैचींत इचलकरंजीहून सांगलीस आणिला. या हत्तीनें आपल्या महादास मारिलें होतें. शिवाय हा हत्ती नेहमीं मस्तींत असे. सदरहू हत्ती अद्यापि सांगली येथें आहे. श्रीमंत सरदार तात्यासाहेबांनीं अत्यंत देखणा असा एकदंती हत्ती खरेदी केलेला संस्थानीं विद्यमान आहे. धार्मिक गोष्टी व श्रीगजाननमहाराजांचा उत्सव पूर्वीप्रमाणें तात्यासाहेबांनीं चालविला होता. श्रीमंत तात्यासाहेबांनीं पुत्रप्राप्ती-कारितां बरींच लग्नें केलीं. अखेर पुत्र एक होऊन अल्पवयांतच निवर्तला मात्र एक कन्या श्री. सौ. तारा आकासाहेब हल्लीं आहेत. श्रीमंत तात्यासाहेब आपल्या वयाचे ६३ वें वर्षीं सन १९०१ डिसेंबरांत ता. १२ रोजीं स्वर्गवासी झाले. यांनीं पन्नास वर्षे संस्थानचा उपभोग घेतला.

सन १९०१ डिसेंबर ता. १२ ते ... १९१० जून ता. २ पावेतों सांगली संस्थान इंग्रजसरकारचे ...कारी वर्गाचे ताब्यांत होतें. पहिले अधिकारी रावबहादुर अच्युतराव भास्कर देसाई यांची कारकीर्द तीन वर्षे झाली. यांनीं खासगी व पागाखात्याचे खर्च कमी करून इतर खात्यांत कांहीं सुधारणा केल्या. यांच्यानंतर फेब्रुवारी १९०५ त मे. क्याप्टन बर्क साहेब ॲडमिनिस्ट्रेटर नेमून आले. यांनीं सर्व खात्यांत सुधारणा केल्या. रयतेच्या गरजा संस्थानास कळण्याकारितां रयतसभा स्थापिली. सांगलीहून मिरजपर्यंत रेलवे कराविली. स्टेशनाजवळ श्रीमंतांच्या नांवाची नवी पेठ वसवून व्यापारास उत्तेजन दिलें. कृष्णानदीचें पाणी नळानें गांवांत आणिलें. शाळा, कचेऱ्या वगैरे इमारती बांधवून गांव शोभिवंत केला. श्रीमंतांस राज्यकारभाराचें शिक्षण उत्तम दिलें. श्रीमंत सौ. ताराक्कासाहेबांचा विवाह पुण्यनगरींतील सरदार खंडेराव चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब मेहेंदळे यांचे पुत्र बळवंतराव खंडेराव ऊर्फ रावसाहेब यांच्याशीं मोठ्या थाटानें केला. याप्रों मे. क्याप्टन बर्कसाहेब यांनीं कारकीर्द करून संस्थानांत आपला लौकिक कायम ठेविला.

श्रीमंत के. आपासाहेबांनीं आपल्या सुनेच्या मांडीवर मिरज किल्ल्यांतील बाळंभट हरभट या घराण्यापैकीं श्रीपतराव बळवंत यांस दत्तक घेऊन त्यांस विनायकरावभाऊसाहेब हें नांव ठेविलें. पुढें आपासाहेबांस तिसरे पुत्र धुंडीरावतात्यासाहेब झाले. ह्मणून भाऊसाहेबांस सालीना २४००० रुपयांची नेमणूक ठरवून दिली. भाऊसाहेबांस पुत्र दोन; गणपतराव व विठ्ठलराव. गणपरावास पुत्र तीन; चिंतामणराव, गोपाळराव व गोविंदराव. गोपाळराव मिरज घराण्यांत दत्तक गेले. चिंतामणरावांस पुत्र दोन; विनायकरावभाऊसाहेब व विठ्ठलराव बापूसाहेब. पैकीं विनायकरावभाऊसाहेब सांगली संस्थानचे अधिपति झाले. श्रीमंत विठ्ठलरावबापूसाहेब यांचें शिक्षण श्रीमंतांबरोबर राजकुमार कॉलेजांत जाल्यावर पुढील शिक्षणासाठीं विलायतेंत जाऊन तेथील केंब्रिज युनिव्हर्सिटीचे बी. ए. एल्. एल्. बी. व बॅरिस्टर ह्या परिक्षेंत उत्तीर्ण होऊन ते हल्लीं इकडेच आहेत.

विनायकरावभाऊसाहेब यांस संस्थानचे मालक ठरवून सांगली येथें ता. १५ जून १९०३ रोजीं मे. पो. ए. साहेब बहादूर ह्यांनीं दरबार भरवून सरकारतर्फे जहागिरीचीं वस्त्रें दिलीं, व त्यांचें नांव श्रीमंत चिंतामणरावआपासाहेब ठेविलें. ह्या दरबारास श्रीमंत के० बाळासाहेब पटवर्धन कुरुंदवाडकर ह्यांच्याबरोबर हा लेखकही गेला होता. ह्या वेळीं श्रीमंतांचें वय तेरा वर्षांचें होतें. ह्यांस शिक्षण देण्याकरितां राजकोट येथील राजकुमार कॉलेजांत ठेवण्यांत आलें. सन १९०९ एप्रिल अखेर तेथील शिक्षण पुरें झाल्यानंतर श्रीमंतांनीं हिंदुस्थान, सीलोन, ब्रह्मदेश ह्या देशांत फिरून बरीच माहिती मिळविली. पुढें मे. बर्कसाहेबांबरोबर आपल्या सर्व संस्थानांत फिरून त्यांनीं संस्थानची माहिती करून घेतली. नंतर सांगली येथें दरबार भरवून ता. २ जून १९१० रोजीं मे. पो. ए. साहेबांकडून संस्थानचे कारभाराची पूर्ण मुखत्यारी मिळाली. श्रीमंत आपासाहेबांनीं राजसूत्रें हातीं घेतल्यापासून आज आठ वर्षांत सांगली संस्थानची निरनिराळ्या

प्रकारांनीं सुधारणाच होत चालली आहे. सन १९१८ या नूतन वर्षानिमित्त बादशाहा पंचमजॉर्ज यांनीं श्रीमंतांना नऊ तोफांच्या सलामीचा कायमचा मान दिला. सांगली येथें ता. १६ जानेवारी १९१८ रोजीं किल्लयांत मोठा थाटाचा दरबार भरला होता. त्यावेळीं सांगली येथील निरनिराळ्या संस्थांकडून श्रीमंतांना बरींच मानपत्रें मिळालीं. तेव्हां श्रीमंतांनीं समयास उचित असें भाषणही केलें. कै. आपासाहेब व कै. तात्यासाहेब हे जसे प्रजेला प्रिय होऊन गेले तसे दिवसेंदिवस श्रीमंतांविषयीं प्रजेचें प्रेम वृद्धिंगत होवो व श्रीमंतांच्या हातूनही प्रजेच्या कल्याणाच्या गोष्टी नेहमीं होवोत.' श्रीमंतांना माधवरावसाहेब, पांडुरंगरावबाळासाहेब व गोविंदरावभय्यासाहेब अशी तीन पुत्ररत्नें आहेत.

सांगली येथील प्रसिद्ध वकील रा. गणेश रघुनाथ अभ्यंकर यांनीं "श्रीमंतांचे मुखत्यारीनिमित्त चित्रमय जगतूचा जो जादा अंक प्रसिद्ध झाला आहे त्यांत सांगली संस्थान संबंधी, कै० आपासाहेबांची व कै० तात्यासाहेबांची ऐतिहासिक व व्यवहारिक माहिती आणि हल्लींचे श्रीमंत आपासाहेबांस मुखत्यारी मिळाल्यासंबंधी साद्यंत हकीकत उत्तम रीतीनें दिली आहे." म्हणून मला इतर माहितीची पुन्हा द्विरोक्ती करण्याचें प्रयोजन नाहीं. फक्त श्रीमंतांना मुखत्यारी देण्याचे वेळीं मेहरबान पो. ए. मेजर वुडहौस यांनीं केलेलें भाषण व त्यावरील श्रीमंतांचें उत्तर ह्याची मात्र द्विरोक्ती करणें जरूर वाटल्यावरून सदरहु दोन्हीं भाषणें जशीच्या तशीच पुढें देत आहे.—

श्रीमंत चिंतामणराव आपासाहेब यांना संस्थानचा अधिकार ता.२ जून १९१० रोजीं देतेवेळीं मे. पो. ए. साहेबांनीं केलेलें भाषण पुढील प्रमाणें:—

पो. ए. मेजर वुडहौस यांचें भाषण.

मेहरबान चिंतामणरावआपासाहेब, संस्थानिकसाहेब, सभ्यस्त्रिया

व सद्गृहस्थहो, मुंबईसरकारच्या तर्फे मे० चिंतामणरावआपासाहेब यांच्या हातीं सांगली संस्थानचीं अधिकारसूत्रें आजच्या दरबारांत देण्यांत येणार आहेत. व त्या दरबारास येण्याबद्दल मी आपल्यास आमंत्रण केलें होतें.

सांगली संस्थान ज्या घराण्याची प्रमुख शाखा आहे; त्या पटवर्धन घराण्याचा इतिहास आपल्या सर्वांस विदितच आहे; सबब त्याचा आज पुनरुच्चार करण्याचें कारण मला दिसत नाहीं. कै० मे. धुंडिराजतात्यासाहेब यांच्या शोचनीय निधनानंतर मे. चिंतामणराव-आपासाहेब यांस सांगली संस्थानच्या गादीस वारस निवडण्यांत आलें व त्यांसच कै. मे. तात्यासाहेब यांचें कुटुंब बुद्धिबाईसाहेब यांनीं दत्तक घेतलें. त्यामुळें त्यांस सांगली संस्थानची गादी मिळाली आहे. मे. आपासाहेब यांचे पणजे भाऊसाहेब यांस पहिले चिंतामणरावआपा-साहेब यांनीं आपल्या सुनेच्या मांडीवर दत्तक देऊन गादीस वारस केलें होतें. परंतु भाऊसाहेबांच्या दत्तविधानानंतर चिंतामणराव यांस मरहूम तात्यासाहेब औरसपुत्र झाल्यानें ते गादीवर बसले व भाऊ-साहेब यांस गादी मिळाली नाहीं. मरहूम तात्यासाहेब हे निपुत्रिक वारल्यानें व त्यांनीं दत्तकाची सनद असूनही त्या सनदेप्रमाणें दत्तक घेण्याची व्यवस्था न केल्यानें, भाऊसाहेब यांस तेव्हां वारसानें जी गादी मिळावयाची होती ती आतां पुढें त्यांचे पणतु आपासाहेब यांस मिळत आहे हा मोठा मनोरंजक योगायोग आहे.

मे. तात्यासाहेब हक्क झाल्यापासून संस्थानची व्यवस्था ब्रिटिश सरकारच्या नजरेखालीं आहे व आज संस्थानचीं अधिकारसूत्रें आपासाहेब आपले स्वाधीन करण्याचें वेळीं संस्थानची स्थिति समा-धानकारक व भरभराटीची आहे हें आपल्यास सांगण्यास मला आनंद वाटत आहे. ही स्थिति संस्थानचे अॅडमिनिस्ट्रेटर मि० देसाई व कॅ० बर्क यांच्या कर्तबगार व सहानुभूतिपूर्ण राज्यव्यवस्थेनें प्राप्त झालेली आहे. कॅ० बर्क यांच्या कारकीर्दीचीं गेलीं पांच वर्षें सांगली

संस्थानच्या इतिहासांत चिरसंस्मरणीय होतील हें या प्रसंगीं सांगण्यास मला आनंद होत आहे.

आज संपत असलेल्या कारकीर्दींतील सर्व गोष्टी सांगत बसून मी आपल्यास शिणवीत नाहीं. थोड्या गोष्टी सांगितल्या ह्मणजे पुरे आहे. या कारकीर्दींत प्रत्येक खात्याची व्यवस्था व त्यांतील नोकर-पेशा यांची योग्य ती पुनर्घटना करण्यांत आली व लोकोपयोगी इमारती बांधण्याकडे पुष्कळ पैसा खर्च करण्यांत आला. ॲडमिनि-स्ट्रेशनच्या कारकीर्दीस जेव्हां १९०२ सालीं सुरवात झाली तेव्हां संस्थानांत कचेऱ्या, कोर्टें किंवा याच स्वरूपाच्या दुसऱ्या सार्वजनिक इमारती मुळींच नव्हत्या ह्मटलें तरी चालेल. त्यानंतर सर्व खात्यांच्या कचेऱ्यांस इमारती, पोलिसलायनी, हायस्कूल व नवीपेठ, हीं कामें सांगली शहरांत झालीं. तालुक्यानिहाय शालागृहें व रुग्णालयें बांध-ण्यांत आलीं आहेत. याच कारकीर्दींत सांगली—मिरज रेलवे बांध-ण्यांत आली असून तिजमुळें सांगलीच्या व्यापारास सोय झाली आहे; इतकेंच नव्हे, तर तिजकरतां खर्च झालेल्या रकमेवर शेंकडा ७ टक्के व्याज पडत आहे. सांगली शहरांस पाण्याचा भरपूर पुरवठा करण्याची एक योजना हातीं घेण्यांत आली असून, ती ब्रिटिश सर-कारच्या बेळगांव जिल्ह्याच्या इंजिनियरमार्फत पुरी करण्यांत येत आहे. या योजनेचें काम पुरें झाल्यावर सांगलीच्या रहिवाशांची एक मोठी गैरसोय दूर होणार हा एक त्यांना मोठा लाभच आहे.

जंगलखात्याची सुव्यवस्था होणें हें प्रत्येक संस्थानास अवश्यक आहे. याप्रमाणें या खात्याची नवी व्यवस्था या संस्थानांत केली असून या नव्या व्यवस्थेनें संस्थानचें उत्पन्न वाढलें आहे. संस्थानांतील रिव्हिजन सर्व्हे झाली आहे व साऱ्या तालुक्यांतून नव्या विहिरी व तलाव बरेच खणण्यांत आले असून, जुन्यांचीहि दुरुस्ती करण्यांत आली आहे.

प्राथमिक शिक्षण संस्थानच्या सर्व प्रजेस सुसाध्य झालें आहे. तालुका लोकलबोर्डें व रयतसभा यांची स्थापना करण्यांत आली आहे आणि या संस्थांचे सभासद आपल्यावरील ज़बाबदारी ओळखून जर आपला वर्तनक्रम ठेवतील तर आपासाहेब, त्या संस्थांचा कारभार चालविण्याचे कामीं तुह्मांस सहाय्य होईल.

आतां आपण संस्थानच्या तिजोरीच्या स्थितीच्या महत्वाचे प्रश्नाकडे क्षणमात्र वळूं. ॲडमिनिस्ट्रेशन कारकीर्दीस सुरवात झाल्यावेळीं रोख रुपये ६९२०५३ व स्थावर मिळकत गहाण लावून घेऊन कर्ज़ाऊ दिलेली रक्कम १०४३९३ व संस्थानच्या बँकेंत गुंतलेली रक्कम ८२०६६ एकूण ८७८५१२ रुपयांची शिल्लक होती. ॲडमिनिस्ट्रेशनच्या कालांत पब्लिक्वर्क्स् व लोकलफंड वर्क्स यांकडे खर्च झालेले २०६०९२०, (यांतच रेल्वेचे १८११२७ रुपये आहेत,) नजराण्याचे ६८६०००, श्री० सौ० आक्कासाहेब यांच्या लग्नाकरितां खर्च झालेले १ लाख रुपये, हे सोडून आजमित्तीस रोख व गुंतविलेली मिळून १५ लाखांची शिल्लक आपासाहेब आपल्या स्वाधीन करण्यांत येत आहे. आपल्या संस्थानचें वट उत्पन्न ११८८००० रुपयांचें फक्त आहे. ही गोष्ट ध्यानांत घेतां वरील स्थिति अत्यंत समाधानकारक आहे यांत शंका नाहीं, व ही अज्ञान कारकीर्दींत शिल्लक ठेविलेली रक्कम, आपासाहेब, तुह्मी मोठ्या विचारानें संस्थानच्या व प्रजेच्या हिताच्या कामाकडेच खर्च कराल अशी मला आशा आहे.

ज्या अर्थीं आपण हें जोखमीचें काम आज आपल्या शिरावर आपण घेणार आहांत, त्याअर्थीं आतां मला आपणांस दोन उपदेशपर शब्द सांगणें जरूर वाटत आहे. आपल्याविषयीं जी काय मला माहिती आहे, त्यावरून हा उपदेश ह्मणजे आपल्या खऱ्या मित्रानें केलेला हितबोध अशा दृष्टीनें तो आपण ग्रहण कराल असा मला पूर्ण भरंवसा वाटत आहे. कर्नल फेरिस यांनीं जेव्हां आपली या

संस्थानच्या गादीवर स्थापना केली, तोंपर्यंत आपल्या शिक्षणासंबंधानें बरीच हयगय झालेली होती व या गोष्टीचा उल्लेख करून ते ह्मणाले, ' जी वेळ व्यर्थ गेली आहे, ती भरून काढण्याविषयीं आपण शिकस्त कराल व ज्या महत्पदावर आपण आरूढ होणार आहांत, त्या पदास शोभण्यासारखी योग्यता आपल्या अंगीं आणण्यास झटाल असें मी इच्छितों. ' तें काम आपण किती चांगल्या प्रकारें बजाविलें आहे व कर्नल फेरिस यांचा आपल्यासंबंधींचा भरंवसा कसा खरा करून दाखविला आहे, तें मला व कॅ० बर्कसाहेबांना पूर्णपणें अवगत आहे. सन १९०९ सालीं राजकुमार कॉलेजांतील आपला अध्ययनक्रम संपवून आपण त्या कॉलेजाचा डिप्लोमा संपादन केला आहे. अभ्यास व तालीम यांत आपण बरींच बक्षिसेंही मिळविलीं आहेत. आपल्या हुषारीबद्दल व आपल्या सद्वर्तनाबद्दल तेथील अध्यापकवर्गाचें आपल्याविषयीं फारच चांगलें मत झालेलें आहे. अभ्यासक्रम पुरा झाल्यानंतर कॅ. बर्क यांच्या मदतीनें कायदाकानूंचें ज्ञान संपादन करून संस्थानच्या राज्यकारभाराचीही माहिती आपण करून घेतली आहे व संस्थानांतून आपण फिरूनही आलेले आहांत. लेफ्ट० रॅली यांच्या समवेत आपण हिंदुस्थान, सीलोन व ब्रह्मदेश यांतील बऱ्याच ठिकाणीं प्रवासही केलेला आहे व निरनिराळ्या प्रांतांतील राज्यकारभारांचें आपण प्रत्यक्ष अवलोकन केलें आहे. ह्मणून राज्यशकटधुरा वाहण्यास आपण योग्य झाला आहांत व त्यामुळें आपलें संस्थान आपल्या अमदानींत या इलाख्यांतील उत्तम प्रकारच्या संस्थानांपैकीं एक संस्थान होईल असें मी खात्रीनें भविष्य करून ठेवितों.

राज्यकारभारांत शिथिलता किंवा ढिलाई येऊं देऊं नका. आपल्या हाताखालील अधिकारी सत्ता व अधिकार बळकावण्यासंबंधानें जर कांहीं खलबतें करतील तर तीं तात्काळ जागच्या जागींच दडपून टाका. कारण हीं असलीं कारस्थानें

पुढें संस्थानच्या हितास विघातक झाल्यावांचून रहातच नाहींत. आपल्या सहवासांत जे लोक ठेवावयाचे त्यांची पुरी पारख करीत जा. जे लोक आपल्या सभोंवतीं तुह्मी घ्याल त्यांची योग्यता व शील कसोटीस लागून त्यांत ते टिकले आहेत अशी खात्री करून घेत चला. " मित्रावरून मनुष्याची पारख होते, " अशी एक ह्मण आहे. ही ह्मण सर्वांसच लागूं आहे, हें खरें, तरी ज्यांना आपल्या वर्तनानें आपल्या प्रजेस कित्ता घालून द्यावयाचा असतो अशा संस्थानाधिपतींच्या बाबतींत तर ती विशेषतः लागूं पडते. ज्यांना स्वाभिमान व अब्रू यांची चाड आहे असेच अधिकारी निवडा. संस्थानचे खरे हितचिंतक, असे जे पुरातनचे नोकर असतील अशांशीं कांहीं बाबतींत मतभेद झाला तरी त्यांना तेवढ्याचसाठीं नोकरींतून दूर करूं नका अगर त्यांची मानखंडना होईल, अशा रीतीनें त्यांना वागवूं नका. नवशिक्या नोकरांपेक्षां हे जुने नोकरच तुमची नोकरी चांगल्या प्रकारें बजावतील. सर्व लोकांना तुमची भेट घेतां येईल अशी सवलत ठेवा, आपल्या संस्थानांतून फिरत जा, व प्रजेचीं गाऱ्हाणीं ऐका; अशा प्रकारें खरी माहिती मिळविल्यास खऱ्याखोट्याची पर्वा न करितां वाटेल त्या खोटयानाटया कंड्या पिकविणाऱ्या लोकांवर तुह्मांस आपला वचक बसवितां येईल. आपल्या भावी अमदानीसंबंधानें व त्याचप्रमाणें आपल्या प्रजाजनांच्या कल्याणासंबंधानें आह्मी जी अटकळ केली आहे, ती खरी ठरो इतकेंच माझें मागणें आहे ही गोष्ट ध्यानांत ठेवावी. राज्यकर्ता या नात्यानें पुष्कळ लोकांचें आयुःक्रमण सुखावह व आनंदी करणें अगर दुःखावह व उदासीन करणें हें तुमच्या हातांत आहे. जर पहिल्यानें तुह्मी कराल तर त्याचा मोबदला जो तुह्मांस मिळेल तो प्रजाजनांची कृतज्ञता व प्रेम या स्वरूपानें मिळेल.

माझें भाषण संपविण्यापूर्वी, एडवर्ड बादशहांच्या मृत्यूनें झालेल्या

भयंकर हानीमुळें आपणां सर्वांवर जी दुःखाची छाया पसरली आहे, तिचा उल्लेख केल्यावांचून माझ्यानें रहावत नाहीं.

सध्यांसारख्या कालीं एका दूरदर्शी व थोर राजाला ईश्वरानें आह्मांमधून नेलें याबद्दल आपल्या सर्वांच्या मनास अत्यंत दुःख होत आहे. बादशहांच्या मृत्यूमुळें सर्व राजेरजवाडे व त्यांचे प्रजाजन यांच्या मनांत वसत असलेली तीव्र राजनिष्ठा व्यक्त झालेली आहे व प. वा. बादशहांच्या विषयींची राजनिष्ठा त्यांचे चिरंजीव पांचवे जॉर्जबादशहा यांच्यासंबंधानें आपल्या मनांत वागेल असा मला भरंवसा आहे. आपासाहेब, आपण बादशहा व त्यांचे तक्त यांविषयीं निष्ठावंत रहाल व आपल्या संस्थानांत राजद्रोह किंवा अप्रीति यांचें बीज न रुजूं देण्याविषयीं खबरदारी घ्याल अशी माझी खात्री आहे.

आपल्या तिजोरीची किल्ली मी आतां आपल्या स्वाधीन करतों व मुंबई सरकारनें या प्रसंगानिमित्त नजर केलेला खिलात मी आपणांस अर्पण करितों. ना० गव्हर्नर इन्-कौन्सिल यांच्या वतीनें मी जाहिर रीतीनें आपल्याला सांगली संस्थानची पूर्ण मुखत्यारी अर्पण करितों

## श्री. आपासाहेब यांचें उत्तर.

त्यावर श्रीमंत आपासाहेबांनीं पुढील आशयाचें भाषण उत्तरादाखल केलें. श्री. आपासाहेब म्हणालेः— मेजर वुडहौस, संस्थानिकबंधु व सद्गृहस्थहो, या मुखत्यारीच्या प्रसंगीं आपलें अंतःकरणपूर्वक स्वागत करण्यांत मला आनंद वाटत आहे. एडवर्ड बादशहांच्या शोचनीय मृत्यूमुळें या समारंभावर दुःखाची छाया पडली आहे. हिंदुस्थानांत व एकंदर ब्रिटिश साम्राज्यांत ज्या प्रसंगामुळें उदासीनता आली आहे, तो प्रसंग आह्मां सांगलीकरांस जाणवल्यावांचून राहणें अशक्य आहे. हिंदुस्थानांतील संस्थानिकांत सर्व साधारण असलेली जी राजनिष्ठेची तीव्र मनोवृत्ती ती प. वा. बादशहांबद्दल माझ्या मनांत वागत होती व तीच हल्लींचे बादशहा पांचवे जॉर्ज



श्री० कै० बापसाहेब पटवर्धन, सांगलीकर.



श्री० बापूसाहेब पटवर्धन, सांगलीकर, ब्यॉरिस्टर.



श्री० आप्पासाहेब पटवर्धन, कागवाडकर.

यांच्याविषयींही राहील. हल्लींचे बादशहा युवराज या नात्यानें १९०५ सालीं हिंदुस्थानांत जेव्हां आले होते, तेव्हां त्यांचें दर्शन होण्याचा सुप्रसंग मला लाभला होता.

माझ्याप्रमाणेंच माझ्या प्रजाजनांच्या अंतःकरणांत राजनिष्ठा वसत आहे अशी माझी खात्री आहे व माझ्या कारकीर्दींत राजद्रोहाचें बीज संस्थानांत रुजणार नाहीं असें आश्वासन देण्यास मला कांहीं दिक्कत वाटण्यास जागा नाहीं.

माझ्या मातोश्री बुद्धिबाईसाहेब, यशोदाबाईसाहेब व सरस्वतीबाईसाहेब यांचे मजवर फार उपकार आहेत. आजचा समारंभ पाहून त्यांना फार आनंद झाला असता; परंतु त्या आज हयात नाहींत याबद्दल मला खेद वाटत आहे. मला स्वतःला प्रेमानें वागवून माझ्या शिक्षणासंबंधीं जी काळजी ब्रिटिश सरकारनें घेतली आहे व माझ्या अज्ञानावस्थेंत कर्तृत्ववान् अमलदारांची योजना करून माझ्या संस्थानच्या हिताची जी चिंता वाहिली आहे, तीबद्दल मी ब्रिटिश सरकारचे अंतःकरणपूर्वक आभार मानितों. इ. स. १९०१ सालीं संस्थानचे माजी अधिपती—माझे दत्तक वडील—जेव्हां कैलासवासी झाले तेव्हां ब्रिटिश सरकारानें गादीसाठीं माझी निवड केली व अशा रीतीनें माझे पणजे विनायकरावभाऊसाहेब यांना न मिळालेला वारसाचा हक्क मला पुनः परत मिळाला. माझ्या दत्तविधानानंतर माझ्या अज्ञानावस्थेंत संस्थानकारभार ब्रिटिश सरकारच्या देखरेखीखालीं चालला होता. माझें शिक्षण राजकुमार कॉलेजांत झालें आहे. या काळांत संस्थानच्या ॲडमिनिस्ट्रेटरच्या अधिकारावर असलेले मि. देसाई व कॅ० बर्क यांनीं मला अत्यंत प्रेमानें वागविलें. राजकुमार कॉलेजांतील ६ वर्षांच्या काळांत कॉलेजांतील अधिकारीही माझ्याशीं तितक्याच प्रेमानें वागले. राजकुमार कॉलेज सोडल्यानंतर व हिंदुस्थान, ब्रह्मदेश व सिलोनच्या प्रवासास निघण्यापूर्वी कांहीं काळ मी सांगली मुक्कामीं कॅ० बर्क व मि० रेली यांच्या सह-

वासांत घालविला. या काळांत मीं राज्यकारभाराची माहिती करून घेतली, कित्येक ग्रंथ वाचले व संस्थानांतील तालुक्यांत फिरलों. कॅ० वर्क व मि० रेली यांनीं मजविषयीं जी आस्था दाखविली तीबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतों.

संस्थानांतील फिरतीची ही जी व्यवस्था केली होती तिजबद्दल मी विशेषच आभारी आहें. कारण तीमुळें संस्थानच्या कारभाराची माहिती मिळविण्याची व निरनिराळे तालुके स्वतः पहाण्याची मला संधी मिळाली. माझ्या संस्थानचा मुलूख अस्ताव्यस्त रीतीनें पसरलेला आहे. सबब कारभाराचीं सूत्रें हातीं घेण्यापूर्वी पसरलेल्या संस्थानच्या प्रदेशाची प्रत्यक्ष माहिती करून घेणें विशेष हिताचें होतें असें मला वाटतें. माझ्या अज्ञानावस्थेंतील संस्थानच्या कारभारांतील महत्वाच्या गोष्टींचें, मेजर वुडहौस, आपण संक्षेपतः समालोचन केलें आहे. कॅ. वर्क व त्यांच्या आधींचे अॅडमिनिस्ट्रेटर यांच्या कारकीर्दींत जें कांहीं झालें आहे, त्याच्या संबंधानें आपण जे प्रशंसापर उद्गार काढले ते मला सर्वथा संमत आहेत. हे सांगण्यास मला फार आनंद वाटत आहे. गेल्या आठ वर्षांत संस्थानची जोराची व एकसारखी प्रगती झाली आहे व सांगली संस्थानच्या इतिहासांत ह्या आठ वर्षांच्या अॅडमिनिस्ट्रेशनच्या काळाची, त्या काळांत झालेल्या अनेक सुधारणांमुळें कृतज्ञतायुक्त स्मृति राहील. सार्वजनिक इमारती व इतर महत्वाचीं कामें, संस्थानांतील खात्यांची पुनर्घटना, शिक्षणाची प्रगती, स्थानिक स्वराज्याची वाढ, दूरदर्शीपणानें व काळजीनें झालेला खर्च व तिजोरीची समाधानकारक स्थिति यांमुळें संस्थानचें मोठें व शाश्वत कल्याण झालें आहे.

मेजर वुडहौस, आपण जो मला उपदेश केला आहे त्याबद्दल आपले आभार पुरेसे व्यक्त करण्याचें सामर्थ्य शब्दांत नाहीं. आपण अत्यंत निष्कपट मित्र व सल्लागार आहांत व आपल्या दीर्घकालिक अनुभवाचा आणि ज्ञानाचा फायदा अडीअडचणीच्या प्रसंगीं आपण

मला झाले हें पाहून माझ्या मनास फार आनंद वाटत आहे. आपला मजवरील विश्वास व माझ्या भावी कारकीर्दीसंबंधानें आपण इतक्या प्रेमानें केलेली आशा, या दोहोंचें माझ्या हातून चीज होईल अशी मला उमेद आहे. सांगलीसारख्या संस्थानच्या कारभाराचें काम सोपें नाहीं व माझ्या शिरावरील मोठी जबाबदारी मी पूर्णपणें जाणून आहे. मीं नुकत्याच केलेल्या प्रवासाच्या प्रसंगीं माझ्या प्रजाजनांनीं, मी व माझें घराणें यांविषयीं निष्ठा आनंदजनक रीतीनें प्रकट केली आहे. अशा माझ्या प्रजाजनांस संतोष वाटण्यासारख्या रीतीनें मजकडून माझें कर्तव्य बजाविलें जाईल अशी मला आशा वाटत आहे. ॲडमिनिस्ट्रेशनच्या काळांत कांहीं विशिष्ट व्यक्तींना पेन्शनें देण्यांत ज्या धोरणाचें अवलंबन करण्यांत आलें आहे त्या धोरणाच्या अनुरोधानें संस्थानांत पेन्शनें देण्याची पद्धती सुरू करण्याचा माझा बेत आहे. रयतेला साऱ्याच्या बाकीची कांहीं सूट द्यावयाची, हल्लीं तुरुंगांत असलेल्या कांहीं कैद्यांना सोडावयाचें व कांहीं कैद्यांच्या शिक्षा कमी करावयाच्या असें मीं ठरविलें आहे. हा खिलांत मला नजर करून माझा जो गौरव करण्यांत आला आहे त्याबद्दल मेजर वुडहौस, आपण माझे आभार मुंबई सरकारास कळवावेत अशी आपणांस माझी विनंति आहे. शेवटीं फिरून मी आपलें एकवार स्वागत करतों. येथें आज आपणां सर्वांच्या भेटीचा लाभ झाल्याबद्दल मला फार संतोष वाटत आहे.

नंतर दरबारास आलेल्या युरोपियन लोकांनीं श्रीमंतांचें अभिनंदन केल्यावर पानसुपारी, हारतुरे व अत्तरगुलाब होऊन दरबार बरखास्त झाला. दोनप्रहरीं गोरगरिबांस अन्नसंतर्पण होऊन रात्रौ देकार झाला.

मे. पो. ए. साहेबांचें भाषण, त्यावरील श्रीमंतांचें उत्तर व ॲडमिनिस्ट्रेशनच्या वेळचें कारभाराचें वर्णन सर्व कांहीं ठीक झालें, परंतु " श्रीगणपती संस्थानची " माहिती मात्र अजिबात राहिली.

" श्रीगणपती देवस्थान " श्री० कै० आपासाहेब यांनीं स्वतंत्र केलें. त्याचा दौलतीशीं कांहींएक संबंध नाहीं. त्याप्रमाणें आपासाहेबांच्या कारकीर्दीनंतर, श्री० कै० तात्यासाहेबांचे कारकीर्दींतही वडिलांच्या इच्छेप्रमाणें ( कारकीर्दीप्रमाणें ) श्रीगणपती संस्थान चालविलें होतें. असें असतां, कॅ. बर्कसाहेबांनीं " गणपती देवस्थान-संस्थान " च्या संबंधीं मात्र चालत आलेल्या वहिवाटीविरुद्ध " अव्यापारेषु व्यापारा " केलें. श्रीगणपती संस्थानच्या उत्पन्नांतून सांगली येथील सडकांचा खर्च, सर्व शाळांचा वगैरे खर्च, कोणत्या न्यायानें सुरू केला ? दौलतीकडून चालणारे खर्च असतां, हें असें पूर्व वहिवाटीविरुद्ध कॅ० साहेबांचे कारकीर्दींत जें झालें तें झालें. परंतु श्रीमंतांना संस्थानचा पूर्ण अधिकार मिळून आज आठ वर्षें झालीं तरीही श्रीमंतांचें लक्ष वडिलार्जित दोन पिढ्या चाललेल्या वहिवाटीकडे कां गेलें नाहीं ! ! वाडवडिलांचा देवस्थान स्वतंत्र ठेवण्याचा स्तुत्य हेतू श्रीमंतांचे लक्षांत लवकर येऊन, श्रीगणपती संस्थानच्या उत्पन्नांतून फक्त श्रीचाच खर्च व्हावा व दौलतीकडे होत असलेला खर्च एकदम बंद करावा. ही व्यवस्था श्रीमंताकडून जाहल्यास, त्यांत श्रीमंतांचेंच कल्याण असून, दोन पिढ्यांची वहिवाट चालू ठेवल्याचें श्रेयही श्रीमंतांनाच मिळेल.

नुकतेच कै० झालेले डॉ० हरी श्रीकृष्ण देव यांच्यासारखा गरीबांचा कैवारी, प्रजाप्रिय आपल्या डॉक्टरी विद्येंत निष्णांत, विद्यार्थ्यांचा दाता असा लोकप्रिय डाक्टर पुन्हा सांगली संस्थानच्या प्रजेला मिळणें शक्यच नाहीं. आतां इतके लोकप्रिय असतां, डॉ० देव सांगली सोडून कां गेले ? असा प्रश्न पुढें येतो हें खरें ! परंतु मुद्दाम संस्थानी दरबारांतरगत शिरून प्रश्न सोडविणेचें हें स्थल नव्हे. येवढें मात्र खरें कीं, डॉ० देवासारखे निस्पृह, चतुर व धोरणी पुरुष पुढें संस्थानला मिळणें दरापास्त होय. सांगली येथें सरकारी

लागला. या कारंजाच्या रूपानें डॉ० देव यांचा लौकिक सांगली येथें कायम राहिला आहे.

* संस्थानिक पटवर्धनांचे देशावर प्रथम आलेले हरिभटबावा यांची समाधी पुणें येथें श्रीओंकारेश्वरासमोर आहे. त्या समाधीचा साधारण जीर्णोद्धार श्री० सांगलीकर यांनीं नुकताच केला आहे.

## मिरजकर पटवर्धन.

गंगाधरराव गोविंद—गंगाधर गोविंद पटवर्धन ऊर्फ पहिले बाळासाहेब हे आपल्या वडिलाप्रमाणें शूर असून मुत्सद्दी होते. भोसले, हैदरनाईक, धोंडजी वाघ वगैरे शत्रूंबरोबर झालेल्या लढाईंत हे होते. पेशवे दरबारांत यांचें विशेष महत्व असल्यामुळें वडिलकीच्या हक्काबद्दल चिंतामणराव आपासाहेबांस सरंजाम जास्त देऊन मिरजेचा किल्ला व त्याच्या खालचा मुलूख बाळासाहेबांकडे ठेविला. बाळासाहेबांनीं आपल्या कल्पनेनें तांब्याचे पत्र्यावर पत्र्याचींच अक्षरें बसवून, प्रत्येक पत्र्यावर चार ओळी याप्रमाणें ‘ श्रीभगवद्गीतेची ’ प्रत छापिली. हे पत्रे ज्यांना पहावयाचे असतील त्यांनीं पुणें येथील ‘ भारत इतिहास संशोधक मंडळांत ’ चौकशी केल्यास पहावयास मिळतील. बाळासाहेबांनीं मिरज येथील श्रीकृष्णाबाईचा घाट, माधवजीचें व गणपतीचें हीं देवालयें, तळीं, धर्मशाळा वगैरे लोकोपयोगीं कामें केलीं. हे इ. स. १८०९ त कैलासवासी झाले. यांना केशवराव, नारायणराव, माधवराव, गोविंदराव, गोपाळराव व वामनराव असे सहा पुत्र होते.

नारायणराव गंगाधर— केशवराव अल्पवयांत मरण पावल्यामुळें सन १८१२ सालीं नारायणराव यांस दौलत मिळून, नारायणरावांची कारकीर्द सुरूं झाली. याच सालीं कंपनी सरकारच्या मध्यस्तीनें पेशवे सरकार व पटवर्धन सरकार यांच्यामध्यें पंढरपूर मुक्कामीं तह जाहला. सन १७९५ च्या खडर्याच्या लढाईंत यांनीं मोठा परा-

क्रम केला. याबद्दल पेशवे सरकारांकडून पालखी व बहुमोलाचीं वस्त्रें मिळालीं. यांना पुत्र दोन; गणपतराव व मोरेश्वरआबा.

गणपतरावतात्यासाहेब— नारायणराव वारले तेव्हां हे अल्पवयी असल्यामुळें यांचे चुलते माधवराव गंगाधर हे कारभार पहात होते. तात्यासाहेबांच्या वतीनें सन १८१९ त गलगले मुक्कामीं कंपनी सरकारांशीं तह केला. त्यांत ३०० स्वार चाकरीस देण्याचा ठराव केला. तात्यासाहेबांचे चुलते गोपाळराव गंगाधर यांनीं सन १८२० त सरकारांत आपणांस दौलतीचा हिस्सा मिळण्याबद्दल थैल्या लिहिल्या. त्यावरून ता. ३ मे सन १८२१ रोजीं सरकारचा ठराव होऊन मे. चापलीनसाहेब बहादुर यांनीं किल्ला व त्या खालील ६५ हजारांचा सरंजाम वेगळा काढून बाकी राहिलेल्या दौलतीचे चार भाग केले. गणपतराव नारायण यांस—मिरज दौलत; माधवराव गंगाधर— मिरज— मळा; कृष्णराव गोविंद—सोनी ( हल्लीं खालसा ); गोपाळराव गंगाधर यांस—सुपारी बाग ( हल्लीं खालसा ); गणपतरावतात्यासाहेबांस किल्ला व त्या खालील सरंजाम देऊन शिवाय वडीलपणाबद्दल २८ हजारांचा सरंजाम जास्त दिला. तात्यासाहेब सन १८३३ त स्वर्गवासी झाले. यांना पुत्र दोन; गंगाधरराव व नारायणराव.

गंगाधरराव गणपतराव— गंगाधरराव गणपतराव ऊर्फ मधले बाळासाहेब हे अल्पवयी होते म्हणून दौलतीचा कारभार त्यांचे चुलते मोरेश्वरराव आबासाहेब पाहूं लागले. पुढें आबासाहेब सन १८३९ त कैलासवासी झाले. आबासाहेबानंतर कांहीं दिवस गोविंदराव खाडिलकर व भास्करराव जोशी हे कारभार पहात होते. परंतु यांनीं सर्व अव्यवस्था करून दौलतीस कर्ज फार केलें म्हणून सरकारतर्फे रा. विनायक कृष्ण पंडित यांस सन १८४४ त कारभारी नेमिलें. यांनीं कर्ज फेडून दौलतीची चांगली व्यवस्था केली. पुढें सन १८४९ फेब्रुवारींत पहिल्या तारखेस बाळासाहेबांस मुखत्यारी देऊन दौलत त्यांच्या स्वाधीन केली. सन १८५७ च्या बंडाच्या [illegible]

रांशीं चांगले वागले ह्मणून सरकारांनीं बाळासाहेबांचे आभार मानिले व सन १८५९ सालीं यांना दत्तक घेण्याची स्पेशल मंजुरी दिली.

बाळासाहेबांनीं एखादा हुषार मुलगा दत्तक घेण्याच्या हेतूनें लहान मुलास जवळ ठेवून त्याची शिक्षणाची वगैरे व्यवस्था करावी व त्यास आपल्याबरोबर वागवावें. याप्रमाणें दोन तीन मुलांची व्यवस्था करून फुकट ! कारण एक नाटकांत गेला; दुसरा कोठें बुडून मेला व तिसराही असाच कोठें गेला. नंतर यांना चौथा मुलगा जो मिरजेच्या घाटावर मिळाला तो मात्र चांगला निघाला. त्या मुलाचें नांव विष्णु बल्लाळ आपटे; यासच दत्तक घेण्याचें बाळासाहेबांचें मनांत होतें. परंतु सर्व आप्त मंडळींनीं आग्रह करून सांगितल्यामुळें ह्मणा ! अगर त्या मुलाच्या "विष्णु बल्लाळ आपटे" याच्या नशिबीं राज्याधिकार नव्हता ह्मणून ह्मणा !! किल्ल्यांतील बाळंभटाच्या घराण्यांतील त्रिंबकराव गणपतराव पटवर्धन यांस दत्तक घेऊन त्यांचें नांव गणपतरावतात्यासाहेब ठेविलें. परंतु बाळासाहेबांनीं जें मृत्युपत्र केलें; त्यांत ¹⁄₃ नंबरचे यादींतील कलम १८ तील मजकूर– "विष्णु बल्लाळ आपटे यांची मातोश्री लहानपणीं वारली, सबब यांस आह्मी किल्ल्यांत आणून पालन–पोषण ( अन्नवस्त्र देऊन ) केलें आहे. याजकरितां त्यांस चालवणूक वगैरे चालविण्याची ती येणेप्रमाणें:–

१ मुलगा हल्लीं अदमासें ११ वर्षें वयाचा आहे. तो प्रौढ होत तावत याजकडून विद्याभ्यास करवावा. आणि वहिवाटीप्रमाणें याचें पालन-पोषण करावें.

२ सदरहू मुलाचें लग्न होणेचें आहे, त्यास लग्नखर्चाबद्दल रुपये ३०० व मुलाचें कुटुंबास दागिने घालण्याबद्दल ४०० चारशें रुपये लग्न होते वेळीं द्यावे.

३ मुलगा प्रौढ झाला ह्मणजे त्यास एकंदर भोजनखर्च वगैरेबद्दल सालिना रुपये २०० दोनशें सालदरसाल द्यावे.

येणेप्रमाणें तीन कलमांबद्दल आमचे चिरंजीवानें तजवीज करावी. हें मृत्युपत्र शके १७८३ दुर्मतीनाम संवत्सरेमध्यें झालें "

हल्लींचे तिसरे श्रीमंत बाळासाहेबांकडून अद्यापि रा. विष्णुपंत आपटे यांना दरसाल दोनशें रुपये मिळत आहेत. सदरहू हकीकत येथें देण्याचीं कारणें दोन; एक कै. बाळासाहेबांनीं ज्याला पुत्रवत् मानिलें त्याचें जन्माचें कल्याण केलें. व दुसरें तेंच पुढें त्यांचे वंशजांनींही चालू ठेविलें.

बाळासाहेबांनीं सन १८६१ त ता. १४ अक्टोबर रोजीं त्रिंबकरावास दत्तक घेतलें. या वेळीं त्रिंबकरावांचें वय अदमासें बारा वर्षांचें होतें. बाळासाहेब मोठे कर्मठ होते. यांनीं अग्निहोत्र घेतलें होतें. यांनीं केलेल्या मृत्युपत्रांत शहरांत नळानें पाणी आणावें व प्रजेच्या सुखाकरितां विशेष सोयी करण्याविषयीं लिहिलें होतें. हे ता. २२ डिसेंबर सन १८६१ रोजीं कैलासवासी झाले.

गणपतरावतात्यासाहेब— गणपतराव हे अल्पवयी असल्यामुळें सरकारांनीं रा. गणेश नारायण काळे यांस कारभारी नेमिलें. यांनीं जमिनीची सर्वे व तरमजमाबंदी करून तिजोरींत शिल्लक पाडिली. यांनींच मिरज शहरांत नळानें पाणी आणिलें. श्रीमंत तात्यासाहेबांनीं बेळगांव सरदार हायस्कुलांत मराठी व इंग्लिश अभ्यास केला. पुढें कायद्याच्या कामाची माहिती घेतल्यानंतर सन १८७१ ता. २३ डिसेंबर रोजीं करवीर मुक्कामीं मुखत्यारी मिळाली. नंतर अदमासें तीन वर्षें दौलतीचा कारभार तात्यासाहेबांनीं केला. तीन वर्षांच्या कारकीर्दींत तात्यासाहेबांनीं लोकहिताचीं कामें, दवाखाना, लायब्ररी चालू करून कमी पगारांच्या नोकर लोकांचे पगार वाढविले. जकात माफ करून व्यापार वाढविला. यांची हुषारी व विद्वत्ता पाहून मुंबईसरकारांनीं ह्यांस आपल्या कायदेकौन्सिलाचे मेंबर नेमिलें. हे अल्पवयांत सन १८७४ त नोव्हेंबर ता. ६ रोजीं परलोकवासी झाले. यांच्या मरणानें मिरजेच्या प्रजेस अत्यंत दुःख झालें.

गंगाधरराव गणपतराव ऊर्फ बाळासाहेब— हल्लींचे श्रीमंत तिसरे बाळासाहेब पटवर्धन हे कै० तात्यासाहेब यांच्या थैलीवरून, सरकारांनीं यांच्या कुटुंबाचे मांडीवर दत्तक देऊन, त्यांचें नांव गंगाधरराव बाळासाहेब ठेविलें. यांचें पूर्व घरचें नांव गोपाळराव होय. सांगलीचे दत्तक घराण्यांतील गणपतराव विनायकराव ऊर्फ बाबासाहेब पटवर्धन यांचे द्वितीय पुत्र गोपाळराव यांचा जन्म ता. ६ फेब्रुवारी सन १८६६ रोजीं बारामती मुक्कामीं झाला. पुढें हे वयाच्या १० वे वर्षी ता. ६ जून सन १८७५ त मिरज घराण्यांत दत्तक होऊन, मिरज दौलतीचे अधिकारी झाले. श्री० बाळासाहेब वयानें लहान असल्यामुळें त्यावेळीं सरकारतर्फे रा० ब० गणेश मार्तंड भडवे हे मिरज संस्थानचे कारभारी होते. श्रीमंतांचा व्रतबंध झाल्यावर मे. पो. ए. साहेब यांच्या देखरेखीखालीं कोल्हापूर येथील राजाराम कॉलेजांत हे विद्यार्जन करण्याकरितां राहिले.

रा. ब. यशवंत मोरेश्वर केळकर हे मिरज दौलतीचे कारभारी झाल्यावर, यांनीं मिरज येथील 'टाऊनहॉल' ही इमारत बांधवून, सन १८७७ च्या दुष्काळांत मोठमोठ्या कामगिऱ्या सुरू करून गरीब लोकांस वांचविलें. करवीर मुक्कामीं श्रीमंतांचा मराठी व इंग्रजी अभ्यास पुरा झाल्यावर, राजदरबारीं कामाच्या माहितीकरितां ते मिरजेस आले. तेव्हां दौलतीचे कारभारी रा. ब. कल्याण सिताराम चित्रे होते. कारभारीसाहेबांसह जॉइंट ॲडमिनिस्ट्रेशनप्रमाणें काम चालूं लागलें. ता. ७ फेब्रुवारी सन १८८७ त श्रीमंतांचे वयास २१ वें वर्ष पूर्ण झालें. याच सालीं मे. कर्नल रिव्हजसाहेब बहादूर पो. एजंट प्रांत कर्नाटक व करवीर यांनीं मिरज मुक्कामीं बडा दरबार भरवून मोठ्या समारंभानें श्रीमंतांस पूर्ण मुखत्यारी देऊन सर्व दौलत श्रीमंतांच्या स्वाधीन केली.

श्रीमंत बाळासाहेब यांना सन १८८७ त संस्थानचा पूर्ण अधिकार मिळाला. त्यावेळीं मिरज शहराची शोभा प्रेक्षणीय होती. त्या

वेळीं टाऊनहॉलचे सभोंवारचे कंपाउंडांत तऱ्हतऱ्हेचीं झाडें असून, नानाप्रकारचे पक्षी व माकडें होतीं. टाऊनहॉलचे बगीचांत घटकाभर बसले असतां आनंद वाटे. यावेळीं हायस्कूलचीहि व्यवस्था उत्तम शिक्षकांमुळें चांगली होती. हायस्कूलचे अत्रे हेडमास्तर नामांकित होते. याच वेळीं हा " ग्रंथलेखक " हायस्कुलांत विद्यार्थी होता. श्रीमंतांनीं तालमीचा व्यासंग पूर्ण केला आहे. पूर्वी सायरबाब व जकात वगैरे प्रजेस त्रासदायक असलेल्या ३३ बाबी माफ केल्या. मिरज शहरांत व संस्थानच्या गांवीं स्वतंत्र म्युनिसिपालिटचा स्थापन करून रस्ते व सार्वजनिक इमारती वगैरे दुरुस्त व स्वच्छ ठेवण्याची व्यवस्था केली आहे. मिरज येथें विजापूर वेशीजवळ हजारों रुपये खर्चून सुंदर थिएटर बांधविलें आहे. हल्लीं गांवांत पाण्याचे नळाची व्यवस्था विशेष करविली आहे. दिल्लीं येथें सन १९०३ सालीं जो दरबार भरला होता त्यावेळीं श्रीमंतांना ब्रिटिश सरकारांतून के. सी. आय. ई. हा बहुमानाचा किताब मिळाला. श्रीमंतांना दोन पुत्र आहेत. नारायणरावतात्यासाहेब व हरिहररावदादासाहेब. गेल्या वैशाखांत दोन्ही पुत्रांचीं लग्नें मोठ्या समारंभानें केलीं. श्रीमंत सौ. वहिनीसाहेबांच्या अकालिक मृत्युमुळें श्रीमंतांनाच काय परंतु सर्व प्रजेलाही अत्यंत दुःख झालें आहे. कै. श्रीमंत सौ. वहिनीसाहेबांचें पुत्रप्रेम, पतिनिष्ठा, प्रजावात्सल्य व धर्मनिष्ठा हे गुण अवर्णनीय होते.

श्रीमंत बाळासाहेबांनीं मिरज शहरांतील गरीब मधुकरी विद्यार्थ्यांकरितां उन्हाळ्यांत दोन महिने दोन्ही वेळां भोजनाची सोय केली असून, पांथस्ताकरितां अन्नसत्र नेहमीं चालू ठेविलें आहे. याखेरीज नरसिंहवाडीचें व औंदुबरचें अन्नसत्र चालविलें आहे.



श्री० कै० गंगाधर गोविंद पटवर्धन, पहिले बाळासाहेब मिरजकर.



श्री० कै० लक्ष्मणराव आण्णासाहेब



श्री० कै० हरिहरराव दादासाहेब पटवर्धन, मळेकर.



श्री० कै० लक्ष्मणराव आण्णासाहेब पटवर्धन, मळेकर.



श्री० सरदार माधवराव बाबासाहेब पटवर्धन, बुदगांवकर.

# बुदगांवकर पटवर्धन.

माधवराव गंगाधरराव पटवर्धन— गणपतराव नारायणराव मिरज-करांचे वेळीं गोपाळराव गंगाधर यांनीं हिस्सा मिळण्याकरितां सरकारांत थैली लिहिली. तेव्हां सन१८२१ ता. ३ मे रोजीं सरकारचा ठराव होऊन मे. चापलीनसाहेब बहादुर यांनीं किल्ला व त्या खालचा ६५ हजारांचा सरंजाम वेगळा काढून बाकी राहिलेल्या दौलतीचे चार हिस्से केले. पहिला हिस्सा गणपतराव नारायण; दुसरा हिस्सा कृष्णराव गोविंद; तिसरा हिस्सा माधवराव गंगाधर व चौथा हिस्सा गोपाळराव गंगाधर; याप्रमाणें हिस्से झाले. नंतर गणपतरावतात्यासाहेब व यांचे चिरंजीव हरिहररावदादासाहेब हे अज्ञान असल्यामुळें यांच्या दौलतीचा सर्व कारभार यांचे चुलते माधवराव गंगाधर हेच पहात होते. यापूर्वी सांगलीकर आपासाहेब यांनीं मिरज-किल्ला आपणांकडे असावा ह्मणून खटपट केली असतां कांहीं उपयोग झाला नाहीं. तसेच माधवराव गंगाधर यांनींहि मिरज-किल्ला आपणाकडे असावा ह्मणून सरकारांत थैली लिहिली. परंतु थैली लिहिल्याचा कांहीं एक उपयोग न झाल्यामुळें सन१८२५ त निरुपायानें किल्ला व सरंजाम गणपतरावतात्यासाहेब यांचे स्वाधीन करणें भाग पडलें.

माधवराव गंगाधर मिरजेनजीक मळ्यांत जाऊन राहिल्यामुळें यांना मळेकर ह्मणूं लागले. माधवरावांचे चिरंजीव लक्ष्मणराव अण्णासाहेब यांची कारकीर्द मिरज-मळ्यांतच झाली. माधवराव गंगाधर मिरजेचा कारभार पहात असल्यामुळें मिरज-दप्तर यांच्याचकडे राहणें साहजिक आहे. लक्ष्मणराव अण्णासाहेब यांचा पुतळा मिरज-मळ्यांत आहे. दादासाहेब मळेकर यांचेनंतर चिरंजीव लक्ष्मणराव-अण्णासाहेब यांच्या अज्ञानपणांत संस्थानची व्यवस्था सरकारांनीं ठेविली होती. मिरज-मळा संस्थानची कचेरी मिरजगांवांत टाऊनहॉल-जवळ असलेल्या त्यांचेच वाड्यांत होती. दुसरे लक्ष्मणराव अण्णा-

साहेब हे संस्थानची मुखत्यारी मिळविण्यापूर्वीच वारल्यामुळें, श्रीमंत बाळासाहेब कुरुंदवाडकर यांचे द्वितीय चिरंजीव श्री०रघुनाथराव हे गादीवर ता. १९ डिसेंबर सन १८९९ त बसले. पुढें ता. २५ डिसेंबर १८९९ त दत्तविधान झालें. व श्रीमंतांचें नांव माधवराव ठेविलें.

श्रीमंत माधवरावबाबासाहेब मळेकर पटवर्धन यांचें शिक्षण राजकोट येथें झालें. इ. स. १९०९ मार्च ता. १७ रोजीं श्रीमंत बाबासाहेब यांना संस्थानचे पूर्ण अधिकार मिळाले. श्रीमंतांना तालीम व वाचन यांचा नाद विशेष असून, हे घोड्यावर बसण्यांत तर फारच पटाईत आहेत. श्रीमंत टेनिस व क्रिकेट वगैरे खेळ चांगलेच खेळतात. यांच्या हातीं राज्यसूत्रें आल्यापासून यांनीं संस्थानचा राज्यशकट उत्तम रीतीनें चालविला असून, मिरज-मळ्यांत न रहातां अलीकडे संस्थानचें मुख्य ठिकाण बुदगांव करून तेथील राजवाड्याची उत्तम दुरुस्ती करवून त्याच वाड्यांत श्रीमंतांनीं आपलें वास्तव्य केलें आहे.यांनीं आपली राजधानी ( बुदगांव ) निरनिराळ्या नव्या इमारतीनें सुशोभित केली आहे. श्रीमंतांनीं आपल्या जुन्या ' कागदपत्रांचीं ' दप्तरें सालवार लावण्याची व्यवस्था उत्तम केली आहे. श्रीमंतांना संतती व संपत्तीचा ताठा बिलकूल नसून स्वभाव शांत' मनमिळाऊ व विनोदी असा आहे. श्रीमंतांचे जनक पिते श्री. कै. बाळासाहेब कुरुंदवाडकर यांचें कृपाछत्र या लेखकावर जसें होतें तसेंच कृपाछत्र श्रीमंतांनीं या गरीब लेखकावर ठेविल्यामुळें, मी श्रीमंतांचा फारच ऋणी आहें.

---

# ६ तासगांवकर, जमखंडीकर व चिंचणीकर पटवर्धन.

## प्रकरण ५ वें.

परशराम रामचंद्र ऊर्फ भाऊसाहेब— भाऊसाहेबांचे वडील रामचंद्र हरि हे हरिभटबावांचे सहावे पुत्र यांचे वंशाची माहितीः—

रामचंद्रपंत हे मोठे शूर होते. श्रीमंत चिमाजीआपासाहेब यांचेबरोबर वसईच्या लढाईत व हिंदुस्थानांतील जयसिंगावरील स्वारींत रामचंद्रपंतांनीं मोठा पराक्रम केला. हिंदुस्थानांत स्वारीवर असतां शिवराजपूर येथें सन १७४९ त शके १६७१ आश्विन शु॥ ७ स उदरीची भावना होऊन हे कैलासवासी झाले. रामचंपंतांस एकच पुत्ररत्न झालें. त्यांचें नांव परशरामभाऊ होय. ‘ पुत्र व्हावा ऐसा बिंडा, ज्याचा तिहीं लोकीं झेंडा. ’ या संतांच्या उक्तीप्रमाणें परशरामभाऊंनीं दिगंत कीर्ति गाजविली.

परशरामभाऊ यांचा जन्म पुणें मुक्कामीं शके १६६२ श्रावण शु॥ ८ रोजीं ह्मणजे सन १७४० त झाला. त्या वेळच्या सरदारमंडळींत जे मोठमोठे पराक्रमी योद्धे होऊन गेले; त्या सर्वांत परशरामभाऊ हेच मुकुटमणी होते असें कोणीही मान्य करील. रामचंद्रपंत निवर्तले त्यावेळीं भाऊंचें वय अवघें १० वर्षांचें होतें. यांचें संगोपन पुणें येथें यांच्या मातोश्री जानकीबाई यांनीं केलें. भाऊ अल्पवयी असल्यावेळीं यांच्या पथकाचें काम यांचे चुलतबंधु पुरुषोत्तमदाजी हे पाहूं लागले. दाजींनीं भाऊंच्या शिक्षणाची फार काळजी घेऊन, घोड्यावर बसणें, तिरंदाजी करणें, वगैरे युद्धकलेंत त्यास निष्णांत केलें.

श्रीमंत पेशवे यांची स्वारी कर्नाटकप्रांतीं सावनूरकरांशीं सामना करण्यास गेली त्यावेळीं, पुरुषोत्तमरावदाजी व परशरामभाऊ आपल्या पथकासह बरोबर होते. ही मोहीम तीन महिने घनघोर चालली

होती. या वेळीं भाऊंचें वय चवदा वर्षांचें असतांही त्यांनीं शौर्याची शिकस्त करून विलक्षण रीतीनें शत्रुसैन्याची कत्तल केली व त्यामुळेंच सावनूरकरांचा मोड झाला. या युद्धांत भाऊसाहेबांनीं जें युद्धकौशल्य दाखविलें, तें पाहून मोठमोठे मी मी ह्मणविणारे वीरसुद्धां चकित् होऊन युद्धचमत्कार पहात तटस्थ उभे राहिले. कैकांस भारती युद्धांतील चिमुकल्या अभिमन्यु वीराचें स्मरण झालें. श्रीमंतांनीं हा विलक्षण प्रकार स्वतः अवलोकन करून, " शाबास, मुला, शाबास. या लढाईचें यश तुजकडे आहे. " असें ह्मणून अतिशय खुष होऊन त्यांस वस्त्रें देऊन बहुमान केला; आणि कोरेगांव बक्षिस दिला व त्याजबद्दल सुरुसन खमस खमसैन मया व आलफ छ १२ रबिलाखरची पुत्रपौत्रादि वंशपरंपरेची सनद सन १७५५ त करून दिली. तो गांव अद्यापि त्यांच्या वंशजांकडे चालला आहे. श्री० बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे यांनीं या प्रसंगीं भाऊंचा सन्मान करून गांव बक्षिस दिला हें योग्य केलें. भाऊंना प्रथमच्या मोहिमेंत यश प्राप्त होऊन सन्मान झाला, येणें करून भाऊंच्या सरदारी बाण्यास उत्तेजन मिळालें. यानंतर हैदर, टिपू, निजाम, कोल्हापूरकर, सातारचे राजे व इंग्रज यांच्याशीं मोठमोठ्या लढाया मारून त्यांत भाऊ विजयी झाले. खडर्य़ाचे स्वारींत तर सर्व फौजेचे आधिपत्य श्रीमंतांनीं भाऊसाहेबाकडे दिलें होतें. " भाऊ जी आज्ञा करतील ती श्रीमंतांची आहे असें समजावें, ह्मणून सर्व सरदार लोकांस कळविण्यांत आलें होतें. " या स्वारींतही भाऊंना यश प्राप्त झालें. भाऊंचे अंगीं साहस, धैर्य, युद्धकौशल्य, दृढनिश्चय, समयसूचकता वगैरे अनेक गुण होते. भाऊंनीं केलेल्या लढाया, स्वामिसेवा, भाऊबंदाविषयीं कळकळ, देशसेवा व धर्मसेवा इत्यादि विषयांची जर साद्यंत माहिती लिहून तयार केली; तर एक मोठा ग्रंथच होईल. परंतु आह्मी त्या भानगडींत न पडतां मुख्य ती माहिती थोडक्यांत दिली आहे. भाऊसाहेबांचा कीर्तिरूप—डंका—ध्वनी आह्मां महाराष्ट्रियांचे कानीं सारखा दुमदुमत आहे.

श्रीमंत नारायणराव बल्लाळ पेशवे यांनीं सन १७७४ त वामन गोविंद, परशराम रामचंद्र व रघुनाथ निळकंठ या तिघांच्या नांवें सरदारीचा दुसरा बेहडा करून दिला तो येणेप्रमाणेः—“ (सुरसन शितैन मयातैन व आलफ. आरबा सबैन मयातैन व आलफच्या तैनात जाबत्याप्रमाणें) फौजा, नौबतखाना, स्वार देखील २४,००,००० रु०, पागा व शिबंदीसुद्धां दर रावती सरासरी ३०० रु० प्रमाणें ८००० स्वारांचे, जातीच्या तैनातीं ८८१०० रुपये. शिबंदीबद्दल सरंजामाचे शिरस्ते पाहून ७०,००० रुपये, एकूण पंचवीस लक्ष अठ्ठावन्न हजार एकशेंहेचा सरंजाम नेमून देऊन, त्रिवर्गांचे नांवें नवी सनद करून दिली. या वेळीं हे सरदार आपापल्या सोईप्रमाणें मिरज, तासगांव व कुरुंदवाड येथें रहात असत. पेशवाई अखेरपर्यंत म्हणजे जोंपर्यंत लढाया चालू होत्या तोंपर्यंत या पटवर्धन सरदारांत भाऊबंदकी नव्हती. अखेरचे बाजीराव पेशवे यांस चिंतामणरावआपासाहेब सांगलीकर यांनीं—“ आम्हीं आमच्या बायकांचे मात्र वेगळाले आहोंत बाकी सर्व व्यवहारांत एकत्रच आहोंत. ” अशा अर्थाचा जबाब दिला असल्याचें मागील प्रकरणांत गेलेंच आहे. परशरामभाऊंनीं स्वामिकार्याकरितां आपला देह वाहिला होता. नाना फडणविसांच्या सल्ल्यानें चिमाजीआपास पेशवाईचीं वस्त्रें देवविण्याचे कामीं भाऊंना काय काय करावें लागलें तें मागील भागांत आलेंच आहे. नाना फडणविसाची अक्कल ऐन प्रसंगीं गेल्यामुळें, प्रथम भाऊंच्या बाजूचे असतां, नंतर बाजीरावांचा पक्ष स्वीकारून, बाजीरावास नानांनीं पेशवाईचीं वस्त्रें देववून भाऊंना कैद करविलें. काय विचित्र माणूस हा ! कीं, ज्यानें राघोबाच्या वंशास नमस्कारही करावयाचा नाहीं; असें निश्चयात्मक चार चौघांत ठरवून, पुन्हा त्याविरुद्ध जो वर्तन करितो तो विचित्र नव्हे तर काय ! ! यावरून इतकेंच सिद्ध होत आहे कीं, पेशवाईची चढती वेळ होती त्यावेळीं ‘ हातांत माती धरली तरी सोनें होत होतें. ’ अशा वेळीं नानांनीं केलेल्या कारभाराची वाहवा

व फाजील स्तुतिस्तोत्रें सर्वतोमुखीं झाली. परंतु चढती कमान नसतां प्रसंगाचे वेळीं जो टिकतो तोच शूर व खरा मुत्सद्दी होय. परशराम-भाऊ हे फक्त तरवारबहादूरच नव्हते; तर मोठे मुत्सद्दीही होते. श्रीमंत पेशवे घराण्यांत पहिले बाजीराव, चिमाजीआपा, रघुनाथ-राव व थोरले माधवराव हे खरे योद्धे व मुत्सद्दी होते. तसेच या पटवर्धन घराण्यांत, पहिल्या प्रतीचे शूर-वीर व मुत्सद्दी गोपाळ-राव गोविंद, रामचंद्र हरि, निळकंठराव त्रिंबक, कोन्हेरराव त्रिंबक, महादेवराव कृष्ण, जनार्दन मेघःशाम, विठ्ठल धोंडदेव, सदाशिव नारायण, भास्कर हरि, रामचंद्र परशराम, रघुनाथराव निळकंठ, चिंतोबाआबा व आपासाहेब सांगलीकर इत्यादि पटवर्धन मंडळी वीर पुरुष होत.

श्रीमंत सरदार भाऊसाहेब शके १७२१ भाद्रपद व. ४ मंगळ-वारीं सन १७९९त पट्टणकुडीचे लढाईंत कामास आले. त्यावेळीं त्यांचें वय ६० वर्षांचें होतें. भाऊंस रामचंद्ररावआपा, हरिहरराव, माधव-राव, विनायकराव व गणपतराव असे पांच पुत्र होते. हरिहरराव निपुत्रिक मरण पावले. विनायकराव लहानपणींच देवाधीन झाले. सन १८११। १२ सालीं पेशवे सरकारांनीं भाऊंच्या जहागिरीचे हिस्से करून दिले. माधवराव यांनीं हिस्सा घेण्याचें नाकबूल केलें, म्हणून जमखंडी आणि तासगांव असे दोनच हिस्से केले. रामचंद्रराव यांस जमखंडी रु० ४, ५४, १०० व स्वार १२८०; आणि गणपतराव यांस तास-गांव, रु० २,०८,७७६ व स्वार ६४० असे हिस्से केले. माधव-राव यांचा हिस्सा जमखंडींत सामील होता.

रामचंद्ररावआपा, हरिहरराव व गणपतराव हे पट्टणकुडीच्या लढाईंत होते. पट्टणकुडीच्या लढाईंत आपल्या वडिलांस ज्यानें ठार केलें, त्यांस सहा महिन्यांचे आंत मारण्याची प्रतिज्ञा रामचंद्रआपानीं केली. प्रतिज्ञा पूर्ण करण्यास किती त्रास सोसावे लागले तरी शेवटीं प्रतिज्ञा पूर्ण केली. ही हकीकत मागील भागांत दिलीच आहे. जमखंडी भागांतील कर्नाटकी अडदांड लोक व देसाई वगैरे लोकांचा बंदोबस्त करून



श्री. कै. रामचंद्रराव अप्पासाहेब पटवर्धन जमखंडीकर.



श्री० सरदार परशुरामराव भाऊसाहेब पटवर्धन, जमखंडीकर.

जमखंडी प्रांतांत आपला अंमल बसविला. जमखंडी येथें परशरामपंत-भाऊसाहेबांनीं सन १७७८त लहानसा टुमदार किल्ला बांधवून, भास्कर-पंत सखदेव यांस कमाविसदार नेमिलें. कोगूरकर देसाई हे कोणीं कामगार आल्यास त्यास जुमानत नसत. भास्करपंत सखदेव शूर होते. यांनीं कोगुरास काडापा देसाई याच्याशीं लढाई करून मोठ्या युक्तीनें अडीचशेंहे कारटक लोक पकडून कैद केले. देसाई पळून जाऊन मुधोळच्या राज्याच्या पदरीं पडला. कैद केलेल्या लोकांची किल्ल्याच्या दक्षिणेकडील मैदानांत दावण बांधून त्यांची कत्तल उड-विली, आणि आपला अंमल पूर्णपणें बसविला. रामचंद्रपंतआपा-साहेब मोठे शूर होते. यांनीं कित्येक युद्धांत यश संपादिलें होतें. यांना शके १७२१ त पुत्ररत्न झालें. त्याचें नांव गोपाळराव ऊर्फ रावसाहेब असें होतें. रामचंद्रावआपासाहेब सन १८१३ त स्वर्ग-वासी झाल्यावर त्यांचे पुत्र गोपाळराव हे राज्यकारभार पाहूं लागले.

माधवराव परशराम यांचे पुत्र गोविंदराव यांनीं आपला हिस्सा मागितल्यावरून सन १८२१ सालीं मे. चॅपलिनसाहेब यांनीं जम-खंडी जहागिरीचे दोन भाग करून हिस्सा देवविला. गोपाळरावांकडे २, ४३, ४७६ रुपयांचा सरंजाम ठेविला आणि गोविंदराव यांजकडे २, २५, १५३ रुपयांचा सरंजाम दिला. गोविंदराव हे पुढें चिंच-णीस राहूं लागल्यामुळें यांना चिंचणीकर पटवर्धन म्हणूं लागले.

गोपाळराव हे भाऊंच्या वडील पुत्राचे पुत्र असल्यामुळें जम-खंडी हें वडील घराणें आहे. पेशवाई बुडाल्यावर जमखंडीकर गोपाळरावांशीं कंपनी सरकारचा तहनामा झाला. त्यांत नोकरीबद्दल स्वारांची संख्या तीनशेंहें ठरविली व जातीची नवी तैनात तीसहजार रुपयांची कंपनी सरकारनीं दिली. जमखंडी हा गांव पूर्वी एक लहा-नसें खेडें असून तें फार प्राचीन काळचें असावें असें वाटतें. येथें फार जुनीं अशीं श्रीजंबुकेश्वर व श्रीकमलेश्वर हीं देवालयें आहेत. हल्लीं देवदर्शनास गेल्यास कित्येक पायऱ्या उतरून खालीं जावें लागतें.

देवालयाचे सभोंवारच्या वस्तीचा भाग इतका उंच झाला आहे. रामचंद्रपंतआपा प्रथम ज्यावेळीं जमखंडी येथें रहावयास आले तेव्हां जमखंडीचे किल्ल्याचा अधिकारी भास्करनाना सखदेव यांचा मुलगा पांडोबा हा किल्ला स्वाधीन करीना. तेव्हां आपासाहेबांस अशा उर्मट नोकराचा फार राग आला आणि आपासाहेबांनीं किल्ल्यावर तोफांचा मारा करून स्वतः चाल करून गेले. आपला आतां निभाव लागणें कठीण असें समजून तो पांडोबा किल्ला सोडून आपासाहेबांस शरण आला आणि जीवदान द्यावें अशी प्रार्थना करूं लागला. आपासाहेबांनीं त्याच्या इमानी वडिलाकडे पाहून ते त्याला ह्मणाले, " जा, पुन्हा तोंड देखील दाखवूं नको. " असें ह्मणून त्याला सोडून दिलें.

गोपाळरावरावसाहेब यांनीं वयाचे १४ वे वर्षापासूनच राज्यकारभार चालविला. हे खर्चाचे कामीं जरा काटकसर करीत असत. यांनीं आपल्या मातोश्रीची तुळा रुपये घालून केली; तेव्हां त्यांत सोन्याच्या पुतळ्या पांच घातल्या होत्या. जरी खर्चाचे कामांत जरा ते काटकसर करीत तरी ती योग्य वेळीं करीत. रावसाहेब हुषार, दक्ष व मोठे धूर्त होते. यांनीं आपले स्वकीय व आपली प्रजा यांचें उत्तम प्रकारें पालन पोषण करून आनंदांत दिवस घालविले. यांचा उत्तम लौकिक ऐकून, तासगांवकर भाऊसाहेब अज्ञान असतांना तासगांवचे जहागिरीचा राज्यकारभार चालवण्याकरितां इंग्रजसरकारानें तें संस्थान रावसाहेबांच्या स्वाधीन केलें होतें. रावसाहेबांस सर्व कांहीं अनुकूल होतें; परंतु पुत्ररत्न नव्हतें व तें प्राप्त व्हावें अशी त्यांची फार इच्छा होती. रावसाहेबांनीं पूर्व वयांतच दत्तकाची मंजुरी मिळावी ह्मणून सन १८२६ सालीं सरकारास थैली लिहिली. त्याचा जबाब दत्तक घेण्याबद्दल आला. परंतु त्यास जहागिरी चालवूं असें नव्हतें ह्मणून पुन्हा सरकारास थैली पाठविली. दुसऱ्या थैलीचें उत्तरः— " आरावसाहेबांकडून नेक वर्तणूक हरवक्त होत आली व जिनत ( कैलासवासी ) मकान परशुरामपंतभाऊसाहेब

यांजकडून सरकार चाकरीचा उपयोग होऊन आला त्याची माहिती आहे. त्यांचे जागीं आपण आहां. याजवर नजर देऊन आपणांस औरस पुत्र नसल्यास दत्तक पुत्राकडे जहागीर बहाल चालविली जाईल. " ह्मणून छ. ११ जिलेज सुरु सन आरबा, अशरीन, मयातैन व अलफ, तारीख १७ जुलै सन १८२६ चे नेक नामदार माउंट स्टयूअर्ड एल्फिन्स्टनूसाहेब गव्हर्नर बहादूर यांचेकडून लिहून आलें.

दत्तकाची परवानगी मिळाल्यामुळें सर्वत्रांस आनंद झाला. पुढें सन १८४० त वैशाखमासीं रावसाहेब सर्व सरंजामासुद्धां नहरास ( महाबळेश्वरास ) गेले होते. तेथें नामदारांच्या मुलाखती झाल्यावर ते परत संस्थानीं आले. प्रवासाच्या त्रासानें किंवा कशानें प्रकृती बिघडली तें समजेना. परंतु दिवसेंदिवस जास्तच प्रकृती बिघडूं लागली. तेव्हां रावसाहेबांनीं पूर्वी ठरलेल्यास दत्तक घेण्यास अवधी नसल्यामुळें, आसंगी येथील अंताजी माधवराव ऊर्फ तात्यासाहेब पटवर्धन यादवाडकर यांचे पुत्र गणप[illegible]ांस ता. १८ नोव्हेंबर सन १८४० रोजीं दत्तक घेतलें. आणि त्याचें नांव रामचंद्रावआपासाहेब असें ठेविलें. हें सर्व कृत्य संपल्यावर रावसाहेबास शक्तिपात झाला. घडोघडीं शक्ति कमी होत चालली व नाडींतही चलबिचल होऊं लागली हें पाहून सर्वत्र घाबरले. श्रीमंत सौ. राधाबाई अस्पर्श असल्यामुळें दूर उभ्या राहून पतिमुखाकडे पहात सारख्या रडूं लागल्या. तें पाहून रावसाहेब म्हणाले, " अग वेडे, रडूं नको. होणार भवितव्य कधीं चुकावयाचें नाहीं. कपाळीं येईल तें भोगलेंच पाहिजे. आतां मुलासह राज्याचा भार हातीं घेऊन, प्रजेचें व पदरच्या मंडळींचें माझ्याप्रमाणेंच उत्तम संरक्षण कर. कदीम चालत आलें आहे त्यांचें कमी करूं नको; कारण पूर्वी यांच्या पूर्वजांनीं आमच्याकरितां रणांगणीं आपलीं शिरें अर्पण केलीं आहेत, हें ध्यानांत आण. त्यांचें कमी केल्यानें, त्यांच्या तळतळाटानें संस्थानास समयीं मोठा अपाय होण्याचा संभव आहे. समजलीस ! आतां रडूं नकोस.

विवेकानें दुःखास आवरून धर. जोशी व आपटे यांचे विचारें राज्य चालीव. आतां माझी तुळा करीव ह्मणजे झालें. याशिवाय माझी कांहींएक इच्छा राहिली नाहीं." असें सांगून स्तब्ध राहिले. शुद्धी-वर आहेत तोंच तुळा करणें बरें असें समजून, मोठमोठे विद्वान ब्राह्मण आणवून तुळा करविली. तुळेचा संकल्प करवितांना मध्येंच रावसाहेब ' उं हूं: ' ह्मणाले; तेव्हां संकल्पांत घडलेली चूक दुरुस्त करवून संकल्प पुरा केला. मरणकालीं देखील श्रीमंतांची राहिलेली स्मरणशक्ति पाहून ब्रह्मवृंदांस आश्चर्य वाटलें. तुळेस १६,३२९ होन वजनास लागले.

रावसाहेबांची प्रकृती तुळा झाल्यावर जास्त बिघडून स. १८४० त कार्तिक व॥ ११ शके १७६२ रोज गुरुवारीं ते हा लोक सोडून कैलासास गेले. सर्वत्र हाहाकार झाला. राधाबाईच्या दुःखास तर सीमाच उरली नाहीं. श्रीमंतांचा देह श्रीकृष्णाकाठीं कंकणवाडी येथें नेला. बरोबर आपासाहेबासह हजारों लोक होते. कंकणवा-डीस सर्व दशांत कर्मादि आणि योग्य असा दानधर्म मुलाकडून करविला. दशदानें देववून ब्राह्मणभोजनादि करविलें. या कृत्यास एकंदर तुळेच्या रकमेसह ८२,०३९॥१२॥३ इतके रुपये खर्च आला. रावसाहेब ज्या दिवशीं स्वर्गवासी झाले त्याच दिवशीं ह्मणजे गुरु-वारीं तासगांव येथें परशरामभाऊंनीं श्रीगणपतीपुढें बांधविलेल्या गोपुरांतून एकाएकीं धुराचे लोटच्यालोट चाललेले हजारों लोकांनीं पाहिले. याच दिवशीं तासगांवास बाजार होता. हें कांहीं तरी दुश्चिन्ह आहे असें थोर थोर लोक ह्मणूं लागले. तों दुसरे दिवशीं रावसाहेब वारल्याचें वर्तमान तासगांवीं समजलें. तेव्हां लोक फार हळहळले आणि भाऊसाहेबांची औरस संतती आज बुडाली हें दाखविण्याकरितांच गोपुरांतून धूर निघोन गेला कीं काय ! असें सर्वांस वाटलें ! !

# रामभट दांडेकर ऊर्फ वाटवे.

हरभटबावा पटवर्धन ज्यावेळीं देशावर आले त्यावेळीं, त्यांच्याबरोबर असलेल्या मंडळींत रामभट दांडेकर होते. रामभट हे हरभटबावांचा वाटवा संभाळीत असत ह्मणून यांना रामभट वाटवा आणा असें ह्मणत असल्यामुळें रामभट वाटवे असेंच सर्व ह्मणूं लागले. रामभट दांडेकर ऊर्फ वाटवे यांचेकडे बावांनीं आपले उपाध्येपण दिलें असल्यामुळें अद्यापि रामभट वाटवे यांचेच वंशज पटवर्धन संस्थानिकांचे उपाध्ये आहेत रामभटांचे वडील चिरंजीव भास्करभट ऊर्फ भटंभट हे रामचंद्र हरींचे बरोबर घोडनदीवरील पेशव्यांचे सरदार जाधव यांचे छावणींत मेले. जाधवांचे व मोंगलांचे युद्धांत रामचंद्र हरीबरोबर रामभटही होते. ते त्या लढाईत कामी आले. ही पटवर्धनांची पहिली लढाई होय.

भास्करभट वाटवे यांचे द्वितीय चिरंजीव त्रिंबकभटनाना हे परशरामभाऊबरोबर नेहमीं लढाईवर जात. लढाई फत्ते झाली कीं, नानांना कांहीं तरी देणगी मिळत असे. नाना हे भाऊंच्या पूर्वीच वारले होते. नानांचे वडील चिरंजीव विश्वेश्वर ऊर्फ बाळंभट यांनीं परशरामभाऊस पेशव्यांचे कैदेंतून सोडविण्याची फार खटपट केली होती. भाऊंचें व रामचंद्रआपांचें त्यांच्यावर फार प्रेम होतें. सावनूर पंचमहालची पांच लक्षाची सुभा पेशवाईंतून आपले हमीवर बाळंभटाचे नांवें केली. बाळंभटाचे वडील चिरंजीव पुरुषोत्तम ऊर्फ दाजीबा वाटवे हे गोपाळराव रामचंद्र ऊर्फ रावसाहेब यांचे स्वाध्याई, बालपणापासून फार प्रेमांतील व विश्वासुक स्नेही होते. रावसाहेबांनीं कुरबेटकर देसाई यांनीं बेइमानी केल्यामुळें देसायाचा बंदोबस्त करण्याकरितां दाजीबा वाटवे यांचेबरोबर सैन्य देऊन कुरबेटावर रवाना केलें. या लढाईत जखमा लागून दाजीबा वारल्यामुळें, त्यांच्या वंशजास इनाम व नक्त नेमणूक वगैरे चालूं लागली.

श्री.

गोपाळरावरावसाहेबांस पत्रः— पो छ. १४ जिलकाद इहिदे अशरीन मयातैन व अलफ.

सेवेसी विठ्ठल गोविंद आपटे व सखाराम बहिरव कृतानेक सा. न. विज्ञापना. ता छ. १४ जिलकादपर्यंत क्षेम असो विो. वे॥ राजश्री दाजीबा वाटवे यास कुरबेटकर यांनीं पलंगावर घालून बेगारी देऊन आज प्रहर दिवसास पाठविलें. बरोबर राजश्री हिंदुराव घोरपडे व माधवराव कर्वे उभयतां काल दाजीचे भेटीस. कुरबेटास गेले होते तेही बरोबर आले आहेत. वाटवे यास जखमा—

| किता | किता |
|---|---|
| १ डोकीवरची भारी | १ उजवे बाहळेवर भारी |
| १ कपाळावर हलकी | १ उजवे हाताचे दंडावर भारी |
| १ डाव्या हाताच्या मनगटावर भारी | १ डाव्या पायावर |
| ३ | ३ |

येकूण जखमा सहा आहेत. बोलणें कार्याकारण आहे. स्वामीकडे रवानगी करावी तर येथें डोली व भोई नाहीं व जखमा बांधणारही येथें कोणीं नाहीं. ऐशास डोली व भोई जलद पाठविण्याविसीं आज्ञा व्हावी शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

श्रीगणपती.

(श्रीगणपती, श्रीपरशरामचरणीं, तत्पर रामचंद्रसुत गोपाळराव निरंतर)

आज स्वारी राजश्री गोपाळराव रामचंद्र ता मोकदम मौजे केमनकोळ पो गोकाक सु॥ सन इहिदे अशरीन मयातैन व अलफ देसाई प्रो मजकूर यांस येण्याकरितां कारकून पाठविले असतां न येत. सबब वे॥ पुरुषोत्तमभट ऊर्फ दाजीभट वाटवे यांस देसाई याजकडे बोलावण्याकरितां रोखा देऊन पायदळ लोकसुद्धां पाठविले. तेथें देसाई यांजकडुन कारकून व लोक याणीं ठाणें कुरबेट येथें दगा करून जखमा लावून ठाण्यांत पाडाव करून नेलें. जखमा भारी

पाहून त्यांणीं ठाण्यांतुन त्यास बाहेर लोक होते तेथें पोहोंचतें केलें. तेथें त्याचा काळ जाहला. त्याचे चिरंजीव वे॥ रा. गणेशभट बि॥ पुरुषोत्तमभट हे उभयतां बंधु लहान. पुढें यांचा योगक्षेम चालवणें प्राप्त व श्रेयस्कर जाणून देसाई यांजकडील गांवांपैकीं पांचशें रुपयांचे आकाराचा गांव इनाम द्यावयाचा त्याजवरोन तुह्मास लिहिलें आहे. तर मौजे मार हा गांव मजऱ्यासुद्धां वाटवे यांस इनाम करून दिल्हा असे. तर गांव वाटवे यांचे स्वाधीन करणें. पांचशें रुपयांची भरती होऊन ज्याजती भरती जाहल्यास तितक्या बेरजेची जमीन परत घेतां येईल. या पत्राची प्रत लिहून घेऊन हें अस्सल पत्र भोगवटीयास परतोन देणें. जाणिजे छ. २५ राकर ( मोर्तब सुद. )

दाजीबा वाटवे यांचे वंशजास पटवर्धनांनीं इनामापैकीं केमनकोळ गांवांपैकीं रुपये ५०० शेंहेची व गोकाकपैकीं रुपये १०० ची जमीन परत घेऊन त्याचे मोबदला२५०शेहेची जमीन जंगमी, कंकणवाडी व नक्त रुपये ३०० शेहे दिले. सदरहु मोबदला इनाम वगैरे हल्लीं दाजीबांचे वंशज माजी वकील येशवंत गणेश ऊर्फ आपाराव वाटवे यांचेकडे चालत आहे. आपाराव वाटवे यांचे पुत्रांपैकीं एक बी. ए.एल्. एल्.बी. असून ते जमखंडी येथें वकिली करीत आहेत. दुसरे सर्व प्रपंच व शेती वगैरे करतात आणि तिसरे डॉक्टरी शिकत आहेत. आपाराव वाटवे हे स्नानसंध्यादिषट्कर्मांत निमग्न असतात.

## पटवर्धन यांचे वकील करंदीकर.

पटवर्धनाचे तर्फे करवीर दरबारीं असलेले वकील नारो हरि करंदीकर यांनीं पट्टणकुडीच्या लढाईंतील केलेल्या कामगिरीसंबंधीं खालीलप्रमाणें माहिती मिळाली आहे.—

नारो हरि करंदीकर यांचे उद्गारः—" करवीराहून मिरजेस आल्यावर श्रीकृष्णेचे वाड्यांत पंक्तीस भोजन करून होतों. श्रीमंत कै. बाबासाहेबाकडून करवीरदरबारीं जाबसालाकरितां ठेविलें होतें.

तीन वर्षे त्याबद्दल मुक्काम. लष्करांत फिरत होतों. बातमी वगैरे काम काम यथाज्ञानानें. नितकें यजमानांच्या मर्जीनुरूप करीत गेलों. पुढें कै. भाऊसाहेब यांची लढाई करवीरकराशीं होऊन बिघडली. तेथें अंतकालची सेवा केली. पुढें करवीरासी पारिपत्यास आपा- साहेब फौज पलटणें वगैरे सरंजाम घेऊन करवीरास वेढा दिल्हा ते समई मी करवीराला होतों. आंतील बातमी वगैरे दिनचर्या सुद्धां देत होतों. ते समई सेवा चाकरी जाहली ह्मणोन बक्षिस मार होतों. ऐशास सेवा चाकरी जाल्याचें बक्षिस ह्मणोन श्रीमंतांचें समाधान करून राहिलों. उद्योग ह्मणून कांहीं नाहीं. कै. भाऊसाहेब यांचें वर्ष- श्राद्ध श्रीकृष्णातीरीं, सरकारचा वाडा मिरजेस आहे तेथें जालें. मला भोजनास बोलाविलें होतें. भोजन जालेवर श्रीमंत बाळासाहेबांनीं आपासाहेबास बोलले. नारोपंतास तूर्त दोन हजार रुपये द्यावे. आपासाहेब यांणीं देतों ह्मणून सांगितलें. त्याजवर दहावर्षें गुदरलीं. पैसा कोणीं दिल्हा नाहीं. मिरजेस राहून नवें कर्ज, कुटुंब सुटकेबद्द- लचें कर्ज व दिनचर्येचें कर्ज मिळून बखेडयांत आलों. कै. भाऊ- साहेबांची सेवा अंतकाळची झाली हा मोठा अलभ्य लाभ झाला. त्या पेक्षां कोणाकडे जाऊं नये असा मनाध्यास संकल्प करून होतों."

कै. भाऊसाहेब यांच्या देहाचे भाग एकत्र करून हमिदवाडचे ओढ्यावर नारो हरि करंदीकर वकील यांणीं दहन केलें त्याचे खर्चाचें टिपणः—

१० सेला ५ चंदन ॥.॥। पर १० ६ जोशी हमिदवाडयाचे ३ सुवर्ण मासे१ ४ मोतदार घाटकेकडील किता प्रेत नेणाऱ्यास व दक्षिणा ह्मणोन वगैरे खर्च. ७८८ किना ब्राह्मण लष्करांतील आगांतुक अदमासें तीस दर ८४ प्रों.

४ पटीस होन यास ५ हस्ती नेणारा ब्राह्मण, ८८ जोडा, २ पासोडी, ८८ पं २राख.

यकुण सगळे ४४८८ साडे चवेचाळीस रुपये.

श्रीगणपती.

यादी खासगत राजश्री रामचंद्र परशराम सु॥ तिसा मयातैन व अलफ नारो हरि करंदीकर यास सालमजकुरापासून नक्त ६५ रुपये पासष्ट रुपये तैनात सालदरसाल खासगीकडून पावतील येणेप्रमाणें करार छ. १९ सु॥ सन तिसा जेष्ठ मास.

श्रीगणपती.

यादी खासगत राजश्री हरि परशराम सुा तिसा खमसेन मयातैन आलफ नारो हरि करंदीकर यास साल मजापासून नक्त ६५ रुपये तैनात पासष्ट रुपये पावतील येणेप्रमाणें छ २० जेष्ठ मास.

श्रीगणपती

यादी नारो हरि करंदीकर सुा अशर मयातैन आलफ यास इनाम जमीन नवीन करार करून १०० रुपयेची दिल्ही असे. पट्टण-कुडीचे लढाईत सेवा केल्याबा. छ. ५ अधिक आषाढ मास मुा तासगांव.

नारो हरि करंदीकर यांनीं पट्टणकुडीचे लढाईत भाऊसाहेब पड-ल्यावर त्यांचें दहन केलें, पुत्रकर्म केलें, हें जाणून रामचंद्रआपा यांनीं पलुस येथील जमीन १०० रु. आकाराची इनाम दिल्ही. व तैनातही दिल्ही. पुढें गोपाळरावसाहेब यांनीं १०० रु. आकाराची जमीन संस्थानांत दिल्ही ती जमीन अद्याप करंदीकराचे वंशास चालू आहे. नारो हरि करंदीकर यांचे चिरंजीव हरि नारायण यांनीं ता. ३१-५-१८५१ इ. रोजीं कंपनीसरकाराकडे इनामाबद्दल अर्ज केला होता याच सालीं मुंबईचे गव्हर्नर यांसही अर्ज केला होता.

"३३४६ ता. ३ माहे डिसेंबर सन १८५१ इसवी अर्जदार यांस हुकूम कीं, येविसी तुह्मी येजंटसाहेबबहादुर यांजकडे अर्ज करावा ता. ५ माहे डिसेंबर सन १८५१ इसवी."

हरि नारायण करंदीकर यांचे उद्गारः— "श्रीमंत कै० परशराम-भाऊ पटवर्धन पट्टणकुडीच्या लढाईंत पडले. त्यांच्या अंतकाळची

सेवा आमचे वडील नारो हरि यांनीं केली. त्यानंतर आह्मी सेवा केली त्याजकरितां कैलासवासी यांचे चिरंजिव श्रीमंत कै० रामचंद्रावआपा यांणीं जमीन १०० मौजे पलुस इ॥ तासगांव येथें करून दिल्ही. व रुपये १५० नानासाहेब याजकडून व रावसाहेब ६५ व बापूसाहेब ३५ रुपये येणेप्रमाणें नेमणूक करून दिल्ही. सदरहू जमीन आह्माकडे आजपावेतों चालत असून हल्लीं मामलेदार यांनीं जप्त केली. येविसी अर्जी मे. म्यॉनसनसाहेब आसिस्टंट पो. ए. याजपासीं अर्जी दिल्ही. त्याप्रों मामलेदार यांनीं चौकशी करून जमीन जप्त केली. वगैरे मजकूरचा अर्ज ता। नोवेंबर सन १८५१ इ॥ " करंदीकरांचे वंशज हल्लीं जमखंडी येथें वाकिली करीत आहेत. यांना जमखंडी संस्थानांतून उत्पन्न चालूं आहे.

सु॥ सन इहिहे मयातैन व अलफ इसवी सालीं झालेल्या लढाईंत भाऊंचे चिरंजीव रामचंद्रआपा यांस गोळीची जखम लागली. त्यांत चतुर्थीचा उपास असल्यामुळें झीट येऊन डोळ्यापुढें अंधारी आल्यामुळें, शिरगांवचे माळावर जमिनीवर व्याकुळ होऊन पडले. तेव्हां घोड्यावरील भुरक्या काढून मालोजीराव नलगे वगैरे नलगे मंडळींनीं भाल्याची कैची करून खांदा देऊन साहेबास घेऊन चालले तों नगदीकर देसाई यांची पालखी घेऊन नंतर मिरजेस पोंचविलें. संकटसमई जिवाची परवा न करितां नलगे मंडळींनीं एकनिष्ठ सेवा चाकरी केल्याचीं पुष्कळ उदाहरणें आहेत. रामचंद्रआपांचें एकच पत्र पुढें देत आहे.

श्रीगणपती.

" राजश्री कुसाजी नलगे व मानसिंगराव व राणोजीराव व मालोजी नलगे गोसावी यासीः— अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नों रामचंद्र परशराम आसिरवाद उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये लिहिणें विशेष. स्वारी बाहेर निघाली आहे तर तुह्मी तयार होऊन चाकरीस सत्वर येणें. गांव अखेर सालीं

नेमून हवालीं तुमच्या केला जाईल. रा॥ छ. २१ रमजान सु॥ सन तिसा मयातैन व अलफ बहुत काय लिहिणें हे आसिरवाद."

नलगे यांचे वंशज जमखंडी येथें आहेत; यांना परंपरा चालत आलेल्या सनाळ येथील जमिनी हल्लीं चालत आहेत. मात्र तैनाती हल्लीं बंद आहेत असें समजतें. यांना अबदागिरीचा मान होता तो हल्लीं आहे किंवा नाहीं तें समजत नाहीं.

रावसाहेबांचे पश्चात् राधाबाईसाहेब यांनीं सर्व प्रजाजनांच्या विनंतीवरून व पतीच्या आज्ञेप्रमाणें, खासगी व दौलतीकडील कारभारी आपटे व जोशी या विश्वासूक व कार्यदक्ष कारभाऱ्यांच्या सहाय्यानें राज्यकारभार सात आठ वर्षें उत्तम चालविला. पुढें जमखंडी येथील क्षुद्र, लोकांच्या संगतीनें, त्या वेळचे पो. ए. अंडरसनसाहेबांनीं वरिष्ठ सरकारास रिपोर्ट करून असें सुचविलें कीं, हल्लींच्या या दोघांही कारभाऱ्यांस कमी करून दुसरा कारभारी नेमावा आणि कामावरून दूर केलेले उभय कारभारी व मेघःशामपंत गोखले वकील वगैरेंवर खटले करावेत. ही शिफारस वरिष्ठ सरकारांनीं मंजूर केल्यावर श्री०ताईसाहेब यांना दरसाल ६००० रुपयांची नेमणूक करून देऊन, राधाबाईताईसाहेबांना राज्यकारभारांतून काढिलें; आणि आपटे व जोशी यांस कमी करून सरकारतर्फे विनायक कृष्ण पंडित यांस सन १८४९ त कारभारी नेमिलें आणि उभयतां कारभारी यांची चौकशी करून, आपटे यांजवर शाबिदी करून तीन वर्षांची कैद व २०००० रु. दंड केला. जोशी यास सोडून दिलें. श्रीमंत रावसाहेबांनीं ज्या कारभाऱ्यांची शिफारस केली; त्या कारभाऱ्यांस सरकारकडून शिक्षा होते. "तेव्हां सरकार शहाणे म्हणावें तर रावसाहेब मूर्ख ठरतात; जर रावसाहेब शहाणे ह्मणावे तर सरकार मूर्ख ठरतें" आश्चर्य आहे ! जे कारभारी रावसाहेबांचे वेळेस होते तेच पुढें होते. सरकारचे मनांत जर राज्यकारभार आपले हातीं घेण्याचा होता तर तो शहाण्यास मूर्ख ठरवून

शिवाय त्यांस शिक्षा देणें वगैरे प्रकार न करतांही; अज्ञान पालकांच्या कायद्याचें कलम पुढें ठेवून सुरेख रीतीनें कारभार हातीं घेतां आला असता व असें कृत्यही करण्याचें प्रयोजन पडलें नसतें. "

श्रीमती राधाबाईसाहेब यांनीं आपल्या संस्थानचा कारभार उत्तम प्रकारें चालविला असतां, पो. एजंटाच्या सांगण्यावरून सरकारनें ताईबाईसाहेबांस सालीना ६००० रुपयांची नेमणूक देऊन हातचा कारभार काढून घेतला. हा एकप्रकारचा झालेला अपमान बाईसाहेबांना दुःसह होऊन त्या जमखंडीस न राहतां श्रीव्यंकटेशाजवळ कल्होळी येथें जाऊन राहिल्या.

रामचंद्रराव आपासाहेब दत्तक झाले वेळीं यांचें वय सात वर्षांचें होतें. दत्तक होण्यापूर्वी पूर्वगृहीं एके वेळीं जनक पिते तात्यासाहेब सोप्यावर बसले होते. तों इतक्यांत एक बैरागी " माई भिक्षा डालो " असें ह्मणाला. तों छोटे गणपती महाराज भिक्षा घालण्यास बाहेर आले. गणपतीकडून भिक्षा घेऊन तो बैरागी त्या गणपतीस नीट न्याहाळून पाहूं लागला; आणि तात्यासाहेबास ह्मणाला, "महाराज, हा तुमचा मुलगा पूर्वजन्मीचा मोठा तपस्वी, राज्य भोगण्याचे इच्छेनें तुमच्या पोटीं आला आहे. थोड्याच दिवसांत हा राजा होऊन पुढें मोठा कीर्तिमान होईल. " असें बोलून तो बैरागी निघोन गेला. पुढें थोड्याच दिवसांत तो मुलगा दत्तक होऊन राजा झाला.

रामचंद्ररावआपासाहेब यांचें शिक्षण झाल्यावर तारिख ७ जानेवारी सन १८५३ शुक्रवार रोजीं, सरकारचे प्रतिनिधी एजंटसाहेब बहादूर यांनीं दरबार भरवून श्रीमंत आपासाहेबांस राज्याची पूर्ण मुखत्यारी दिली. नंतर श्री० आपासाहेबास उद्देशून प्रतिनिधी ह्मणाले, " आजपासून आपण आपल्या संस्थानचे पूर्ण मालक झालांत. सर्व राज्यसूत्रें आपले हातीं आलीं. यास्तव आपण न्याय व नीति यांस अनुसरून आपल्या प्रजेचें उत्तम प्रकारें संरक्षण करावें. ह्मणजे सरकारास संतोष होईल अशी आमची इच्छा आहे. " अशा आशयाचें

थोडेसें भाषण झाल्यावर, श्री० रामचंद्ररावांनीं प्रथम सरकारचे आभार मानून " आपल्या उद्देशाप्रमाणें परमेश्वर खचित मजकडून करवील अशी मी आशा बाळगतों, " अशा प्रकारचें मोठ्या गंभीरपणानें उत्तर दिलें. नंतर अत्तर गुलाब होऊन दरबार बरखास्त झाला.

श्री० आपासाहेबांनीं मुखत्यारी मिळाल्यानंतर मोठा समारंभ करून ब्राह्मणभोजनें व देकार केला.व मोठ्या आनंदानें सुयंत्रित राज्यकारभार सतत पांच वर्षें चालविला. तो अकस्मात् एखादा घाला पडावा किंवा सिंहाचा बच्चा अचुक सापळ्यांत सांपडावा तसें झालें. उत्तर हिंदुस्थानांत सन १८५७ सालीं काशी येथें हिंदू पलटणी बिथरून युरोपियनांची कत्तल केली. याच सुमारास झांशीची महाराणी आपल्या दत्तक मुलास मान्य केलें नाहीं म्हणून युद्धास उभी राहिली. याच सुमारास नानासाहेब पेशवे व तात्या टोपे आपलें गेलेलें राज्य परत मिळविण्याच्या खटपटीस लागले. अशा धामधुमीचे वेळीं दक्षिण हिंदुस्थानांतही गडबड सुरू झाली.

सत्तावन सालच्या धामधुमीचे वेळीं कांहीं संशयावरून श्रीमंत आपासाहेबांसही सरकारनें धरून नेऊन बेळगांव व वेंगुर्लें येथें ठेविलें होतें. परंतु पुढें चौकशीअंतीं पुन्हा सरकारांनीं श्री० आपासाहेबांस सन १८५९ च्या जानेवारींत सातवे तारखेस सोडून दिलें.

श्रीमंत आपासाहेब यांस, नेलेला सर्व खजिना दागिन्यांसह त्यांच्या हवालीं करून मोठ्या सन्मानानें आपले संस्थानीं जाण्याविषयीं अधिकाऱ्यांनीं हुकूम दिला. हें आनंददायक वर्तमान ताबडतोब जमखंडीस येऊन पोहोंचलें. इतक्यांत त्यांचे मागोमाग सर्व सरंजाम पाठवून देण्याबद्दल हुकूमच जमखंडीस दाखल झाला. सर्व सरंजामानिशीं श्रीमंतांची स्वारी पालखींतून येत होती. हत्ती, घोडेस्वार, सांडणीस्वार, कोतवाल, मानकरी, तैनातदार आणि पालखीजवळ भालदार, चोपदार अशा थाटानें स्वारी गांवांत येत होती. गांवांत गुढ्या, तोरणें, निशाणें, मोठमोठ्या कमानी व रस्त्यांवर

नानातऱ्हेच्या रांगोळ्या काढल्या होत्या. सर्व तऱ्हेचीं वाद्यें वाजत होतीं. मधून मधून बंदुकांचे फेर झडत होते. रस्त्यानें व माडी-वरून प्रभूला पाहण्याकरितां लोकांची गर्दी झाली होती. श्रीमंतांवर वाटेंत प्रजाजन व नोकरलोक यांनीं फुलांची वृष्टी केली. सर्वत्रांस आनंदीआनंद झाला. श्रीमंत रामचंद्रराव गादीवर विराजमान झाले. सर्व गांवांत शर्करा वाटल्या. याचक व दीनजनांस व ब्राह्मणांस देकार केला व ब्राह्मणसंतर्पण केलें; आणि श्रीशंकरावर महारुद्र करविला. श्रीरामेश्वराची आपल्यावर पूर्ण कृपा आहे असें जाणून, आपासाहेब रात्रंदिवस श्रीच्या पदीं लीन होऊन राहिले. श्रीमंत ता. १७ एप्रिल सन १८५९ इ. रोजीं जमखंडीस आले आणि ता. १९ पासून पूर्ववत आपल्या दौलतीचा कारभार आनंदानें करीत राहूं लागले. चोहोंकडे चाललेल्या धामधुमीपासून आपणांस त्रास होऊं नये ह्मणून आपासाहेबांनीं आपल्या व राज्याच्या बंदोबस्ता-करितां कांहीं नवीन लोक नोकर ठेवून बंदोबस्त केला. तों सरका-रचा समज भलताच होऊन, आपासाहेबावर दुर्धर प्रसंग आला होता; परंतु श्रीरामेश्वराचे कृपेनें सरकारची संशयवृत्ति शुद्ध झाली.

आपासाहेबांचे मनांत किल्ल्यांत न राहतां दुसरीकडे कोठें तरी रहावें असें आलें. कारण, मध्यंतरी झालेल्या गडबडींत किल्ल्याची सर्व पाडापाडी झाल्यामुळें किल्ल्यांत व वाड्यांतही गोवध व गोमांस-भक्षण झाल्याबद्दलची त्यांच्या मनांत शंका आल्यामुळें त्यांनीं हवा-शीर जागा पहाणेचें निश्चित केलें. जमखंडी गांवापासून सुमारें दीड मैलावर मेलागिरी लिंग्गापा या नांवाचे डोंगरांत श्रीरामेश्वर या नांवाचें अनादि देवस्थान आहे तेथें श्रीशंकर अंबेसह वास करितात. श्रीराम-चंद्रजी लक्ष्मणासह रावणवधार्थ लंकेवर गेले त्यावेळीं याच मार्गानें गेले. हें स्थळ उत्तम व पवित्र आहे असें समजून त्यांनीं येथें श्री-रामेश्वराची व देवीची स्थापना केली, अशी आख्यायिका आहे. श्री-सान्निध्य राहून सेवा करण्यास हें स्थळ उत्तम आहे असें ठरवून

आपासाहेबांनीं या स्थळीं राहण्याचा निश्चय केला. आणि येथील सर्व जंगल कापून, जवळचे डोंगर फोडून मैदान करविलें. आणि तेथें लहान मोठ्या अशा पुष्कळ इमारती बांधविल्या. हत्तीकरितां ठाणीं, पाकशाळा, पागा, विहिरी, तलाव आणि सुंदर बागबगीचे करविले. त्याप्रमाणेंच श्रीमदुमारामेश्वर, श्रीत्रिपुरसुंदरी, श्रीहरिहरेश्वर, श्रीकामेश्वर, श्रीसर्वेश्वर, मारुती आणि दुर्गाबागेंत श्रीदत्तात्रय या देवांचीं देवालयें लहान मोठीं बांधिलीं. आणि रामेश्वराचें स्थान अनादि आहे, त्याचेजवळच श्रीदत्तात्रयाचें सुरेखसें मंदिर उठविलें. येथील सर्व इमारती व देवालयें या कामीं अदमासें तीस बत्तीस लाख रुपये खर्च झाले असावेत असें ह्मणतात. अशा या सुंदर हवाशीर जागेंत आपासाहेब राहूं लागले. सर्व देवांच्या पूजा व नैवेद्य आणि नंदादीप सर्व व्यवस्थेशीर चालूं केले. श्रीपुढें त्रिकाल चौघडा सुरूं केला.

आपासाहेबांचे मनांत नानाप्रकारचें ग्रंथसंग्रही असावेत ह्मणून ग्रंथसंग्रह केला. त्यांत संस्कृत हस्तलिखित व छापील मिळून ३३०० मराठी ११००; कानडी १००; गुजराथी १००; इंग्रजी ३०००; फारशी व उर्दू १५० आणि ५०० किरकोळ मिळून ८२५० एकंदर पुस्तकें होतीं. या संग्रहालयाची व्यवस्थाहि उत्तम प्रकारची ठेविली होती.

श्री० राधाबाईसाहेब आपल्या दत्तक पुत्राचें प्रेमानें संगोपन करूं लागल्या. मुलाचा व्रतबंध शके १७६४ माघ शु० १० रोजीं रा. रा. बापूसाहेब मंगळवेढेकर यांजकडून पुण्याहवाचन ठेवून मोठ्या समारंभानें केला. खर्च पांच हजार पांचशें पासष्ट रुपये चार आणे आला. नंतर चार वर्षांनीं तासगांव येथील हरि महादेव गोडबोले यांच्या मुलीबरोबर आपासाहेबांचा विवाह झाला. श्री. भाऊसाहेब तासगांवकर यांणीं पुण्याहवाचन ठेविलें होतें. मुलीचें नांव लक्ष्मीबाई ठेविलें. या कार्यास पो. एजंट यांनीं ५०००० रुपयांची मंजुरी दिली होती. आपासाहेबांनीं तरुणपणीं दुसरी बायको सांगली येथील मनोहर

यांची मुलगी करून घेऊन तिचें नांव जानकीबाई ठेविलें. सौ. जानकीबाई जरा देखण्या असल्यामुळें यांच्यावर आपासाहेबांचें प्रेम विशेष होतें.

आपासाहेबांच्या मातोश्री कल्होळीहूनही पुढें कृष्णाकांठीं हिपरगी येथें जाऊन राहिल्या होत्या. मातोश्रींना जमखंडीस आणावें असें आपासाहेबांचें मनांत वरचेवर येऊं लागलें; त्याप्रमाणें त्यांच्याकडे जाण्याची तयारीही करण्यास कारकुनास सांगितलें. या वेळीं यांचा मुक्काम गाणगापूर येथें होता. इतक्यांत जमखंडीहून मातोश्री आजारी असल्याचें पत्र आलें; तें वाचून पहातांच सडे एकटेच तावडतोब निघोन मातोश्रीजवळ आले व अत्यंत विनयानें मातोश्रींचे पाय घट्ट धरून ह्मणाले, कृपा करून वाड्यांत यावें, मी आपणांस आतां नेल्याशिवाय राहणार नाहीं. पुत्राच्या निष्कपटपणाच्या व लीनतेच्या कृतीमुळें मातोश्रीस आनंद झाला आणि म्हणाल्या, मी सांगतें तें तूं जर करशील तर येतें. तेव्हां आपासाहेब ह्मणाले, आपल्या आज्ञेबाहेर मी अगदीं वागावयाचा नाहीं. तेव्हां मातोश्री ह्मणाल्या, "एक तर, माझ्या विठूस बंदिवासांतून सोडवावें, गोपाळ गोविंद यांस सहा वर्षांची बेदाया पावती द्यावी, आम्ही आजवर चालविलें आहे तसें चालवावें, पदरच्या मंडळीचें कमी करूं नये, अंतीं माझी तुला करावी आणि लक्ष ब्राम्हणभोजन करावें. या सर्व गोष्टी करील असें वचन दे." श्री० आपासाहेबांनीं, शक्य त्या सर्व गोष्टी मी करील असें तावडतोब वचन दिलें. व त्या पांच कलमांची याद लिहून दिली. श्रीमंत मातोश्रीस बरोबर घेऊन निघाले ते जमखंडीजवळ आले. जोगीमर्डीपासून, मातोश्रीस मेण्यांतून उतरवून पालखींत बसविलें. आपण पालखीबरोबर पायीं चालले. सर्व सरंजाम बरोबर असून वाद्यें वाजूं लागलीं. सर्व नगरी शृंगारली होती असा अवर्णनीय थाट कधींहि झाला नव्हता. सन १८०३ ता. २२ एप्रिल रोजीं सकाळचे ८॥ वाजण्याचे सुमारास

मातोश्रीस किल्ल्यांत आणून श्रीमंतांनीं त्यांचा हात धरून पालखींतून उतरून घेऊन हळूं हळूं खास वाड्यांत नेलें. त्यावेळीं तोफा डागण्यांत आल्या. आपली दूर गेलेली मातृदेवता पुनश्च आपले राजमंदिरांत आली ह्मणून आपासाहेबांस परमानंद झाला. तन्निमित्त ब्राह्मणभोजन करविलें. दक्षिणा दिली व गोरगरिबांस देकार केला. श्रीमंत दिवसांतून दोन वेळां मातोश्रीजवळ येऊन बसत. सुनाही सासूबाईंच्या अर्ध्या वचनांत राहूं लागल्या. श्री. ताईसाहेबांनीं आपल्याजवळ असलेले जडजवाहिराचे दागिने मोठ्या प्रेमानें दोघी सुनांस सारखे वाटून दिले आणि दानधर्मादिक कृत्यें करीत आनंदांत राहिल्या.

याप्रमाणें कालक्रमण करीत असतां, दिवसेंदिवस प्रकृती थकत चालल्यामुळें अंतकाल समीप आला. तेव्हां मातोश्रींच्या विचारें तुला करण्याचें ठरविलें व चैत्र वद्य ३ मंगळवारीं यथाविधि तुला करविली. तुलेंत बसतांना श्री. ताईसाहेबांनीं आपलेजवळ तुलसीवृन्दावन व आपली नात मनुबाई यांस घेतलें होतें. ११,६७६ होन तुकीं लागले. पुढें ता. ६ मे सन १८५३ चैत्र वद्य १४ भृगुवारीं श्री. राधाबाईताईसाहेब स्वर्गस्थ झाल्या. श्रीमंतांना अत्यंत दुःख झालें. त्यांच्या मनांत मातोश्रींची आणखी कांहीं दिवस सेवा घडावी असें होतें. मातोश्रींचें उत्तरकार्य यथाविधीनें करून दानधर्महो बराच केला. तुळेची रक्कम पुढें सार्वजनिक कामाकडे लाविली. विठ्ठलपंत आपटे कैदेंत असतां वारल्यामुळें त्यांच्या मुक्ततेखेरीज करून बाकीचीं मातोश्रीस दिलेलीं वचनें सगळीं पुढें पूर्ण करून दिलेल्या वचनांतून आपासाहेब मुक्त झाले. पुढें एकामागून एक अशा थोड्याच दिवसांच्या अंतरानें दोन्हीं कुटुंबें वारलीं. तेव्हां नाइलाजास्तव सर्वलोकांच्या आग्रहावरून श्रीमंतांनीं तिसरा विवाह सन १८६१ ता. ६ मार्च रोजीं केला. वधू शेडबाळ येथील रहाणारे नेने यांची कन्या होय. यांचें नांव सीताबाई असें ठेविलें. यांना मूलबाळ होत नाहीं तेव्हां आणखी लग्न करावें कारण चौथ्या कुटुंबास आपल्याला खास पुत्र-

प्राप्ती होणार असें ज्योतिषांनीं सांगितलें. योग्य कारण लक्षांत घेऊन प्रजेच्या आग्रहाकरितां आपासाहेबांनीं चौथें लग्न केलें. पाली येथील आपटे यांची मुलगी केली व तिचें नांव श्री. सौ. पार्वतीबाई असें ठेविलें. या कुटुंबापासून आपासाहेबांस सुख न होतां दुःख मात्र फार झालें. श्री. सौ. पार्वतीबाईसाहेब एकाएकीं अपमृत्यूनें ता. ३० जानेवारी सन १८७४ रोजीं देवाधीन झाल्या.

दाजीसाहेब चिंचणीकर वारल्यावर त्यांच्या मुलांपैकीं कृष्णराव ऊर्फ आणासाहेब हा लहान होता. त्यास आपासाहेबांनीं आपलेजवळ ठेवून त्याचें ते पुत्रवत् पालन करूं लागले. श्री० सौ. सीताबाईसाहेब यांनीं आपल्या बहिणीची मुलगी गोदू या नांवाची बाळगिली होती. गोदू व आण्णा या उभयतांचा जोडा सुरेख शोभतो, असें यजमान व यजमानपत्नीस वाटून आल्यामुळें, शके १७९४ माघ शु॥ १० रोजीं शुमुहूर्तावर त्यांचा विवाह केला. हा विवाह करण्याचा मुख्य हेतू त्यांस पुत्रप्राप्ती व्हावी, ह्मणजे तोच आपण दत्तक घेतला असतां उत्तम ! ! असें श्रीमंतांचे मनांत होतें. "देव भावाचा भुकेला" अशी ह्मण आहे. त्याप्रमाणें यजमान व यजमानीण यांचा पूर्ण भाव असल्यामुळें त्या दंपत्यास श्रीरामेश्वराचे कृपेनें पुत्र झाला. नगरांत शर्करा वाटली. बारसें मोठ्या थाटानें केलें. मुलाचें नांव माधव ऊर्फ दाजी असें ठेविलें. पुढें त्या मुलास योग्य शिक्षक नेमून दिला. घोड्यावर बसणें, निशाण मारणें, वगैरे शिकण्याच्या वेळा निराळ्या नेमून दिल्या. फावल्या वेळीं श्रीमंत स्वतः संस्थानसंबंधीं त्यास पूर्वजांच्या पराक्रमाच्या गोष्टी सांगत असत. एकंदर व्यवस्था आपल्या पुत्राप्रमाणें त्या दाजीची ठेविली होती.

सन १८९१।९२ सालीं श्रीमंतांनीं पुण्याच्या कारागिरांकडून चांदीची एक पालखी करवून आणिली. ती चांदीची केलेली असून तीन राजगोंड्यासह सर्व गोंडे चांदीचेच केलेले असून, दांडीच्या पुढच्या बाजूस सिंहाचें तोंड व मागील बाजूस एक तऱ्हेचें फूल

केलेलें आहे. वरील बाजूस पांच कळस झळकत आहेत. अशा प्रकारची सर्वांगसुंदर कुसरीचें काम केलेली पालखी इकडील संस्थानांत कोणाकडेही नाहीं. या पालखीस सुमारें १५००० रुपये खर्च आला असावा. ही पालखी तयार होऊन येतांच प्रथमतः दाजीसाहेब त्यावेळीं लहान होते, त्यांस पालखींत बसवून मोठ्या समारंभानें देवदर्शनास नेऊन आणिलें. तेच दाजीसाहेब विद्यमान संस्थानाधिपती आहेत.

दाजी याचा व्रतबंध व मुली अंबा आणि दुर्गा विवाहास योग्य असल्यानें त्यांचे विवाह, व श्रीमंतांचा पूर्वगृहांतील धाकटा बंधु केशवराव अनंत यादवाडकर याचा पुत्र बापू याची मुंज, अशीं चार कार्यें, श्री० आपासाहेबांनीं मोठ्या थाटानें करविलीं. शके १८१० त वैशाख शु॥ ५ स मुंजी, आणि वैशाख शु॥ ९ स लग्नें याप्रमाणें झालीं. जमखंडी येथील खंडेराव रास्ते यांचा मुलगा बापूसाहेब यांस अंबा व आपला नातू नानासाहेब जोशी यांस दुर्गा अशा सालंकृत कन्या अर्पण केल्या. या कार्यांत चार दिवस ब्राह्मणभोजन मुक्तद्वार चाललें होतें. या चारी कार्यांस एकंदर खर्च २२,५५३ रुपये ४ आणे ८ पै झाला.

चिरंजीव सौ. अंबाबाई व दुर्गाबाई यांस त्यांचा योगक्षेम पुढें चांगल्या रीतीनें चालावा म्हणून दोघींना दोन गांवें सन १८९० सालीं वंशपरंपरा इनाम करून दिलीं. सौ. अंबाबाई इजला कडपटी हा गांव ४२२८१२८६ रुपयांचा आणि ५५१८२८६ उत्पन्नाची जमीन; मिळून एकंदर ९७३ ८१५ चें इनाम दिलें. आणि सौ. दुर्गाबाईला हंचनाळ या नावाचा गांव रुपये ९६९८११ चा इनाम दिला. त्याप्रमाणेंच मानलेली कन्या चि॥ सौ. गोदूबाई इजलाही नागनूर व कंकणवाडी या दोन गांवच्या पाटिलक्या व दरमहा शंभर रुपयांची नेमणूक करून दिली. तसेंच भावी युवराज दाजीसाहेब यांस दोन गांव इनाम करून दिले होते.

श्री० आपासाहेब यांनीं राज्यव्यवस्था उत्तम चालविली होती. राजनगरींत आपल्या मळ्यांत एक सुंदर हायस्कूल बांधून त्यास "परशरामभाऊसाहेब हायस्कूल " असें नांव दिलें. त्यास एक लक्ष पंचवीस हजार रुपये खर्च झाला असावा. सर्व संस्थानांत बहुतेक नव्या शाळा बांधिल्या. सन १८५३ सालीं शिळेचा छापखाना व सन १८५५ त खिळ्याचा ( टाईपाचा ) छापखाना असे दोन छापखाने आणवून विद्याखात्याकडे दिले. शिळेवर साप्ताहिक ' परशू ' नांवाचें वर्तमानपत्र व त्याची पुरवणी खिळ्यावर इंग्लिश भाषेंतही निघूं लागली. शिवाय लहान लहान पुस्तकेंही निघूं लागलीं पुढें या छापखान्यास ' रामतीर्थ प्रायव्हेट प्रेस ' असें नांव दिल्यानंतर निरनिराळीं पुस्तकें व दौलतीकडील नोटिसा, समन्सें, हिशोबाचे नमुने वगैरे कामें छापून निघूं लागलीं.

श्री० आपासाहेबांनीं आपल्या संस्थानांत पुष्कळच सुधारणा केल्या. विद्याखातें, पोलिसखातें, देवीखातें व दवाखाना स्थापन करून पाण्याच्या सोयीकरतां, लकणकेरी तलाव खर्च १२०००० रुपये व मुडगिरी तलावास नळासुद्धां एक लाख रुपये खर्चून पाण्याची उत्तम व्यवस्था केली. सन १८८७ पासून सन १८९६ पर्यंत रस्त्याच्या बाजूच्या झाडाकरितां, दुष्काळांतील कामाकरितां, पाण्याच्या सोयीकरितां, धर्मशाळा, रस्ते, शाळेच्या इमारती वगैरे लोकोपयोगी कामाकरितां एकंदर खर्च ७८५६२१ रुपये लागला. वर नमूद केलेल्या कामाशिवाय रामतीर्थ येथें बांधविलेलीं लहान मोठीं देवालयें, पागा, दुर्गातलाव, लहान मोठे बंगले, हत्तींचीं ठाणीं व इतर इमारती पब्लिकवर्क्स खात्याकडे होत असलेला खर्च वगैरे यांच्या कारकीर्दींत एकंदर खर्च ६०।७० लाख रुपये झाला असावा असें सहज दिसून येण्याजोगें आहे. अशा मोठमोठ्या रकमा या कामीं खर्च करण्यांत श्रीमंतांचा हेतू हाच होता कीं, सार्वजनिक कामें होऊन लोकांच्या अडचणी दूर व्हाव्यांत व त्यांना सौख्य व्हावें.

आणि गोरगरीब लोकांना मजुरीच्या रूपानें पैसे मिळून त्यांचा प्रतिपाळ व्हावा.

सन १८५७ च्या धामधुमींत आपासाहेबांस बेळगांव व वेंगुर्ले येथें नेलें. त्यावेळीं त्यांच्याबरोबर पुजेंतील नित्य पूजा करण्याचा एक बाण होता. तो बाण श्रीमंतांना पूर्वी एका सिद्ध पुरुषानें देऊन ह्मणाला, " या बाणाचें तूं नित्य पूजन करीत जा. हा बाण तुझ्यावर येणाऱ्या एका भयंकर संकटांतून तुला मुक्त करील. " श्रीमंतांना आधींच शंकराची भक्ति विशेष, त्यांतून सिद्ध पुरुषाकडून बाण मिळालेबद्दल त्यांना फारच आनंद होऊन त्या बाणाची पूजा श्रीमंत नित्य करीत. मध्यंतरी आलेले विघ्नांतून श्रीमंत मुक्त झाल्यावर, जमखंडी येथें किल्ल्यांत उत्तरेच्या बाजूस मोठें सुंदर असें भव्य देवालय बांधून, त्यांत त्या बाणाची विधिपूर्वक स्थापना सन १८६० ह्मणजे शके १७८२ मार्गशीर्ष शु॥ ६ रोजीं केली; आणि त्याचें नांव " श्रीमदुमारामेश्वर जमखंडी " असें ठेविलें. देवालयाचे पुढें एक टोलेजंग कमान उभी करून तिच्यावर चौघडा ठेविला आहे. या देवालयास पुष्कळ पैसा खर्च करून, श्रीमदुमारामेश्वरास १४०१९ चवदा हजार एकोणीस रुपयांची दरसालची नेमणूक करून दिलेली असून, त्यांतून वार्षिक शिवरात्रीउत्सव, दररोजची पूजा-नैवेद्य वगैरे सर्व व्यवस्था उत्तमप्रकारें होत असते. वडिलार्जित चालत आलेला श्रीगणपतीउत्सव पूर्वी किल्ल्यांत मोठ्या थाटानें करीत. त्याचप्रमाणें पुढें तो उत्सव श्रीरामतीर्थावर होऊं लागला. या उत्सवास लांबलांबचे गवई, हरिदास, शास्त्री, वैदिक येत असत. श्रीमंतांना वेदश्रवणाचा फार नाद असे. ह्मणून ते ब्राह्मणांचे रात्रौ जागरण करवीत व तेव्हां ते स्वतः ऐकण्यास बसत. ते सर्व ह्मणणें संपल्यावर मग जात. सदरहु ब्रह्मवृंदांस मोठ्या थाटानें पाटरांगोळी घालून, चांदीच्या ताटवाट्या ठेवून, नाना प्रकारच्या पक्वान्नांनीं युक्त असें भोजन घालून भोजनसमयीं, मोठ्या विनयानें हात जोडून

प्रार्थना करीत. भोजनोत्तर योग्यतेनुरूप शालजोड्या, धोतरजोडे, दक्षिणा व वाटखर्ची देऊन, चरणी वंदन करून "असेंच प्रतिवर्षी येणें झाल्यास माझ्या मनास फार आनंद होईल." असें बोलून सर्वांस निरोप देत. यांनीं मोठमोठालीं सत्कृत्यें, शिवाय पाशुपतास्त्राचें पुरश्चरण, शतचंडी वगैरे अनुष्ठानें हजारों रुपये खर्च करून केलीं. या व्यतिरिक्त अन्य धर्मकृत्यें श्रीमंतांनीं पुष्कळच केलीं त्याचें वर्णन करणें अशक्य आहे.

## शृंगेरी स्वामींचे आगमन.

श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य यांचें आद्यपीठ शृंगेरी. त्या मठाचे जगद्गुरु महाराज यांचें आगमन जमखंडीस कधींच झालें नव्हतें व श्रींस तेथें कोणीं आणण्याचाही प्रयत्न केला नाहीं. जगद्गुरूंचे पाय आपल्या गृहीं लागावे अशी श्री० आपासाहेबांची फार इच्छा होती. म्हणून केशवाचार्य नांवाच्या दरबारीं ब्राह्मणास विनंतीपत्र देऊन, श्रीमंतांनीं श्रीचरणीं निमंत्रणास पाठविलें. श्रीत्रिपुरसुंदरी देवीचें शारदीय नवरात्रोत्सवास श्रींचें आगमन व्हावें, हा श्रीमंतांचा हेतु होता. श्री आद्य गुरूंनीं श्रीमंत रामचंद्ररायाचा उत्तम प्रकारचा लौकिक ऐकला होता; त्यांतून अतिशय लीनतेनें भक्तिपुरःसर लिहिलेलें विनंतीपत्र पाहून श्रीनीं सर्व सरंजामासह येण्याचें अभिवचन देऊन तसें आज्ञापत्रही दिलें. तें पाहून आपासाहेबांना फारच आनंद झाला.

श्रींची स्वारी ता. १६ सप्टेंबर सन १८८७ इ. शके १८०९ भाद्रपद वद्य १४ रोजीं सकाळीं किती वाजतां येईल, सामोरे जाण्याकरितां सरंजाम व मंडळी कोठें तयार असावी, श्रींची स्वारी पेठेंतून कोणत्या रस्त्यानें मिरवत येऊन रामतीर्थावर जाईल वगैरे गोष्टी व कोणकोणते कामगारांनीं काय काय व्यवस्था ठेविली पाहिजे, याजबद्दल पूर्वीच कार्यक्रम काढून तो ज्या त्या खात्याचे अधिकारी

यांजकडे पोंचता केला होता; व त्यांत कामें वेळच्यावेळीं बिनचुक केलीं पाहिजेत असा सक्तीचा हुकूम केलेला होता. जमखंडीपासून दीड मैलावर कट्टेगिरी या नांवाचा मोठा तलाव आहे; त्याचे कांठीं श्रींचें आदरातिथ्य करण्याकरितां एक भव्य तंबू दिला होता.

श्रींच्या सुवर्णमय पालखींत, श्रींची स्वारी बसलेली असून ती शामवर्ण मूर्ति, तरुण, स्वारी भव्य व रमणीय असून हास्यवदन व शांत होती. डोईवर रत्नजडित मुकुट घातला असून कपाळीं भस्म चर्चिलें होतें. गळ्यांत मोत्यांच्या व जडावाच्या माळा धारण केल्या होत्या व भरगच्ची दुपेटा परिधान केला होता. हस्ताचे डावीं एक स्मरणी असून मुखावाटे नामस्मरण चाललें होतें. श्रींची पालखी गांवांतून जातांना कित्येक सुवासिनी पंचारतीनें ओंवाळीत होत्या. कित्येक लोक सारखी पुष्पवृष्टी करीत होते. आणि सर्वतोमुखीं " श्रीजगद्गुरुमहाराज कीं जय " असा सारखा गजर चालला होता. श्रीमदुमारामेश्वराचें दर्शन घेऊन, श्रींची स्वारी तेथें तयार केलेल्या भरजरी सिंहासनावर बसून थोडी विश्रांति घेऊन, पुन्हा मार्गक्रमण करूं लागली. तों श्रीरामतीर्थावर पोंचल्यावर, तेथें असलेल्या लोकांनीं श्रीपुढें नारळ ठेवून दर्शन घेतलें. मग तेथून श्रींची स्वारी निघून श्रीउमारामेश्वर, रामतीर्थ व श्रीत्रिपुरसुंदरी यांचें दर्शन घेऊन तेथील सभामंडपांत एक भव्य जरतारी काम केलेलें सिंहासन मांडलें होतें त्यावर श्रीजगद्गुरु बसल्यानंतर श्रीमंत आपासाहेब यांचे पुतणे अण्णासाहेब चिंचणीकर यांनीं पाद्यपूजा केली. मग श्रीस उतरण्याकरितां जी तेथून जवळच एक सुशोभित जागा तयार केली होती तेथें श्रीस नेऊन पोंचविलें आणि श्रींची आज्ञा घेऊन श्रीमंत आपासाहेब परिवारासह स्वस्थानीं आले. श्रीकडील सर्व प्रकारची व्यवस्था ठेवण्याकरितां योग्य कामगाराची नेमणूक केली होती. आणि आपण स्वतः प्रतिदिनीं त्रिकाल श्रीगुरुचरणीं मस्तक ठेवून सेवेस सदा तत्पर असत.

श्रींनीं आपला नवरात्रोत्सव रामतीर्थावरच केला. त्यासंबंधीं ब्राह्मणभोजन वगैरे सर्व प्रकारचा खर्च यथास्थितपणें श्रीमंतांनीं करून त्यांचे संपूर्ण हेतू मोठ्या आनंदानें भक्तिपुरःसर पुरविले. याप्रमाणें श्रींस रामतीर्थावर कांहीं दिवस मोठ्या प्रेमानें ठेवून घेऊन नंतर जगद्गुरूंची पाद्यपूजा व अर्चा वगैरे करून मोठा गौरव केला आणि नवरत्नांचा हार किंमत रुपये १२००० चा, ज्यास मध्यें पदक असून त्यांत दाजीसाहेब यांची तसबीर बसविली होती असा व शालजोडी किंमत५३१८४ची धोतरजोडा १०१ रुपयांचा, शिवाय दक्षिणा रुपये ९०० शें एकूण १३४३१८४ इतका ऐवज श्रीचरणीं अर्पण केला. इतकें देऊनही तृप्ती झाली नसल्यानें दरसाल एक हजार रुपयांच्या नक्त नेमणुकीची सनदही सद्गुरुचरणीं श्रीमंतांनीं अर्पण केली आणि ज्याच्या प्रसादानें अघोर पातकांचा नाश होतो अशा श्रीचरणयुगुलास अण्णा व दाजी यांजकडून साष्टांग प्रणिपात करविला व त्यांसह आपण पुढें हात जोडून उभे राहिले. ही रामचंद्ररायाची पूर्ण भक्ति व प्रेमातिशय पाहून श्रीगुरूंस महदानंद होऊन त्यांनीं त्यास बसण्याविषयीं आज्ञा केली. आज्ञेप्रमाणें श्रीसन्निध बसल्यावर श्रींनीं "बा रामचंद्रा, पूर्णायुषी होऊन धर्मावर व गुरूवर अशीच भक्ती ठेवीत जा आणि नानाप्रकारचीं सत्कृत्यें सदोदित करीत जाऊन सुखी रहा," असें बोलून अनेक आशिर्वाद दिले आणि आपला प्रसाद म्हणून शृंगेरी येथें श्रींचे मठांत जे कांहीं उत्सव होतील त्यांतील प्रथम आरतीचा मान सन्मानें करून श्रीवरें श्रीमंत आपासाहेबांस दिला व शालजोडी आणि फल व मंत्राक्षताही दिल्या. अशा प्रकारें सेवा करून श्रीमंतांनीं सर्व जगाचा जो गुरु शृंगेरीमठाधीश्वर जगद्गुरुमहाराज, यांची सर्व सरंजामासह पाठवणी केली.

पुढें संकेश्वराधिपति श्रीजगद्गुरु स्वामीमहाराज यांचे चरणकमलाची कांहीं दिवस रामतीर्थावर सेवा घडावी असें मनांत आणून एका दरबारी ब्राह्मणाबरोबर विनंतीपत्र देऊन त्यास संकेश्वरीं रवाना

केलें. श्रीमंतांचा हेतू पूर्ण करावयाकरितां श्रींची स्वारी सन १८९१ सालीं जमखंडीस आली. श्रींची स्वारी जवळ आली अशी वर्दी येतांच, श्रीमंतांनीं बरोबर ब्रह्मवृंद वडी वडी मंत्र्यादिक मंडळी आणि सर्व सरंजामासह सामोरें जाऊन, जगद्गुरु येतांच, त्यांच्या चरणीं मस्तक ठेवून आपण श्रीनिकटीं राहून वाजत गांजत मोठ्या समारंभानें श्रीस आदरपूर्वक श्रीरामतीर्थावर आणिलें व योग्य स्थळीं उतरविलें. आणि त्यांची उत्तम प्रकारची व्यवस्था केली. श्रीमंत नित्य सकाळ सायंकाळ दर्शनास जाऊन दोन घटका श्रीजवळ बसून तीर्थप्रसाद घेऊन येत. याप्रमाणें कांहीं दिवस गुरुसेवा केल्यानंतर श्रींची पादपूजा भक्तिपूर्वक करून, शालजोडी, धोतरजोडा व नक्त याशिवाय दरसाल ५०० शें रुपयांची नेमणुकीची सनद लिहून श्रीगुरुचरणीं अर्पण केली. आपल्या शिष्याची सद्बुद्धी आणि भक्ति पाहून श्रीस अत्यानंद झाला व " तूं सकल शिष्यवर्गांत शिष्यशिरोमणि आहेस, तुझा वर्तनक्रम पाहून मद्देवतेस समाधान झालें. " असें बोलून श्रींनीं रामचंद्ररायास अनेक आशिर्वाद दिले. नंतर श्रीसमागमें आलेल्या विद्वज्जनादि परिवारांस वस्त्रदानादिकें करून गौरवून श्रींसह त्यांची पाठवणी केली. पोहोंचविण्यास श्रीमंतांची स्वारी दूरवर जाऊन श्रीगुरुचरणीं मस्तक ठेवून आशिर्वाद घेऊन परत आली. या कृत्यास १०००० रुपये खर्च आला असावा.

श्रीमंत आपासाहेब पुढें श्रीगणपतीपुळें येथें जाऊन, ज्याच्या प्रसादानें आपला हरभटजीबावांचा-वंश नांवालौकिकास आला, त्या गणपतीस लक्ष मोदक वाहून मोठें ब्राह्मणभोजन करविलें. तसेंच सन १८९३ चे एप्रिल महिन्यांत तुळजापुरास गेले वेळीं श्रीतुळजाभवानीचें दर्शन घेऊन शंभर पुतळ्यांची माळ श्रीचे गळ्यांत घातली. महाबळेश्वर येथें श्रीकृष्णाबाई आदिकरून पांच नद्यांचे उगमावर मंडप नसून तें स्थळ खुलें असल्यानें तेथें जाणारे भक्त लोकांस राहण्यास वगैरे गैरसोय होत असे, ती नाहींशी करण्याकरितां त्यावर

एक भव्य मंडप पुष्कळ रुपये खर्च करून श्रीमंतांनीं घालविला. हें स्तुत्य कृत्य पाहून तेथें जाणारे लोक श्री० आपासाहेब यांचें कौतुक करितात. श्रीमंत महाबळेश्वरीं गेले ह्मणजे तेथील अंध, पंगू वगैरे गोरगरिबांस कपडे व अन्नदान केल्यावांचून ते कधीं परत येत नसत. जमखंडी येथील रामतीर्थावरील श्रीरामेश्वरास दरसाल २८२८ रुपयांची नेमणूक करून श्रीत्रिपुरसुंदरी आदिशक्ति या देवीला दरसाल ८००० रुपयांची नेमणूक करून दिली. श्री दत्तात्रयास एक हजार रुपयांची नेमणूक दरसाल केली. जमखंडी शहरांतील श्रीमदुमारामेश्वरास ४९२३ रुपयांची दरसाल नेमणूक करून दिली. प्रतिवर्षी सर्व देवालयांतून कार्तिकमासीं दीपोत्सव होत असे. हजारों दिवे लाविल्यावर लांबून पहाणाऱ्यास फारच कौतुक वाटे. देवाची धुपारती, आरती, मंत्रपुष्प व दक्षणा होई. नंतर पुष्कळ प्रकारचें दारूकाम पहाण्याजोगें सुटे. याप्रमाणें दीपोत्सव मोठे प्रेक्षणीय होत असत.

श्री० आपासाहेब रामतीर्थ सोडून कोठें दूर बाहेरगांवीं जातांना अगर मुक्कामीं परत आल्यावर प्रथम श्रीरामेश्वराचें दर्शन घेऊन श्रीपुढें मोहोर अगर पुतळी ठेविल्यावांचून कधीं राहिले नाहींत. श्री० आपासाहेब श्रीरामेश्वराची अनन्यभावें विषेष भक्तिपूर्वक सेवा करीत. श्रीमंतांनीं लोकापूर येथें श्रीपरमहंस स्वामी यांचे समाधीवर सन १८१२ सालीं मंडप बांधिला.

श्री जगद्गुरु स्वामीमहाराज मठ शृंगेरी यांच्या चरणदर्शनाची अतिशय इच्छा उद्भवल्यामुळें, श्रीमंत आपासाहेब विद्वान् शास्त्री, वैदिक वगैरे पुष्कळ लोक बरोबर घेऊन मोठ्या थाटानें व भक्तीनें सन १८९० सालीं डिसेंबर महिन्याचे १ तारखेस जमखंडीहून निघून ता. ११ रोजीं शृंगेरीस पोंचले. श्रीगुरूंनींहि आपला शिष्योत्तम येणार म्हणून नगर शृंगारून जागोजागीं कमानी व केळीचे खुंट उभे केले होते. श्रींचे मुख्य कारभारी ब्रह्मवृंदासह सामोरे येऊन त्यांनीं मोठ्या सन्मानानें वाजतगाजत श्रीमंतांस नेऊन मठामध्यें

स्वतंत्र प्रकारची सुंदर जागा करविली होती तेथें उतरविलें. याप्रमाणें योग्य प्रकारचें स्वागत श्रींनीं करविलें. श्रीमंत बिऱ्हाडीं जाऊन उतरतांच प्रथम श्रींच्या दर्शनास गेले.

नंतर दुसरे दिवशीं स्वस्थ मनानें श्रींची एकांतीं गांठ घेऊन ज्यांचे चरण मुमुक्षु लोकांचें हित करण्याविषयीं सदा दक्ष, अशा श्रीगुरुश्रेष्ठ महाराजांचे चरणीं मस्तक ठेवून हस्त जोडून श्रीमंत सन्मुख उभे राहिले. शिष्याचें मनोगत समजून श्रींनीं सदुपदेश केला. तेणेंकरून नृपरायांचे मनींचा संसृतीचा ताप सर्व गळून गेला. ते वेळीं नृपाच्या पूर्वसुकृताचाच प्रभाव कळला कीं काय असें वाटून आलें. नंतर श्रीशारदांबेचें षोडशोपचारें पूजन करून, शंभर पुतळ्यांची माळ मध्यें चवकटी मोहोर असून कलावतूमध्यें पटविलेली आहे, अशी श्रींचे चरणीं अर्पण केली. श्रीगुरुचरणीं सहस्रनामें करून १००० रुपये वाहिले आणि ४४०० रुपये खर्चून सुरेख नक्षीदार चांदीचें सिंहासन तयार करवून बरोबर घेतलें होतें तें समर्पण केलें. तेथील सर्व आबालवृद्ध ब्रह्मवृंदांस बुंदीचें प्रयोजन करून चवली चवली दक्षणा दिली. अन्य जातींस शिधा व वस्त्रें वाटलीं. एक दिवस मोठा जंगी दीपोत्सव करविला व त्यावेळीं सर्वत्रांस एक एक रुपया आणि विद्वानांस पांच, चार, तीन व दोन असे रुपये संभावना म्हणून दिले. श्रीमंतांबरोबर गेलेल्या मंडळींनींही पादपूजा केल्या. मग सद्गुरूंचा वस्त्रेंभूषणादिकेंकरून मोठा गौरव करून श्रींचे परिचारक व मठांतील विद्वान लोक यांना शालजोडया व धोतरजोडे दिले; तरी देखील नृपरायांचे मनाची तृप्ति झाली नसावी असें वाटून आलें. कारण भक्तिरूप सरितेचा प्रवाहच तसा जोरानें वाहिलेला दृष्टीस पडत होता. श्रींनींही, नृप, दाजी व आण्णा ह्यांस अनेक आशिरवाद देऊन मोठा सन्मान केला आणि श्रीमंतांकडील मंडळींचाही वस्त्रादिकेंकरून बहुमान केला. ते वेळीं श्रीमंत आपासाहेब यांनीं " आपली भक्ति श्रीपादारविंदीं उत्तरोत्तर दृढ होत जावी "

अशा प्रकारचा वर मिळावा ह्मणून संसारार्णवीं बुडल्यांना नौका होऊन पैलपार करणारे श्रीसद्गुरूचरण मोठ्या विनयानें धरिले, तेव्हां " तथास्तु, तुझी इच्छा श्रीचंद्रमौलेश्वर परिपूर्ण करील. " असा आशिरवाद श्रींनीं देऊन निज शिष्याचे शिरीं हस्त ठेविला, आणि मोत्याची कंठी, मध्यें पदक असलेली प्रसाद ह्मणून शिष्याचे गळ्यांत घातली. याप्रमाणें चार दिवस श्रीसंनिध दर्शनामृत प्राशन करीत आनंदानें राहून तेथील सर्वजन संतोषित करून श्रींचा निरोप घेऊन श्रीमंत आपले नगरास परत येण्यास निघाले. मार्गीं जीं जीं गांवें लागलीं तेथील लोकांनीं श्रीमंतांचें आदरातिथ्य मोठ्या आनंदानें केलें. नृपरायांनींही तेथील दीन, अनाथ जनांस शिधा व वस्त्रें देऊन संतोषित केलें. या कामीं एकंदर १५००० रुपये खर्च आला.

या भरतखंडामध्यें अलीकडे पुष्कळ दाते होऊन गेले व हल्लींही असतील. परंतु सर्व प्राणिमात्रांस शिवस्वरूप मानून मोठमोठीं दानें, बक्षिसें व देणग्या देणारा, लक्ष ब्रह्मणभोजन, तशींच अन्य मोठमोठालीं ब्राह्मणसंतर्पणें करून, ब्रह्मवृंदांस नानाप्रकारच्या पक्वान्नांनीं संतुष्ट करणारा, तसेंच अंत्यजादि ब्राम्हणेतर अन्य जातींस मिष्टान्नांनीं संतोषित करणारा, श्रीमंत आपासाहेब पटवर्धन जमखंडीकर यांच्या समान दुसरा क्वचितच आढळेल. श्रीमंत आपासाहेबांनीं जसे अन्नदानसमारंभ केले, तसे पुनश्च दृष्टीस पडणें अशक्य. आपासाहेबांनीं सर्व ज्ञातिभोजनें बरींच घातलीं. त्यांतील शेवटलें सर्वज्ञातिभोजन फारच मोठें झालें. नृपरायाचे अंगीं वास करीत असलेली समबुद्धि, प्रेम, भक्ति आणि लीनता या गुणांची ओळख त्यांच्या विलक्षण दातृत्वावरून सहज पटून वाचक आनंदसमुद्रांत बुडून जातील यांत कांहीं संशय नाहीं. श्रीमंतांनीं शेवटचें ' सकलज्ञातिभोजन ' सन १८९३ सालच्या जानेवारी महिन्यांत घातलें. त्याकडे एकंदर २५०९०८११०७ इतका खर्च झाला.

परशरामपंतभाऊसाहेब व रामचंद्रराव आपासाहेब यांना युद्धप्रसं-

गामुळें दारुगोळा, स्वारशिबंदी वगैरे विशेष ठेवण्याकरितां द्रव्य लागे व कर्ज काढण्याचे प्रसंग येत. तो गडबडीचा व धामधुमीचा काळ असल्यामुळें, काढलेल्या कर्ज-रोख्यांची भरपाई व झालेले कर्जरोखे पुष्कळ वर्षे झालेलीं असतांही ज्यांच्याकडे असे रोखे होते; ते रोखे घेऊन, या दयार्द्र अंतःकरणाच्या नृपरायाकडे आले आणि म्हणाले, "आपल्या पूर्वजांनीं आमच्या पूर्वजांकडून कर्ज काढिलें. तें भरपाई झालें नाहींत. सदरहु कर्जरोखे कायद्याबाहेर जरी गेले आहेत, तरी आमच्या गरीबीकडे पाहून आपणांस श्रीरामेश्वर जी बुद्धी देईल तें द्यावें व हे कर्जरोखे घ्यावेत." तेव्हां श्री० आपासाहेबांनीं शक्य तितक्या थोड्याबहुत रकमा देऊन; त्यांच्या संतोषानें वाडिलार्जित कर्जरोखे परत घेतले. वाडवडिलांनीं लिहून दिलेले कर्जरोखे कोठें राहूं नयेत असें मनांत आणून श्रीमंतांनीं सदरहूप्रमाणें व्यवस्था केली. याचें नांव पुत्रधर्म.

क्षुद्र अधिकारीवर्गाकडून वरिष्ठ सरकारच्या इभ्रतीची पायमल्ली कशी होते, तें यापुढील माहितीवरून सर्वांचे लक्षांत येईल. वरिष्ठ सरकारानें आपणांकडे जो अधिकार दिला तो अधिकार योग्य रीतीनें न बजावणें ह्मणजे केवळ आडदांडपणा होय. गम्मत ही कीं, एखाद्या अधिकाऱ्यानें जर कांहीं विक्षिप्तपणा केला तर वरिष्ठ सरकाराकडून तो विक्षिप्तपणा केलेला जसा दुरुस्त होतो; तसा विक्षिप्तपणा करणाऱ्या अधिकाऱ्यास योग्य शासन होत नाहीं, ह्मणून अधिकारीवर्ग वाटेल तसा उन्मत्तपणानें वागतो. सन १८७३ त श्री० आपासाहेब जमखंडीकर यांनीं कांहीं गुन्हेगारांस शिक्षा केल्यावरून ते गुन्हेगार संस्थानच्या तुरुंगांत कैद भोगत असतां, सदरहु कैद्यांना शिक्षा भोगण्याकरितां कोल्हापुरास पाठवावें, ह्मणून सरकारचा हुकूम झाला आहे असें मे. पो. एजंट यांजकडून थैली ७४ नंबर ता. २४ फेब्रुवारी सन १८७३ इ. चे कलमीं होऊन आल्यानें; ता. १८ मार्च सन मजकूरचें थैली-पत्रावरोबर कैदी कोल्हापुरास पाठ-

विले आणि त्याच दिवशीं मे. एजंटसाहेब यांजकडे नंबर १९ ची थैली लिहिली कीं, " इकडील कैदी दुसरीकडे शिक्षा भोगण्यास पाठविण्याची वहिवाट आजपावेतों मुळींच झालेली नसून हल्लीं होत आहे, या योगानें इलाख्याचे रीतीस व महत्वास कमतरता होत आहे. या खटल्यांत इकडून कोणताही गैरवाजवी प्रकार झालेला नसून कैदी कोल्हापुरास सरकारांनीं काय कारणानें मागविले हें कारण समजत नाहीं; न पाठवावे तर सरकारास पसंत वाटणार नाहीं याच कारणानें पाठविण्यांत आले आहेत, तर वर लिहिले मजकुराचा योग्य विचार होऊन उत्तरीं फलमीं होईल अशी इच्छा आहे. " इतकी थैली लिहून याच कामाकरितां श्रीमंत पुण्यास गेले. तेथें सुमारें नऊ महिने राहून गव्हरनरसाहेब बहादूर यांच्या एक दोन वेळां मुलाखती घेऊन या खटल्याची सर्व हकिकत त्यांस निवेदन केली आणि ता. १३ सप्टेंबर सन १८७३ ची थैलीही लिहिली. तेव्हां कोल्हापुरास कैदी शिक्षा भोगीत असलेले जमखंडीस परत द्यावे, अशा अर्थाचा ठराव नंबर ६८४९ ता. ७ नोव्हेंबर सन १८७३ इ. चा केला. त्याप्रमाणें सदरहु कैदी ता. ८ डिसेंबर सन १८७३ इ. रोजीं जमखंडीस परत आले. श्रीमंत आपासाहेब आपल्या मानमरातबाबद्दल फारच जपत असत. कैदी परत जमखंडीस आल्यावर त्यांचे मनास समाधान वाटलें.

श्री० आपासाहेब यांनीं आपल्या मुखत्यारीनंतरच्या चव्वेचाळीस वर्षांच्या कारकीर्दीत सार्वजनिक कामाकरितां, दुष्काळ निवारणाकरितां, पब्लिकवर्क्स खात्याकरितां, दानधर्माकरितां, अन्नदानाकरितां वगैरे लक्षावधी रुपये खर्च केले. अशा कामीं खर्च करण्यास त्यांनीं कधींच मागें पुढें केलें नाहीं, हें सर्व ठीकच आहे; पण त्यांत आश्चर्यकारक ही गोष्ट आहे कीं, श्रीमंत रामचंद्ररावास पैशाची म्हणून उणीव कधींच भासली नाहीं. इतर कांहीं जहागिरदार लोक कर्जबाजारी झाले आहेत तसा प्रसंगही आला नाहीं. यांना एक पै

देखील कर्ज नव्हतें, उलटपक्षी श्रीमंतांचे अंतकाळसमयीं खासगी-कडील २१३४९३८८८५, देवस्थानाकडील ४३०४४८६८१॥ व दौलतीकडील ३७९१६५८१०८२ मिळून रोकड शिल्लक ६३५७०३८८८८॥ होती, शिवाय जडजवाहीर, सोनें, रुपें, दागदागिने वगैरे पुष्कळच शिल्लक होते. यावरून आपासाहेबांची द्रव्यदृष्टी विलक्षण होती. यांना दुसऱ्याचें देणें आहे असें ह्मणणेंही खपत नसे; यामुळें नोकर व मजुरदार यांचा पगार पांच तारखेच्या आंत देण्याविषयीं आणि व्यापारी वगैरे लोकांची तात्काळ बिलें करून पैसा आदा करीत जाण्याविषयीं यांनीं हुकूम दिलेले होते व त्याप्रमाणें वहिवाट यांच्या कारकीर्दींत चालली होती. दोन दोन चार चार महिने नोकर लोकाचा पगार तुंबून राहिला, वेळेवर त्यांस तो पोंचला नाहीं, असा प्रकार या दैवशाली पुरुषाच्या कारकीर्दींत मुळींच झाला नाहीं. यावरून "रोख ठोक जमखंडीचे लोक" अशी एक ह्मणच पडून गेली आहे.

श्री० कै० आपासाहेब जमखंडीकर सरकार यांचें 'चरित्र' हरि दामोदर फाटक पेन्शनर मामलेदार यांनीं प्रसिद्ध केलें आहे. हें चरित्र अत्यंत वाचनीय आहे. दातृत्व, धर्मजागृता, सदाचार, उद्योगप्रिय, करारी, धर्माभिमानी, कुलाभिमानी इत्यादि गुणांची योग्यता किती ग्रहणीय आहे हें ज्यांना समजून घेणें असेल त्यांनीं सदरहु चरित्र जरूर वाचावें. लेखक हरि दामोदर फाटक यांनीं श्री० कै० आपासाहेब यांचीं कारकीर्द अवलोकन केल्यामुळें व विशेषतः श्रीमंतांविषयीं अंतःकरणांत दृढभक्ति असल्यावरून प्रेमळ भावानें चरित्र लिहिलें गेलें आहे. त्यांच्या या चरित्रलेखनामुळें मला फार उपयोग झाला. याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें. श्रीमंत आपासाहेबांनीं, प्रतिवर्षीं दसऱ्याचे दिवशीं मृत्युपत्र करणें; याप्रमाणें १६ वर्षें चाललें होतें. सदरहु मृत्युपत्र कमी जास्तीचे शेऱ्यानें विशेष लांबलचक झालें होतें. त्यांत कमीजास्ती करून स्पष्ट कळण्याजोगें मृत्यु-

पत्र ता. २८ सप्टेंबर सन १८९५ इ आश्विन शु॥ १० शके १८१७ रोजीं ' चरित्रलेखक ' फाटक यांचेकडून लिहविलें.

पुढें कांहीं दिवसांनीं नृपरायाचे पाठीवरील आवाळू सछिद्र होऊन वाहूं लागलें. शिवाय बहुमूत्राचा विकार असून त्यांत ज्वरानें पछाडिलें. अशा तिघां शत्रूंनीं जोराचा हल्ला केल्यामुळें नृपाची प्रकृती दिवसेंदिवस जास्त बिघडत चालली; यास्तव आतां अवधि करून उपयोगाचें नाहीं, असें श्रीमंतांनीं मनांत आणून विद्वान् ब्राह्मणांकडून दत्तकाचा मुहूर्त काढविला आणि ता. १५ डिसेंबर सन १८९६ इ. रोजीं मंगळवारीं चिंचणीकराचे घराण्यांतील दाजीसाहेब या नांवाचे मुलास सुमुहूर्तावर दत्तक घेत आहे ह्मणून इंग्रजसरकाराकडे वगैरे थैल्या लिहून कळविलें. दत्तक घेण्यावद्दल यांना पूर्वींच सन १८६२ त सनद मिळाली होती. त्यांतील हांशील— हिंदुस्थानचे कित्येक राजे व सरदार जे हल्लीं आपले मुलुखाचा काजकारभार पाहतात, त्यांचीं राज्यें त्यांजकडे चिरकाल चालावीं व त्यांचे घराचा वंश व मरातब सतत चालवावा असा महाराणी सरकारचा इरादा असल्यावरून तो इरादा पूर्ण करण्यास आह्मी आपल्यास असा भरंवसा देतों कीं, आपल्यास आपले पश्चात् दौलतीस होणारा वारस नसल्यास आपण व आपले दौलतीस पुढील होणारे अधिकारी हिंदूशास्त्राप्रमाणें व घराण्याच्या रिवाजाप्रमाणें दौलतीस मालक होण्याकरितां जो दत्तक घतील तो महाराणी सरकार मंजूर धरून कायम करतील. जोंपर्यंत आपले घराणें राणीसरकारचे राज्याशीं इमानानें वर्तेल व इंग्रजसरकाराबरोबर आपले घराण्यानें वर्तणूक करण्याविषयीं जे तहनामे अगर करार झाले आहेत त्याप्रमाणें आपले घराणें विश्वासुकपणानें वर्तणूक ठेवील तोंपर्यंत हा हल्लीं आपणाशीं केलेला करार कशानेंही बिघडला जाणार नाहीं ही आपण खात्री ठेवावी. " या कागदावर सही लॉर्ड क्यानिंगसाहेब महाराणी सरकारचे पहिले व्हाइसराय यांची आहे.

दत्तक विधान झाल्यावर तेंच दिवशीं सायंकाळीं श्रीमंत युवराज यांची स्वारी पालखींत बसून सर्व सरंजाम मानकरी वगैरेसह मोठ्या थाटानें शहरांतील सर्व देवतांचीं दर्शनें घेऊन, परत श्रीरामतीर्थावर येऊन श्रीरामेश्वराचें वगैरे दर्शन घेऊन नंतर मातापितरांचे चरण वंदून, ब्रह्मवृंदास नमस्कार केला. नंतर दुसरे दिवशीं एकंदर नगरीस आमंत्रण करवून मोठें प्रयोजन केलें; आणि रात्रौ देकार वांटिला. मृत्युपत्रांत नमूद केल्याप्रमाणें श्रीमंत युवराज यांचें नांव परशुरामपंतभाऊसाहेब ठेविलें.

श्रीमंत आपासाहेब या नश्वर सृष्टीस व आप्त, इष्टमित्र, राजवैभव वगैरे सर्वांचा त्याग करून, श्रीशंकरचरणसेवा अखंड करण्याकरितां मंगळवारीं सायंकाळीं ता. १२ जानेवारी सन १८९७ इ. पौष शु॥ १० शके १८१९ रोजीं कैलासाप्रत गेले

श्रीमंतांस कंकणवाडी येथें श्रीकृष्णाकांठीं दहन करण्यास नेतेवेळीं हजारों प्रजाजन दुःखाश्रु ढाळीत बरोबर चालले होते. श्रीकृष्णेवर पोहोंचतांच, चंदन, कापूर इत्यादि अनेक सुगंधी द्रव्यें घालून चिता तयार केली व श्रीमंतांची काया चितेवर ठेवून यथाविधीनें अग्निसंस्कार केला. नंतर बऱ्याच वेळानें दुःखित झालेले युवराज जसे परतले तसे सर्व जनसमूहही परतला. पुढें युवराजांनीं पित्याचें उत्तरकार्य यथाविधी, यथास्थितपणें व योग्य प्रकारें केलें; गजादिक मोठमोठीं दानें केलीं; अन्नशांतीही पुष्कळ केली. या कामास एकंदर खर्च रुपये १४४४७८९८८ झाला.

देशोदेशींच्या लोकांच्या रीतीभाति काय आहेत, तेथील लोक आपापला व्यवहार कशा प्रकारें चालवीत आहेत, त्यांची स्थिति कशी आहे, तेथें व्यापारधंदा व शिक्षण कशा प्रकारें चालतें, हें सर्व समजून घेऊन अन्यत्र ज्या उत्तम रीतीभाति असतील त्या आपले परिजनांस लावाव्या, तसेच योग्य व्यवहार व शिक्षण इकडेही सुरू करावें, अशा प्रकारच्या स्तुत्य व लोकहितैक हेतूंनीं प्रेरित होऊन

मोठमोठीं नामांकित तीर्थें, स्थळें, शहरें व इमारती पाहण्याकरितां व त्याप्रमाणेंच महान् महान् पवित्र स्थानें व साधुसंत यांचें दर्शन घेण्यास्तव, श्रीमंत आपासाहेबांनीं जलपर्यटन व देशाटन पायरस्त्यानें, आगगाडीनें वगैरे आपले आयुष्यांत पुष्कळ करून ते दिगंत कीर्ती करून गेले.

महान् भगवद्भक्त हरिभटबावा पटवर्धन यांनीं जप, तप, अनुष्ठानें महायात्रा वगैरे करून, मोठ्या कडकडीत वैराग्यानें राहून, हजारों लोकांचें कल्याण करून, समाधिस्त झाले. परंतु, हजारों लोकांचें पालनकर्त्या राजानें कशा रीतीनें प्रजेचें पालन करून, आपल्या देहाचें सार्थक करून घ्यावें; हें प्रत्यक्ष संस्थानिक व महाराजे यांना दाखविण्याकरितांच पुन्हा आपल्याच वंशांत हरिभटबावा, श्री० आपासाहेबांच्या रूपानें प्रगट झाले असें ह्मणण्यास कांहींच हरकत नाहीं.

श्रीमंत परशरामरावभाऊसाहेब यांचा जन्म तारीख १० माहे मे सन १८८३ ई. रोजीं रामतीर्थ येथें झाला. सदर प्रसंगीं कै० श्रीमंत रामचंद्रावआपासाहेब यांनीं मोठा उत्सव केला व गांवांत घरोघर शर्करा वाटली. लहानपणापासूनच कै० श्री० आपासाहेब यांनीं श्री० भाऊसाहेब यांच्या शिक्षणाची सोय स्वतंत्रपणें गार्डियन नेमून केली होती. श्री० कै० आपासाहेब यांनीं तारीख १५ डिसेंबर सन १८९६ ई. रोजीं श्री० भाऊसाहेब यांस विधिपूर्वक दत्तक घेतलें. दत्तविधान झाल्यानंतर थोड्याच दिवसांत श्रीमंत आपासाहेब यांचा काल झाला. श्री० भाऊसाहेब हे त्यावेळीं लहान असल्यानें जमखंडी संस्थानचा कारभार इंग्रज सरकारांनीं चालविला. श्रीमंत भाऊसाहेब यांस उच्च शिक्षण देण्याकरितां युरोपियन ट्यूटरचे देखरेखीखालीं कोल्हापूर येथें नेऊन ठेवणेंत आलें होतें. तेथें सन १९०२ सालीं त्यांचा विद्याभ्यास पुरा झाला.

# श्रीमंत कॅपटन सर परशुरामरावभाऊसाहेब पटवर्धन के. सी. आय. ई.

श्रीमंत भाऊसाहेब यांचा प्रथम विवाह सन १९०० सालीं, तालिकोटच्या घराण्यांतील पहिल्या वर्गाचे सरदार श्रीमंत के० बाळासाहेब रास्ते यांची कन्या श्री० ताईसाहेब यांचेबरोबर रामतीर्थ येथें झाला. व श्रीमंत ताईसाहेब यांचें नांव श्री० सौ. रमाबाईसाहेब असें ठेवणेंत आलें.

श्रीमंत भाऊसाहेब यांचा कोल्हापूर येथील शिक्षणक्रम पुरा झाल्यानंतर त्यांनीं ठिकठिकाणचे रीतिरिवाज वगैरे पहाणेकरतां सर्व हिंदुस्थानची सफर केली. त्यानंतर कांहीं दिवस जमखंडी येथें राज्यकारभाराची व कायदेकानूची माहिती घेणेकरितां श्रीमंतांची स्वारी राहिली. राज्यभार वाहण्याची पात्रता श्रीमंत भाऊसाहेब यांचे अंगीं आल्याचें पाहून तारीख ४ जून सन १९०३ ई. रोजीं श्रीमंतांस जमखंडी संस्थानचे मुखत्यारीचीं वस्त्रें देण्यांत आलीं. या प्रसंगीं ब्रिटिश सरकारांस सुमारें पांच लाख रुपयांचा नजराणा देणेंत आला.

श्री० सौ. रमाबाईसाहेब यांचे पोटीं तारीख ५ नवंबर सन १९०६ ई. रोजीं श्रीमंत भाऊसाहेब यास पुत्ररत्न झालें. व पुत्राचें नांव श्री. शंकररावआपासाहेब असें ठेविलें. हा पुत्रोत्सव फारच थाटाचा झाला. सदर प्रसंगीं श्रीमंतांनीं आपल्या रयतेस सुमारें २ लाख रुपयांची सूट दिली. व दुसरी अत्यंत महत्वाची गोष्ट ह्मणजे आपल्या संस्थानांत प्राथमिक शिक्षण मोफत केलें ही होय. तारीख १ आक्टोबर सन १९०७ ई. रोजीं श्री० सौ. रमाबाईसाहेब यांस देवाज्ञा झाली, त्यामुळें श्रीमंतांस व सर्व प्रजेस अत्यंत दुःख झालें. श्री० सौ. रमाबाईसाहेब यांचा स्वभाव फार थोर, उदार, मनमिळाऊ असा होता. त्यांची धर्मावर पूर्ण श्रद्धा असून पतीचे ठायीं निस्सिम प्रेम होतें.

त्यांची रहाणी फार साधी होती. "श्री० कै० सौ. रमाबाईसाहेब वाचनालय" ही संस्था जमखंडी येथें चालूं आहे.

श्रीमंत भाऊसाहेब यांचा द्वितीय विवाह सन १९०८ सालीं पुणें येथील सुखवस्तु गृहस्थ रा. गोपाळराव दामले यांची कन्या ठकूताई यांचेबरोबर झाला, व ठकूताई यांचें नांव रमाबाईसाहेब असेंच ठेवण्यांत आलें. श्रीमंत सौ. रमाबाईसाहेब यांना एक कन्यारत्न आहे.

सन १९०९ ई. मध्यें श्रीमंत भाऊसाहेब यांनीं युरोपखंडांत प्रवास केला, तिकडील कलाकौशल्य व हरएक बाबींतील सुधारणा पाहून आपल्या संस्थानांत तिकडील सुधारणांचा शक्य तो उपक्रम सुरूं केला. श्रीमंत भाऊसाहेब यांचा राज्यकारभार फारच चांगल्या रीतीनें चाललेला पाहून सन १९१३ ई. मध्यें त्यांस के. सी. आय. ई. चा बहुमान सार्वभौम सरकाराकडून देणेंत आला. युरोपखंडांतील महायुद्धाचा वणवा भडकल्यावर सन १९१५ ई. मध्यें श्रीमंत भाऊसाहेब हे बरोबर मोटार, ॲम्ब्यूलन्स घेऊन फ्रान्समधील रणभूमीवर गेले होते. युरोपखंडांतील महायुद्धावर प्रथम गेलेले दक्षिण महाराष्ट्रांताल हे पहिलेच संस्थानिक होत. सन १९१८ इसवीमध्यें श्रीमंत भाऊसाहेब यांस साम्राज्य सरकारांकडून ९ तोफांच्या सलामीचा मान व ऑ. कॅपटनची रँक देण्यांत आली. याच सालीं हिंदुस्थानसरकाराकडून मेसापोटेमियांतील "रेडक्रास" सोसायटीच्या कामाची पाहाणी करून रिपोर्ट करणेबद्दल श्रीमंत भाऊसाहेब यांची स्पेशल नेमणूक झाली. तेथील त्यांची कामगिरी पाहून हिंदुस्थानसरकारनें आपला पूर्ण संतोष व्यक्त केला आहे.

सांप्रत श्रीमंत भाऊसाहेब यांना एक पुत्र व एक कन्या अशीं दोन अपत्यें आहेत. जमखंडी संस्थानचें क्षेत्रफळ ५२५ चौ. मैल असून लोकसंख्या सुमारें १००३०४ आहे. व वसूल सुमारें ६३६७२५ रुपये आहे, गेल्या साठ वर्षांत शिक्षणाचे बाबतींत जमखंडी संस्थान



श्री० कै० गोपाळराव रामचंद्र पटवर्धन,
शेडसाळकर.



श्री०रा. केशवराव गोविंद पटवर्धन,
शेडसाळकर.



श्री० भय्यासाहेब पटवर्धन, चिंचणीकर. बी. ए.



श्री० बाळासाहेब पटवर्धन, चिंचणीकर.

फारच पुढें आलेलें आहे. हल्लीं प्राथमिक शिक्षण सर्वत्र मोफत करण्यांत आलें आहे. व उच्च शिक्षणाची लालसा असणाऱ्या विद्यार्थ्यांस संस्थानकडून फारच चांगली मदत मिळते. शेतकी शिक्षणाचीहि सोय करणेंत आली आहे. शक्य त्या सुधारणा करून संस्थानांतील लोकांस उत्तम शिक्षण देणेचा श्रीमंत भाऊसाहेब यांचा कृतसंकल्प आहे व त्या दिशेनें त्यांचा प्रयत्नही चालू आहे. श्रीमंत भाऊसाहेब यांना कलाकौशल्य व इमारती यांचा विशेष नाद असल्यानें ते गादीवर आलेपासून त्यांनीं पुष्कळ सुंदर नवीन इमारती बांधविल्या आहेत. त्यांत विशेषतः पोलो पॅलेस व दरबारहॉल या दोन इमारती बऱ्याच खर्चाच्या व फार शोभिवंत झाल्या आहेत. श्री. भाऊसाहेब यांनीं आतांपर्यंत सुमारें २५० नवीन इमारती बांधविल्या असून त्यांस सुमारें १४ लाख रुपये पावेतों खर्च आलेला आहे. जमखंडी संस्थानांतील लोकांचा मुख्यत्वेंकरून शेतकी हा धंदा आहे. तथापि श्रीमंतांचे उत्तेजनानें व मदतीनें इतर धंदेही अस्तित्वांत येऊं लागले आहेत. स्थानिक स्वराज्याचे बाबतींत श्रीमंत उदारमतवादी असून त्यांनीं जमखंडी येथील म्युन्सिपालिटीस स्वतः आपला अध्यक्ष निवडणेचा अधिकार दिला आहे. त्याचप्रमाणें हल्लीं एक लोकसभा नांवाची संस्था स्थापन झाली असून, दरसाल ती आपल्या सूचना सुचवीत असते. एकंदरींत सर्व बाजूंनीं श्रीमंत भाऊसाहेब यांचे कारकीर्दींत संस्थानची भरभराट होत असून सार्वभौमसरकाराकडून श्रीमंतांचीहि वारंवार शिफारस होत आहे. श्रीमंत मोठे हौसी असून दानशूर आहेत. तसेच शूर असल्यामुळें शिकारीचा नादही विशेष आहे.

## चिंचणीकर पटवर्धन.

परशुरामपंतभाऊसाहेब यांच्या पांच पुत्रांपैकीं पहिलें रामचंद्रपंतआपा यांचें वडील घराणें होय. वडील घराण्याकडेच हल्लीं जमखंडीसंस्थान चालू आहे. पुढें माधवराव परशुराम यांनीं जरी हिस्सा

नाकारिला तरी यांचे पुत्र गोविंदराव यांनीं हिस्सा करून घेऊन चिंचणीस राहिल्यामुळें, यांना चिंचणीकर पटवर्धन असें म्हणूं लागले. पुढें गोविंदरावांनीं शिळकर पटवर्धनापैकीं दत्तक घेतले. या दत्तक पुत्रास जहागीर न चालवितां सरकारांनीं ती जहागीर सन १८३६ त खालसा केली. दत्तकपुत्र माधवराव गोविंदराव ऊर्फ दाजीसाहेब यांना पांच पुत्र झाले. हरिहरराव, गोविंदराव, विनायकराव, कृष्णराव व सदाशिवराव; पैकीं विनायकराव तात्यासाहेब व सदाशिवरावभाऊसाहेब हल्लीं आहेत. गोविंदराव निपुत्रिक वारले. पहिले हरिहरराव यांचे पुत्र गोपाळराव व रामचंद्रराव; गोपाळरावास पुत्र हरिहर; विनायकरावतात्यासाहेबांचे पुत्र पांच; पैकीं पहिले गोविंदराव वारले; गणपतराव, शंकरराव, चिंतामणराव व पांडुरंगराव हे हल्लीं आहेत; गणपतरावास पुत्र व्यंकटेश व गोविंद हे लहान आहेत. कृष्णराव आण्णासाहेब यांस पुत्र तीन. माधवराव, गंगाधरराव व निळकंठराव; माधवराव दत्तक गेले असून हल्लीं जमखंडी संस्थानच्या गादीचा उपभोग घेत आहेत; गंगाधररावबाळासाहेब व निळकंठरावभैय्यासाहेब हे जमखंडी येथें रहात आहेत; गंगाधररावबाळासाहेब यांस पुत्र गोविंदराव हे लहान आहेत. निळकंठरावभय्यासाहेब बी. ए. असून स्वभावानें फारच गरीब आहेत.

श्री० कै० दाजीसाहेबांस मुलें बाळें होऊन प्रपंच वाढला व ते खर्चिक असल्यामुळें, उत्पन्नापेक्षां खर्च जास्त होत गेल्यामुळें शेतें, मळे वगैरे सर्व गहाण पडलें, सावकाराचा तगादा बसला. अशी स्थिति या राजघराण्यास आलेली पाहून श्री० आपासाहेबांस फार वाईट वाटून स्वतःहास अत्यंत झीज सोसून, दाजीसाहेबांच्या विनंतीवरून आपला एक कारकून चिंचणीस पाठवून एकंदर देण्याचा हिशोब करविला. सावकार लोकांचें एकंदर देणें २७००० रु. झालें. तेव्हां दाजीसाहेब यांचे कबुलीनें १३५०० रुपयांत रयतावा जमिनी वगैरे खरेदी आणि इनाम जमिनी; वाडा वगैरे १३५०० रुपयांत

गहाण लिहून घेऊन वरील सर्व कर्ज आपासाहेबांनीं देऊन टाकिलें. नंतर दाजीसाहेब यांस कुटुंबासह जमखंडीस आणवून जमखंडी तालुक्यापैकीं आलगूर गांवीं त्यास रहाण्यास वाडा व सालीना १२००रुपयेची नेमणूक करून देऊन तेथें त्यांची स्थापना करून दिली. सावकारी कर्जाखेरीज अन्य लोकांचें २००० रु. देणें होतें. ती रकम दाजीसाहेबांचे नांवें बक्षिसांत टाकून, लोकांचें देणें चुकतें केलें. मुलाबाळांचे कार्यास वगैरे वेळोवेळीं मदत करीतच असत. सन १८६९ त दाजीसाहेब आलगूर येथेंच वारले. त्यावेळींही श्रीमंतांनीं खर्चास देऊन पुढील विधि करविला. मुलांस व कुटुंबांस नेमणुका करून दिल्या. त्या हल्लीं त्यांजकडे चालत आहेत. त्यांचा प्रपंच वाढता, तेव्हां आपण दिलेल्या नेमणुकीवर आतां त्यांचा संसार भागणार नाहीं . त्यांचे हातून गहाण सोडवून घेणें शक्य दिसत नाहीं, असें समजून या दयार्द्र अंतःकरणाचे आपासाहेबांनीं अंतकाळचे वेळीं इनाम जमिनी वगैरे गहाण लिहून घेतलेला १३५०० रुपयांचा दस्तऐवज तसाच फाडून चिंचणीकर यांस दिला. एवढेंच नाहीं तर पुढें मुलांनीं केलेलें कर्जसुद्धां फेडलें. ज्यांची वाटणी होऊन पुष्कळ वर्षें झालीं. अर्थात् कांहीं संबंध नाहीं हें जरी खरें ! तरी आपल्या भाऊबंदाची स्थिति पाहून, खऱ्या मनुष्यप्राण्याचें मुख्य कर्तव्य लक्षांत आणून आपासाहेबांनीं स्वतःहास हजारों रुपयांची झीज सोसून दुसऱ्याचें अखंड कल्याण केलें. सख्ख्या बंधूशीं, आप्तांशीं, व मित्रांशीं कलह करणाऱ्या प्रत्येक मनुष्यानें हे वरील उदाहरण सदैव लक्षांत येऊन तसें वागावें ! !

## तासगांवकर पटवर्धन.

मिरज येथील भुइकोटकिल्ला पूर्वी अदिलशाहींतील एका सरदारानें बांधिला आहे; त्याचप्रमाणें अदिलशाही कारकीर्दीतच तासगांव येथील तटबंदी वाडा बांधिला गेला असून, वाड्याचे भोंवतालीं मातीचे

बुरुजासह तट विशेष उंच बांधिले आहेत. या वाड्याचा उत्तर दरवाजा ( दिल्लीदरवाजा ) पूर्वीपासूनच भाऊंनीं बंद करून पूर्वदरवाजा बांधिला. विद्यमान भाऊंचे वंशज श्रीमंत बाबासाहेब यांनीं बंद असलेला उत्तर दरवाजा ता. ३१ डिसेंबर सन १९१५ रोजीं सकाळीं ९॥ वाजतां उघडून याच दरवाजानें विशेष जाण्यायेण्याचा परिपाठ हल्लीं चालूं केला आहे. उत्तर दरवाजाचीं उंची २६ फूट व रुंदी ११ फूट आहे. पूर्वदरवाजाची उंची २६ फूट व रुंदी १४ फूट आहे. उत्तर दरवाजाचें काम विशेष मजबूत व चिरेबंदी केलेलें आहे. वाड्याची लांबी ४१२ फूट व रुंदी ३५७ फूट आहे. भाऊंनीं या तटबंदीकोटांत प्रथम जो चंदनीचौकाचा वाडा बांधिला होता तो वाडा कोल्हापूरकरानें जाळिल्यामुळें जो दुसरा वाडा बांधिला तो विद्यमान आहे. विद्यमान असलेल्या वाड्यांतील विशेष महत्वाची जागा म्हणजे तिसऱ्या मजल्यावरील बारद्वारी होय. बारद्वारी म्हणजे प्रत्येक दिशेस तीन खिडक्या याप्रमाणें चारी दिशांस खिडक्या आहेत. ही जागा भाऊंची खलबत, (महत्वाची चर्चा) करण्याची होय. या बारद्वारींत बसले असतां आसमंतांतील सर्व प्रदेश दृष्टीस पडतो.

भाऊसाहेबांनीं तासगांव येथें अशा धामधुमीचे काळांतही चिरस्मरणीय गोष्टी केल्या आहेत. श्रीगणपती पंचायतनाचें दगडी देवालय, त्यासमोरील गोपूर व त्या गोपुराशीं सात मजली इमारत बांधिली आहे ती तर फारच प्रेक्षणीय आहे. भाऊंनीं देवालयांत श्री गणपतीची स्थापना सन १७७९ त केली. या गोपुरासारखी प्रेक्षणीय इमारत इकडील प्रांतीं क्वचितच असेल. हें ' गोपूर ' ९७ फूट ९ इंच उंच आहे. भाऊंनीं येथील श्रीहाटकेश्वराचे देवळाचा जीर्णोद्धार करून मोठें देवालय बांधिलें. भाऊंचा विजयी-जरिपटका पूर्वदरवाजांत विद्यमान असून, भाऊंच्या वाड्याचें संरक्षण करीत असल्याची साक्ष देत आहे. भाऊंनीं पांढरे सरदाराचा हरण करून आणलेला ' जरिपटका ' फारच पहाण्यासारखा आहे. सदरहु जरीपटका हल्लीं



श्री० कै० परशुरामराव गणपतराव पटवर्धन तासगांवकर.



श्री० कै० गणपतराव परशुराम पटवर्धन तासगांवकर.



श्री. विनायकराव बाबासाहेब पटवर्धन
तासगांवकर.



श्री. कुमार परशरामरावभाऊ पटवर्धन
तासगांवकर.

श्री. बाबासाहेब दसरा व श्रीगणपती उत्सवांत बाहेर काढितात. तसेंच श्री. बाबासाहेब यांच्या देव्हाऱ्यांत नित्यपूजेंत अदमासें एक इंचाचे उंचीचा ' पोवळ्याचा गणपती ' आहे हा गणपती भाऊसाहेब नेहमीं दंडावर बांधीत असत. उत्तरहिंदुस्थानांत शिंदे व होळकर यांनीं जशी तलवार गाजविली; तशीच कर्नाटकप्रांतींहि परशुरामभाऊसाहेब यांनीं तलवार गाजविली. श्रीरंगपट्टणवरील स्वारींत, कोल्हापुरावरील स्वारींत व खडर्यावरील स्वारींत भाऊंनीं अद्वितीय पराक्रम केल्यामुळें भाऊंची कीर्ति यावत्चंद्र कायम राहिली आहे.

श्रीरंगपट्टणच्या स्वारींत टिपूचा अगदीं मोड करण्याचे कामीं परशुरामभाऊंनीं कंपनी सरकारास जी मदत केली त्या उपकाराचे फेडीकरितां म्हणून कंपनी सरकारानें परशुरामभाऊंना एक गुप्त ( तहनाम्यासारखी ) करार-मदार केलेली याद सादर केली ती येणेप्रमाणें: —

यादी ठराव रावसाहेब मुस्फक मेहरबा कर्म फर्माय दोस्ता परशुरामपंतभाऊसाहेब व गंगाधर गोविंदरावसाहेब विलाखा तासगांव प्रांत मिरज आज साहेब हनराबल इस्ट वारीट जनरेल तामूस अवली बाद जनरेल कटवाली पारमलसाहेब बहादूर सलाम बाजत सलाम अंज्याम आके येथील खैर खुषी कलमें केलीं ते राहाजूर पाहून कलमें केलीं. ( शिक्का )

जनरेल तामस वाली सिलमेंडूससाहेब बहादूर यांनीं कलमें केलीं ते सन ११९८ फसली तारीख ११ तारखेस दिल्हे ते सरमाफ कलमें इंग्रजी. ( शिक्का. )

१ प्रांत मिरज इलाखा तासगांव येथील दरखुलास तुम्हास आहे तर पेशवे सरकारांतून तुम्हास दस्तबादमीबद्दल मुताप होऊन तुमचे दौलतीस इजा जाहालेस कंपनी सरकारांतून पुस्त देऊन दौलत चालविली जाईल येणेप्रमाणें करार.

१ तुमचें तासगांव ठिकाण मूळ गादी कंपनी सरकारचें मूळ

ठिकाण गादी विलायत असे तुमचे ठिकाण सरकारची गादी कायम ऐसीजेपर्यंत चालविलें जाईल येणेंप्रमाणें करार.

१ तुह्मी सरकाराशीं इमान धरून चालला तैसेच पुढेंही कोणाशीं फंद फितूर न करितां वर्तणूक करावी दोस्ती कायम चालली जाईल येणेप्रमाणें करार.

१ पटणचे स्वारीस फार तुह्मी मेहेर सरकारशीं केली ती स्वारी फारमास्त झालेवर तुमचे संस्थानाकडे कांहीं याजपैकीं जाहागीर दिल्ही जाईल येणेप्रमाणें करार.

१ हर कोठें मोगल सींदे वगैरे संस्थानिक आहेत यांनीं सरकारावर कमान केलेस तुह्मी कुमक करावी किंवा तुमचेवर शत्रू करवीरकर वगैरे कोणी कमान केलेस सरकारांतून कुमक देऊन बंदोबस्त करून दिले जाईल येणेंप्रमाणें करार.

१ स्वारीहून तुमचे कुमकेस ज्या वेळेस याल ते वेळेस सरकारांतून खर्चास पोंचते होत जाईल. ज्याफा सालाबाद कुमकसंबंधीं सरकारांतून सव्वालाख रुपये कंपणी नक्त तुमचें मूळ ठिकाण गादीकडे पोचत जाईल येणेंप्रमाणें करार

१ मेहरबा पटवर्धन मंडळी व सरमजामे तुमचे विलाख्यांतील तुह्माशीं लोभ राखून तुमचे रजस्त चाललेस कोणाशीं इजा होणार नाहीं येणेंप्रमाणें करार.

आज दीलखुशी येकलास सदर भरून दोस्तीचर नजर देऊन कलमें दिलीं मेहरबा रसवील साहेब बहादूर यांनीं तें कलमें सन १७८८ सदर आसाहेबाचे कलमें बार करून एकंदर कलमें केलीं तेरा ते सरमाफ. ( शिक्का. )

१ मैतवासी गोपाळरावसाहेब प्रांत मिरज येथें राहणार यांचे वंशीक यांनीं कसबे तासगांव येथील मुळ ठिकाण गादी ह्मणोन जनराल तामसवाली सिलमेंडूस साहेब बहादूर यांनीं ठरविलेंप्रमाणें मूळ गादीचें संरक्षण यथास्थित करून

राहावें त्याचे ठिकाणचें संरक्षण तुम्ही करावें तुमची गादी कायम असीजेपर्यंत त्याचे संस्थानास कंपणी सरकारांतून हरएकविसी उपद्रव लागणार नाहीं येणेंप्रमाणें करार.

१ मेहरबा रघुनाथरावसाहेब विलाखा कुरुंदवाड येथें राहणार याणी कसबे तासगांव ही गादी मूळ ठिकाण म्हणून जनराल आसाहेबांनीं ठरविलें प्रमाणें मूळ गादीचें संरक्षण यथास्थित करून राहावें तुमची गादी आसीजेपर्यंत त्याचे संस्थानास कंपणी सरकारांतून हरएकविशी उपद्रव लागणार नाहीं येणेंप्रमाणें करार.

१ मिरजकर व कुरुंदवाडकर वगैरे तुमचे गादीकडे चालणार संस्थानिक यांनीं गादीस रजून चालत असतां तुम्हाकडून त्यांस विजा झालेस नमानत असतां कंपणी सरकारांतून बंदोबस्त केला जाईल येणेंप्रमाणें करार. कलम.

१ पट्टणचे स्वारीस कंपणी सरकाराशीं तुम्ही कुमक केली ते वेळेस सरकारची इजत हुरमत बहुत राखली ते मुलाजा राखून कलमें चालविलीं जातील येणेंप्रमाणें करार.

१ पट्टणचे स्वारीस वेळेस तुम्हीं बहुत इजतीनें सर्व गोष्टीचा पुरावा केला तो लुकसानी झाले असल ते कंपनी सरकारांतून दरयाप्त पाहून दिल्हे जाईल येणेंप्रमाणें करार.

१ तुम्ही तुमचे गादीस मालकच आहां परंतु कंपणी सरकाराशीं दोस्ती चालली असें जाहाले पाहिजे याजखातर सालांतून दोन महिने सरकारचे खात्याकडे राहून जात जावें येणेंकडून दोस्ती दुरस्त राहील कंपणी करकाराशीं लिहिले कलमाप्रमाणें वाजवी वागावें सरकारनें तुम्हास इजत हुरमतीनें चालवावें येणेंप्रमाणें करार. (शिक्का)

आज दीलखुषी एकलास सदर भरून दोस्तीवर नजर देऊन सर माफ राहाजूर कलमें मेहेरबा कटवाली गुट साहेब

बहादूर यांणीं सन ११९८ फसली ता० १३ स सन आरदी सुद्धां.

१ जनराल तामसवाली सिलमेंडुस साहेब बहादूर यांणीं इनाम पत्राची याद ठरविली ती विलाइत नंबरी वार होऊन तुह्मास दिल्हे सन ११९८ फसली ता० ११ तार-तारखेस उजु होऊन दिल्लेले यादींचे ओळी छत्तीस तेली-बादी २ किताबसुद्धां ते उजु धरून मुपसल मन मौनइ-जार त्यांत जीं कलमें अइदाचारीचे व इनामपत्राचे याद करून दिल्हेप्रमाणें चालविले जातील कंपणी सरकारांतून हरकत होणार नाहीं व पेशवे सरकारांतही राहाजूर कर-णार नाहीं असें जाब कंपणी सरकारांतून चालविले जातील येणेंप्रमाणें करार. कलम.

१ जनराल तामसवाली सिलमेंडूस साहेब बहादूर यांणीं करून दिल्हेलीं कलमें सदर भरून मेहेरबा रसाविल साहेब बहादूर याणीं कलमें केलीं ते सदर भरून राह-जूर पाहून सर माफ कलमें भरून दिल्हे असे येणेंप्रमाणें करार. कलम.

१ जनराल तामसवाली सिलमेंडूस साहेब बहादूर याणीं पट्ट-णावर सिकस्त होऊन जिनसी पुरावा न होतां कुमक पुरावा न होतां सिदार जाहले तेव्हां तुह्माकडून सामान कुमक घेऊन कंपणी सरकारासीं पोंचल्याचे रुजू होऊन यादी ठरवून दिले चार इंग्रजी विलग.

१ गल्ला भरणा झालेची याद बंदी १ ओळी २२.
१ दारू व गोळा भरणा झालेची बंदी १ ओळी १५.
१ कुमकेस लुटार ठेविलें ते भरण्याची याद बंदी १ ओळी १९.

१ मेहेरबानी हुरमती लोक ठेविले त्याची यादी बंदी २ ओळी ७४.

एकूण चार यादी किताबासुद्धां करून देऊन भरणा करून घेतला सन ११९८ फसली ता० १५ तारखेस कंपणी सरकारची इजत हुरमत फार राखली तें पेशवे सरकाराशीं न कळतां दरयाप्त पाहून इजल करून ऐवज भरण्यास जाहागिर इनाम करून दिल्हे जातील येणेंप्रमाणें करार. कलम.

१ वारीट तामस रसविल साहेब बहादूर यांणीं तेरा कालमाची याद सरजाव इनाम ठरवून दिल्हें तें विलाइत नंबरीवार होऊन तुह्मास दिल्हे सन ११९८ फसली ता. २० दशंबर तारखेस तेलीबंदी ४ तसू दोन जास्ती किताबसुद्धां ते उजु भरून मुपसल मन मनमुन इजार त्यांत जीं कलमें ऐदाचारीचे व सरजाव इनामपत्राचे याद करून दिल्हेप्रमाणें चालविलें जातील कंपणी सरकारांतून हरकत होणार नाहीं व तुह्मावर जुलुम जास्ती सरकारची गादी अशीजे पर्यंत होणार नाहीं येणेंप्रमाणें करार.

१ वारीट जिगरेल तामस रसवील साहेब बहादूर यांणीं सदर याद ठरवून दिल्ही त्यांत इनाम पत्राचा शेरा उगवला याजखातर आपरेल करून शाहा धरून विलाइतास खबर देऊन इनामपत्र तासगांव मुळ ठिकाण गादी कंपनी सरकारची गादी विलायत असे दरयाप्त करून इनामपत्र करून दिल्हें तें ओळी २४ पैकीं सोन्याच्या शाईच्या ओळी ५ कागद रुंद तसू ५ लांब तसु १४ करून दिल्हे ते कंपणी सरकारांतून आपली गादी असीजे पर्यंत इजत हुरमतीनें चालविले जातील येणेंप्रमाणें करार.

१ आज दीलखुषी एकलास सदर भरून दोस्तीवर नजर देऊन

सदर भरल्याप्रमाणें सदर जाब चालविले जातील कंपणी सरकारांतून तक्रार न करितां गादी तुमची चालविली जाईल तुह्मी कंपनी सरकारासीं तक्रार न करितां चालावें. येणेंप्रमाणें करार. कलम.

१ पेशवे सरकारांत सालांत तुह्मी येऊन दस्त बादमीबद्दल हजर राहून असतां तैसे कंपनी सरकारचे खात्याकडे सलामी देऊन जात जावें येणें करून दोस्ती दुरस्त राहील येणेप्रमाणें करार. कलम.

१ दखन खात्याकडे कोणी कंपनी सरकारांतून अमलास येतील त्यांणीं तुह्मांस दोस्ती राखून गादीस बदमामला न करितां रजून चालावें तुमचे गादीस बदमामला जो करील तो इंग्रजी बीज नव्हे या बाबे अमलांत आणून कंपनी-सरकारची हुरमत फार राखली ह्मणोन सरकारचे हुकूम घेऊन क्रियाबद्दल कटआकबरी मेहेर होऊन नजर क्रिया देणेस मोजुद केली सबब हल्ली सरकारची टोपिची खूण परी कलगी ते विलाइत कंपणी चारशेहे नऊ बुकीं तेतीस नंबरावर बार करून दिल्हीं आहे त्याप्रमाणें इनाम धरून कंपनी सरकाराशीं तुह्मी चालावें कंपणी सरकारांनीं इमान धरून तुह्मासी चालावें येणेंप्रमाणें करार.

१ कंपणी सरकारची व तुमची दोस्ती चालली आहे आणि एक मिलाफी आहेत असे सर्व जाहागिरदार व मोगल वगैरे यांस कळलें पाहिजे याजखातर आपलेकडील मोठा मानकरी पंचवीस स्वाराचे बेदरीनें सरकारचे खात्याकडे राहावें त्यास सरकारांतुन गोट देऊन त्याची पुस्त राखून ठेऊन नक्त ऐवज सरकारांतून पोंचणेचा करार जनराल तामसवाली सीलमेंडुस साहेब बहादूर याचे यादींत आहे तो सरकारांतुन तुमचे मानकरी यांजकडे पोंचनें होत जाईल

येणें करून जहागिरदार व मोगल सिंदे यांस एक मिलाफी आहेत. असें कळण्यांत येईल सबब दरयाप्त करून लिहिलेप्रमाणें चालवावें येणेंप्रमाणें करार.

१ पेशवेसरकाराशीं हे मिलाफी असे कळून तुह्मावर त्यांणी कमान केलेस तुम्हास कुमकेस न बलाविता त्याजवर कंपनी सरकारांतून कमान करून तुह्मास तोसीस न लागू देतां तुमचा बंदोबस्त करून देऊं. हे अभय असे यांत तक्रार आह्मी केलेस इंग्रजी बिज नव्हे येणेंप्रमाणें करार.

१ तुमचे जिल्हेंतील सरमजामी वगैरे जाहागीरदार याचे वंशक्षय जाहलेस त्याचे वतनमान व त्याचे जहागिरीस मालक तुह्मी किंवा त्याचे जहागिरीस मालक करून देणें हे तुह्मी द्यावे घ्यावे कंपणी सरकारांतून विचारणार नाहीं येणेप्रमाणें करार. कलम.

१ मेहेरबा गंगाधर गोविंदरावसाहेब मिरजकर यांस जहागिरीचे इनामपत्र कंपनी सरकारांतून करून दिल्हें आहे त्याचे ओळी २३ कागद रुंद तसु ५, लांब तसू १५ सन ११९८ फसली ता० २३ माहे दशंबर तारखेस मेहेरबानी मेहेरबा परशरामपंत भाऊसाहेब याचे दोस्तीवर नजर देऊन इनामपत्र करून दिल्हप्रमाणें वंश परवंश चालविलें जाईल येणेंप्रमाणें करार. कलम.

१ मेहेरबा रघुनाथरासाहेब विलाखा कुरुंदवाडकर यांस जाहागिर चालत आहे प्रमाणें कंपणी सरकारांतून इनामपत्र करून दिल्हें आहे, त्याचे ओळी २१ कागद रुंद तसु ५ लांबी तसू १५ सन ११९८ फसली तारीख २३ दशंबर तारखेस मेहेरबानी मेहेरबा परशरामपंत भाऊसाहेब यांचे दोस्तीवर नजर देऊन इनामपत्र करून दिल्हें प्रमाणें वंशपरवंश चालविलें जाईल येणेंप्रमाणें करार.

१ कलकत्ते खाल्यास कोण साहेब कंपनी सरकारांतून अमलांत असेल त्यासही ठराव बारनिशी याद दाखवावी ह्मणजे तुमची जी खबर असेल ती त्यांनीं हुजुरास जाहीर करावी, त्यास त्याणें तक्रार केलेस इंग्रजी बिजनव्हे येणेंप्रमाणें करार. कलम

१ ही क्रिया ल्याहावयास कारण सरकारची इजत हुरमत तुह्मी फार राखली आणि कंपनी सरकारांत बडजाद होऊन सरकारची खातरी जाहली सबब दखणेंत अंमल चालत असतां दोस्ती असावी याजवर नजर देऊन सदर जाब लिहिलेप्रमाणें इनाम धरून कंपनी सरकाराशीं चालावें. येणेंप्रमाणें करार शेऱ्यासुद्धां १५ कलम.

मेहेरबा जनराल तामसवाली सिलमेडूस साहेब बहादर यांनीं जिनसी पुरावा याची यादी करून दिल्ही. चार जिनसी पुरावा दारू व गोळा अनाज घास पुल्या एकंदर पेटा करून घेतले ते मारपत जन्येरल साहेब बहादुर याचे उजूनी घेतले ते कलमें चार सदर पेटा भरून दिल्हे असे येणेंप्रमाणें करार. ( शिक्का )

मेहरबा कटवाली गुटसाहेब बहादूर हे दक्षणेचे अंमल मंजूर करणें खातर आले यांनीं दरयाप्तीं पाहून करून दिल्हे मेहेरबा रावसाहेब मुस्फक मेहरबा कर्म फार्माय दोस्ता परशरामपंत भाऊसाहेब विलाखा तासगांव प्रांत मिरज याचे भाईबंदी सुधा मेहेरबावर नदर देऊन इनामपत्रें खासगत मेहरबाची १ व कुरुंदवाडकर व मिरजकर यास इनामपत्रें दोन मेहेरबाकडे नदर देऊन करून दिलीं असे येणेप्रमाणें करार. ( शिक्का )

१ तुमचें तासगांव ठिकाण मुळ गादीस अवलादी नसता मालक होऊन आटीटाट जाहलेस गादीस मालक कोणास तुमचे दिलास वाटेल त्यास करावे मेहेरबा

रामचंद्रराव आपासाहेब याणीं किंवा त्यांणीं आपले दरज्यास किताब राखून अवलादी असल्यास बसवावयास मालकी त्या खेरीज दुसऱ्यास येणार नाहीं किंवा दुसऱ्यास बसणेस मालकी त्यांजखेरीज अखत्यार नाहीं येणेंप्रमाणें करार. कलम.

१ मेहेरबा मिरजकर हे तुमचे भाईबंद आहेत त्याजवर हरबाबे मेहेरबाची पुरी नदर असावी त्याप्रमाणें कंपनी सरकारांतून नदर ठेविली जाईल येणेंप्रमाणें करार.

१ कंपणी सरकारचा अमल फार चडला तरी मेहेरबाचे व सरकारचे विचारें काय जें करणें किंवा कोणावर कमान करणें हें एकमेकाचे विचार घेतले खेरीज करू नये येणें-प्रमाणें करार. (शिक्का)

एकूण कलमें आसाहेबांनीं दिल्हीसुद्धां व हल्लीं रहरस्ते करून सदर मामुलपासुन जमेस धरून बार केले असे विलाइत चारशेंहें नव्याणगव बुकी चवदा नंबरावर बार झाले असे याप्रमाणें कंपनी सरकारांतून सरीस चालविले जाईल यांत तक्रार केलेस क्रिया ममा देवीची व येसुखीस्त मेहेरबा गुरूची बदल केलेस इंग्रजी बीज नव्हे येणें-प्रमाणें इजत हुरमतीनें कंपनी सरकारचे गादी विलाइत असे तुमचे गादीचा अभिमान राखून आमचे गादी असीजेपर्यंत बरोबर इज-तीनें चालवून देऊं. तुह्मी कंपनी सरकाराशीं फंद फितुर करून बदल केलेस तुम्हांस सदर लिहिलेप्रमाणें क्रिया एकमेकांनीं दुरस्त राखून आवलाद आफलाद मिलाफत करून दौलत गादी चालवावी. कंपनी सरकारचे व मेहरबा परशरामपंत भाऊसाहेब हे एकमेकांत भाई-बंदकी दोस्तीची आहे असे कळण्यांत पेशवे सरकारचे राज्य खाल-सात जाहले खेरीज जहागीरदार वगैरे यांस कळण्यांत येऊ नये व ही खबर कंपणी सरकारांतून पेशवे सरकारांत वगैरे कळणार नाहीं. कदापी पेशवे सरकारांत कळलेस तुम्हांस तक्रार आलेस कंपनी सर-

कारचे अमल मामुल चालत आहेत त्याजपैकीं जहागीर देऊन मेहेरबास चालविले जाईल सन १२०१ फसली सन १७९२ इसवी ता. ९ नवंबर ज्यादा काय ल्याहावे प्यारे मोहोबत असोदीजे.

मेस्ती गोविंद व्यंकटेश मुनसी. सही इंग्रजी.

" भारत इतिहाससंशोधक मंडळाचें साहावें संमेलन शके १८४० मधील दुसऱ्या दिवसाचे कार्यक्रमांत रा. पां. न. पटवर्धन यांनीं परशुरामभाऊ पटवर्धन व इंग्रज सरकार यांचा संबंध दाखविणारें एक कलमपत्रक वाचून दाखविलें व त्याचा निष्कर्ष असा निघाला कीं, परशुरामभाऊ हे कंपनी सरकारचे फितुर दोस्त असून, त्यांनीं प्रसंगविशेषीं पेशव्यांचेही विरुद्ध सहाय्य करण्याचें कंपनी सरकाराला कबूल केलें आहे व दत्तक देऊन तासगांव इलाखा चालू ठेवूं अशी हमी घेतली आहे. या पत्राच्या वाचनानंतर अध्यक्ष रा. वासुदेवशास्त्री खरे यांनीं असा खुलासा केला कीं, हें परशुरामभाऊंना बदनाम करणारें पत्रक खोटें आहे. कारण १७९१ सालांत पेशव्यांचा ऊखेर यांत लिहिला आहे व ' इंग्रजी बीज नव्हे. ' ' ममादेवी व येशुखिस्त ' यांची शपथ ही कोणा हिंदूचीच कल्पना असली पाहिजे. इंग्रज कधींहि असें लिहिणार नाहींत. दुर्दैवाची गोष्ट ही कीं, याच खोटया पत्रकाचा प्रसार, थेट इंग्लंदपर्यंत चिंचणी संस्थान-प्रकरणामुळें झाला आहे. "

वरीलप्रमाणें शके १८४० चे भारत इतिहाससंशोधक मंडळाचे सहावे संमेलनांत कंपनी सरकारानें भाऊंस करून दिलेल्या कलमबंदी यादीसंबंधीं विक्षिप्त तऱ्हेचे तर्ककुतर्क उत्पन्न करून परशुरामभाऊंसारख्या निःसीम स्वामिभक्तावर फितुरीचा आरोप जरी आणिला गेला तरी त्या संमेलनाचे अध्यक्षांनीं " परशुरामभाऊंना बदनाम करणारें पत्रक खोटें आहे. " असें विधान करून भाऊंच्या संबंधीं त्यांनीं आपला निष्कलंक भाव व्यक्त केला. आतां सदरहु यादींत कंपनी सरकारांनीं जी भाषा वापरली आहे त्या भाषेवरून

कलमबंदी याद खोटी आहे असें जें अध्यक्षांनीं विधान केलें तें मात्र त्यांचें चुकलें. जर तासगांवकर पटवर्धन यांचे कागदपत्र अध्यक्षांच्या पहाण्यांत आले असते तर सदरहू विधान त्यांच्याकडून झालें नसतें.

सदरहु कलमबंदी याद खरी असून कंपनी सरकारांनीं, भाऊ-साहेबांचे आपणांवर अत्यंत उपकार झाल्याचें स्मरून आपण होऊ-नच अती लीनपणाची भाषा वापरून गुप्त कलमबंदी याद परशराम-भाऊकडे दिली. या कलमबंदी यादीचे शेवटीं असे आहे कीं, " कंपनी सरकारचे व मेहरबा परशरामपंतभाऊसाहेब हे एकमेकांत भाईबंदकी दोस्तीची आहे असें कळण्यांत पेशवे सरकारचें राज्य खालसात जाहले खेरीज जाहागीरदार वगैरे यांस कळण्यांत येऊं नये व ही खबर कंपनी सरकारांतून पेशवे सरकारांत वगैरे कळणार नाहीं. कदापि पेशवें सरकारांत कळलेस तुह्मास तक्रार आलेस, कंपनी सरकारचे अमल मामुल चालत आहेत त्याजपैकीं जाहागीर देऊन मेहेरबास चालविले जाईल. सन १२०१ फसली सन १७९२ इसवी ता. ९ नवंबर जादा काय ल्याहावें ध्यारे मोहबत असो दीजे. " या लिहिण्यावरून असें स्पष्ट होतें कीं, पेशवे सरकारचें राज्य असे पर्यंत ही याद गुप्त समजावी. कदाचित् पेशवे सरका-रास समजून तुमची नुकसान होईल तर पेशवे सरकारांतून चालत आल्याप्रमाणें आह्मी चालवूं. आतां या कलमबंदीवरून असें अनु-मान सिद्ध होतें कीं, कंपनी सरकारांनीं मात्र एका स्वामिभक्त सरदारास स्वामिभक्तीपासून च्युत करण्याचा प्रयत्न केला. परंतु अशा तऱ्हेची गुप्त कलमबंदी याद कंपनी सरकारांकडून जरी भाऊंचें हातीं आली तरी परशरामपंतभाऊ मरेपर्यंत स्वामिसेवेस अंतरले नाहींत. यावरून भाऊसाहेब जसे महापराक्रमी होते तसेच मुत्स-द्दीही होते यांत शंकाच नाहीं.

परशरामभाऊंचे पुत्र गणपतराव यांचे नांवें तासगांव जहागीर त्यांच्या वडील बंधूंनीं ( रामचंद्रआपांनीं ) करून देऊन आपण

जमखंडीस रहावयास गेले. हे पुढील अस्सल कागदाचे उतारे देत आहे; त्यावरून सहज लक्षांत येईल.

( शिक्का. ) श्रीगणपती.

आज स्वारी राजश्री रामचंद्र परशराम ता। मोकदम कसबे तासगांव सु॥ इसन्ने अशर मयातैन व अलफ का। मजकूर हा गांव व खेरीज दुमाले करून आमल चिरंजीव राजश्री गणपतरावबापू यांजकडे सरकारांतून साल मजकुरी सरंजामास लावून दिल्हा आहे तर चिरंजिवाकडील कारकून यासी रुजू होऊन आमल सुरळीतपणें देत जाणें वसूलबाकीचें पत्रक पाठवून देणें जाणी छ ९ रोबल ( शिक्का. )

श्रीगणपती.

" राजश्री वेंकटापा नाईक बहिरी बहादर संस्थान सुरापूर गोसावी यासीः—

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्ने॥ रामचंद्र परशराम आसिरवाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित जाणें विशेष संस्थान मजकूर येथें सरकारची × × × × णे त्याजपै॥ आह्माकडील सरंजामास दरसाल तीस ( ३०००० ) हजार रुपये सरकारांतून लावून दिल्हे आहेत, त्याजपैकीं दहा हजार रुपये चिरंजीव राजश्री गणपतरावबापू याजकडे सरंजामास साल गु॥ सन इसन्ने आशर मयातैन पासून देत जाणेविसी सरकारचें आज्ञापत्र आलें त्याजवरून हें पत्र तुह्मांस लिहिलें आहे तर तुह्मांकडून सालाबाद खंडणी बाबत तीस हजार रुपये येणें त्यांजपैकीं चिरंजिवाकडे सालगु॥ पासून इकडे खंडणीचा भरणा होणें त्याअन्वयें दरसाल दाहा हजार रुपये पावते करीत जाणें र॥ छ. १२ जा॥र सु॥ सलास आशार मयातैन व आलफ बहुत काय लिहिणें हे आसिरवाद मोर्तब " गोल शिक्कयांतील मजकूर कंसांत दिला आहे ( ७० श्रीगणपती श्रीमंत प्रधान चरणी तत्पर रामचंद्र सुत परशराम निरंतर.)

" बदामीजवळील अनंतपूर लष्कर मुक्कामेंत पटवर्धन परशराम-

भाऊ यांचे लेक गणपतराव यांणीं तासगांवाहून वकील अंताजीपंत याजबरोबर तेवीस कलमी कलमबंदी याषादपटी पाठविली त्यास सरकाराकडून जाबसाल ठरले ते सन १८१८ इसवी माहे फेब्रुवारी छ. १७ रोज." हीतेवीस कलमीयाद अवश्य छापणेची परंतु वेळेवर न आल्यामुळें राहिली. याद तासगांवकर यांचेजवळ आहे.

नं. ११७ मुंबई किल्ला १८ जानेवारी १८२० रेव्हुनिडिपार्टमेंटकडून– गणपतराव परशराम पटवर्धन तासगांवकर यांना इंग्रजसरकाराकडून ( पांचशें ) ५०० रु. वसूलाचा गांव निरंतर जातइनाम करून दिला आहे. गणपतराव मयत झाल्यावर परशराम गणपतराव यांचे नांवें नं. ५५८ सन १८२१ता. ६ एप्रिल१८२१रोजीं सरकाराकडून पुन्हा सदरहु इनामगांव काटे जि॥ रत्नागिरी हा जातइनाम तुम्हास निरंतर चालविला आहे. " याप्रों सदरहु इनामगांव स. १८४८ पर्यंत चालू होता. "

पंढरपूरचा तहनामा जसा इतर पटवर्धन सरदारांबरोबर झाला; तसा गणपतरावबापू पटवर्धन तासगांवकर यांचेबरोबर झाला नाहीं. कारण गणपतरावबापूसाहेब तासगांवकर यांनीं कंपनी सरकारास असें कळविलें कीं, आमचे वडील परशरामपंतभाऊसाहेब यांच्याबरोबर सन १७९२ त झालेल्या ठरावाप्रमाणेंच आमचें चाललें पाहिजे. हें पुढील कागदपत्रावरून सिद्ध होत आहेः–

॥ श्री ॥

गव्हरनर जनरल बंगालचे लार्ड साहेब यांचे नांवें जनरल तामस मनरोल एसक्वायर यांचा रिपोर्ट तारीख ३ माहे एप्रील सन १८१८ नंबर ६७ चा––

१ मिस्तर आनरबल एलफिरटन साहेब सदर दक्षिणेचे राज्याचे निबंध ठेविणार यांनीं मजला रिकमेंड सन१८१७सालचे नंबर १२ चे पत्रांत कलमी केलें. करनाटक प्रांतांतील सरदारापैकीं पटवर्धन मंड-

ळींतील मयत परशुरामपंतभाऊसाहेब पटवर्धन यांचे औरस पुत्र गणपतरावबापूसाहेब यांजला मी पेशवे यांचे लढाईप्रसंगांत मानपत्र व वकिलांचे विद्यमानें कळविलें कीं, तुमचे लक्ष कंपनी सरकाराकडे असोन कदीमची दोस्ती आहे तीच कायम ठेवावी ह्मणून बहुत प्रकारें सुचविलें. त्यांनींहि माझें ह्मणणें कबूल केलें. त्यास जर पटवर्धन मजकूर बोलणेस येतील तर मोठ्या खातरदारीनें त्यांची दोस्ती होईल असा अर्थ करून योग्य रीतीनें पुरता विचार त्यांचे खुषीप्रमाणें व सरकारचे फायदेशीर करार करून घ्यावे. ह्मणोन वगैरे मजकुरांचीं पत्रें दोन आलीं त्यांच्या काप्या आपले जनरल कौन्सीलास गेल्या. सन मजकुरचे नंबर १०१ चे रिपोर्टाबरोबर पाठविल्या आहेत. त्याजवर जाहली हकीकत आपल्यास कळवीत आहे.

२ तासगांवकर पटवर्धन गणपतरावबापूसाहेब यांजकडील वकील थैलीपत्र व मिस्तर आनरबल एलफिस्टनसाहेब एसक्वायर यांची चिटी घेऊन येऊन मजला भेटला तेव्हां त्यांचें बोलणें सर्व ऐकतां कंपनी सरकाराबाबद निष्कपट दोस्ती राखावी असाच इरादा दिसून आला. त्याजविषयीं मी त्याजला फार खडून विचारलें तरी ते खातरजमेनें आपला हेतु स्नेह करणेचाच सांगताल. जाणून मीही त्यांस बहुत खातरीपूर्वक भरंवसा देऊन तुमची चांगलीच बढती करीन असें सांगितलें.

३ तासगांवकर पटवर्धन मजकूर यांनीं कराराची यादी व्हावी ह्मणून वकिलाचे मार्फत आपले कलमबंदी हजर केली त्यांत त्यांनीं बहुतेक मुद्दे लिहिले असोन दोन कामाविषयीं सबळ आग्रह दाखविला त्याचा मी विचार करून तीं कलमें बहुत पटवर्धन यांचे फायदेसारखे करून दिले. कारण पेशवे सरकारचे पदरचे प्रौढ सरदार व त्यांचा मुख्य हाच आग्रह पडला कीं, केवळ इंग्रज सरकारचे चाकर ह्मणविणार नाहीं. जशी पेशवे यांनीं आमची बढती केली व स्वतंत्र वागलों त्यापेक्षां अधिक तुह्मी मेहरबानी कराल तर आपले वचनाखेरीज आह्मी नाहीं. ह्मणून बहुतेक कारणें त्यांचे सवालांत

आली व सारांश चाकरी माफ असावी ह्मणून मुद्दा पडला. तो मी त्यांचे ह्मणणेप्रमाणें कबूल करून मोठ्या बळानें बरोबरीचे दर्जाप्रमाणें कधीं कारण पडेल तेव्हां कुमकेस यावें लागेल ह्मणोन कबुलायत घेतली.

४ कंपनी सरकारांनीं दोस्ती केली आणि पेशवेचा जोर जाहला तर ते आम्हास खराब करितील तेव्हां आमचा कसा बंदोबस्त इंग्रज ठेवतील हे एक बहुत मजबूत बंदोबस्त करून घेणेचें कलम पटवर्धन मजकूर यांनीं बोलले त्याचा मी फार खातरदारीनें कसर करून दिला कीं जेथें कंपनी सरकारचा हक्क असेल तेथें तुम्हांस नाइदाद ( इनाम ) लावून देऊं याप्रमाणें वचनपूर्वक कबूल केलें म्हणुन त्याचा हेतू आपलेकडे पुर्ता राखून करार केला.

५ बाकी कलमें आपलेस विदीत असावीं जाणून तासगांव पटवर्धन याजबरोबर कलमबंदी ठरली. त्याची याद आपलेकडे या रिपोर्टापोर्टीं पाठविली आहे. व दुसरी प्रत सविस्तर वर्तमानपत्र मिस्तर सर अनरेबल एलफिस्टनसाहेब एसक्वायर यांजकडेही रवाना केली आहे. त्यास मीं पत्रीं सुचविलें कीं पटवर्धन मजकूर यांचें इमान घेऊन करार करून दिला त्याप्रमाणें निष्कपट त्यांचे वर्तणुकीचा अनुभव घेऊन ठरेल ते कलमें अमलांत आणावीं ह्मणोन लिहिलें आहे. त्या पत्राची कापी या रिपोर्टापोर्टीं आहे त्यावरून दरएक कलमाचे प्रकरणांत माझा कसा अभिप्राय आहे हें आपले जनरल कौन्सीलास विदीत होईल.

६ जें पटवर्धन मजकूर यांनीं वचन दिलें त्याप्रमाणें धोरणानें त्यांनीं अखेरपर्यंत दोस्ती ठेविल्यास जे मी करार करून दिले ते अक्षयीं निभवून त्याजला फेरबदल आज किंवा पुढें आणूं नये. मयत परशरामपंत भाऊसाहेब पटवर्धन हे टिपू हैदरचे लढाईचे प्रसंगांत कंपनी सरकाराबरोबर मोठे अडचणीचे वक्तीं उपयोगीं पडले. त्यांनीं खरी दोस्ती आपले बरोबर ठेविली. त्याजवर नजर देऊन मी बरो-

बरीचा त्यांचा दर्जा सर्व कलमबंदींत ठेविला. तशी त्यांनीं हल्लीं अव्वलअखेर दोस्ती लढाईचे प्रसंगांत राखिली पाहिजे. जर अंतर आल्यास करारही फेरबदला करावा व नंतर आल्यास मी त्याजविषयीं मागाहून फार खुलाशानें रिपोर्ट करीन त्याप्रमाणें सर्व मान व सरंजाम वगैरे जावत्काळ इंग्रज सरकारांचा अंमल आहे तावत्काल चालविले पाहिजे.

॥ श्री. ॥

तारीख १२ माहे आगस्ट सन १८१९ नंबर ८८८ गव्हरनर जनरल व बंगालेचे लार्ड यांस रिपोर्ट मिस्तर आनरबल एल्फिस्टन यांचाः—

१ हिंदुस्थान मुलुखांपैकीं कर्नाटक प्रांतांत प्राचीनपासून पटवर्धन या नांवाचे सरदार हजारों फौजेनिशी आहेत. त्यांजकडे मुलूखही फार बरजेचा असून त्या एकंदर मंडळींचा कशा रीतीनें मी बंदोबस्त करीत आहे. व करण्याचा इरादा ठेविला. त्या सर्व हकीगतीचा रिपोर्ट तारीख २३ माहे नवंबर सन १८१८ रोजीं नंबर ११८० चा केला आहे. त्यावरून सर्व गोष्ट विदीत झालीच असेल.

२ मयत परशुरामपंत भाऊसाहेब पटवर्धन त्यांचे प्रत्यक्ष औरस पुत्र गणपतराव बापूसाहेब यांजला मी पेशवे यांचे लढाईचे वेळीं मानपत्र पाठवून कंपनी सरकाराकडे आपले दिल असावा व दोस्ती पूर्वीची कायम ठेवावी ह्मणून इषारा केल्यावर त्या माझे इच्छेस हेतुपूर्वक पटवर्धन मजकूर यांनीं अनुमोदन देऊन माझे ह्मणण्यावर दोस्तीचा इरादा सरकाराबरोबर निष्कपट ठेविला. आणि मी सुचविल्यावरून मिस्तर जनरल तामस मनरोल एसक्वायर कर्नाटक प्रांताचा निबंध ठेवणार त्याजकडे रुजू होऊन त्यांचे सवाल जबाबानें पुष्कळ चर्चा आपसांत ठरून सन १८१८ चे फत्नुवारी महिन्यांत करार दोघांचे विचारानें झाले, त्या कलमबंदीची कापी व मी आणखी त्या करारांत कमजास्ती कलमें करण्याचा हेतु धरिला. त्या

सर्व हकिकतीचा रिपोर्ट आपणास तारीख ५ माहे मे सन १८१९ रोजीं ४२२ चा केला. त्यावरून सर्व खुलासा समजलाच असेल.

३ परशुरामपंतभाऊसाहेब पटवर्धन यांचे औरस पुत्र गणपतरावबापूसाहेब यांजला मिस्तर जनरल तामस मनरोल एस्क्वायर यांचे करारांतील कलमाबद्दल फेरबदल करणेविसीं मी बहुतप्रकारें पत्रें व वकिलाचे मार्फत बोलणें चालविलें परंतु त्याचा मोठा हट्ट जो मिस्तर जनरल तामस मनरोल यांनीं करार करून दिला, त्यास कमिजास्ती करूं नये अशाविषयीं फार पडला. तेव्हां त्यांस नानाप्रकारें मनाप्रमाणें समजूत देऊन त्यांचें हित व माझा इरादा सिद्ध होई अशी तजवीज चालविल्यावर मोठया श्रमानें बहुत जिकीर होऊन तारीख १७ माहे जून सन १८१९ रोजीं कर्नाटक प्रांत विजापूरचे सुभ्यांत कलमबंदी ठरली त्याची कॉपी या रिपोर्टापोटीं ठेविली आहे. त्याजबद्दल एकंदर खुलासा लक्षांत येईल.

४ चाकरी कबूल करणेकारितां पटवर्धन मशारनिल्हे यांस मी अशी त्यांचे हिताची वाट दाखविली कीं, तुह्मांस सर्व सरदारापेक्षां तुमचें म्हणणेप्रमाणें निरंतर दत्तक घेण्याची पावर देतों व तुमचें संस्थान इनामीप्रमाणें कायम करून जरी चाकरी घेणेचें करितों तरी त्याबद्दल सुमारचा चाळीस हजार बेरजेचा मुलूख देत जावें व एकंदर सरंजामापैकीं तीन हिस्से चाकरी माफ करून त्याबदला मुलूख तीन भागाचा तुमचे कुटुंबास निरंतर इनामाप्रमाणें बे हरकत सरकार निर्वेध नेकनजरेनें चालवील असें करून देतों. म्हणून वगैरे फायदे पुढें ठेविल्यावर मोठ्या वेळानें माझें म्हणणें कबूल केलें व आणखी कित्येक जातींचे व सिफारसीपैकीं कलमें झालीं पाहिजेत म्हणून आग्रहानें मुद्दे घातले. योग्यायोग्य पाहून त्याचे समजुतीप्रमाणें करून दिलें. व कबूल केलें तेव्हां त्यांनीं एक भागाची चाकरी कबूल केली.

५ मी पटवर्धन मशारनिल्हे यांचे कराराचे यादीखेरीज एक याद अक्षयीं दत्तक घेण्याची करून दिली त्याची यादी या रिपोर्टाबरोबर

पाठविली आहे. हा ठराव त्यांजकडे दोस्तीखातर गुपचीप करून दिला असा इकरार त्यांचे बरोबरीचे सरदार पटवर्धन यांजला नसून हे प्रमुख व माझा शब्द मान्य व कादिमापासून सरकारांचे दोस्ती जाणून स्वतंत्र पावर दिला. हा त्यांस किंवा मजलाच ठाऊक आहे. जर दुसरे पटवर्धन यांजला खबर समजली तर ते मजला उपद्रव देतील. ज्याणून निराळी याद करून दिली. त्यास बरहुकूम यादी-प्रमाणें त्यांनीं कारण पडल्यास दत्तक बे हरकत घ्यावा त्यांजला नजर माफ केली आहे. असी सल्ला दिली याप्रमाणें स्वतंत्र पावर कोणास दिली नाहीं. हें आपल्यास विदीत व्हावें.

६ इकडील प्रांतांत एक एक सरदार मोठे बाकेदार व ते पेशवे सरकारचे कारकीर्दींत फार स्वतंत्र राहिले. यांजवर एकाएकीं कंपनी सरकारांचा चाकराप्रमाणें हुकूम पोंचणार नाहीं तसें जर करावें तर तेंच निराकरण करितां करितां फार शीण पडेल ज्याणून जसें जसें योग्य वाटेल तसें तसें सरदारांचे बंदोबस्त करून दिले. व सर्वांची दोस्ती कायम ठेविली आणि समजूत काढिली. त्या एकंदर प्रकरणांचे रिपोर्ट हमेशा आपणांस केलेच आहेत. त्यांत कितीएक कलमांविषयीं कमजास्ती किंवा फेरबदल करणेविसीं सवड ठेविली आहे. तो सर्व प्रकार त्या रिपोर्टांत लिहिला, तदनुसार परशुरामपंतभाऊ-साहेब पटवर्धन यांचे औरस पुत्राविसीं माझें लिहिणें नाहीं. जी त्यांस कराराची याद करून दिली, तीच याद बहाल ठेविली पाहिजे कारण सरकारचे उपयोगीं मयत परशुरामपंतभाऊ पटवर्धन फार पडले व त्यांचे मागें लोकांनीं निष्कपट दोस्ती ठेविली. त्याअर्थीं माझा किंवा आपला अभिप्राय दुसरा आज किंवा पुढें नसावा.

॥ श्री ॥

तारीख २५ माहे सपटंबर सन१८२२ मिनीट लार्ड ल्यूकस बेंटिक व्हाइकौंट फाकलंड गव्हरनर इन प्रेसिडेंट मुंबई यांचा--

१ तासगांवकर पटवर्धन यांनीं देवस्थानास नेमणुक केली ती त्यांस परत द्यावी कीं कसें याचा विचार मी मोठ्या दक्षतेनें पाहतों व हक्क परत देणेस मुख्य येवढा विचार झाला पाहिजे कीं, पटवर्धन यांस देणगीचा पावर होता कीं कसें याजबद्दल कराराचे कागद वगैरे बघून मी मत देतों.

२ मिस्तर सर आनरबल एलफिस्टन एसक्कायर दक्षिणेचे राज्याचा निबंध ठेवणार यांनीं तासगांवकर पटवर्धन यांस करार करून दिले व गव्हरनर जनरल॰ बंगालचे लार्ड यांसी जे रिपोर्ट केले त्यांतील अर्थ ओळखिला. तरी जसे पेशवे याचप्रमाणें आपले हक्कापुरते पटवर्धनापाशीं त्यांची थोरपणाची व्याख्या करून लिहिली व सर्व सत्ता त्यांचे हातीं ठेविली वगैरे आहे. शिवाय मजला असें आढळलें कीं, पटवर्धन यांचे हक्कास कधींहि आडचण आणूं नये. जरी अस्सल वंश बुडाला तरी दत्तक घेणेची त्यास सल्ला दिली व तोही वंश गारद जाहल्यास हाच करार निभवावा. अशी फार विवर्णता लिहिली. ती मी चित्तांत घेऊन तासगांवचे पटवर्धन यांस खरी सत्ता देणगीची आहे असें खातीनें मानतो.

३ जे मिस्तर अनरबल एल्फिस्टन यांनीं तासगांवकर पटवर्धन यांची व्याख्या करून लिहिली त्यास खरेपणा आणण्यास बहुता दिवसांचे पेशवेसरकारचे कागद करारासारखे पटवर्धन यांस दिले. त्याचे ट्रान्सलेशन ह्मणजे तरजुमे बघतां जे दक्षिणेचे राज्यांचे निबंध ठेविणार लिहितात व जी वरिष्टाचे रिपोर्टांत विवर्णता केली तें खरें आहे असें माझें नजरेस पुरतें आढळतें.

४ वरचे विचाराखेरीज माझी इच्छा पुरवर होण्यास आणखी बहु-

तेक मत्यंतर पाहिजे. त्यास मिस्तर जनरल तामस मनरोल एसक्वा- यर यांनीं पटवर्धन मजकूर यांजबद्दल वरिष्ठांस इतल्ला केला. तो रिपोर्ट पाहतां माझे सर्व चित्ताची खात्री मी जे हुडकितों त्याजवरून होते व निश्चयेरूप पावर पटवर्धन यांजला इनाम व सरंजाम नेम- ण्यास आपले हक्कांत स्वतंत्र आहे.

५ सदरहु एकंदर कारणावरून व सोबतचा हक्क सोडून देणेस रुकार देतात सबब हा इनाम सोडण्यास आर्डरीचा ड्राफ्ट, इनामी फलेलें पत्र, यांचे नांवें ओरीएंटल डिपार्टमेंटचे सेक्रेटरी यांनीं खुला- शानें लिहून माझे बघितल्यानंतर रिफर करावें.

६ पटवर्धनांचे कराराबद्दल कागद इमानी कमिशनर यांजकडे रिफरआर्डरा पोटीं ठेऊन करावे व मी जे हशील काढून इच्छा आपली पुरवर करून घेतली ती सर्व व्याख्या कळवावी ह्मणजे त्यास योग्य विचार केल्याची तृप्ति होईल. तारीख २ माहे आगटोंबर सन १८५२ नंबर ७३२ चा आर्डर इनामी कमिशनर यांस--

गणपतरावबापू यांचे दत्तकपुत्र परशरामराव यांचे नांवें जातीची तैनात चालू होती त्या सनदेंतील मजकूर पुढीलप्रमाणें " यादी कंपनी सरकारांतून अजम परशराम गणपतराव तासगांवकर यांस जातीचे तैनात सनद करून दिल्हे सु॥ सन आशरीन मयातैन व अलफ फसली सन १२२९ कुल रुपये ४०००० चाळीस हजार. "

३०००० जात तैनात;
८००० अमणापूर पैकीं तिसरे हिश्शाचे.
२००० तासगांव गणपतीचे नैवेद्य व चौघड्याकरितां.

एकूण ४०००० रुपये.

हलीं सदरहू रकमेपैकीं फक्त २००० दोन हजार रुपये श्रीमंत दादासाहेब पटवर्धन तासगांवकर यांना सरकाराकडून मिळत आहेत. परशरामभाऊ गणपतराव हे सन १८४८त वारले. त्यावेळीं यांचें कुटुंब श्रीमंत रमाबाईसाहेब गरोदर होत्या. श्री. रमाबाईसाहेब पटवर्धन

तासगांवकर यांनीं ता. ३१ मार्च सन १८५३ मध्यें कोर्ट ऑफ डायरेक्टकडे पाठविलेल्या यादींतील कांहीं उतारे:—

" सन १८४८ ता. ८ जून रोजीं परशरामराव गणपतराव वारले नंतर ता. २४ जून १८४८ रोजीं रमाबाईसाहेब यांनीं पो. ए. इन्चार्ज-न्यारिटी कोल्हापूर याजकडे मी अदमासे महिना दीड महिन्याची गरोदर आहें असें कळविलें. पो. ए. यानें एक युरोपियनबाई पाठविली. त्या बाईनें तासगांवचे मामलेदारासमक्ष परीक्षा करून श्रीमंत रमाबाईसाहेब गरोदर असल्याबद्दल पो. ए. कडे तावडतोब कळविलें. असि० पो. ए. अंडरसन यांना बाईसाहेब यांनीं तुह्मी आपल्या बायकोसह येऊन मला भेटावें व खात्री करून घ्यावी अशा अर्थाचीं पत्रें वेळोवेळीं लिहिलीं होतीं. असि. पो. ए. मॉनसनसाहेब यांनीं बाईसाहेब गरोदर असल्याची आपली खात्री करून घेऊन, मामलेदार व युरोपियन बाईकडून सुद्धां खात्री करून घेतली व सन १८४९ मार्च ता. २।३ चे सुमारास साहेब तासगांवाहून साताऱ्यास गेले.

मी प्रसूत होण्याचे पूर्वीपासूनच कडेकोट पोलिस बंदोबस्त त्या युरोपियनबाईनें व मामलेदारानें ठेविला होता. श्रीपरमेश्वर कृपेनें सन १८४९ मार्च तारीख ५ च्या पहाटे तीन वाजण्याचे सुमारास माझे पोटांत दुखूं लागलें आणि पहाटे ५ वाजतां मला पुत्ररत्न झालें. असि. पो. ए. मॉनसनसाहेबांचे शिरस्तेदार भिकाजी पांडुरंग यांनीं साहेबबहादुरास बाईसाहेब यांस पुत्ररत्न झाल्याचें कळविलें. नंतर गांवांत हत्तीवरून साखरा वाटल्या आणि सरदार भाऊबंद व सरकारांतही साखरा पाठविल्या. "

नंतर थोडेच दिवसांत सरकारांनीं श्रीमंत रमाबाईसाहेबास कळविलें कीं, तुमचा मुलगा बेकायदेशीर आहे. असें कळवून सरकारानें तासगांव संस्थान तावडतोब आपले ताब्यांत घेतलें आणि बऱ्याच वर्षांनीं सन १८६३ त संस्थान इंग्रजी राज्यांत सामील केलें.

सरकारानें श्रीमंत रमाबाईसाहेब यांना झालेला मुलगा बेकायदे-

शीर आहे हें जें ठरविलें तें कायद्यानें कायदेशीर तर ठरविलें नाहींच. जसें बाईसाहेबांनीं वेळोवेळीं सरकारांत आपण गरोदर असल्याचें कळविलें; तसें बाईसाहेब गरोदर नसल्याबद्दल त्या प्रसूत होईपावेतों सरकारांनीं ज्याअर्थीं जाहीर केलें नाहीं, त्याअर्थीं बाईसाहेब गरोदर असल्याबद्दल सरकाराची पूर्ण खात्री झाल्याचें सिद्ध होत आहे. बाईसाहेब प्रसूत होण्याचे पूर्वींच जर कडेकोट पोलिस बंदोबस्त ठेविला होता तर सदरहु मुलगा बेकायदेशीर कसा ठरतो ! त्याच वेळीं ह्मणजे प्रसूत होण्याचे सुमारास जर सरकारांनीं योग्य पंचाचे देखरेखीखालीं प्रसिद्धपणें बाईसाहेबास ठेविलें असतें, तर सरकारानें योग्य कर्तव्य बजाविलें असें कोणींही ह्मटलें असतें. सरकारानें उघडपणें न्यायकोर्टांत जर कायदेशीर पुराव्यानें सदरहू मुलगा बेकायदेशीर ठरविला असता तर योग्य न्यायच झाला असें सर्वतोपरीं झालें असतें. परंतु सरकारानें इतक्या गुप्तपणें हें कृत्य कां केलें ? निदान परशरामभाऊंच्या खास घराशीं तरी असें वर्तन सरकारानें करणें योग्य नव्हतें. सरकारानें या तासगांव प्रकरणीं अत्यंत अन्यायाचें वर्तन केलें आहे असें ह्मटल्यावांचून रहावत नाहीं.

तासगांवकर पटवर्धनांचे भाऊबंद श्रीमंत कै० सरदार बापूसाहेब कुरुंदवाडकर यांनीं तासगांवच्या प्रकरणासंबंधीं काढलेले उद्गार "पो. ए. यांणीं तासगांवकर बाईसाहेबापाशीं एक मडमसाहेबाची योजना केली. त्या मडमसाहेब तासगांवकर बाईसाहेबापाशीं असून, बाईसाहेबांनीं आपण गरोदर असल्याचा बहाना केला आहे; असें बाईसाहेब प्रसून होऊन पुत्र होईपर्यंत अगदीं कोणापाशीं सांगितलें नाहीं. व सरकारचे अधिकारी यांजकडून बाईसाहेब गरोदर आहेत कीं नाहीं, याची त्यांच्या गरभारपणीं कांहीं चवकशी केली नाहीं. बाईसाहेबापाशीं असलेल्या मडमसाहेब ही खबर गुप्तपणें पोलिटिकल एजंट यांस मात्र देत होत्या, असें ह्मणतात. पुढें बाईसाहेब प्रसूत होऊन पुत्र जाहला. त्याजबद्दल तासगांवाहून सर्व पटवर्धनांस शर्करा

वगैरे आली; व आलेल्या मनुष्यास बक्षिस दिलें. सुमारें आठ दिवसपर्यंत प्रसूत होण्यांत कांहीं कपट आहे असें कोणाच्या कानांवर आलें नाहीं. सर्व पटवर्धनांनीं धर्माप्रमाणें जाताशौच वगैरे धरिलें; नंतर पो. ए. इन्व्हर्‍यारिटीसाहेब यांणीं सरकारचे हुकमानें, बाईसाहेब यांणीं आपण प्रसूत न होतां दुसऱ्याचा मुलगा आणून आपण प्रसूत जाल्याचें ढोंग केलें; ही सरकारांशीं मोठी प्रतरणा केली, व सर्व पटवर्धन घराण्यांस काळोखी लाविली. हा मुलगा खोटा असल्यामुळें तासगांव संस्थानचा अधिकारी होणार नाहीं, व बाईसाहेबांनीं सरकारांशीं कपटाची वहिवाट केल्यामुळें यांस कांहीं पेन्शनही मिळणार नाहीं. असा ठराव करून दौलत खालसा केली. आतां मी अथवा दुसरे कोणीही पटवर्धन बाईसाहेबांनीं खोटें व कपटाचें कृत्य केलें नसेल असें ह्मणत नाहीं; आणि जर केलें असेल तर सरकारचे हुकुमानें एजंटानें ठराव केल्याप्रमाणें सर्व पटवर्धनास काळोखी लागण्यासारखें व इंग्रज सरकारांशीं कपट केलें, हें अगदीं गैर केलें. यांत कांहीं संशय नाहीं. परंतु बाईसाहेबावर हे चार्ज आले, तेव्हांच कांहीं पटवर्धन कुलांतील गृहस्थांस घेऊन बाईसाहेब गरोदर होत्या तेव्हांच अगर प्रसूत जाहल्यानंतर उघडे रीतीनें कमेटी नेमून चवकशी करते तर, सर्वांची खात्री जाहली असती. पण तसें कांहीं न होतां, हा सर्व चवकशीचा प्रकार अतिशय गुप्त रीतीनें चालविल्यामुळें त्यांच्या खोटेपणाबद्दल लोकांस भरंवसा वाटत नाहीं."

वरील उद्गारावरून त्या वेळच्या सर्व पटवर्धन सरदारास सरकारानें तासगांवासंबंधीं केलेल्या अन्यायी कृत्याचा तिटकारा आल्याचें दिसतें. पो. एजंटानें "पटवर्धन घराण्यास काळोखी लाविली." वगैरे जे शब्द वापरले ते गैर आहेत. सरकारानें श्री० रमाबाईसाहेबावर कारण नसतां भयंकर प्रसंग आणिला होता. बिचारी बायको माणूस काय करणार? तसेंच त्या पुत्रासह त्यांनीं

दिवस कंठिले. बाईसाहेबांचे पुत्र गणपतराव* हे पुढें वयांत आल्यावर आपणासंबंधीं सरकारानें भयंकर कल्पना केली हे मनांत आणून विरक्त स्थितींत राहिले होते. हे सन १८९६ त वारले. यांना दोन पुत्र झाले. पहिले परशुरामराव वयाचे तिसरे वर्षींच वारले. दुसरे पुत्र विनायकराव बाबासाहेब हल्लीं आहेत. बाबासाहेबांच्या मातोश्री श्री० सिद्धीबाईसाहेब यांनीं बाबासाहेबास लहानाचे थोर करून सुशिक्षित केलें आहे. श्री० बाबासाहेबांनीं अत्यंत परिश्रम करून स्वतःचे हक्काचे उत्पन्नाची बाब वाढवून इनाम गांवें व जमिनी सोडवून घेतल्या. आणि ते त्याच खटपटींत आहेत. श्री० बाबासाहेब जात्याच विशेष भाविक आहेत. यांना एक पुत्र आहे. त्यांचें नांव परशुरामरावभाऊसाहेब होय. श्री०बाबासाहेबांनीं " त्रिजन्म परिक्षण" नांवाचें नाटक सन १९१७ त छापिलें आहे. यांनीं आपलें उपाध्येपणाचें उत्पन्न सांगलीकरावर काम चालवून अदमासें ९० वर्षांचें वसूल केलें. तासगांवकरासंबंधीं आज तारखेपर्यंतचें साद्यंत वर्णन प्रसिद्ध केल्यास एक निराळेंच उपयुक्त पुस्तक होईल. श्री० बाबासाहेबांनीं ब्रह्मीभूत हरिभटबावांच्या व श्री गणपतीच्या फोटोचा खर्च देऊन लेखकासही थोडीशीं मदत केली आहे. श्री० बाबासाहेबांनीं खुद्द विलायतसरकाराकडे व्यवस्थेशीर खटपट केल्यास विलायतसरकार योग्य चवकशी करून तासगांव संस्थान श्री० बाबासाहेबांचे नांवें करून अन्यायाचें कृत्य खोडून काढतील अशी या लेखकास फार आशा आहे.

---

* गणपतरावांचें नित्य नेसण्याचें धोतर थोडें पाण्यांत भिजवून तें धोतर पिळून तें पाणी गरोदर स्त्रीस पोटांत दुखूं लागतांच पिण्यास दिल्यास ती सुखरूप प्रसूत होते. ही ऐकिव माहिती नव्हे प्रत्यक्ष या लेखकानें पाहिलें आहे.

# ७ शेडसाळकर घराणें.

हरिभटबावा यांचे सातवे पुत्र भास्करपंत होत. भास्करपंतास सहा पुत्र होते. हे सर्वच पराक्रमी होते. त्यांत विशेषतः धोंडोबा, विनोबा, हरबा व रामचंद्र यांनीं जे पराक्रम केले त्यासंबंधीं साधारण माहिती मागील ऐतिहासिक प्रकरणांत दिलीच आहे. विनोबा यांचे पणतू बळवंतराव विनायक यांनीं भास्कर हरि व त्यांचे पुत्र सहा यांचेसंबंधीं साद्यंत ऐतिहासिक माहितीसह एक लेखी पुस्तक तयार केलें आहे. तें पुस्तकही लवकरच प्रसिद्ध होणार आहे. श्रीयुत बळवंतराव विनायक ऊर्फ बाळासाहेब पटवर्धन पेनशनर मु॥ बडोदें यांनीं मला पत्रानें कळविल्यावरून, भास्कर हरीच्या वंशासंबंधानें मला विशेष लिहिण्याचें आतां प्रयोजन उरलें नाहीं; फक्त भास्कर हरीच्या वंशापैकीं कोण कोठें आहेत तेवढीच माहिती पुढें देत आहे.

धोंडो भास्करचे वंशज गणपतरावदादासाहेब शेडसाळकर हे नुकतेच वारल्यामुळें वंश संपला. आतां विनोबा भास्करचे वंशापैकीं, भालचंद्र चिंतामण हे कॉलेज स्टूडंट आहेत. केशवराव गोविंद हे सांगली संस्थानांत हल्लीं दोदवाडचे वहिवाटदाराचे जागेवर आहेत. माधवराव हरिहर हे मिरज संस्थानांत मामलेदार होते; हल्लीं पेनशनर असून मिरज येथें आपल्या घरींच असतात. बळवंतराव आबाजी हे बडोदें संस्थानांत मोठ्या हुद्याचे जागेवर होते. हल्लीं यांना सवाशें रुपये पेनशन झाली असून हे बहुतेक बडोद्यासच रहात असतात. हे आपल्या घराण्यासंबंधीं वर सांगितल्याप्रमाणें लवकरच पुस्तक छापविणार आहेत. बळवंतराव आबाजी ऊर्फ बाळासाहेब हे आपल्या घराण्याचे पूर्ण अभिमानी असून, मोठे निग्रही आहेत. पुरुषोत्तम नारायण हे सांगली येथें आहेत.

हरबाआणांच्या वंशजांपैकीं गंगाधरराव शिवराव, हरिपंत गंगाधर व भास्करराव गंगाधर हे हरबाआण्णांनीं बांधिलेल्याच वाड्यांत मिरज

येथें आहेत. भास्करराव हरिहर व निळकंठराव भास्कर हेही मिरज येथेंच आहेत.

सदोबा भास्कर याचा नष्टांश. वासुदेव भास्कर याचे वंशापैकीं, विनायक निळकंठ हे नोकरीवर आहेत. धोंडो निळकंठ हे गणेशवाडी येथें शेती करून असतात. हरिहर धोंडो, मोरेश्वर धोंडो व वासुदेव धोंडो हे नोकरी व शेती करितात.

रामचंद्र भास्कर याचे वंशापैकीं गोविंदराव गोपाळ हे मिरज येथें वकीली करीत आहेत. वासुदेवराव गोपाळ हे बी. ए. एल्. एल्. बी. असून नाशीक येथें वकीली करीत आहेत. हरिपंत गोपाळ हे इंजिनीयर खात्यांत नोकर आहेत.

---

हरिभटबावांचे वंशांतील अदमासें ३०।३२ पुरुष, स्वामिकार्याकरितां शत्रूंशीं रणांगणांत झुंजत होते. पैकीं २१ पुरुष जखमी झाले होते व या एकविसांत सात पुरुष रणक्षेत्रीं ठार झाले. कोणास कोणत्या लढाईंत अंगावर कोठें जखमा झाल्या वगैरे वर्णन ज्यांना वाचावयाचें असेल, त्यांनीं श्रीमंत कै० चिंतामणरावआपासाहेब यांनीं तयार केलेली ऐ. ले. संग्रहांतील पृष्ट ३०४९ ची यादी नं. २१९३ पहावी.

शत्रूवर चाल करून जाणें, त्याला जेरीस आणणें, त्याला तह करविण्यास भाग पाडणें अगर त्याचा पूर्ण पराभव करणें; हें सर्व सेनाध्यक्ष, सेनानायक किंवा सेनापती यांच्या धूर्ततेवर अवलंबून असतें. लेखणीबहादुर अधिकाराच्या जोरांत वाटेल तें अनुमान ठरवून अमूकच तुम्ही करावें असें हुकूम करितात. अशा हुकमापासून रणधुरंधर पराक्रमी पुरुषांच्या अंतःकरणास अतीशय दुःख होईल यांत संशयच नाहीं. टिपूची नरगुंदावर स्वारी झाली त्या वेळीं परशुरामभाऊंस कारभारी नाना फडणविसानें लिहिलें " शत्रूनें नरगुंदचा वेढा उठविला, तुम्हांस ज्या कार्यावर पाठविलें तें कार्य झालें;

त्यापक्षीं या उपर शत्रूच्या वाटेस न जातां तुमची फौज पुढें गेली आहे तिनें रामदुर्गासन्न तूर्त मुक्काम करून रहावें. उतावळपणानें शत्रूचे सरदार लढाईस येतील तरी सुद्धां तुह्मी सरकारचा आब रक्षून धीराधीरानें मागें हटावें, पण लढाई करूं नये! शत्रूच्या वकिलांनीं येथें तह ठरविल्यासारखा केला आहे, तथापि त्याचा विश्वास येत नाहीं. याकरितां काळोपंत व व्यंकटराव व इतर ब्राह्मण-मंडळी कुटुंबासुद्धां नरगुंदच्या किल्ल्यांत आहेत त्यांस काढून आणावें. काळोपंतांनीं लढाईची शर्थ केली. या उपर त्यांनीं तेथें राहूं नये व कोणास ठेवूंही नये. फक्त एखादा लढाऊ सरदार व हजार दोन हजार गडकरी काय असतील तेवढ्यांनीं मात्र किल्ल्यावर रहावें." टिपूचा मनापासून द्वेष करणाऱ्या व नरगुंदकराविषयीं कळकळ बाळगणाऱ्या परशरामभाऊंसारख्या पराक्रमी सरदाराच्या मनास कारभाऱ्यांचीं वरील अर्थाचीं पत्रें (हुकूम) येऊं लागल्यामुळें अतिशय ताप झाला. परशरामभाऊसारख्या शूर-वीरास तर मरणप्राय दुःख झालें असेल यांत शंकाच नाहीं. शत्रू अंगावर चालून आला असतां (पाश्चात्य पद्धतीप्रमाणें) व्यवस्थेशीर मागें हटावें असा कारभाऱ्यांचा हुकूम! त्यामुळें वीर पुरुषास उचित कर्तव्यापासून परांङ्मुख व्हावें लागलें, या वेळीं भाऊसाहेबांनीं आपल्याजवळ असलेल्या फौजेनिशीं शत्रू बुराणउद्दिनावर चालून जाऊन त्याला तुंगभद्रेपार सहज हांकून दिलें असतें. कारभाऱ्यांस भाऊसाहेबांचें उत्तरः—"आम्हीं मागें हटावें अशी सरकारची आज्ञा होते त्याअर्थी तसें वागणें आह्मांस प्राप्त आहे; पण मागें हटण्यांत आमचा व सरकारचा लौकिक रहाणार नाहीं व हें भित्रेपणाचें धोरण कारभाऱ्यांस पुढें जड जाईल, याबद्दल त्यांचा त्यांनींच विचार करावा!"

फौजेवरील मुख्य अधिकारी शूर असून, लढाई चालू असतां कोणत्या वेळीं काय काय तजवीज करून विजय मिळविला पाहिजे हें जाणणाराही लागतो. ह्मणजे तो विशेष चतुर असावा व शूरही

असावा. फक्त शूरच असून तो उपयोगीं नाहीं. दोन्ही गुण ज्या सेनापतीचे अंगीं असतात त्यांस नेहमीं जयच मिळणार. पेशवाईच्या कारकीर्दींत कांहीं कांहीं लढायांत विजय न मिळण्याचें मुख्य कारण कारभाऱ्यांचा अदूरदर्शीपणा होय. बाळाजी विश्वनाथ, बाजीराव बल्लाळ, चिमणाजी बल्लाळ, बाळाजी बाजीराव व माधवराव बल्लाळ यांच्या कारकीर्दींत कारभाऱ्याचें प्रस्थ नव्हतें. पुढें नारायणराव बल्लाळ, सवाई माधवराव व बाजीराव रघुनाथ यांच्या कारकीर्दींत कारभाऱ्याचें प्रस्थ विशेष झाल्यामुळें पेशवाई लयास गेली. कारभाऱ्यांचे कारकीर्दींत झालेले पेशवे नामधारी असल्यामुळें, कारभाऱ्यांचें प्राबल्य जास्त झालें व हे कारभारी जे हुकूम फर्मावतील ते सर्व सरदारांना मान्य करणें भाग पडे ! !

वर नमूद केल्याप्रमाणें ह्या पटवर्धन घराण्यांतील कोणकोणते पुरुष कोणकोणत्या लढाईंत ठार झाले ते देतोंः—

सन १७६५ त नारायणराव कृष्ण पटवर्धन हे हैदरनाईकाचे लढाईंत ठार झाले.

" १७७० त महादेवराव कृष्ण पटवर्धन हे धारवाडच्या लढाईंत ठार झालें.

" १७७१ त निळकंठराव त्रिंबक पटवर्धन हे हैदरावरील तिसऱ्या स्वारींत ठार झाले.

" १७७७ त कोन्हेरराव त्रिंबक पटवर्धन हे सांवशीच्या लढाईंत ठार झाले.

" १७९० त जनार्दन मेघःशाम पटवर्धन हे धारवाडच्या लढाईंत मानेंत गोळी लागून ठार झाले.

" १७९५ त विठ्ठलराव धोंडदेव पटवर्धन हे खडर्याच्या लढाईंत तमंच्याची गोळी लागून ठार झाले.

" १७९९ त परशराम रामचंद्र ऊर्फ भाऊसाहेब पटवर्धन ह्यांना पट्टणकुडीचे लढाईंत मूर्च्छित होऊन पडले असतां

शत्रूंकडील एकजण आपल्या घोडयावर घेऊन राजाकडे नेत असतां एका गायकवाड आडनांवाच्या नराधमानें ठार करून तुकडे तुकडे केले.

" १७४९ त रामचंद्रपंत हरि पटवर्धन हे हिंदुस्थानांतील स्वारीवर असतां विजापूर येथें मरण पावले.

" १७७१ त गोपाळराव गोविंद पटवर्धन हे हैदरावरील तिसऱ्या स्वारींतून उदराच्या विकारामुळें घरीं आले तों ताबडतोब वारले.

" १७७८ त वामनराव गोविंद पटवर्धन हे खानदेशांत लढाईवर असतां वारले.

" १७७७ त पांडुरंगराव गोविंद पटवर्धन हे शत्रूचे कैदेंत असतां अतिसाराच्या विकारानें वारले.

" १७६५ त कृष्णंभट बाप्पाजी पटवर्धन हे पुत्रशोकानें वारले.

" १७७१ त गोविंद हरि पटवर्धन हे पुत्रशोकानें वारले.

रामचंद्रपंतआपा परशराम; हरिहरराव परशराम; माधवराव परशराम; गणपतराव परशराम; पुरुषोत्तम कृष्ण; लक्ष्मणराव कृष्ण; सदाशिवराव नारायण; श्रीपतराव मोरेश्वर; भास्कर हरि; धोंडो भास्कर; विनोबा भास्कर; रामचंद्र भास्कर; रघुनाथराव निळकंठ; शिवराव निळकंठ; गणपतराव कोन्हेरराव व चिंतामणराव पांडुरंग. या पैकीं बहुतेकांना लढाईवर असतां जखमा झाल्या होत्या. हैदरावरील स्वाऱ्या, टिपूवरील स्वाऱ्या, इंग्रजांबरोबर लढाई, हिंदुस्थानावरील स्वाऱ्या, करवीरावरील लढाया वगैरे कित्येक लढाईंत वरील पटवर्धन वीरांनीं पराक्रम करून आपलें नांव अजरामर केलें.

कोतवडेकर पटवर्धन घराणें कोंकणांतील इतर गांवच्या पटवर्धन घराण्यापेक्षां विस्तीर्ण असून शूर घराणें आहे. हरिभटबावा यांचे वडील बाळंभट व आजे हरिभट. हरिभटबावास चुलते दोन; एक कृष्णंभट व दुसरे रघुनाथभट. रघुनाथभटाचे वंशांतलि वाजीपंत पट-

वर्धन, हे सातारारोड स्टेशनास लागून असलेल्या डोंगरी ( नांदगीर ) किल्ल्याचे किल्लेदार होते. बाजीपंत पटवर्धन यांचे वंशज रा. येशवंतराव रावजी पटवर्धन बी. ए. एल्. एल्. बी. वकील हे सातारा येथें आहेत. बावांचे बंधू दोन; एक केशवभट व दुसरे विठ्ठलभट. केशवभटाचे वंशज भिलवडीकर पटवर्धन व विठ्ठलभटाचे वंशज यादवाकर पटवर्धन ह्मणून प्रसिद्ध आहेत. दुसऱ्या प्रकरणाचे आरंभीं हरिभटबावांच्या पुत्रासह मूळ वंशवृक्ष दिला आहे.

या पुस्तकांत हरिभटबावापासून आजपर्यंतचा वंशवृक्ष देण्याचे ऐवजीं एक नवीन तऱ्हेची जंत्री तयार करून, या पुस्तकास जोडली आहे. वंशवृक्षापेक्षां या जंत्रींत विशेष माहिती दिली आहे. या जंत्रींत हरिभटबावापासून ते आजमित्तीस हयात असलेल्या लहान मुलांसुद्धां सर्वांचीं नांवें दिलीं आहेत. कोणते पुरुष कोणत्या सनांत जन्मले व मयत झाले ते सन, पुरुषांच्या बायकांचीं नांवें, त्यांच्या माहेरचीं आडनांवें व गांवेंहीं मिळालीं तितकीं दिलीं आहेत. जंत्रींत ज्या नांवांवर कांहींच चिन्ह नाहीं ते सर्व मयत समजावेत. ज्या नांवांवर ( ॥ ) कौंसांतील हें चिन्ह आहे ते सर्व सज्ञान समजावेंत व ज्या नांवावर ( ❋ ) कौंसांतील हें चिन्ह आहे ते सर्व अज्ञान समजावेत.

श्री० अण्णासाहेब कुरुंदवाडकर सीनीयर, श्री० आपासाहेब सांगलीकर, श्री० बाबासाहेब बुदगांकर, श्री० भाऊसाहेब जमखंडीकर व श्री० नानासाहेब कुरुंदवाडकर यांच्या आगाऊ सहाय्यामुळेंच उत्तेजन मिळून, अशा महर्गतेच्या अडचणीकडे न पहातां संस्थानिक पटवर्धन घराण्याचा इतिहास मीं छापून प्रसिद्ध केला. प्रत्येक वस्तूची व त्यांत विशेष कागदाची फारच महागाई असल्यामुळें, या कामीं अतीशय खर्च करावा लागला. ह्मणून पुण्यपुरुष हरिभटबावा पटवर्धन यांच्या वंशजांनीं व सर्व संस्थानिकांनीं आपापल्यापरी मला द्रव्याची योग्य मदत करावी अशी मी विनंती करितों.

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु. ॥

## हयात पुरुषांचा संबंध, मूळ पुरुषापर्यंत दाखविणारी जंत्री.

| नं० | पुरुषाचें पूर्ण नांव. | पत्नीचें नांव, माहेरचें आडनांव व गांव | जन्म सन | मृत्यू सन |
|---|---|---|---|---|
| १ | ब्रह्मीभूत हरिभट्ट बाळंभट्ट पटवर्धन. | लक्ष्मीबाई ( शेंडे. पुळें. ) | १६५५ | १७५० |
| २ | १ कृष्णंभट्ट हरिभट्ट पटवर्धन. | १ राधाबाई लेले. २ दुर्गाबाई भिडे मागकापूरकर. | | १७६५ |
| ३ | २ बाळंभट्ट " " | काशीबाई, सखंभट जोशी यांची कन्या. | | |
| ४ | ३ त्रिंबकपंत " " | आकाबाई. | | १७७१ |
| ५ | ४ गोविंदपंत " " | सत्यभामाबाई. | | १७७१ |
| ६ | ५ महादेव " " | | | |
| ७ | ६ रामचंद्रपंत " " | जानकीबाई ( लिमये–खाजगीवाले. ) पुणें. | | १७४९ |
| ८ | ७ भास्करपंत " " | सावित्रीबाई ( गोखले. ) | | १७९९ |

## मौजे चळ-आंब व मंगळवेढें घराणें.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | १ नारायणराव कृष्णंभट्ट पटवर्धन. | १ रखमाबाई, २ वाराणशीबाई. | १७२६ | १७६५ |
| १० | २ पुरुषोत्तमदाजी " " | १ गोपिकाबाई, २ कृष्णाबाई ( [illegible] ) | १७२९ | १७७६ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ११ | [illegible] मेघःशामबापू " | " | | २ आनंदीबाई. | १७३० | |
| १२ | ३ जनार्दनपंत " | " | | | | |
| १३ | [illegible] महादेवराव " | " | | | | १७७० |
| १४ | [illegible] लक्ष्मणराव " | " | | | | |
| १५ | १ कृष्णाजी नारायण पटवर्धन. | | दत्तक | गोपिकाबाई ( ह्मसकर ) | | |
| १६ | २ सदाशिव " | " | द. | १ पार्वतीबाई २ भागिर्थीबाई. ( काळे ) ( पाटणकर ) | | |
| १७ | १ नारायण सदाशिव पटवर्धन. | | | | | |
| १८ | २ पांडुरंगराव " | " | | रखमाबाई. | | |
| १९ | ३ रामचंद्रराव " | " | | | | |
| २० | ४ नारायणराव " | " | | | | |
| २१ | ५ जनार्दनपंत. " | " | | | | |
| २२ | १ कृष्णाजी पांडुरंग पटवर्धन | | | | | |
| २३ | २ वासुदेव " | " | | | | |
| २४ | ३ सदाशिवराव " | " | | पार्वतीबाई, राधाबाई. | | |
| २५ | ४ काशीनाथपंत " | " | | | | १९०४ |
| २६ | १ नारायण सदाशिव " | | | भागिरथीबाई ( दणगे ) | | १९०४ |
| २७ | २ माधवराव " | " | | ॥ लक्ष्मीबाई ( करवे ) | | १९१८ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २८ | १ * सदाशिव माधवराव | " | | | | |
| २९ | २ * नारायण " | " | | | | |
| ३० | १ ॥ पांडुरंगराव काशीनाथ | " | | | | |
| ३१ | १ * काशीनाथ पांडुरंग | " | | | १९१८ | |
| ३२ | १ हरिहरराव पुरुषोत्तम | " | | राधाबाई | १७६२ | |
| ३३ | २ विठ्ठलराव " | " | | | | |
| ३४ | १ विश्वनाथ हरिहर | " | | उमाबाई, मुजुमदार सांगली | | |
| ३५ | १ गणपतराव विश्वनाथ | " | | सत्यभामा केळकर, कुलगुड | | १८६९ |
| ३६ | १ विश्वनाथराव गणपतराव | " | | १ गंगाबाई, २ सिताबाई जोग | | |
| ३७ | १ ॥ गणपतराव विश्वनाथ | " | | सौ. ॥ येश्वदाबाई बरवे वडगांव | १८८४ | |
| ३८ | १ * बाळकृष्ण गणपतराव | " | | | १९०६ | |
| ३९ | २ * पुरुषोत्तम " | " | | | १९०८ | |
| ४० | ३ * हरिहर " | " | | | १९१२ | |
| ४१ | ४ * विश्वनाथ " | " | | | १९१४ | |
| ४२ | १ पुरुषोत्तम विठ्ठल | " | | | | |
| ४३ | १ रामचंद्र पुरुषोत्तम | " | द० | | | |
| ४४ | १ दत्तात्रय रामचंद्र | " | | | | |
| ४५ | २ ॥ पांडुरंगपंत " | " | | | | |
| ४६ | १ * विनायक दत्तात्रय | " | | | | |
| ४७ | २ * कृष्ण " | " | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४८ | १ | [illegible]षोत्तम पाडुरंग | " | | | | |
| ४९ | २ | [illegible] " | " | | | | |
| ५० | ३ | [illegible] " | " | | | | |
| ५१ | ४ | [illegible] " | " | | | | |
| ५२ | १ | [illegible] मेघःशाम | " | | रुक्मीणीबाई | | |
| ५३ | १ | नारायणराव कृष्ण | " | | लक्ष्मिबाई, लेले. | १८०८ | |
| ५४ | १ | हरिहरराव नारायण | " | | राधाबाई लागू . | १८५० | |
| ५५ | १ | नारायणराव हरिहर | " | | सौ०लक्ष्मी खासगीवाले. सौ.रुक्मिणी; | १८७८ | १९१८ |
| | | द० (भिलवडीकरपैकी) | | | गोळे. ॥ येश्वदाबाई, परचुरे. | | |
| ५६ | १ | * हरिहरराव नारायण | " | | | १९०३ | |
| ५७ | २ | * पुरुषोत्तमराव " | " | | | १९१४ | |
| ५८ | १ | दामोदर माधवराव | " | | आंबाबाई | | |
| ५९ | २ | गोपाळराव " | " | द० | सुंद्राबाई | | |
| ६० | १ | माधवराव गोपाळराव | " | द० | सौ. आंबाबाई | १८३२ | १९०३ |
| ६१ | १ | ॥ दामोदरपंत माधवराव | " | | सौ. ॥ लक्ष्मीबाई, मनोहर सांगली. | १८५५ | |
| ६२ | १ | * माधवराव दामोदर | " | | | १९०७ | |
| ६३ | १ | विष्णु लक्ष्मणराव | " | | | | |
| ६४ | २ | गणपतराव " | " | | | | |
| ६५ | १ | लक्ष्मणराव विष्णु | " | | | | |
| ६६ | १ | विठ्ठलराव लक्ष्मण | " | | ॥ रखमाबाई | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६७ | १ | ॥ लक्ष्मणराव विठ्ठल दत्तक " | | | |
| ६८ | १ | पांडुरंग गणपतराव " | राधाबाई | | |
| ६९ | १ | रामचंद्रराव पांडुरंग " | जानकीबाई | | |
| ७० | १ | हरिहरराव रामचंद्र " | जानकीबाई देशमुख, पुणें. | | |
| ७१ | १ | ॥ गणपतराव हरिहर " | सौ० ॥ राधाबाई, जोशीराव. | | |
| ७२ | १ | * पांडुरंग गणपतराव " | | | |

## मिरज किल्ल्यांतील घराणें.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७३ | १ | मोरेश्वर बाळंभट्ट पटवर्धन | | | |
| ७४ | १ | श्रीपतराव मोरो " | रमाबाई व ताई. | | |
| ७५ | १ | मोरेश्वर श्रीपतराव " | काकूबाई रानडे, रामदुर्ग. | | |
| ७६ | १ | बळवंतराव मोरेश्वर " | बहिणाबाई लेले, सावंतवाडी. | | |
| ७७ | १ | मोरोपंत बळवंत " | लक्ष्मीबाई घोरपडे, इचलकरंजी. | | १८८१ |
| ७८ | २ | श्रीपतराव " " द. गे. | | | |
| ७९ | ३ | गणपतराव " " | १ सरस्वतीबाई भानू व चाफेकर. | | १८७६ |
| ८० | ४ | गोविंदराव " " | सत्यभामाबाई काळे, तासगांव. | १८४९ | |
| ८१ | ५ | कृष्णराव " " | ॥ राधाबाई लिमये, सांगली. | | १८८८ |
| ८२ | १ | केशव उर्फ श्रीपतराव मोरो " द. | रमाबाई फडके, जमखंडी. | १८५६ | १९१५ |
| ८३ | १ | * नारायणराव श्रीपतराव " | | १९१२ | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८४ | १ निळकंठराव गणपतराव | " | पार्वतीबाई गोखले | | १८८४ |
| ८५ | २ त्रिंबकराव " | " द. गे. | | | |
| ८६ | १ बळवंतराव निळकंठ | " | २ रुक्मिणी, परांजपे व रानडे | १८६५ | १९१० |
| ८७ | १ ॥ निळकंठराव बळवंत | " | ॥ सौ० उमाबाई करंदीकर सातारा | १८८८ | |
| ८८ | २ * गणपतराव " | " | | १९०२ | |
| ८९ | ३ * रामचंद्रराव " | " | | १९०८ | |
| ९० | १ * चिंतामण निळकंठराव | " | | १९०८ | |
| ९१ | २ * भालचंद्र " | " | | १९१७ | |
| ९२ | १ ॥ हरिहरराव गोविंद | " | सौ. गंगाबाई चितळे, कुरुंदवाड | १८९३ | |
| ९३ | २ केशवराव " | " द. गे. | | | |
| ९४ | १ माधवराव हरिहर | " | ॥ सिताबाई गोळे, मिरज | १८७२ | १९१४ |
| ९५ | १ * कृष्णराव माधव | " | | १८९८ | |
| ९६ | २ * त्रिंबकराव " | " | | | |

## कुरुंदवाड, कागवाड व वाडी घराणें.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९७ | १ निळकंठराव त्रिंबक पटवर्धन | | | १७२६ | १७७१ |
| ९८ | २ कोन्हेरराव " | " | | १७३७ | १७७७ |
| ९९ | १ रघुनाथराव निळकंठ | " | | १७५० | १८०१ |
| १०० | २ शिवराव " | " | | | १८१८ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १०१ | | त्रिंबकराव रघुनाथ | " | | | | |
| १०२ | | केशवराव त्रिंबक | " | | लक्ष्मीबाई | | १८२७ |
| १०३ | | रघुनाथराव केशव | " | | सिताबाई भिडे, वाटेगांव | १८१२ | १८७५ |
| १०४ | | हरिहरराव " | " | | | १८१४ | १८५१ |
| १०५ | | विनायकराव " | " | | गंगाबाई गोळे. | १८२२ | १८७६ |
| १०६ | | त्रिंबकराव " | " | | | १८२३ | १८६८ |
| १०७ | | चिंतामणराव रघुनाथ | " | | सौ. लक्ष्मीबाई परांजपे, परिंच,<br>लक्ष्मीबाई भागवत, रामापूर. | १८४९ | १९०८ |
| १०८ | | ॥ भालचंद्रराव चिंतामण | " | | सौ. ॥ यशोदाबाई मुजुमदार | १८७३ | |
| १०९ | | ॥ रघुनाथराव " | " | द. गे. | | | |
| ११० | | गणपतराव हरिहर | " | | जानकीबाई चितळे. | १८३७ | |
| १११ | १ | ॥ माधवराव गणपतराव | " | | सौ. सिताबाई परांजपे | १८७५ | |
| ११२ | १ | ॥ गणपतराव माधवराव | " | | सौ. रमाबाई जोग | १८९९ | |
| ११३ | १ | हरिहरराव विनायकराव | " | | सौ. ॥ रमाबाई जोग | १८५१ | |
| ११४ | | ॥ विनायकराव हरिहर | " | | सौ. ॥ गंगाबाई लांगू | १८७७ | |
| ११५ | | ॥ त्रिंबकराव " | " | | सौ. ॥ उमाबाई जोशी, जमखंडी | | |
| ११६ | ३ | ॥ मोरेश्वरराव " | " | | सौ. सरस्वतीबाई फडके | | |
| ११७ | | ॥ निळकंठराव " | " | | सौ. ॥ पार्वतीबाई बिवलकर | | |
| ११८ | ५ | ॥ धुंडीराज " | " | | सौ. ॥ अन्नपूर्णाबाई करवे | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११९ | १ * केशवराव मोरेश्वर " | | | |
| १२० | १ * हरिहरराव निळकंठ " | | | |
| १२१ | १ * चिंतामणराव धुंडीराज " | | | |
| १२२ | १ कृष्णराव शिवराव पटवर्धन | | | १८४० |
| १२३ | २ कोन्हेरराव " " | ‖ राधाबाई लेले, पुणें. | | १८८२ |
| १२४ | १ चिंतामणराव कृष्ण " | | | १८४८ |
| १२५ | २ त्रिंबकराव " " द० गे. | | | |
| १२६ | १ गणपतराव चिंतामण " द. | | | |
| १२७ | १ ‖ चिंतामणराव गणपतराव द. | | | |
| १२८ | १ ‖ विनायकराव चिंतामण " | | | |
| १२९ | २ * गणपतराव " " | | | |
| १३० | १ * शिवराव विनायकराव " | | | |
| १३१ | १ गणपतराव कोन्हेरराव " द. गे. | | | |
| १३२ | २ निळकंठराव " " | ‖ लक्ष्मीबाई थत्ते. | १८५३ | १८८४ |
| १३३ | ३ ‖ विनायकराव " " | ‖ सौ. सगुणाबाई गोखले | १८५८ | |
| १३४ | १ गंगाधरराव निळकंठ " " | ‖ पार्वतीबाई गोळे, मिरज. | १८८३ | १९१४ |
| १३५ | १ * गणपतराव गंगाधर " | | १९०२ | |
| १३६ | १ गणपतराव कोन्हेरराव " | सरस्वतीबाई | | १८२५ |
| १३७ | १ त्रिंबकराव गणपतराव " द० | पार्वतीबाई भावें, रामदुर्ग. | | १८५७ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३८ | १ गणपतराव त्रिंबकराव " द. | ऋद्धीबाई लेले. ॥ सिद्धीबाई जोग. | | १८९१ |
| १३९ | १ ॥ त्रिंबकराव गणपतराव " | सौ० ॥ पार्वतीबाई रास्ते, पुणें. | १८८२ | |
| १४० | १ * गणपतराव त्रिंबकराव " | | १९०६ | |
| १४१ | २ * विनायकराव " " | | १९०८ | |
| १४२ | ३ * रघुनाथराव " " | | १९१७ | |

## सांगली, मिरज व बुदगांव घराणें.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४३ | १ गोपाळराव गोविंदराव पटवर्धन. | लक्ष्मीबाई भिडे, पुणें. | १७२९ | १७७१ |
| १४४ | २ वामनराव " " | | | १७७५ |
| १४५ | ३ पांडुरंगराव " " | | | १७७७ |
| १४६ | ४ गंगाधरराव " " | | | १८०१ |
| १४७ | १ नारायणराव गंगाधर " | | | |
| १४८ | २ माधवराव " " | | | |
| १४९ | ३ गोविंदराव " " | | | |
| १५० | ४ गोपाळराव " " | | | |
| १५१ | १ गणपतराव नारायण " | | | १८३३ |
| १५२ | १ गंगाधरराव गणपतराव " | | | १८६१ |
| १५३ | १ गणपतराव गंगाधर " द. | | | १८७४ |
| १५४ | १ ॥ गंगाधरराव गणपतराव " द. | | १८६६ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५५ | १ ॥ नारायणराव गंगाधरराव " | सौ. ॥ लक्ष्मीबाई आपटे, लिंब. | १८९८ | |
| १५६ | २ ॥ हरिहरराव " " | सौ. ॥ गंगाबाई सहस्रबुद्धे, सांगली. | १९०१ | |
| १५७ | १ लक्ष्मणराव माधवराव पटवर्धन. | | | |
| १५८ | १ हरिहरराव लक्ष्मणराव " | | | |
| १५९ | १ लक्ष्मणराव हरिहरराव " | | | |
| १६० | २ ॥ माधवराव " " द. | | | |
| १६१ | १ * चिंतामणराव माधवराव " | | | |
| १६२ | २ * हरिहरराव " " | | | |
| १६३ | ३ * कृष्णराव " " | | | |
| १६४ | १ चिंतामणराव पांडुरंग पटवर्धन. | | | १८५१ |
| १६५ | १ गणपतराव चिंतामण " | | | १८२६ |
| १६६ | २ धुंडिराज " " | | १८३८ | १९०१ |
| १६७ | १ ॥ चिंतामणराव धुंडिराज " | सौ. ॥ सरस्वतीबाई जोशी, उमरावती. | १८९० | |
| १६८ | १ * माधवराव चिंतामण " | | | |
| १६९ | २ * पांडुरंगराव " " | | | |
| १७० | ३ * गोविंदराव " " | | | |
| १७१ | १ विनायकराव गणपतराव " द. | गंगाबाई | | |
| १७२ | १ गणपतराव विनायकराव " | | | |
| १७३ | २ विठ्ठलराव " " | लक्ष्मीबाई गोळे, पुणें. | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १७४ | १ चिंतामणराव गणपतराव ” | | ॥ गंगाबाई गोळे, पुणें. | | |
| १७५ | २ ॥ गोपाळराव ” ” द. गे. | | | | |
| १७६ | १ ॥ विनायकराव चिंतामण ” द. गे. | | | | |
| १७७ | २ ॥ विठ्ठलराव ” ” | | सौ. ॥ रमाबाई परांजपे, नेवरें. | | |

## जमखंडी, चिंचणी व तासगांव घराणें.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७८ | १ परशरामभाऊ रामचंद्रराव पटवर्धन. | राधाबाई जोग, तासगांव. | १७४० | १७९९ |
| १७९ | १ रामचंद्रआपा परशराम ” | | १७६१ | १८१३ |
| १८० | २ हरिहरराव ” ” | रमाबाई रास्ते, वांई. सती गेली. | १७६९ | १८१० |
| १८१ | ३ माधवराव ” ” | पार्वतीबाई कोल्हटकर. सती गेली | १७७९ | १८१८ |
| १८२ | ४ गणपतराव ” ” | सावित्रीबाई सोमण, संगमनेर. | १७८५ | १८१९ |
| १८३ | १ गोपाळराव रामचंद्र ” | राधाबाई फडणवीस, पुणें. | १७९९ | १८४० |
| १८४ | १ रामचंद्रआपा गोपाळराव ” द. | गोडबोले, मनोहर, नेने व आपटे. | १८३३ | १८९७ |
| १८५ | १ ॥ परशरामभाऊ रामचंद्र ” | सौ. रमाबाई रास्ते, वांई. सौ. ॥ रमाबाई दामले, पुणें. | १८८३ | |
| १८६ | १ * शंकरराव परशराम ” | | १९०६ | |
| १८७ | १ गोविंदराव माधवराव ” | | | १८३६ |
| १८८ | १ माधवराव गोविंद ” द. | | | १८६९ |
| १८९ | १ हरिहरराव माधवराव ” | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १९० | २ ॥ विनायकराव " | " | | | |
| १९१ | ३ कृष्णराव " | " | राधाबाई फाटक, गणेशवाडी. | | १८९६ |
| १९२ | ४ ॥ सदाशिवराव " | " | | | |
| १९३ | १ ॥ गोपाळराव हरिहर | " | | | |
| १९४ | २ * रामचंद्र " | " | | | |
| १९५ | १ * हरिहर गोपाळ | " | | | |
| १९६ | १ ॥ गणपतराव विनायकराव | " | | | |
| १९७ | २ ॥ शंकरराव " | " | | | |
| १९८ | ३ ॥ चिंतामणराव " | " | | | |
| १९९ | ४ ॥ पांडुरंगराव " | " | | | |
| २०० | १ * व्यंकटेश गणपतराव | " | | | |
| २०१ | २ * गोविंद " | " | | | |
| २०२ | १ ॥ माधवराव कृष्णराव | " द. गे. | | | |
| २०३ | २ ॥ गंगाधरराव " | " | सौ. ॥ इंदिराबाई आपटे, जमखंडी. | १८९१ | |
| २०४ | ३ ॥ निळकंठराव " | " | सौ. ॥ शालिनीबाई दामले, पुणें. | १८९५ | |
| २०५ | १ * गोविंदराव गंगाधर | " | | १९१६ | |
| २०६ | १ * श्रीपाद सदाशिव | " | | | |
| २०७ | १ परशरामभाऊ गणपतराव | " द. | रमाबाई फाटक, रावडी. | १८११ | १८४८ |
| २०८ | १ गणपतराव परशराम | " | ॥ सिद्धीबाई लिमये, सोलापूर. | १८४९ | १८९६ |

| | | | |
|---|---|---|---|
| २०९ | १ ॥ विनायकराव गणपतराव " | सौ. ॥ सरस्वतीबाई गोळे, पुणें. | १८८९ |
| २१० | १ * परशरामभाऊ विनायकराव" | | १९१७ |

## शेडसाळकर घराणें.

| | | | |
|---|---|---|---|
| २११ | १ विनोबा भास्कर पटवर्धन | | |
| २१२ | २ हरबा " " | | |
| २१३ | ३ वासुदेव " " | | |
| २१४ | ४ रामचंद्र " " | | |
| २१५ | १ गणपतराव विनोबा " | | |
| २१६ | २ कृष्णराव " " | | |
| २१७ | ३ पुरुषोत्तम " " | | |
| २१८ | १ गोपाळराव गणपतराव " | | |
| २१९ | २ विष्णुपंत " " | रखमाबाई बिनिवाले, सांगली. | |
| २२० | १ मोरेश्वर गोपाळ " | | |
| २२१ | १ * गणेश मोरेश्वर " | | |
| २२२ | १ चिंतामणराव विष्णुपंत " | सरस्वतीबाई लिमये, कुरुंदवाड. | |
| २२३ | १ गणपतराव चिंतामण " | | |
| २२४ | २ ॥ भालचंद्र " " | | |
| २२५ | ३ * धुंडिराज " " | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २२६ | १ धरणीधर गणपतराव ” | | | | |
| २२७ | १ गोविंदराव कृष्णराव ” | | अन्नपूर्णाबाई आपटे, आजरें. | | |
| २२८ | २ हरिहरराव ” ” | | सत्यभामाबाई परांजपे, इचलकरंजी. | | १८८६ |
| २२९ | ३ विनायकराव ” ” | | सरस्वतीबाई केळकर, सांगली. | | १८८४ |
| २३० | १ ॥ केशवराव गोविंदराव” | द. | सौ. ॥ रमाबाई भोगुले–देसाई पेटलाद | | |
| २३१ | १ * गोविंद केशवराव ” | | | | |
| २३२ | १ ॥ माधवराव हरिहर ” | | सौ. ॥ गिरजाबाई जोग, हावनूर. | १८५३ | |
| २३३ | १ हरिहरराव माधवराव ” | | ॥ आनंदीबाई रानडे, सांगली. | | १९१३ |
| २३४ | १ * त्रिंबक हरिहरराव ” | | | | |
| २३५ | १ ॥ बळवंतराव विनायकराव | | सौ. ॥ राधाबाई खाडिलकर, सांगली | १८५५ | |
| २३६ | २ ॥ केशवराव ” | द. गे. | | | |
| २३७ | १ विनायक पुरुषोत्तम ” | | | | |
| २३८ | १ नारायण ” ” | | | | |
| २३९ | १ ॥ धोंडोपंत विनायक ” | | | | |
| २४० | १ ॥ पुरुषोत्तमपंत नारायण ” | | | | |
| २४१ | १ * नारायण पुरुषोत्तम ” | | | | |
| २४२ | १ निळकंठराव हरबा ” | | | | |
| २४३ | २ विश्वासराव ” ” | | | | |
| २४४ | १ गणपतराव निळकंठ ” | | सरस्वतीबाई लागू. | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २४५ | १ | हरिहरराव गणपतराव | " | | मनूबाई आपटे, मिरज. | | |
| २४६ | १ | ॥ भास्करराव हरिहर | " | | | | |
| २४७ | १ | ॥ निळकंठराव भास्कर | " | | | | |
| २४८ | १ | शिवराव विश्वासराव | " | | उमाबाई. | | |
| २४९ | १ | ॥ गंगाधरराव शिवराव | " | | रुक्मिणीबाई कान्हेरे, कुरुंदवाड. | १८६६ | |
| २५० | १ | ॥ हरि गंगाधर | " | | सौ. ॥ उमाबाई गोडबोले, धारवाड. | १८८७ | |
| २५१ | २ | ॥ भास्कर " | " | | सौ. ॥ लक्ष्मीबाई जोशी, धारवाड. | १८९१ | |
| २५२ | १ | * शिवराव हरि | " | | | १९१२ | |
| २५३ | २ | * गणेश " | " | | | १९१५ | |
| २५४ | १ | माधव वासुदेव | " | द. | | | |
| २५५ | १ | वासुदेव माधव | " | | रामाबाई. | | |
| २५६ | २ | निळकंठ " | " | | | | |
| २५७ | १ | सदाशिव वासुदेव | " | | गिरजाबाई खाडिलकर, मिरज. | | १९१० |
| २५८ | १ | विष्णु सदाशिव | " | | रखमाबाई जोशी, कोल्हापूर. | | १९०३ |
| २५९ | १ | * परशराम विष्णु | " | | | | |
| २६० | १ | ॥ विनायकराव निळकंठ | " | | | | |
| २६१ | २ | ॥ धोंडोपंत " | " | | | | |
| २६२ | ३ | ॥ केशवराव " | " | द. गे. | | | |
| २६३ | १ | ॥ चिंतामण विनायक | " | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २६४ | १ | ॥ हरिहर धोंडो | " | | | | |
| २६५ | २ | ॥ [illegible]श्वर " | " | | | | |
| २६६ | ३ | ॥ वासुदेव " | " | | | | |
| २६७ | १ | * निळकंठ हरिहर | " | | | | |
| २६८ | १ | गोपाळराव रामचंद्र | " | द. | राधाबाई जोशी, गणेशवाडी. | | १९०२ |
| २६९ | १ | ॥ गोविंदराव गोपाळ | " | | सौ. ॥ रमाबाई फडके जमखंडी. | १८७२ | |
| २७० | २ | ॥ वासुदेवराव " | " | | सौ. ॥ आनंदीबाई गोखले. | १८७८ | |
| २७१ | ३ | ॥ हरिपंत " | " | | सौ. ॥ पार्वतीबाई आपटे, जमखंडी. | १८८४ | |
| २७२ | १ | * रघुनाथ गोविंद | " | | | १९०४ | |
| २७३ | २ | * विष्णु " | " | | | १९१० | |
| २७४ | ३ | * कृष्ण " | " | | | १९१५ | |
| २७५ | १ | * गणेश वासुदेव | " | | | १९१६ | |
| २७६ | २ | * नारायण " | " | | | १९१७ | |
| २७७ | १ | * भास्कर हरि | " | | | १९१३ | |

देवालयाचे सभोंवारच्या वस्तीचा भाग इतका उंच झाला आहे. रामचंद्रपंतआपा प्रथम ज्यावेळीं जमखंडी येथें रहावयास आले तेव्हां जमखंडीचे किल्ल्याचा अधिकारी भास्करनाना सखदेव यांचा मुलगा पांडोबा हा किल्ला स्वाधीन करीना. तेव्हां आपासाहेबांस अशा उर्मट नोकराचा फार राग आला आणि आपासाहेबांनीं किल्ल्यावर तोफांचा मारा करून स्वतः चाल करून गेले. आपला आतां निभाव लागणें कठीण असें समजून तो पांडोबा किल्ला सोडून आपासाहेबांस शरण आला आणि जीवदान द्यावें अशी प्रार्थना करूं लागला. आपासाहेबांनीं त्याच्या इमानी वडिलाकडे पाहून ते त्याला ह्मणाले, " जा, पुन्हा तोंड देखील दाखवूं नको. " असें ह्मणून त्याला सोडून दिलें.

गोपाळरावरावसाहेब यांनीं वयाचे १४ वे वर्षापासूनच राज्यकारभार चालविला. हे खर्चाचे कामीं जरा काटकसर करीत असत. यांनीं आपल्या मातोश्रीची तुळा रुपये घालून केली; तेव्हां त्यांत सोन्याच्या पुतळ्या पांच घातल्या होत्या. जरी खर्चाचे कामांत जरा ते काटकसर करीत तरी ती योग्य वेळीं करीत. रावसाहेब हुषार, दक्ष व मोठे धूर्त होते. यांनीं आपले स्वकीय व आपली प्रजा यांचें उत्तम प्रकारें पालन पोषण करून आनंदांत दिवस घालविले. यांचा उत्तम लौकिक ऐकून, तासगांवकर भाऊसाहेब अज्ञान असतांना तासगांवचे जहागिरीचा राज्यकारभार चालवण्याकरितां इंग्रजसरकारानें तें संस्थान रावसाहेबांच्या स्वाधीन केलें होतें. रावसाहेबांस सर्व कांहीं अनुकूल होतें; परंतु पुत्ररत्न नव्हतें व तें प्राप्त व्हावें अशी त्यांची फार इच्छा होती. रावसाहेबांनीं पूर्व वयांतच दत्तकाची मंजुरी मिळावी ह्मणून सन १८२६ सालीं सरकारास थैली लिहिली. त्याचा जबाब दत्तक घेण्याबद्दल आला. परंतु त्यास जहागिरी चालवूं असें नव्हतें ह्मणून पुन्हा सरकारास थैली पाठविली. दुसऱ्या थैलीचें उत्तरः– " आरावसाहेबांकडून नेक वर्तणूक हरवक्त होत आली व जिनत ( कैलासवासी ) मकान परशरामपंतभाऊसाहेब

यांजकडून सरकार चाकरीचा उपयोग होऊन आला त्याची माहिती आहे. त्यांचे जागीं आपण आहां. याजवर नजर देऊन आपणांस औरस पुत्र नसल्यास दत्तक पुत्राकडे जहागीर बहाल चालविली जाईल." ह्मणून छ. ११ जिलेज सुरु सन आरबा, अशरीन, मयातैन व अलफ, तारीख १७ जुलै सन १८२६ चे नेक नामदार माउंट स्टचूअर्ड एलूफिन्स्टनूसाहेब गव्हर्नर बहादूर यांचेकडून लिहून आलें.

दत्तकाची परवानगी मिळाल्यामुळें सर्वत्रांस आनंद झाला. पुढें सन १८४० त वैशाखमासीं रावसाहेब सर्व सरंजामासुद्धां नहरास (महाबळेश्वरास) गेले होते. तेथें नामदारांच्या मुलाखती झाल्यावर ते परत संस्थानीं आले. प्रवासाच्या त्रासानें किंवा कशानें प्रकृती बिघडली तें समजेना. परंतु दिवसेंदिवस जास्तच प्रकृती बिघडूं लागली. तेव्हां रावसाहेबांनीं पूर्वी ठरलेल्यास दत्तक घेण्यास अवधी नसल्यामुळें, आसंगी येथील अंताजी माधवराव ऊर्फ तात्यासाहेब पटवर्धन यादवाडकर यांचे पुत्र गणप[illegible] ांस ता. १८ नोव्हेंबर सन १८४० रोजीं दत्तक घेतलें. आणि त्याचें नांव रामचंद्रावआपासाहेब असें ठेविलें. हें सर्व कृत्य संपल्यावर रावसाहेबास शक्तिपात झाला. घडोघडीं शक्ति कमी होत चालली व नाडींतही चलबिचल होऊं लागली हें पाहून सर्वत्र घाबरले. श्रीमंत सौ. राधाबाई अस्पर्श असल्यामुळें दूर उभ्या राहून पतिमुखाकडे पहात सारख्या रडूं लागल्या. तें पाहून रावसाहेब म्हणाले, "अग वेडे, रडूं नको. होणार भवितव्य कधीं चुकावयाचें नाहीं. कपाळीं येईल तें भोगलेंच पाहिजे. आतां मुलासह राज्याचा भार हातीं घेऊन, प्रजेचें व पदरच्या मंडळींचें माझ्याप्रमाणेंच उत्तम संरक्षण कर. कदीम चालत आलें आहे त्यांचें कमी करूं नको; कारण पूर्वी यांच्या पूर्वजांनीं आमच्याकरितां रणांगणीं आपलीं शिरें अर्पण केलीं आहेत, हें ध्यानांत आण. त्यांचें कमी केल्यानें, त्यांच्या तळतळाटानें संस्थानास समयीं मोठा अपाय होण्याचा संभव आहे. समजलीस ! आतां रडूं नकोस.